१९५८
म. ग्रं. सं. ठाणें.
विषय निबंध
सं. क्र. २५०२४



REFBK-0022553

# समर्पित

निबंध १वि.५.२८२४

दा.क्र. २२४४३
१५।१२।८८

## मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

**सूचना :—** खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक/मासिक परत करावे, तसे न केल्यास घटना नियम क्र. ५ (८) नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल.

(कृ.मा.प.)

# समर्पित

## श्री अण्णासाहेब टोणगावकर स्मृती

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
REFBK-0022553

संपादन

मंदाकिनी टोणगावकर

प्रमुख विक्रेते

साधना प्रकाशन, पुणे ३०

प्रकाशक :

मंदाकिनी टोणगावकर,
एम्. ए., बी. एड्.
दोंडाइचे, जिल्हा धुळे

३ ऑक्टोबर १९७८, दहावा स्मृतिदिन

मुद्रक :

नाना डेंगळे
साधना प्रेस
४३०–३१ शनिवार पेठ
पुणे ४११ ०३०

© मंदाकिनी टोणगावकर

मुखपृष्ठ : अनिल उपळेकर

किंमत रु. १२

अस्पृश्यता निवारणासाठी
सामाजिक आघाडीवर
शर्थीने झुंजणाऱ्या
लढवैय्यांना
समर्पण

# अनुक्रम


| | |
|---|---|
| शुभेच्छा | १ |
| निवेदन | २ |
| प्रास्ताविक | ४ |
| चित्रावली | ९ |
| जीवनाची वाटचाल | १७ |
| स्मृतिमंजुषा | ७९ |
| अण्णांचे वैचारिक लेख | १५५ |
| काव्यसंपदा | १८७ |

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
२८०२४ थि. मु.
दा. क्र. २२५५३
ग्रंथ शाखा (स्थळ प्रत)

## शुभेच्छा

ॐ

फार उशिरा का होईना, पण स्वोद्धारक गृहाचे, हरिजन कार्याचे आणि अनेक शुभप्रवृत्तींचे प्रेरक कार्यकर्ते कै. टोणगावकर यांचे चरित्र प्रसिद्ध होत आहे, ही अभिनंदनीय गोष्ट आहे. कै. टोणगावकरांचे कार्य त्यांच्या चरित्राद्वारे लोकांपुढे येऊन त्यांना सतत सत्कार्याची प्रेरणा मिळेल याविषयी शंका नाही. अशा चरित्रग्रंथाला शुभेच्छा व्यक्त करून परमेश्वरापाशी प्रार्थना करतो की असे थोर कार्यकर्ते या देशाला लाभोत.

धुळे, दि. १३–९–७७

**शिवाजी न. भावे**
गांधी तत्त्वज्ञान मंदिर

# निवेदन

अनेकांच्या सहकार्याने स्व. रंगनाथ राजाराम टोणगावकर यांचे 'समर्पित' हे जीवन-चरित्र वाचकांच्या हाती देण्यात आनंद होत आहे. चरित्रात त्यांच्या 'अण्णा' या उपनामाचाच वापर केलेला आहे.

सन १९६७ ला श्री. यदुनाथ थत्ते, संपादक साधना, यांनी अण्णांना निर्वाणीची धमकी दिली होती की, त्यांनी अस्पृश्यता निवारण कार्यातील समरप्रसंग चितारणारे पुस्तक लिहावे, अन्यथा ते हरिजन सेवक संघाचे सदस्य होणार नाहीत.

स्व. अण्णांच्या निधनानंतर दि. ११–१०–६८ रोजी धुळे येथे त्यांना श्रद्धांजली अर्पण करण्याकरिता स्वोद्धारक विद्यार्थिगृहाच्या आवारात प्रतिष्ठित नागरिक व निरनिराळ्या सामाजिक संस्थांनी शोकसभा आयोजित केली होती. ह्या सभेस मी उपस्थित रहावे ही सर्वांची इच्छा. त्या सभेत प्रा. सदाशिवराव माळी, धुळे यांनी अण्णांचे चरित्र, लेखन व काव्य प्रसिद्ध झाल्यास नवागत कार्यकर्त्यांना त्याचा खूप लाभ होईल याचा उच्चार केला. मीही या कार्यात सहयोग देण्याचे आश्वासन दिले होते.

सन १९६७–६८ ची महाराष्ट्र हरिजन सेवक संघाची वार्षिक सभा श्री. वि. नी. उपाध्ये यांच्या अध्यक्षतेखाली सेवाग्राम येथे झाली. त्या वेळी अण्णांच्या लेखनाचे संकलन करून पुस्तकरूपाने छापावे असा ठराव झाला. परंतु तदनंतर श्री. उपाध्ये स्वर्गवासी झाले व तो ठरावही दप्तरी तसाच राहिला.

चरित्र वा लेखन संकलित होण्याचा योग श्री. यदुनाथ थत्ते यांच्या प्रभावी प्रेरणेने घडून आला. जेव्हा जेव्हा भेट होई, तेव्हा तेव्हा त्यांचा चरित्राबद्दल धोशा असे.

तरीपण चरित्र लिहावयास मन धजत नव्हते. प्रभावी व्यक्तिमत्व असलेल्यांची चरित्रेसुद्धा वाचली जात नाहीत. वाचकांचा ओढा ललित वाङ्मय वाचण्याकडे जसा असतो तसा चरित्र वाचनाकडे नसतो. तशात ज्या व्यक्तिजीवनाचा फारसा परिचय वाचकांना नसेल त्यांची चरित्रे वाचणे दुरापास्तच!

असे असले तरी ज्यांचे चरित्र लिहिले गेले आहे ते स्वातंत्र्य देवतेचे पाईक होते. समाज-सेवा मार्गातील 'एकला चलो रे' या वृत्तीचे पथिक होते, विद्यार्थ्यांचे जीवन फुलवणारे शिक्षक होते व डोळसपणे संसारी-जीवन व्यतीत करणारे गृहस्थ होते. त्यांच्या चरित्रापासून झाला तर लाभच होईल, हानी होणार नाही हे निश्चित.

'समर्पित' चरित्रातील जीवनाच्या वाटचालीला शब्दरूप देण्यात फार मोठे सहकार्य श्री. य. बा. देशपांडे, दोंडाईचे यांचे आहे. तसेच संपादन कार्यात श्री.

कांतीलाल गुजराथी, संपादक स्वतंत्र भारत, धुळे व प्रा. सदाशिवराव माळी, धुळे यांचे मोलाचे सहकार्य आहे. श्री. कांतीलालजींनी सन १९६७–६८ ची 'दलित-सेवक' या म. ह. सेवक संघाच्या मुखपत्राची फाईलच माझ्या हाती दिली. एवढेच नाही तर सन १९४७ व १९४८ या दोन वर्षांच्या 'स्वतंत्र भारत' वृत्तपत्रांची बुके संदर्भाकरिता माझ्या अवलोकनार्थ दिली.

मिळविलेले साहित्य, अण्णांचे लेख व कविता, व आलेल्या आठवणी यांचा विस्तार फारच पसारा करणारा होता, तेव्हा शक्यतो फोलपट पाखडून सत्त्व असलेला भाग ठेवण्याकरिता श्री. यदुनाथ थत्ते यांनी सौ. अंजली ठकार यांचेवर ही कामगिरी सोपवली, व त्यांनी ती समर्थपणे पार पडली. 'प्रूफ-रीडिंग'च्या कामी माझी भगिनी सौ. वैजयंती दशपुत्रे हिची मदत खूपच झाली.

स्व. अण्णांचा कवितासंग्रह बराच मोठा. मला त्यांच्या काव्याचे मूल्यमापन काव्य-प्रांतातील मान्यवर कवींकडून हवे होते. त्या कामी प्रा. पुरुषोत्तम पाटील, धुळे व श्री. मंगेश पाडगावकर मुंबई, या कविद्वयांनी बहुमूल्य अशी साथ दिली. स्वातंत्र्यकाळातील अण्णांच्या कामगिरीबद्दल मला निश्चित माहिती नव्हती ती अण्णांच्या स्नेह्यांनी दिली. श्री. नवल आनंदा पाटील, नवलनगर, यांनी सन १९४२ च्या लढ्यापूर्वीची हकीगत सांगितली तर प्रत्यक्ष सन १९४२ च्या 'करेंगे या मरेंगे' या स्वातंत्र्य-लढ्याची हकीगत श्री. विनायक उर्फ विष्णुभाऊ सीताराम पाटील, कापडणे ह्यांनी सांगितली. आयुष्यभर अहिंसावादी असलेल्या व म. गांधींची एकादश व्रते पालन करणाऱ्या अण्णांकडून त्या वेळी स्वातंत्र्यप्राप्तीकरिता काही वेगळे घडले असल्यास नकळे!

सेवामार्गावर सदा पायपीट करणाऱ्या स्व. अण्णांच्या द्योतक चित्राने श्री. अनिल उपळेकर यांनी मुखपृष्ठावर साज चढविला आहे. साधना प्रेसचे श्री. श्रीरंग वरेरकर, श्री. गोखले व तेथे काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांनी पुस्तकाची छपाई वेळेवर व सुबक केली.

पुराव्याच्या अभावी अण्णांना 'स्वातंत्र्य-सैनिक' म्हणून राजपत्र मिळाले नाही! गॅझेटेड वॉरंट मला मिळत नव्हते. चरित्राकरिता ते आवश्यक वाटले. अण्णांचे एक शिष्य श्री. बन्सीलाल कुचेरिया, मुंबई यांनी ते मिळविले. अनेकांनी आठवणी पाठवून चरित्राला आभूषित केले. श्री. यदुनाथ थत्ते यांनी चरित्राला पोषक असे प्रास्ताविक लिहिले.

या सर्वांचे ऋण कसे आणि किती मानू? शेवटी मी म्हणेन—

**'फिटायचे का ऋण हे हातून। आनंदाने माथा वाहीन'**

**—मंदाकिनी टोणगावकर**

# प्रास्ताविक

महाराष्ट्रातील अस्पृश्यता निवारणाच्या आघाडीवर शर्थीने झुंजलेल्या मंडळींत श्री. अण्णासाहेब टोणगावकर यांचाही समावेश आहे. त्यांनी स्वतःचे अनुभव संगतवार कधी लिहून ठेवले नाहीत, कारण तेवढी उसंतच त्यांना कधी मिळाली नाही. जीवनाची हाकच अशी उत्कट असे की त्यापुढे लेखन गौण वाटे. त्यांना अचानक मृत्यूने गाठल्याने त्यांचा लिहिण्याचा संकल्प असला तरी तो खंडित अचानकच झाला. पण राहवले नाही तेव्हा त्यांनी स्फुट लेखन केले. जीवनाच्या रणांगणात अहर्निश लढणाऱ्याने लिहिलेले ते लेखनही विखरूनच पडले होते. अशा जीवनवीरांचे लिखाण रांगडे, ओबडधोबड, पण उत्कट असते. कलाकुसर करीत बसायला त्यांना वेळ नसतो. कलात्मक आनंदाचा लाभ जनतेला मिळावा, हा त्यांच्या लेखनामागचा उद्देशही नसतो. कार्य करताना ओसंडून वाहाताना ज्याने शब्दरूप घेतले ते त्यांचे लेखन. जनबोध हा एकच त्यांच्या लेखनाचा हेतू असतो. हे लेखन जीवनात सहज रीतीने उमललेले असते. ह्या लेखनात कालौघाचे प्रतिबिंब पडलेले असते. अशा लिखाणात व्यक्ती आणि समाज यांचे जीवन धागे बेमालूमपणे गुंफलेले असतात. परंतु प्रासंगिक म्हणून अशा लेखनाची बहुधा उपेक्षा होते. अशा लेखक–कार्यकर्त्यांचा स्वभाव संचितावर जगण्याचा नसतो. नित्य नवीन जीवनानुभव घेण्याची अनिवार ओढ त्यांना असते. त्यामुळे ते प्रासंगिक लिखाणाबद्दल फारशी फिकीर करीत नाहीत. मराठी साहित्यातील हे दालन त्यामुळे अतिशय दरिद्री आहे. अण्णासाहेब टोणगावकर यांच्या दहाव्या स्मृतिदिनाच्या निमित्ताने साहित्यातील हे दारिद्र्य दूर करणारे एक पाऊल टाकले जात आहे, ही अत्यंत आनंदाची व समाधानाची गोष्ट आहे. श्रीमती मंदाकिनीबाई टोणगावकर व डॉ. रवींद्र टोणगावकर यांनी मनावर घेतले नसते तर अण्णासाहेबांचे हे देखणे शब्दही एकत्र झाले नसते. श्रीमती मंदाकिनीबाई या अण्णासाहेबांच्या जीवनाच्या जोडीदार. त्यांनी ते क्षण अण्णासाहेबांच्या इतक्याच उत्कटपणे अनुभवलेले. त्यामुळे त्यांनी अत्यंत चिकाटीने सर्व साहित्याचे लेखन संपादन केले आणि त्यातून हे पुस्तक सिद्ध झाले. त्यांना धन्यवाद देणे औपचारिक ठरेल. त्यांनी आपल्या जीवनातील कृतार्थ क्षणांत या निमित्ताने नव्या पिढीला वाटेकरी केले, ही त्यांची कामगिरी विसरता येणार नाही.

महाराष्ट्रातील अस्पृश्यतानिवारणाच्या प्रत्यक्ष कार्याची गंगोत्री महात्मा ज्योतिराव फुले यांच्यापासून सुरू होते. महर्षी विठ्ठल रामजी शिंदे हा प्रवाह बळकट करतात व राजर्षी शाहू महाराज हा प्रवाह संपन्न करतात. प्रा. श्री. म. माटे यांचे कार्यही या

संदर्भात विसरता येणार नाही. पण ही चळवळ बरीचशी शहरांपुरतीच मर्यादित होती. ' भारत खेड्यात वसला आहे ' याचे भान महात्मा गांधींनी प्रथम या देशाला करून दिले. त्यामुळे इथले राजकीय, आर्थिक, सामाजिक आणि सांस्कृतिक प्रश्न सोडवायचे तर त्यांचे ग्रामीण भागातील स्वरूप समजून घेतले पाहिजे, ही जाण गांधीजींनी निर्माण केली. भारतातील खेड्यांचे जीवन तसेच ठेवून होणाऱ्या सर्व सुधारणा ह्या वरपांगी आणि दिखाऊ ठरतील, हे उघडच आहे. त्या ग्रामीण पातळीपर्यंत ह्या सामाजिक प्रश्नांचे लोण पोचवायाचे आणि त्याला अखिल भारतीय पाया देण्याचे काम गांधीजींनी केले. ' विधायक कार्याची परिपूर्ती हीच स्वराज्याची सिद्धी ' अशी जाणीव त्यांनी निर्माण केली आणि विधायक कार्यकर्त्यांची एक खडी फौज त्यांनी उभारली. हरिजन सेवक संघ हे त्या फौजेतील एक पथक होते आणि श्री. अण्णासाहेब टोणगावकर हे त्या पथकातील एक विनीचे शिलेदार होते. हरिजन सेवक संघामार्फत त्यांनी केलेले कार्य हे स्वराज्य संपादनाचे कार्यच त्यांना वाटत होते आणि त्यांचे दर्शन असे व्यापक असल्याने हरिजन सेवेच्या क्षेत्रात विपरीत अनुभव आले तरी निराशेचा स्पर्शही हृदयाला होऊ न देता ते सतत लढत राहिले.

स्वराज्यप्राप्तीपूर्वी हा प्रश्न सुटला पाहिजे, असे गांधीजींना तीव्रपणे वाटत होते. ते स्पष्टच असे म्हणाले होते की, हा प्रश्न स्वराज्यापूर्वी न सुटला तर स्वराज्यातील सत्तेच्या आधाराने तो आणखीनच बिकट आणि गुंतागुंतीचा बनेल आणि त्याची सोडवणूक करणे अवघड होईल. श्री. अण्णासाहेब टोणगावकरांसारखी कितीतरी ज्ञात–अज्ञात माणसे गांधीजींची ह्या प्रश्नाबाबतची उत्कटता जाणून जिद्दीने प्रयत्न करीत होती. पण परिस्थितीच्या दडपणाने भारताला, हा प्रश्न सुटण्यापूर्वीच स्वराज्य मिळाले आणि स्वराज्योत्तरच्या काळातही दोन दशके अण्णासाहेब टोणगावकर ही आघाडी शर्थीने लढवीत राहिले.

महात्मा गांधी आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे याबाबतचे कार्य परस्पर पूरक होते, हे त्या काळात अनेकांना आकलन झाले नाही, कारण दोघे परस्पर विरुद्ध छावण्यांत उभे राहिल्यागत दिसत होते. पण तात्कालिकांचे ते पटल डोळ्यांवरून निग्रहाने दूर करून पाहिले तर ही परस्परपूरकता समजण्याला अडचण पडू नये. माथेफिरू घालवेड्या मंडळींचा अर्थातच याबाबत अपवाद करणे भाग आहे. त्यांचे हितसंबंध ही परस्परपूरकता न ओळखण्यात व लोकांना तिचे भान करून न देण्यात गुंतलेले आहेत आणि समाजपरिवर्तनासाठी हितसंबंधांवर निखारे ठेवण्याची तयारी असावी लागते. शब्दासाठी प्राणपणाने लढण्याचे नाटक वठवायला त्यांची तयारी आहे. ' नावात काय आहे ? ' असे एक प्रसिद्ध वचन आहे, पण नावातच सर्वस्व साठवले असावे, असा त्यांचा आविर्भाव असतो. अखिल भारतात रूढ झालेल्या हरिजन शब्दाचाही त्यांना विटाळ होत असावा, असे त्यांचे बोलणे असते ! श्री. अण्णासाहेब टोणगावकरांसारख्यांनी

केलेले शर्थीचे प्रयत्न समजून घेण्याइतपत समंजस भूमिका ते घेतील तर हा आजचा कार्यहानी करणारा कृत्रिम दुरावा निवळेल आणि जातिवादविरोधी आघाडी बळकट करता येईल. लोकशाहीत जन्मजात अल्पसंख्यकांना आपल्या एकस्याच्या बळावर सामाजिक प्रश्न सोडवता येण्यात अनेक अडथळे असतात. ह्या अडथळ्यांना निकोप मनाने तोंड देण्याचे टाळून आपला शेजारी हाच आपला एक नंबरचा शत्रू मानण्याच्या कौटिलीय सिद्धान्ताला बळी पडण्यामुळे सामाजिक विषमतेच्या पुरस्कर्त्यांशी मुकाबला करणे बिकट होणार आहे, याचे असावे तसे भान आवेशाने पेटलेल्या मंडळींना राहत नाही. पण इतिहास पुसता येत नाही, तो समजून घेण्यातच शहाणपणा असतो.

अस्पृश्यतेचा प्रश्न स्पृश्यांच्या संदर्भातच सुटायचा असल्याने स्पृश्य आणि अस्पृश्य अशा दोन्ही आघाड्यांवर काम करणे क्रमप्राप्त आहे. स्पृश्य-अस्पृश्य अशी संयुक्त आघाडी उभी राहिल्यावाचून हा प्रश्न निकराने लढवताच येणार नाही. महात्मा गांधींमुळे स्पृश्य समाजात विचारपरिवर्तनाची प्रक्रिया गतिमान झाली आणि डॉ. आंबेडकरांमुळे दुबळ्या दलितांत त्राण निर्माण झाले. डॉ. आंबेडकरांच्या नेतृत्वाखाली शंभर टक्के अस्पृश्य संघटित झाले असते किंवा गांधींच्यामुळे शंभर टक्के स्पृश्यांचे विचार बदलले असते तरीही त्यांच्या एकेकट्याच्या कामामुळे आजच्या इतकीदेखील मजल निश्चितच मारता आली नसती, हे उघड आहे. डॉ. आंबेडकर व महात्मा गांधी यांच्या कार्यामुळे चांगल्या-वाईटाबद्दलची नवी सांस्कृतिक जाणीव या समाजात थोडीशी तरी निर्माण झाली, हे मान्यच करावे लागेल. अस्पृश्यता ही एक विपरीत मनोवस्था आहे, ह्याची जाणीव काही प्रमाणात तरी आज समाजात दिसते आहे.

शहरी चळवळींचा कितीही गाजावाजा झाला तरी त्या येगडी चळवळीच आहेत. ग्रामीण भागात नव्या जाणिवा रुजवण्याचे काम या चळवळींच्या बोलघेवड्या घोषणाबाज नेत्यांच्या हातून कधीच होणार नाही. डॉ. बाबा आढावांची 'एक गाव- एक पाणवठा' चळवळ हा गांधी-आंबेडकरांच्या चळवळींचा उन्नत संकर आहे. पाणवठा म्हणजे अनौपचारिक महिला पंचायत. तिथपर्यंत नवा विचार पोचवण्याचे व रुजवण्याचे कार्य स्पृश्यास्पृश्यांना संयुक्तपणे करावे लागणार आहे. अस्पृश्यतानिवारण हा नव-जीवनाचा स्वीकार व्हावयाचा तर हाच एक मार्ग आहे. पळवाटा शोधून हा प्रश्न संपुष्टात आणल्याचा आभास निर्माण करता येईल, पण ह्या पळवाटांची परिणती शेवटी वरळीच्या दंगलींसारख्या प्रकारांत होते, हे विसरता येत नाही. दलितस्थानाची मागणी हा राग व्यक्त करण्याचा एक प्रकार आहे. ती मागणी करणारांनीही त्याचा फार खोलवर विचार केला आहे, असे वाटत नाही. दलितांना स्वसंरक्षणार्थ शस्त्रे देण्याची मागणीही अशीच मूढपणाची आहे. शस्त्रास्त्रांनी दलितांना आत्मरक्षण करता येणार

नाही, कारण त्यांच्यापेक्षा अनेकपट अन्य समाज आहे आणि लोकशाहीत एका विशिष्ट मर्यादेपलीकडे नेतृत्व त्यांना दुखवू शकणार नाही. आत्मरक्षणार्थ शस्त्रास्त्रांची मागणी हा रागाचाच एक प्रकार आहे. त्याच्या शब्दार्थात जाण्यात स्वारस्य नाही.

दलित-हरिजन समाजांतील नेतृत्व आणि स्पृश्य समाजातील नेतृत्व यांच्यांत वैचारिक पातळीवर सामंजस्य निर्माण होण्याची गरज आहे आणि चळवळींना विवेकाचे अधिष्ठान देण्याची गरज आहे. भोंदू आणि ढोंगी समाजात शब्दांनी पटवण्याचा उद्योग निरर्थक ठरतो, असा अनुभव गांधी आणि आंबेडकर दोघांनाही आला होता. ब्रिटिश शिक्षणपद्धतीतून ते तयार झाल्याने तर्कशुद्ध युक्तिवादाने पटवण्याचाच अवकाश की सर्व घडून येईल, अशी दोघांची सुरवातीला भाबडी श्रद्धा होती व त्या दृष्टीने त्यांनी निकराचे प्रयत्नही करून पाहिले. पण तर्कशुद्ध विचार पटवून न घेण्यातच काहींचे हितसंबंध गुंतलेले असतात व शब्दांनी पटवण्याचा उद्योग ते व्यर्थ ठरवतात, हा दोघांनीही अनुभव घेतला. तोंडदेखले पटल्यासारखे दाखवणारांची कसोटीही नवरचना करताना लागते आणि तिला अनेकजण उतरत नाहीत. तेव्हा संघर्ष–शांततामय संघर्ष हाच पटवण्याचा मार्ग उरतो. हे त्या दोघांना जाणवले आणि त्यांच्या जीवनात असे संघर्षाचे प्रसंग दिसतात. मूलतः महात्मा गांधी काय किंवा आंबेडकर काय, नेमस्त वृत्तीचे, पण नेमस्त युक्तिवादांना आत्मक्लेषांतून नवे ओज चढते हे त्यांना समजले होते. आत्मक्लेष हा शब्दांतील सत्यत्वाचा इसार असतो आणि त्यातूनच संघटना उभ्या राहातात.

गांधी–आंबेडकरांच्या जीवनामधून अस्पृश्यतानिवारणाचे एक पंचशील सहज फुलते. डॉ. आंबेडकर आपल्या अनुयायांना सांगत : प्रबोधन करा ( एज्युकेट ), संघटना उभारा ( ऑर्गनाइझ ) आणि संघर्ष करा ( ॲजिटेट ) यालाच परिवर्तन करा ( रिफॉर्म ) आणि एकात्मता साधा ( इंटिग्रेट ). या दोन गांधी तत्त्वांची जोड दिली तर हे पंचशील तयार होते. श्री. अण्णासाहेब टोणगावकर हे ह्या पंचशीलाचे उपासक होते. त्यांच्या-सारख्यांचे विचार आणि कार्य हे एखाद्या पुलासारखे असते. त्यांच्यासंबंधीचे व त्यांच्या लेखनाचे हे पुस्तक अशी जवळीक आणि समजूतदारपणा निर्माण करण्यासाठी उपयोगी ठरेल. सामाजिक विषमतेचा अत्यंत पराकोटीचा प्रकार म्हणजे अस्पृश्यता. त्याचे निरा-करण त्वरेने झाले पाहिजे. आपल्या स्वाधीनच्या गोष्टी करतानाही जर आपण काचकूच करणार असू तर या देशापुढील भवितव्य फार बिकट आहे असे म्हणणे भाग आहे. आधुनिक विज्ञान ' द ओनली वन वर्ल्ड– फक्त एकच जग ' हाच आत्मरक्षणाचा मार्ग म्हणून सांगत असता आम्ही त्याला विसंगत वागून निभाव लागणार नाही.

या संदर्भात साने गुरुजींचा उल्लेख करणे क्रमप्राप्त आहे. साने गुरुजींनी अस्पृश्य-तेच्या अमानुष प्रथेची जाणीव उगवत्या पिढ्यांना करून दिली. महात्मा फुले, महर्षी

शिंदे, प्रा. श्री. म. माटे यांचे कार्य शहर भागातच मुख्यतः झाले. आंबेडकरांनी अस्पृश्य समाजात त्राण निर्माण केले. गांधींनी ग्रामीण भागात नवी जाणीव निर्माण करण्याचा प्रयत्न केला. पण या सर्वांचे कार्य मुख्यतः प्रौढांपाशीच थबकून राहिले. साने गुरुजींनी ते मुलांपर्यंत पोचवले. स्वातंत्र्याच्या उदयकाली पंढरपूरच्या विठ्ठल मंदिराचे दरवाजे सर्वांसाठी खुले व्हावे म्हणून त्यांनी अवघ्या महाराष्ट्रात प्रबोधन–यात्रा केली. कागदोपत्रीचा कायदा पुरेसा नाही, हृदयाचा कायदा हवा, हे त्यांनी परोपरीने सांगितले. माणसाने माणसाशी माणसासारखे वागले पाहिजे, त्यासाठी कोणत्याही धर्मशास्त्रीय आधाराची गरज नाही, हे त्यांनी शिकवले. आणखीही एका व्यक्तीचे येथे स्मरण होते. श्री. अप्पासाहेब पटवर्धन यांना पृथ्वी निःशूद्र करण्याची तळमळ लागली होती आणि त्यासाठी त्यांनी मैलासफाई तर केलीच, पण मृतपशू सोलण्यासाठी हाती रापीदेखील घेतली. संत गाडगे महाराज आणि तुकडोजी महाराजांनीही शाहू महाराजांप्रमाणे अस्पृश्यता-निवारणासाठी देशाच्या ग्रामीण भागात प्रयत्न केले. सेनापती बापटांनी सतत झाडू चालवला. अशा अनेक थोरांनी पाया घातला. मराठवाड्यातील दंगलींनी पुन्हा जाणीव करून दिली आहे की, ह्या प्रश्नाबाबत ढिलाई करून चालणार नाही. श्री. अण्णासाहेब टोणगावकरांच्या ह्या स्मृति–विचारसंग्रहाच्या प्रकाशनाचा उपयोग ही ढिलाई दूर करण्याच्या कामी चांगला होऊ शकेल.

— **यदुनाथ थत्ते**

# चित्रावली



चौघे बंधू



अण्णांचे छोटे कुटुंब परमप्रिय मातृदैवतासह



कायदे अनेक केले तरी त्या कायद्यांचा व्यवहारांत [illegible] उपयोग व्हावा [illegible]
जोपर्यंत समाजाच्या अंतःकरणात त्याचे ठाव घेतला नाही
समाजाच्या हृदयांत [illegible] पालट झाला नाही तोपर्यंत
त्या कायद्याचा काही उपयोग होऊ शकत नाही. म्हणून [illegible]
[illegible]
[illegible]
[illegible] व्हावा.
[illegible]

अण्णांचे हस्ताक्षर



ध्येयसिद्धीसाठी भ्रमंती



महाराष्ट्र प्रांतिक कॉंग्रेस कमिटीतील अण्णा एक सभासद



श्वशुर कुटुंबाचे उजवे हात



नवविवाहित पुत्र-स्नुषेसह

# १ : जीवनाची वाटचाल

## वैशाख वणवा

१९१८–१९१९ चा काळ असावा. धुळे मुक्कामाची ही एक घटना. पांझरा नदी काठ. जवळच प्रसिद्ध नारायण महाराजांचा मठ. प्रशस्त आवार. आवारात बैलगाडी होती. एक विधवा स्त्री, बरोबर चार मुलगे आणि दोन मुलीही. तीन दगड मांडून चूल मांडली होती. ज्वारीच्या भाकरी भाजण्याचे काम चालू होते. लहान मुले जवळच होती. काकींच्या पाठीशी लुडबूड चालू होती. आवारात खेळत होती. मधूनच काकी घाम पुसायच्या. भाकरी भाजली गेली का ? मांडा आला का ? पाहायच्या. पण चेहऱ्यावर मूर्तिमंत चिंता पसरलेली होती.

" भाऊ कसा नाही आला अजून ? " काकींच्या मनाची घालमेल चालू होती.

तेवढ्यात भाऊ दत्त म्हणून पुढे हजर ! काकींच्या चेहऱ्यावर प्रसन्नता आली.

" अरे भाऊ, मिळाली का खोली ? आपल्याला येऊन चार दिवस झाले. किती दिवस उघड्यावर राहणार ? मठाचा आश्रय अधिकाधिक दोन-तीन दिवसांचा. "

" त्याच प्रयत्नात आहे मी काकी ! इथं आपली ना ओळख ना पाळख. डॉ. केळकरांचं नाव सांगतो आणि विचारतो. पण आपल्याला झेपेल अशी भाड्याची खोली मिळवणं फार कठीण ! " भाऊ उत्तरला.

" मग काही यश ? "

" होय काकी. पलीकडेच नदीकाठी एक वाडा आहे. गोऱ्यांचा ! त्यांना हकीकत सांगितली. त्यांच्याही डोळ्यांत पाणी आलं. म्हणाले सामान घेऊन या. खोली देतो. "

" भाडं काय सांगितलं ? "

" दोन रुपये महिना. "

" अरे बाप रे ! "

" दुसरी खोली मिळणं मुष्किल. कष्ट करू, पैसे मिळवू. तू खोली ताब्यात घे. आपण सामान हलवू ! "

यातील भाऊ म्हणजे काकींचा वडील मुलगा. वय फक्त चौदा-पंधरा. पण खांद्यावर मात्र संसाराची धुरा. काकींची वडील मुलगी पंधरा वर्षांची बालविधवा तर सर्वांत धाकटे मूल फक्त सहा महिन्यांचे. ज्यांचे चरित्र आपण पाहत आहोत ते अण्णा या वेळी नऊ-दहा वर्षांचे होते.

अशा या कुटुंबाने सामान बैलगाडीत भरले. गाडी गोऱ्यांच्या वाड्याकडे चालू लागली. वाड्याजवळ थांबली. सामान उतरले गेले.

" मी जाऊ काकी ? " गाडीवान म्हणाला.

" थांब दोन घास खाऊन जा ! "

" बैल, गाडी कुठं ठेवायची ? "

" आम्हांला काय करायची ? याचा उपयोग काय ? "

" मग विकायची का ? "

" नाही बाबा ! तूच घेऊन जा ! तुला उपयोग होईल. तुझी मुलंबाळं सुखी होतील. "

" गाडी-बैलांचे किती पैसे पाठवू ? "

" अरे, इतकी वर्षे तू आमच्याकडे राहिलास; सुख-दुःखात साथ दिलीस. आमची शेती पिकवलीस. तुझ्याच श्रमावर आम्ही जगलो. पैसे कसले विचारतोस ? घेऊन जा तशीच ह्यांची आठवण म्हणून. "

गाडीवानाच्या डोळ्यांत अश्रू तरळले. काकींनीही डोळ्यांना पदर लावला. गाडीवानाने दोन घास खाल्ले. गाडीला बैल जुंपले. जोत आवळले. गाडीवान बसला. जड अंतःकरणाने बैलांना इशारा दिला. गाडी चालू झाली.

## शापभ्रष्ट शेतकरी

अण्णा मूळचे जळगाव जिल्ह्यातील भडगावचे राहणारे. जवळच टोणगाव होते, कोठली होती, तेथे त्यांची वडिलोपार्जित शेती होती. टोणगावचे म्हणून आडनाव टोणगावकर झाले. वडील–राजारामपंत– घरीच शेती करीत. नाक्यावर नोकरीही करीत. कोरडवाहू शेती निसर्गावर अवलंबून.

" भारतातील शेतकरी राजा खरा, पण नुसता नावाचाच, कारण त्याला दारिद्र्यात पिचण्याचा एक शाप आहे अन् तोच माझ्या वडिलांना भोवला. निसर्गाची लहरीनुसार अवकृपा अधूनमधून चाललेलीच असते. कधी ओला दुष्काळ तर कधी सुका दुष्काळ. तशात सर्वांत मोठा अतिथ्यशील शेतकरीच. ऋण काढून तो सण करीत असतो. सावकारी पाशात तो अडकलेला असतो. नियोजन त्याला माहीत नसतं. आपल्या बेहिशोबी वृत्तीमुळे आपल्या कुटुंबाचं उद्ध्वस्त जीवन तो उघड्या डोळ्यांनी पाहत असतो. म झे वडीलही याला अपवाद नव्हते. " अण्णा म्हणत.

ला गोपाठ तीन वर्षे दुष्काळाची गेली. सावकारांकडून कर्ज काढावेच लागले. त्याशिवाय शेती कशी पिकणार ? निसर्गाने कर्ज फेडीला साथ दिलीच नाही. तशात सावकारांवर विश्वास दांडगा. ते लिहून घ्यायचे आणि कुळाने डोळे झाकून सही

करायची. मधून मधून कर्जाची फेड थोडीफार व्हायची, पण त्याची नोंद होत होती का नाही ईश्वर जाणे! कुळाची सही सावकारांकडे. सावकार मात्र चुकून सही देत नसत. घरी हिशेब ठेवणे माहीत नव्हते.

देणे फुगत चालले. व्याजावर व्याज चढत चालले. मुनिमांचे तगादे सुरू झाले. जप्ती आली. कशीबशी परतवली. काही काळ लोटला. पुन्हा तोच प्रकार! असे तीनदा झाले.

अण्णांचे वडील झुकत चालले. अन्न जाईना. त्यांना काही सुचेना. काळजी त्यांना खाऊ लागली. चिंता चितेची पाऊलवाट आहे म्हणतात. काही दिवस गेले.

अन् एके दिवशी हाहाकार उडाला. काकींवर—सीताबाईंवर—माहेरच्या लाडक्या विठाबाईंवर वैधव्याची कुऱ्हाड कोसळली. त्यांचे सौभाग्य-निधान पुसले गेले. अण्णांचे तीर्थरूप वयाच्या बेचाळिसाव्या वर्षी हृदयविकाराने ' ठेविले अनंते तैसेची राहावे ' म्हणत अनंतात विलीन झाले.

वडील मुलगी ताई-बायडी-१५–१६ वर्षांची, पण बालविधवा झालेली. दिसायला सुस्वरूप, बांधेसूद. पण परिस्थितीच्या भोवऱ्यात सापडलेल्या वडिलांनी तिच्यापेक्षा वयाने खूपच मोठ्या असलेल्या तीन सापत्न मुलांची तिला माता बनविली. दुर्दैवाचा आघात असा की पती-पत्नीचे नाते समजण्यापूर्वीच बालवैधव्य तिच्या ' बाराव्या 'ला पुजले गेले. तोही फार मोठा धक्का या कुटुंबाला बसलेलाच होता. धाकटा मुलगा सत्यवान फक्त सहा महिन्यांचा होता. एकूण आईसकट खाणारी लहान-मोठी सात तोंडे. नातेवाईकांची परिस्थिती यथातथाच. एवढ्या मोठ्या कुटुंबाला आधार देण्याचे धैर्य कोणीही दाखवले नाही.

शेती गेली. घर गेले. घराचा आधारस्तंभ कोसळला. पुढे काय ?

" सीता, तू येथे राहून काय करणार ? "

काकींच्या डोळ्यांत अश्रू मावत नव्हते. काही सुचत नव्हते. सकाळचे आहे तर संध्याकाळचे नाही अशी स्थिती. एकेक दिवस कसाबसा लोटला जात होता.

" तू भडगाव सोडावं ! "

" मग कुठं जाऊ ? कोण सहारा देणार ? दोन भाऊ पण दूर देवासला-अन् अशा परिस्थितीत न जाणंच योग्य. आपला भार दुसऱ्यावर कसा घालणार ? "

" कुठं तरी शहरात जा. धुळ्यात माझा मुलगा डॉक्टर आहे. त्याचं साहाय्य घे. तेथे उद्योग मिळेल. हळूहळू जम बसेल. मुलांना शिक्षण दे. मोठं कर. देवच सर्वांचा वाली आहे. तोच तुमचा पाठीराखा. "

डॉ. केळकरांच्या आईने सल्ला दिला. काकींना पटला. पण जायचे कसे ? घरची गाडी होती. बैल होते. गाडीवानाला सांगितले. तोही तयार झाला. गाडीत थोडेफार सामान भरले. केळकरांच्या आईकडेच जेवणे झाली. माउलीने दशम्या दिल्या. मीठ-पीठ दिले. अश्रुपूर्ण नेत्रांनी माउलीचा निरोप घेतला. गाडी चालू लागली.

" काकी, आपण आधी चाळीसगावला बुंदेलखंडांकडे सावकाराकडे जायचं का ? काही मिळतं का पाहू. " काकींच्या वडील मुलाने—भाऊने विचारले.

काकींनी होकार भरला व गाडी चाळीसगावी चालू लागली. संकट एकटे दुकटे कधीच येत नसते. दुर्दैवाच्या फेऱ्यात सापडलेल्याच्या भोवती तर अनेक संकटे फेर धरून नाचत असतात व त्याला अधिकाधिक भेडसावून नाशाच्या खाईत लोटण्याचा प्रयत्न करतात, अन् तसेच झाले. गाडीत अण्णांना ताप भरला. प्लेगचे दिवस. चाळीसगाव येईपर्यंत लहानगे अण्णा तापाने फणफणले. मंडळी चाळीसगावी दत्तमंदिरात येऊन पोचली. तापाची कुणकुण कोणाला लागली असेल, काहीजण तपासास आले.

" अण्णा, तू काही वेळ न निजता थोडा बसून राहा बरं बाळ ! कोणाला तुझं अंथरुण दिसलं तर आपल्याला कोणत्या दिव्यातून जावं लागेल न कळे ! " काकी भरल्या आवाजानं म्हणाल्या.

" काकी, तू काळजी करू नकोस, माझं दुखणं मी कोणालाच कळू देणार नाही. " अण्णा निर्धारानं म्हणाले. वयाच्या ९ व्या १० व्या वर्षीच अण्णा धैर्याचे मेरू होते; हे त्यांनी दाखवून दिले.

तपासनीस आले. वरवर पाहून निघून गेले. मात्र रात्री अण्णा तापाने बेहोश झाले ! गळ्याच्या डाव्या बाजूला मानेवर मोठी गाठ दिसू लागली. बेहोशीत बडबड करीत आपल्या माउलीला धीर देत होते. माउली तर असहाय्य होती. आकाशच फाटले होते. भाऊ कोटलीला पाटलाकडे गेले. त्यांनी एक कसलासा कंद व पांढरी मुळी दिली. राम म्हणू पाहणाऱ्या अण्णांना आराम पडला. अण्णांनी पुढे सबंध आयुष्यभर 'आराम हराम है ' हे तत्त्व जोपासले.

दिवसामागून दिवस जात होते. काकींनी स्वयंपाकाची चाकरी धरली. मोठे भाऊ जगन्नाथपंत बुद्धीने तल्लख. त्यांनी टेक्निकल् स्कूल — त्या वेळची सुतारी शाळा— मध्ये प्रवेश घेतला. जवळच असलेल्या ट्रेनिंग स्कूलच्या बोर्डिंगमध्ये वाढप्याचे काम स्वीकारले. ज्याच्याजवळ सर्व पुस्तके आहेत अशा मित्राशी मैत्री जोडली. त्याच्याकडे अभ्यास करू लागले. मित्र झोपला म्हणजे यांचा अभ्यास सुरू. पुढे धुळ्याच्या प्रताप मिलच्या इंजिनिअरिंगच्या विभागात लागले. त्यांची प्रगतीची घोडदौड सुरू झाली. प्रोबेशन इंजिनिअरिंगच्या परीक्षा दिल्या. धुळे जिल्ह्यात प्रथम वर्गात प्रथम आले.

दुसरे बंधू दिनकरपंत यांची शालेय प्रगती फारशी नव्हती.

" काकी, तुमच्या दिनूला अमळनेरला मिलमध्ये पाठवा. मी लावतो त्याची व्यवस्था. "

" जशी तुमची इच्छा. "

काकी आणि त्यांचा पुतण्या बाळाभाऊ यांच्यातील हा संवाद. आणि खरेच दिनकरदादा कशीबशी चौथी इयत्ता पूर्ण करून अमळनेरच्या प्रताप मिलमध्ये वीव्हिंग खात्यात वयाच्या चौदाव्या वर्षीच काम करू लागले. शिक्षण तेथेच थांबले. पोटापाण्याचा

उद्योग सुरू झाला. सुरुवातीला ॲप्रेंटिस म्हणून बेताचेच वेतन. शिक्षणाच्या अभावी दिनकरदादांची प्रगती झालीच नाही. शेवटपर्यंत मिलमध्ये साचे चालविण्याचेच काम त्यांनी केले.

अण्णा माधुकरी मागून आणीत— ते काही वेळेला गंमत सांगत. " माधुकरी मागण्यासाठी सोवळ्याची रेशमी लंगोटी लावूनच जावे लागे. माधुकरी आणीपर्यंत शाळेची वेळ झालेली असे. तसेच खाऊन वा उपाशीपोटी पळत पळत शाळा गाठावी लागे. दुसरी लंगोटी बदललेली नसे. मुले हसत. माझ्या कमरेला लंगोटी सन १९२१ ला स्वोद्धारक विद्यार्थी संस्थेत प्रवेश करीपर्यंत होती. नानांनी ( कै. द. के. देशपांडे ) मला पहिली चड्डी नेसवली. कशी घालावी हे शिकविले. "

## संकल्पांचे बीजारोपण

अण्णांच्या मनावर बालपणीच परिस्थितीचे फार खोलवर परिणाम झाले होते. शिक्षणाच्या अभावी दैना होते म्हणून शिक्षण प्रसार केलाच पाहिजे; गरिबांना औषधोपचाराभावी मृत्यूला कवटाळावे लागते, म्हणून स्वतः वैद्यकी शिकून अशा रुग्णांची व्यवस्था करावी असेही विचार अण्णांच्या मनात घोळू लागले. परिस्थिती माणसाचा मोठा गुरू. अण्णा धुळ्यातील प्रसिद्ध पावलेल्या डॉ. राजाभाऊ देशपांडे यांच्या दवाखान्यात जाऊ लागले. वैद्यकी शिकावी ही इच्छा; कारण अण्णांना मामांचे छत्र फार दिवस लाभले नव्हते तरी दोन्ही मामा वैद्यकी करीत. काकीही स्वतः प्रसूती करण्यात तरबेज होत्या. शिवाय त्यांना काही मंत्र येत असत. बऱ्याच लोकांचा त्यावर विश्वास होता. ' तुमच्या मंत्रानं आम्हाला बरं वाटलं. ' असे म्हणणारी अनेक मंडळी असत.

शिक्षण, वैद्यकी याच्याचबरोबर काही सामाजिक, विधायक कामांची बीजे याच काळात अण्णांच्या मनात रुजली. पुढे अण्णा आणि त्यांची मित्रमंडळी यांनी ' जरठ-बाला-विवाह विध्वंसक संस्था ' काढली होती, त्याचे मूळ अण्णांच्या बहिणीच्या बाल-वैधव्यात होते. ते पुनर्विवाहाचे पुरस्कर्ते होते.

हिशेबी वृत्ती, नियोजन, कर्ज न काढण्याचा निर्धार याच काळात रुजला. अण्णांच्या आयुष्यात त्यांनी मुलाला एक्स-रे मशीन घेताना कर्ज काढण्यास प्रथम परवानगी दिली. कारण ते मानवसेवेकरिता घेतलेले आवश्यक कर्ज होते.

शेतकी शिक्षणाने व आधुनिक प्रयोगांनी शेतीच्या उत्पादन वाढीस मदत होईल याचे छोटेसे बीज याच वेळी रुजू घातले गेले. वडिलांचा बेहिशेबी व परंपरागत शेती करणारा कारभारच आपल्या आईला भोवला व भरल्या घरा-दारातील, भरल्या हाताची बाई दुसऱ्याच्या दारोदार पोटापाण्यासाठी फिरू लागली याचे दुःख त्यांना याच वेळी

जाणवले व त्यातूनच पुढे स्वोद्धारक विद्यार्थी संस्थेत शेतीत प्रयोग करून शास्त्रशुद्ध शेतकी शिक्षण देण्याची व्यवस्था अण्णांनी केली.

भारतातील जनतेला दारिद्र्यात होरपळावे लागते याला मूळ कारण पारतंत्र्य होय असे अण्णांच्या मनावर बिंबले गेले व कुमारवयातच देशभक्तीकडे त्यांचे मन वळले.

अशा रीतीने ज्या वयात खावे, प्यावे, नुसते हुंदडावे त्या वयात अण्णांची जीवनवेल दारिद्र्यरूपी वैशाख वणव्याने पार होरपळून निघाली. परंतु त्याचमुळे त्यांची मनोभूमी सुविचारांना पोषक अशी तयार झाली. परिस्थितीने रंजल्या–गांजलेल्यांचा विचार त्यांच्या रोमरोमांत भरला.

## उद्धरेदात्मनात्मानम्

"श्री. अण्णासाहेबांनी 'स्वोद्धारक विद्यार्थी गृह' आणि 'महाराष्ट्र हरिजन सेवक संघ' ह्या दोन्ही संस्थांची भरीव सेवा केली आहे. त्यामुळे त्यांच्या आत्म्यास शांती मिळेलच ह्यात शंका नाही. त्यांनी तरुणांना सेवेचे उदाहरण घालून दिले आहे."

—पू. बाळूभाई मेहता

अण्णांच्या निधनानंतर पू. बाळूभाईंनी डॉ. रवींद्राच्या – अण्णांच्या पुत्राच्या– पत्रात जो दोन संस्थांच्या भरीव सेवेचा उल्लेख केला आहे त्यांतील पहिल्या संस्थेने म्हणजे स्वोद्धारक विद्यार्थी संस्थेने अण्णांना घडविले होते व अण्णांनी संस्थेला मोठे केले होते. त्या संस्थेचे आजन्म सेवक कै. दत्तात्रय केशव देशपांडे यांनी अण्णांवर प्रेमाचा वर्षाव करून अण्णांच्या मनातील स्फुल्लिंग फुलविले. हा संबंध पुढील-प्रमाणे आला.

अण्णांच्या आईने धुळ्यात येऊन स्वयंपाकाचे काम पत्करले होते व त्यांच्या दोन वडील मुलांनी जीवन चरितार्थाचा आपल्यापुरता का होईना मार्ग शोधला होता. ही हकीकत मागे येऊन गेलीच आहे. अण्णा माधुकरी मागून प्राथमिक शाळेत जात होते.

"काकी, रंगनाथला तरी आता चांगले शिकू द्या !"

"मी कुठं नाही म्हणते. मी बाईमाणूस ! अशी असहाय्य ! परमेश्वर करील ते खरं !"

"परमेश्वरच रंगनाथच्या शिक्षणाचा विचार करतो आहे; आपल्याच गावात एक विद्यार्थी संस्था काढण्याचे विचार एका मास्तरांच्या मनात आले आहेत, त्यांना नाना म्हणतात. दत्तात्रय देशपांडे त्यांचे नाव. गरिबांचे कनवाळू. गरिबीमुळे समाजातील होतकरू मुलांचे शिक्षण होत नाही अशा मुलांच्यासाठीच ही संस्था काढण्याचे घाटत

आहे. मी करतो तेथे प्रयत्न." काकींकडे आपुलकीने पाहून त्यांची मधूनमधून वास्तपुस्त करणाऱ्या दामोदर वामन भावे गुरुजींचा सल्ला मिळाला.

काकींनी आपल्या १२ वर्षांच्या मुलास संस्थेत पाठविण्यास रुकार दिला.

कै. पू. द. के. देशपांडे यांनी ९ जून १९२१ ला स्वोद्धारक विद्यार्थी गृह सुरू केले. अगदी पहिल्याच दिवशी पहिले विद्यार्थी म्हणून अण्णांना दाखल करण्यात आले. अण्णा आपल्या या संस्थेबद्दल सांगत, "संस्थेला शासकीय अनुदान मिळत नव्हते, तेव्हा संस्था कशी चालवावी ? हा प्रश्न संस्थेने कधी विचारात घेतला नाही. जनता जनार्दनाच्या अनंत हस्तांनी दिलेली मदत घेण्याकरिता समाजपुरुषांनी समाज-कार्याकरिता अंगीकारलेला 'ॐ भवति भिक्षां देही 'चा गुरुमंत्र अंगीकारला, संस्थेचे ध्येय ठरले–उद्धरेदात्मनात्मानम्. जीवनातील मौलिक तत्त्व, स्वतःचा उद्धार स्वतःच करावयाचा. 'जो दुसऱ्यावरी विसंबला त्याचा कार्यभाग बुडाला.' जीवनावरील भाष्य सांगणारे धर्मतत्त्व संस्थेने स्वीकारले; त्यामुळे आमच्या संस्थेचा नामकरण विधी झाला, 'स्वोद्धारक विद्यार्थी संस्था.'"

अण्णा पहिलेच विद्यार्थी. त्यांच्या शिक्षणाची सर्व जबाबदारी संस्थेने उचलली व अण्णांचा सर्वांगीण विकास केला. अण्णांनीही या संस्थेच्या उन्नतीसाठी आपले तन-मन-धन लावले. ही संस्था जातिविरहित होती. त्यामुळे या संस्थेकडे सर्व आकृष्ट होत; त्यामुळे थोरामोठ्यांच्या भेटी होत. त्यांचे सुविचार ऐकावयास मिळत, व संस्थेला चांगले अभिप्रायही मिळत, त्यांतील काही निवडक पुढीलप्रमाणे :

'इस संस्थाका आदर्श अच्छा है।'

— **महात्मा गांधी**

'राष्ट्रसंघटनेस अशा संस्था आवश्यक आहेत.'

— **ग. वि. मावळंकर**

'सर्वांनी मदत करण्यास योग्य अशी ही संस्था आहे.'

— **बॅरिस्टर वि. दा. सावरकर**

'अशी संस्था प्रत्येक शहरात पाहिजे. दास्यातून व जातीयवादातून मुक्त होण्यास अशा संस्था मदत करतात.'

— **लक्ष्मणशास्त्री**

'स्वोद्धारक संस्थेचे कार्य व शाखा इतक्या दीर्घ मुदतीपासून व इतक्या संघटित व परिणामकारक पद्धतीने चालवलेल्या आहेत की, आता त्याला माझ्यासारख्या घटकाभर पाहून जाणाऱ्याच्या प्रमाणपत्रांची आवश्यकता राहिली नाही.'

— **अप्पासाहेब पटवर्धन**

कै. पू. सानेगुरुजी जर धुळ्यास वा दोंडाइच्यास आले तर स्वोद्धारक विद्यार्थी संस्थेत आल्याविना राहत नसत. पू. विनोबा भावेही दोंडाइच्यास स्वो. वि. संस्थेत येऊन गेले होते. त्यांच्या वास्तव्यात विद्यार्थ्यांकरिता बौद्धिके झाली होती.

या सर्व राष्ट्रप्रेमाने भारावलेल्यांची बौद्धिके विद्यार्थ्यांना ऐकावयास मिळत; त्यांच्यावर संस्कार घडत. अण्णा पुढे नेहमी म्हणत, " आमची संस्था ' राष्ट्रीय शाळा ' म्हणून संबोधली जाऊ लागली. सन १९२७ मध्ये गांधीजींचे आगमन झाल्यावर तर जवळजवळ सर्वच विद्यार्थी खादीधारी बनले व सर्वांनी राष्ट्रीय-स्वातंत्र्य-आंदोलनात भाग घेतला. जर स्वातंत्र्याचा इतिहास लिहावयाचा असेल तर स्वोद्धारक विद्यार्थी संस्थेला वगळता येणार नाही. "

अशा या संस्थेत अण्णांचा प्रवेश त्यांचा सर्वच जीवनप्रवाह बदलविणारा ठरला. अण्णांच्या पाठोपाठ श्री. नवल आनंदा पाटील, काशीनाथ सीताराम पाठक [ सध्या शिर्डी येथे असलेले कोर्ट-रिसीव्हर ], वासुदेव जोशी, बन्सीधर सीताराम पाठक, श्रीकृष्ण पिसोळकर, दामोदर दशरथ पगार, बाजीराव जोशी असे सात विद्यार्थी संस्थेत दाखल झाले होते.

नंतर साक्रीचे गोपाळराव भोसले, हरिभाऊ उपासनी, डॉ. नारायण विष्णू भावे, ठोंबरे बंधू, ज. ना. जोशी हेही दाखल झाले. जुन्या धुळयात भाड्याच्या घरात प्रथम हे गरीब मुलांचे गृह सुरू झाले. गुरुवर्य नानासाहेब देशपांडे व ना. गो. वैद्य हे व्यवस्था पाहत, हे काम ते विनावेतन करीत. स्वोद्धारकमध्ये शिक्षण घेतलेल्यांपैकी काहींनी पुढे संस्थावाढीकरिता वाहून घेतले, त्या वेळी हाच कित्ता गिरविला. उपजीविकेचे दुसरे साधन असले तर संस्थेत विनावेतन काम करावयाचे वा फार थोड्या वेतनावर –चरितार्थापुरत्या वेतनावर–काम करावयाचे. अण्णांनी तर पुढे सर्वस्वच संस्थेकरिता वाहिले.

१९२१ हे साल भारताच्या इतिहासातील अत्यंत घडामोडीचे. ' स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे, व तो मी मिळवीनच ', ही प्रेरणा देणारे पू. लोकमान्य टिळक दिवंगत झाले होते. स्वातंत्र्य हाती आले नव्हते. याच वेळी देशाची सूत्रे महात्मा गांधींच्या हातांत आली होती. असहकारितेची चळवळ सर्व देशभर सुरू झाली होती. राष्ट्रोन्नतीसाठी पुढारी शहरे सोडून खेड्यापाड्यांकडे वळू लागले होते. ज्याला जे सुचेल त्या मार्गाने प्रत्येकजण राष्ट्रोन्नतीसाठी धडपडत होता.

बहुजन समाजातून शिक्षण प्रसार झाल्याशिवाय राष्ट्रोद्धार होणार नाही. शिक्षण-प्रसार हीच उद्धाराची गुरुकिल्ली होय! दारिद्र्याने गांजलेला, अज्ञानाने व्यापलेला असा खेडोपाडी इतस्ततः पसरलेला विद्यार्थीवर्ग मोठ्या प्रमाणात होता. ज्ञानाची लालसा आहे पण घरात व अवती–भवती अठराविश्वे दारिद्र्य, अशी सामान्यांची परिस्थिती. सकाळचे आहे तर संध्याकाळचे नाही अशा परिस्थितीत कोठले शिक्षण? शिक्षण नाही म्हणजे कोठले संस्कार? कोठली प्रगती?

अशा निराशाजनक परिस्थितीत शिक्षण प्रसाराचे मोलाचे कार्य संस्थेने केले. पुढे अण्णा या ध्येयाने भारावले गेले व त्यांनी प्रेरित होऊन शिक्षणाचे प्रभावी कार्य हाती घेतले. स्वतः संस्थाचालक राष्ट्रप्रेमाने झपाटलेले होते. ते ' आर. एस्. एस्. ' वादी होते, पण विद्यार्थ्यांना कोणत्याही विशिष्ट पक्षाचे धडे न देता राष्ट्रीय वृत्तीची जोपासना

करणारे होते, म्हणूनच त्यांचे विद्यार्थी नवलभाऊ पाटील व अण्णासाहेब टोणगावकर यांनी धुळे जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्षपद भूषविले.

संस्थेने विद्यार्थ्यांच्या शिक्षणाची, भोजनाची तसेच कपडे–पुस्तकांचीही सोय केली. याकरिता लागणारी मदत देणगी रूपाने मिळवावी लागे. शाळांना सुट्टी लागल्यावर स्वतः शिक्षक विद्यार्थ्यांसह खेड्यापाड्यांतून फिरत. त्यांना धान्य रूपाने मदत मिळे. काही वेळेला ही १४–१५ वर्षांची मुलेच प्रचारास निघत. प्रचार पायीच चाले.

## भेदाभेद अमंगळ

अण्णांचे सर्वच मित्र असत. पण त्यात एकरूप झालेले मित्र नवल आनंदा पाटील हे होते. हे दोघे स्वो. वि. संस्थेत राहून मराठी शाळा नं. २ मध्ये ५ वीत शिकत असतानाची घटना.

शाळेची मधली सुट्टी झाली. अण्णा आपल्या या मित्राला घेऊन गावातच असलेल्या आपल्या घरी गेले. भाकरीचा डबा काढला, एक थाळी काढली व दोघे एकत्र जेवण्यास बसले. तेवढ्यात काकी लोकांकडचा स्वयंपाक आटोपून घाम पुशीत पुशीत आल्या.

“ कोण रे हा ? ”

“ मित्र. ”

“ याचे नाव काय ? ”

“ नवल पाटील. ”—

“ पाटील म्हणजे कुणबी, अन् तू नि तो एका थाळीत बसलात ? घर बाटेल ना ? ऊठ, त्याला दुसरी थाळी दे. अन् पुन्हा शिवाशिव करू नकोस घरात. ”

“ पण काकी, त्याच्यात नि माझ्यात काय फरक आहे ग ? तो माझा मित्रच नाही तर भाऊच आहे. तू जर त्याला न् मला एकत्र जेवू देणार नसशील ना, तर मी घरी येणारच नाही ! ”

अण्णा वाढलेल्या ताटावरून उठले व ‘ चल नवल ’ असे म्हणत बाहेर पळून जाऊ लागले. नवलभाऊ म्हणतात, “ मला अगदीच चोरट्यासारखे झाले. मी दोघांचा संवादच ऐकत राहिलो. अण्णांची पाचवी पुजलेल्या मातेला अण्णांच्या स्वभावाची कल्पना होती की हा निग्रही आहे. घरच वर्ज्य करील व मुलाचे म्हणणे तरी कुठे खोटे आहे ? दोघांमध्ये काय फरक आहे ? धर्मरूढी का पुत्रप्रेम ? हा पेच काकींपुढे पडला होता. पण मुलाचे म्हणणे त्यांना पटले. पुत्रप्रेमाचा विजय झाला. त्यांनी अण्णांना हाक मारली. मला म्हणाल्या, ‘ माझे चार मुलगे तसाच तू पाचवा हो ! जेवा एका थाळीत. ’ त्यांच्या डोळ्यांतून अश्रुधारा वाहत होत्या.

१९२१ चा काळ म्हणजे कर्मकांडाचा, धर्मावरील अंधश्रद्धेचा. एक केशवपन झालेली स्त्री, जिच्या उपजीविकेचे साधन, चरितार्थाचे निव्वळ साधन म्हणजे लोकांकडचा स्वयंपाक करणे; जिला बहिष्काराची भीती आहे, आधीच उद्ध्वस्त झालेले जीवन, बहिष्काराने तर पार रसातळाला गेले असते, पण आई पाळीत असलेला धर्म, खरा धर्म नव्हे, ती नुसती रूढी. खरा व्यापक धर्म म्हणजे मानव धर्म होय. जेथे भेदाभेद तेथे अमंगळ होय, हे तत्त्व मुलाने पटविले व आपल्या घरातील जातीयवादाला त्यांच्या वयाच्या बाराव्या वर्षीच तिलांजली दिली. आईनेही विशाल अंतःकरणाने सर्व जातीं-करिता आपल्या घराची कवाडे सताड उघडली. पुढे तर खो. वि. संस्थेतील बँड मास्तर किसन हा अस्पृश्य होता तरी त्यास त्या वाढत व त्याचे उष्टे काढीत. अण्णा ज्ञानेश्वर–एकनाथांचे उदाहरण अशा प्रसंगी देत असत.

"मी माझ्या जीवनात सत्यशोधक चळवळीकडे वळलो असतो व पूर्ण जातीयवादी झालो असतो. परंतु आमच्या खेडेगावी येणाऱ्या पुरोहिताकडून माझ्या शिक्षणाची प्रेरणा वडिलांना मिळाली. 'कुणब्याच्या पोरांनी कशाला शिकायचे ? त्यांचे काम ढोरे चारायचे !' खानदेशात असे बोलले जात होते. पुराणिकांनी खो. वि. संस्थेत पोहोच-विले. अण्णांनी व काकींनी मला जातिवादापासून परावृत्त केले. अण्णा माझ्या जीवनात आले नसते तर मला आजचे भाग्य लाभले नसते." मोकळ्या मनाने नवलभाऊ अण्णांचे ऋण मानतात.

ते दोघे इतके एकरूप झालेले होते की दोघांनाही एकमेकांवाचून करमायचे नाही. एकाच ताटात जेवायचे. दोघांचे कपडे एकच. पुस्तकांचा संच एकच. अण्णांनी नवलभाऊंवर खास कविता केल्या.

**'नवल सुहृद का ? प्रश्न हा कानी येतो ।'**
**'असंख्य असती जरी प्रिय मला जगी मित्र या**
**परि नवल एकला करिसी तूच आनंदि या ।'**
**'तुझ्या संगे केव्हा हसत असतो पोट धरुनी**
**वनामाजी केव्हा फिरत असतो वाट चुकुनी ।'**

'नवल'च्या कवितेवरून नवलभाऊंना आठवण येते त्यांच्या प्रचार कार्याची. १४-१५ वर्षांची ही मुले सुट्टी लागली की पोती घेऊन बाहेर पडत. धान्य, पैसा जे मिळे तो आणीत. त्यापायी या लोकांनी सगळा धुळे जिल्हा सातपुड्यासकट पायदळी तुडवला. काऱ्याकुऱ्यातून, दऱ्याखोऱ्यांतून, डोंगरकपारीतून फिरत. कधी वाट चुकून रानोमाळ फिरत व मुक्कामाला गेल्यावर कोणी जे खावयास देत ते खाऊन मदत आणीत.

या प्रचार कार्यात अण्णा आघाडीचे, मोठे हिमती व हिकमती. प्रचार कार्यातील हे अनुभव अण्णांचे दर्शन घडविणारे असेच आहेत.

एकदा ही मंडळी–अण्णा, नवलभाऊ, हरिभाऊ उपासनी, गोपाळराव भोसले, ठोंबरे आदी–साक्री भागात प्रचाराला गेली. वस्ती विरळ. किर्र्र्ऽझाडी.

" अण्णा, तिकडे जाऊ नको ! "

" का ? "

" तिकडे दाट जंगल आहे. "

" बरं मग ? "

" जंगलात वाघ आहेत. ते माणसांना पकडतात व खातात. "

" छान ! मग तर आम्ही या जंगलातूनच जाणार ! "

" आणि ? " " आणि काय ? वाघ एकालाच पकडेल. तेव्हा वाघ जिवंत माणूस कसा पकडतो, कसा खातो ? हे बाकीच्यांना तरी बघायला मिळेल ! नसेल कोणाची हिंमत तर परता, हा मी चाललो. मीच वाघाला सामोरा जातो. "

अण्णांचे हे उत्तर ऐकून एकच हशा पिकला आणि अण्णा कंपनी निर्भयपणे खरेच त्या जंगलातून निघून गेलीही. नवलभाऊ म्हणाले, " वाघच आम्हाला भिऊन पळाले. "

साक्री तालुक्यात त्यांना धमनार कळगावला जायचे होते. अंधार पडला. " मुक्काम करा. सकाळी जा " असे अण्णांना कोणीतरी सांगितले. कारण अंधारामुळे रस्ता दिसणे मुष्किल.

अण्णांनी ऐकले नाही, " आपण टेकडीवर चढू. मग दिवे दिसतील. दिव्यांच्या रोखाने गेलो की कोठल्यातरी झोपडीत पोहोचू " असे म्हणाले आणि चालूही लागले. भीती त्यांच्या गावीही नव्हती. निर्भयता पाचवीला पूजलेली. इतरांनाही त्यांच्या पाठोपाठ भरकटावे लागले.

नवलभाऊ म्हणतात, " आम्ही जीव मुठीत घेऊन चाललो होतो. पायाखालचा पाचोळा चुर्‌चुर्‌ वाजत होता. त्यातून सरसर इकडून तिकडे काहीतरी पळत होते. एकदाचे कळगावला पोहोचलो."

" कळगावला कसं आलात ? " गोविंद पाटलांनी विचारले.

" कसं म्हणजे ? असेच चालत ! " अण्णा सहजतेने, निर्भयतेने बोलले. आवाजात यत्किंचितही कंप नव्हता.

गोविंद पाटलांना जंगलातील वाघ म्हणत. त्यांना अपरात्री पायी आलेल्या मुलांना पाहून आश्चर्य वाटले. अण्णांची निर्भयता पाहून आपल्यापेक्षा खरा वाघ अण्णाच आहे असे जाणवले. थकलेल्या मुलांचे त्यांनी स्वागत केले.

प्रचार कार्यातला असाच आणखी एक नवलभाऊंनी ऐकवलेला प्रसंग. मुल्हेर भागातील ही घटना ! साल्हेरचा किल्ला सयाजीराव गायकवाडांच्या ताब्यात होता.

तेथील काम आटोपून ही मंडळी मुल्हेरला जायला निघाली. चांगला रस्ता लांबणीचा होता व उभ्या कड्याच्या बाजूने रस्ता जवळचा होता. अण्णा म्हणाले, " आपण या जवळच्या रस्त्याने जाऊ."

" इकडून जाऊ नका. ही मागची बाजू अगदी सरळ आहे. नीट उतरता येत नाही." फौजदारसाहेबांनी सांगितले.

" अण्णांना सरळ मार्ग पटला तर ते कसले अण्णा! ' सरळ मार्गाने तर सगळेच जातात. त्यात कसले वैशिष्ट्य ' असे ते म्हणू लागले. मी, हरिभाऊ, गोपाळराव त्या रस्त्याने जावयास तयार नव्हतो. "

" अरे, भिता काय रे? हिरकणीचा व मावळ्यांचा इतिहास नुसता वाचता? एखादा पडला तर पडला. जे पडतात, तेच चढतात. बोला– ' मराठा गडी यशाचा धनी! ' "

अण्णांच्या पुढे कोणाचीच बोलण्याची टाप नव्हती. सर्व मुकाट निघाले. बरोबर वाटाड्या घेतला. त्याला त्या भागात चालण्याची सवय असल्याने तो भराभरा निघाला.

नवलभाऊ हसत हसत सांगू लागले, " आमचे पाय घसरायला लागले. उभ्या उभ्या आमचे झोक जाऊ लागले. शेवटी पायांतल्या चपला काढल्या; शर्टाने त्यांना गळ्यात बांधले व बसून बसून उतरू लागलो. निम्म्यावर अगदीच थकलो. अण्णांवर रागावू लागलो. मागे परतता येईना. "

" आगे बढो, आगे बढो, " म्हणून अण्णा आम्हाला समजावयास लागले. एकदाचे पायथ्याला पोहोचलो. एकमेकांच्या पाठी थोपटून घेतल्या. मागे वळून त्या उंचच उंच कड्याकडे आ वासून पाहू लागलो.

अण्णा म्हणाले, " आम्ही गड जिंकला, आम्ही गड जिंकला. "

पुढे एक छोटेसे गाव लागले. तेथे गावाच्या नावाची पाटी होती.–वाघांबा पाडा. तेथे गेलो. फक्त एक भिल्लाची झोपडी. झोपडीत खावयासही काही मिळाले नाही. फक्त एक तरट झोपावयास मिळाले. आम्हा शिकलेल्या मुलांना वाटले की, वाघांबा पाडा म्हणजे वाघाशी संबंधित असणार.

" येथे वाघ येतात का? "

" येतात पण येथील पोरं पिटाळून लावतात. " ऐकून मुलांच्या पोटात धस्स झाले.

" अरे येऊ तर दे, आपणही पिटाळून लावू." असे म्हणत असताच अण्णांचे घोरणे देखील सुरू झाले. इतर मुले मात्र भीतीने झोपू शकली नाहीत.

नवलभाऊंच्या आठवणींना जोर चढला होता, " एकदा आम्ही नकाण्याच्या विस्तीर्ण तलावावर सहलीस गेलो."

" केवढा विस्तीर्ण तलाव! पाणी किती अथांग. या तीरावरून त्या तीरावर जाण्याची हिम्मत अजून कोणी दाखविली नाही. " कोणीतरी पुटपुटले.

" त्यात काय कठीण आहे ? मी जाऊन दाखवतो त्या तीरावर ' अण्णांनी आव्हान स्वीकारले.

" नको रे, रंगनाथ! या तलावात काटे फार आहेत व जलदेवता एखाद्याचा बळी घेते येथे ! "

असे ऐकले न ऐकले तोच रंगाने झेप घेतली आणि पैलतीरावर पोहोचले. तेथून हात हालवून ' सब कुछ ठीक है । 'चा इशारा दिला व त्याच दमात परतलेही.

" गिरणामाईने त्यांना लहानपणापासूनच पोहण्यात तरबेज केले होते. एकदा तर आम्ही धुळयाच्या पांझरा नदीत पुरात उड्या टाकल्या होत्या. पाण्याच्या वेगाने आम्ही वाहू लागलो पण कसेबसे तीराला लागलो. एकदा आमच्या प्रचार कार्यात आम्ही तापी नदीच्या परिसरात गेलो. आम्हाला पाणी काढण्याकरिता बादली हवी होती. तेथील आड ( विहीर ) २००/२५० फूट खोल असतात. एका म्हाताऱ्या बाईने आम्हाला मुष्किलीने बादली दिली. मुलांकडून ती विहिरीत पडल्यावर त्या बाईने खूप त्रागा सुरू केला, अपशब्द बोलण्यास सुरवात केली. अण्णांना सहन झाले नाही. त्यांनी विहिरीत उडी मारली. तो गाव तेथे गोळा झाला. पाणी स्थिर झाल्यावर सर्वांना खूप हळहळ वाटली की मुलगा मेला. पण थोड्या वेळाने अण्णा बादली घेऊन पृष्ठभागावर आले, लोकांनी नाडा ( मोठा दोर ) विहिरीत सोडला, त्याला धरून ते वर आले. लोक म्हणाले, ' डाळ-भात्या नाही, शूर आहे. ' डाळ-भात्या हे ब्राह्मण मुलांना चिडविले जाई व कमकुवत असल्याची ती पावती असे. पण अण्णांनी ती पावती फाडली. "

## सारे काही देशासाठी

अण्णा पोहण्यात पटाईत होते तसेच लाठी-काठीतही ते पटाईत होते. हुतूतू, खोखो, फुटबॉलमध्येही त्यांनी यश मिळविले होते. व्यायाम आयुष्यात कधी चुकविला नाही. म्हणायचे, "स्वातंत्र्यप्राप्तीकरिता या सर्वांची आवश्यकता आहे." अण्णा जोर, बैठका, नमस्कार, आसने इतकी करीत की, घामाने ओथंबल्यावर त्यांची एक आकृती जमिनीवर तयार होई. ' आता खरा व्यायाम झाला ' अण्णा म्हणत. तारुण्यात त्यांचे शरीर पोलादी बनलेले होते. त्यामुळेच शिरोड्याच्या सत्याग्रहात पडलेल्या लाठ्या त्यांनी सहज पचविल्या.

## आर्योद्धारक मंडळ

स्वोद्धारक विद्यार्थी गृहात विद्यार्थीदशेत अण्णा कधी स्वस्थ बसले नाहीत. तेथील

बालचमूंचे अण्णा म्होरके. त्यांनी आपल्या मित्रमंडळींना लाठी-काठीचे शिक्षण दिले. त्यांच्या व्यायाम शिक्षकाकडून नित्सुरे गुरुजींकडून, हे शिक्षण मिळाले. आपल्या मित्रांची एक टोळी अण्णांनी तयार केली. व आर्योद्धारक मंडळाची; स्थापना केली. मुख्यतः निरनिराळ्या धार्मिक उत्सवांतून, यात्रेतून त्यांची कामे चालत. धुळ्याच्या एकवीरा देवीची चैत्रात मोठी यात्रा भरे. सज्जनांबरोबर दुर्जनही असत. मिशनरी लोकांचे मोठाले स्टॉल्स असत. त्यांची आपल्या धर्माची महती गाणारी प्रवचने चालत व एखाद-दुसरे चुकार कोकरू कळपातून ओढून आपल्या कळपात आणण्याचा प्रयत्न चाले. अशा रीतीने आपला ‘ आर्य धर्म ’ धोक्यात आहे असे वाटून अण्णांनी त्यांना विरोध करण्याकरिता आर्योद्धारक मंडळ काढले.

नवलभाऊंना ही आठवण सांगताना पोट धरून हसायला येत होते. “ मिशनऱ्यांचे प्रवचन सुरू झाले की, अण्णा त्यांच्याचसमोर एखाद्या उंचवट्यावर जाऊन उभा राही. अण्णांनी रचलेली कवनं पहाडी आवाज असलेली मुले म्हणावयास सुरवात करीत. उदा. –

## हिंदभूमीची हाक

**कधि नेशि रे पूर्णत्वा मम आशा। तोडुनिया परकीय पाशा।**
**तू हकली रे गोऱ्यांना परदेशा। गुंडाळुनी त्यांचा गाशा।**
**हे झाले रे कारण माझ्या नाशा। नेउनिया द्रव्य स्वदेशा।**
**तू उतरी रे यांचा आता नक्षा। देउनिया तयांना शिक्षा ।**
**ही समृद्धि नसे रे घाला।**
**येऊनिया लुटति ते मजला।**
**खावया नसे मम बाळा।**
**परि यांचा चाले चाळा।**
**कधी थांबविसी जगी आपल्या ऱ्हासा। तोडुनिया परकीय पाशा ॥ १ ॥**

अशा प्रकारच्या कवनांनंतर लोकांची गर्दी जमली की गाणे थांबे. अण्णांचे प्रवचन सुरू होई. त्यात मिशनऱ्यांच्या मोहाला बळी न पडण्याबद्दल लोकांना कळकळीची विनंती केली जाई. गंमत अशी होई की मिशनऱ्यांबद्दल मनात आधीच धाकधुक असलेली मंडळी मोठ्या जमावाने आमच्या भोवती जमत. अण्णांचे झाले की माझे प्रवचन होई.

आर्य धर्म श्रेष्ठ आहे, तो लयाला जाता कामा नये, ही आमची भावना. अण्णांच्या सुपीक डोक्यातून ‘ आर्योद्धारक मंडळ ’ हे आमच्या मंडळाचे नामकरण तयार झाले होते.

यात्रेतून दुसरी एक कामगिरी असे. खादीचा पांढरा शुभ्र, अर्ध्या बाह्यांचा, टोपगे असलेले दोन खिसे असलेला शर्ट, पांढरीच हाफ् पँट, पायात चपला व डोकीला गांधी टोपी असा आमचा पोशाख असे. अण्णा आम्हाला जन-जमावातून विखरून काम करण्यास सांगे. स्काउटची सर्व कामे तेथे हाताळली जात. अंधळ्या-पांगळ्यांना, चुकलेल्यांना मदत करणे वगैरे. पण प्रामुख्याने गुंडांवर वचक ठेवण्याचे काम आम्ही करीत असू. एखाद्या बाईला गुंड धक्का मारतो आहे किंवा जाणूनबुजून रेटतो आहे असे दिसले तर आमची जाणीव करून देण्याकरिता लाठीचा एक रट्टा दिला जाई व त्याच वेळी आमच्या तोंडातील शिट्टीने इशाराही दिला जाई. त्या वेळी त्या रोखाने सर्व जमत, हेतू हा की गुंडांचे साथीदार जमले तर अण्णांच्याच शब्दांत ' हम भी कुछ कम नहीं । ' हे दाखवावे लागे. अण्णा इतक्या जोरात लाठी फिरवीत की त्यांच्या काठीचा वचक सर्वांना वाटे.

## जरठ बाला विवाह विध्वंसक मंडळ

आर्योद्धारक मंडळाच्या जोडीलाच आम्ही मित्र मंडळींनी ' जरठ-बाला विवाह विध्वंसक मंडळा 'चीही स्थापना केली होती. अण्णांवर त्यांच्या वडील बहिणीचे बाल-वैधव्य खोलवर परिणाम करवून गेले होते. या मंडळाची कामगिरी अण्णा, हरिभाऊ उपासनी व आबासाहेब ज. ना. जोशी आदींनी स्वीकारली होती व त्यांचे प्रयोगही सुरू केले होते. जरठ वराला पत्र पाठवून ' हा विवाह ठरला तर आमच्याशी तुम्हास तोंड द्यावे लागेल. आम्ही वर्तमानपत्रांत ही बातमी देऊ ' अशी धमकी दिली जाई, कधीकधी प्रत्यक्ष भेटून सामोपचाराने मिटविण्याचा प्रयत्न होई.

अण्णांचे असे अनेक प्रयोग चालत व कोणी शंका व्यक्त केली की हे शक्य होईल का ? तर ताडकन अण्णा उत्तरत,

' केल्याने होत आहे रे, आधी केलेचि पाहिजे. '

## नाटकातून प्रेरणा

अण्णा केव्हा केव्हा लहानपणच्या आठवणी सांगत, " साधारणतः सन १९२४–२५ ला धुळ्यात बालगंधर्वांची नाटकं येत, आम्हाला नाटक पाहणं परवडत नव्हतं, पण मी एक युक्ती काढली. आम्ही छोटे छोटे डबे तयार करवून घेतले, – स्वोद्धारक विद्यार्थी गृहाला सढळ हाताने मदत करा – असे हस्तलिखित पत्रकही तयार करवून घेतले. आम्ही धुळे शहरात मदत गोळा करण्यास फिरत असू त्यामुळे बहुतेक उच्च-भ्रू

वर्ग आम्हांला व संस्थेला चांगला ओळखू लागला होता. याचाच फायदा आम्हाला झाला. थिएटरमध्ये आम्हास प्रवेश मिळे, प्रकाश असेपर्यंत मदत गोळा करावी व अंधार झाला की जसे जमेल तसे कधी उभ्याने, कधी बसून नाटक पाहावे. बालगंधर्वांच्या सुरेल रागदारीचा आस्वाद घ्यावा. आमचे ते वय संस्कारक्षम होते, त्यामुळे या नाटकातील काही संस्कारही घ्यावे. विशेषत: 'कीचकवध' पाहिला की, आमच्या शत्रूला भीमाप्रमाणेच आम्ही हरवू असे ठरवून भीमासारखे महापराक्रमी होण्यासाठी, बलवान बनण्याकरिता अधिक व्यायाम करावयास आम्ही सुरवात केली. व्यायामानंतर दूध हवेच असे सर्वजण म्हणत.

## दुधाकरिता दळण

तो काळ गांधीवादाने भारावलेला होता, त्यामुळे चक्कीपेक्षा हातचे पीठ सर्वांना लागे. मी रोज पहाटे उठून एक शेर तरी दळण दळत असे व त्या पैशांचे दूध आणीत असे. जाते स्वोद्धारक विद्यार्थी गृहातच ठेवले होते. पुढे विसापूर जेलमध्ये मला दळण दळण्याची शिक्षा झाली त्याची ही नांदीच होती.

'देवलांची शारदा' पाहिल्यानंतर तर आमचे बाहू वृद्ध नवरदेवांना बोहल्यावरून खाली खेचण्याकरिता स्फुरण पावू लागले. त्यातूनच आम्ही मित्रमंडळींनी 'जरठ-बाला-विवाह-भंजक (विध्वंसक) मंडळ' स्थापले. पण या मंडळाची प्रगती फारशी झाली नाही. कारण नंतर आमचा एक पाय तुरुंगात व एक पाय बाहेर राहू लागला.

नाटक साधारणत: २॥–३ ला सुटे. त्या वेळी पांझरा नदीच्या पुलावर पिशाच्चांची मुंडकी फिरतात असा एक लोकभ्रम होता. काही काही वेळेला तर मी एकटाच नाटकाला गेलेला असे, तेव्हा पुलाच्या या टोकाशी आलो की, राम राम करीत मागे वळून न पाहता त्या टोकापर्यंत धूम ठोकत असे व मग शांत उभे राहून मुंडके दिसते का ? हे पाहू लागे व मी स्वत:शीच हसत सुटे.

## अन्नदाता सुखी भव

स्वो. वि. संस्थेच्या विद्यार्थ्यांना त्यांच्या परिस्थितीमुळे जर कोणी हीन मानू लागले तर अण्णा त्याला धडा शिकविल्याशिवाय राहत नसत. चातुर्मासात एका बाईंनी नियम धरला की ठराविक वारी बटूला जेवावयास घालावयाचे. अशी मुले मोजकी होती. एकदा जेऊन आलेला मुलगा पुन्हा पाळी आली तर जावयास तयार होईना. अण्णांनी कारण विचारले,– "त्या बाई दोन-तीन पोळ्यांची कणीक भिजवितात, आपल्याला

समोरच जेवावयास बसवितात व चतकोर अर्धी पोळी वाढतानाच 'बाळ, आणखी वाढू का ?' विचारतात. आपल्यालाच जेवायची लाज वाटते. भुकेने कडकडलेले आपण उपाशीच उठतो. गृहातही आपल्याला त्या दिवशी जेवण मिळत नाही." अंतरीचे दुःख उगाळले गेले.

"बरं तर ! आज मीच जातो. पुण्य जोडू पाहणारांनी ही जी थट्टा आरंभली आहे त्याला उत्तर मिळालेच पाहिजे." अण्णा पुटपुटले.

"बाळ, आणखी वाढू का ?"

"होय मावशी."

मावशीला खमंग भाचा मिळाला होता. मिळमिळीत दिसत नव्हता. अक्षरशः त्यांनी तीनदा कणीक भिजविली. सगळ्या पोळ्या फस्त. एखादा बकासूर याच्या पोटात आहे की काय अशीही शंका मावशींना येऊन गेली.

"मावशी आम्ही तरुण मुलं. श्रमही खूप करतो. आमचे हे वाढते वय. घरांतून राहणारी मुलं व गरीब परिस्थितीतील वसतिगृहांतून राहणारी मुलं यांच्यात फरक असतो. मधल्या वेळेला इतर खाणे इतरांना मिळते, तसे आम्हाला मिळत नाही. पानावर बसल्यावर पोटभर जेवण मिळालेच पाहिजे. अन्नदाता सुखी भव, तेव्हाच म्हटले जाईल."

मावशी खजील झाल्या होत्या. पण आतापर्यंत असा उजेड पाडणारा कोणी भेटलाच नव्हता.

"बरं झालं बाळ, तू मला कल्पना दिलीस. नाहीतर सुखवस्तू घरातून येणाऱ्या बटूसारखीच मी तुमची कल्पना केली होती. येऊ दे हो, मुलांना माझ्याकडे ! त्यांना जेवू घालून मी आता खरं पुण्य मिळवीन."

इतर म्हणत, "तदनंतर आम्हाला तर जेवण चांगले मिळेच. पण अण्णांची चौकशी केल्याविना त्या बाई राहत नसत." संस्थेतील विद्यार्थ्यांना मिळालेल्या मदतीवरच अवलंबून राहावे लागे. त्यामुळे निकृष्ट प्रतीचे अन्न मिळे. 'उदरभरण नोहे जाणिजे यज्ञकर्म' हा त्यांचा रोजचा श्लोक. पण अण्णा म्हणत, शरीरधारणेकरिता 'यज्ञकर्म' पूर्ण केले पाहिजे, ते अर्धवट असता कामा नये.

## अण्णांचे शिक्षण

मराठी ७ वीपर्यंतचे अण्णांचे शिक्षण धुळे येथील मराठी शाळा नं. २ मध्ये झाले. पुढे ते जे. आर. सिटी हायस्कूलमध्ये दाखल झाले. दोंडाइचे येथील स्वोद्धारकच्या मिड्ल् स्कूलचे मुख्याध्यापक श्री. व. पु. कुलकर्णी ऊर्फ काका सर अण्णांचे सहाध्यायी होते. काका सरांचा वाडा जुन्या धुळ्यात होता. त्याच वाड्यात अण्णांच्या आई राहावयास गेल्या होत्या.

काका आठवण सांगू लागले, "आम्ही ५ वी 'ब'त होतो. अण्णा गणित आणि मराठी विषयांत विशेष प्रावीण्य मिळवीत. गणितात १०० पैकी ९९ गुण पडले तरी तो १ गुण का कमी केला म्हणून शिक्षकांशी वाद घालीत. त्यांचे हस्ताक्षर खूप चांगले नव्हते, पण खराबही नव्हते. इंग्रजी विषय मात्र प्रावीण्य मिळविण्याइतपत नव्हता. कारण त्यांनी एका वर्षात तीन इयत्ता केल्या होत्या.

आम्ही खेळात प्रावीण्य मिळवीत असू. हुतुतू फुटबॉल हे तर आमचे अत्यंत आवडते खेळ. आम्ही ढाल मिळवीत असू. एकदा खेळांचे सामने जाहीर झाले होते. आमच्या तुकडीत मुले कमी म्हणून आम्हाला फुटबॉलची स्वतंत्र टीम मिळाली नाही. 'आम्हाला टीम मिळालीच पाहिजे' अण्णांनी गर्जना केली. अण्णा, भाटे, मी आम्ही तिघांनी मिळून टीम मिळविली. अण्णा त्या टीमचे कॅप्टन झाले. टीमने घवघवीत यश मिळविले. सर्वांची छाती फुगली. त्या दिवशी सर्वांनी अण्णांना खांद्यावर घेऊन नाचविले.

अण्णा बालवीर पथकाचेही कॅप्टन होते. हे पथक त्यांनी उत्कृष्टपणे चालविले होते. नेतेपणाचे शिक्षण त्यांनी बालवीर चळवळीतून मिळविले होते. अण्णा मॅट्रिकच्या परीक्षेकरिता गेले पण परीक्षा न देता आले. कारण त्यांचा ओढा देशसेवेकडे अधिक होता. सन १९२७ मध्ये म. गांधींचे आगमन स्वोद्धारक विद्यार्थी गृहात झाल्यानंतर तर ते पुरे देशभक्तीने झपाटले. अण्णा शाळेत असतानाच लेखन व कविता करीत.

सत्याग्रहाला जाण्यापूर्वी आईची परवानगी घेण्याकरिता अण्णांनी आमच्याच वाड्यात सत्याग्रह केला होता. आमच्या आत्या-आजीनेच काकींना परवानगी द्यावयास लावली.

देशसेवेबरोबरच अण्णांनी विधायक व सामाजिक कार्याचा वाटा उचलला होता. अण्णा बुद्धीने प्रखर होते. समाजात सततच्या वावरण्यामुळे त्यांची बुद्धी तीव्र व चौकस झाली होती."

## देशभक्त अण्णा

सन १९२१ च्या जून महिन्यातील स्वोद्धारक विद्यार्थी संस्थेची मुहूर्तमेढ भारतीय राजकारणाच्या पार्श्वभूमीवर मननीय ठरेल. स्वराज्याचा मंत्र शिकविणारे पू. लोकमान्य टिळक दिवंगत झाले होते. ब्रिटिशांच्या दमन-नीतीची कारवाई सुशिक्षित भारतीयांच्या दृष्टीने हेरली होती. याच वेळी म. गांधींसारखा कुशल नेता असहकाराचे शस्त्र हाती घेऊन भारतीय राजकारणांगणात अवतीर्ण झाला. असहकार व बहिष्कार या मार्गाने राष्ट्रोद्धाराचे प्रयत्न व चळवळी सुरू झाल्या.

संस्थेची स्थापना करताना गरिबांच्या शिक्षणाचीच सोय करणे एवढाच हेतू संस्थेने ठरविला नव्हता. कै. द. के. देशपांडे ऊर्फ नानासाहेब व कै. ना. गो. वैद्य हे शिक्षकद्वय संस्थापक देशप्रेमाने झपाटलेले होते. शालेय शिक्षणाबरोबरच त्यांना राष्ट्रप्रेमी विचारवंतांची पिढी निर्माण करावयाची होती. त्याकरिता नुसत्या गरिबीने ग्रासलेले गरीब विद्यार्थी त्यांच्या दृष्टीने अभिप्रेत नव्हते; तर ते होतकरू असणे आवश्यक होते. धाडसी प्रयोग करणाऱ्या या शिक्षकांना साथ देणारे विद्यार्थी हवे होते. त्यांच्याच प्रेरणेने अण्णा, नवलभाऊ पाटील, हरिभाऊ उपासनी यांनी स्वातंत्र्य चळवळीत सक्रिय भाग घेतला होता.

पुढे अण्णा नवलभाऊंचे विद्यार्थी, शिवाजीराव पाटील, ब्रिजलाल पाटील, सत्यवान टोणगावकर आदींनी भाग घेतला.

अण्णा टकळीवर सूत कातीत असत. पू. बाळूभाई मेहता व कै. नानासाहेब टकार हे त्या वेळचे धुळे जिल्ह्यातले गाजलेले नेते. यांच्याबरोबर अण्णांनी मुष्टिफंड गोळा करण्यात भाग घेतला व भरपूर काम केले.

त्याच वेळी अण्णा बालवीर चळवळीतही दाखल झाले. उत्कृष्ट बालवीर म्हणून त्यांनी लौकिक मिळविला. बालवीरही देशसेवा करू शकतो हा त्या वेळचा विचार. पण त्यातही ब्रिटिश नीती डोकावू लागली. याच वेळी सन १९२७ मध्ये महात्मा गांधींचा मुक्काम धुळ्यात होता. त्यांनी स्वोद्धारक विद्यार्थी संस्थेला भेट देऊन समाधान व्यक्त केले. त्यांच्या भेटीमुळे अण्णा–नवलभाऊ ही जोडगोळी भारावली व त्यांनी देशव्यापी राष्ट्रीय चळवळीत स्वतःला झोकून घेतले.

१९२१ च्या असहकारितेच्या चळवळीला वेगळे वळण लागल्याने ती बंद पडली. म. गांधींनी १९३० च्या सुमारास कायदेभंग आणि वैयक्तिक सत्याग्रहाची चळवळ हाती घेतली. ब्रिटिशांचे जुलमी कायदे मोडायचे व अन्याय्य कर द्यायचा नाही.

## शिरोडे मीठ-सत्याग्रह

धुळे जिल्ह्यातून शिरोडे येथे मीठ-लुटीकरिता एक तुकडी पाठवायचे ठरले. स्वयंसेवक निवडीसाठी धुळ्यास शिबिर घेण्यात आले. पोलिसांची नजर होतीच. शिबिरात यायला फारसे लोक धजले नाहीत. आणि याच वेळी नानासाहेब टकारांना अटक झाली. कॅप्टन विश्वासराव, राजाराम महाराज अटकेत ठेवले गेले. शेवटी त्या वेळी धुळे जिल्ह्यात तडफदार युवक म्हणून नावाजलेल्या नवलभाऊ व अण्णांनी नेतृत्व आपल्या हाती घेतले. स्वयंसेवक गोळा करण्याचे काम सुरू झाले. कापडणे, सवाई मुकटी, नावरानावरी आदी ठिकाणांवरून प्रामुख्याने या जोडगोळीला साथ दिली होती.

कापडण्याचे पुढारी कै. माधवराव दिवाण यांनी शिबिरात जाण्याचे नाकारले होते, परंतु त्यांनी या युवकांना आश्वासन दिले की, ज्या दिवशी कूच करावयाचे असेल त्या दिवशी कापडण्याहून तुकडी पाठवू. श्री. नवलभाऊंनी अण्णांना या टोळीचे कॅप्टन म्हणून पाठविले. त्यांची खात्री होती की संघकुशलता, चिकाटी व साहस या अण्णांच्या गुणांमुळे ते कॅप्टनपद चांगले गाजवतील.

कापडणे येथून २० लोकांची तुकडी वाजत-गाजत धुळयास आली. अण्णांना कॅप्टन म्हणून घोड्यावर बसविले. सुवासिनींनी त्यांना ओवाळले. मिरवणूक काढली. अण्णांच्या मातेने व वहिनींनी साश्रू नयनांनी निरोप दिला.

या आधीची थोडी कौटुंबिक हकीगत सांगणे अप्रस्तुत होणार नाही. ' घरच्यांची परवानगी आवश्यक ' असा शिबिरार्थींकरिता एक दंडक होता. अण्णांना परवानगी मिळेना.

" नको रे बाबा ! पोलिस पकडतील. बेड्या पडतील. तुरुंगात जावं लागेल. आपण गरीब माणसं. " असे म्हणताम्हणताच काकींच्या डोळ्यांत पाणी उभे राहिले. काकी परवानगी देईनात.

" कशाला नसत्या भानगडीत पडतोस. चांगली नोकरी धर. आपण अजून पोटभर खाऊ शकत नाही; ही कामं सुखवस्तू लोकांची " वडील भाऊ जगन्नाथपंत म्हणाले. तेही परवानगी देईनात.

" असं सर्वच म्हणतील तर भारतमातेची सेवा कोणी करावयाची ? भारतमातेची सेवा मी करू शकलो नाही तर तुझीसुद्धा सेवा मला करता येणार नाही. ' जननी जन्मभूमिश्च स्वर्गादपि गरीयसी ' अन् बरं का काकी, आमच्याबरोबर खूप लोक आहेत. कैद झाली तरी आम्ही राजकीय कैदी. सरकारी पाहुणे. आमची व्यवस्था छान राहील. तू काळजी करू नकोस. तुझ्या चार मुलांपैकी एक मुलगा तू देत नाहीस. काही काही तर सर्वच कुटुंबियांसह भाग घेत आहेत. " अण्णांनी आईला पटविण्याचा प्रयत्न केला.

काकी परवानगी देईनात. अण्णांनी घरातच अन्न-सत्याग्रह सुरू केला. त्यात सर्व घरही सामील झाले. घरात चूल पेटली नाही. अण्णांची वडील वहिनी प्रथमच गरोदर होती तीही उपाशी.

" काकी, सत्याग्रहात भाग घेण्याची परवानगी दिल्याशिवाय मी तोंडात अन्न घालणार नाही. तुझा आशीर्वाद मला हवा आहे. " अण्णांचा पक्का निर्धार.

तिसऱ्या दिवशी सुनेने सासूबाईंचे पाय घट्ट धरले व कळकळीची विनंती केली, " सासूबाई, तुम्ही भावजींना परवानगी द्याच. त्यांचा निश्चय दृढ आहे. " शेजाऱ्यांनीही दुजोरा दिला, व अण्णा तडक शिबिरात पोहोचले.

काकींचे अण्णांवर फार प्रेम होते. हूड, चळवळ्या म्हणून तर त्यांना कौतुकमिश्रित काळजी वाटे. त्या मायेच्या सागरच होत्या. मुलांसाठी त्यांनी जीवनात खूपच सोसले. सर्व

तऱ्हेच्या दुःखाला त्यांनी तोंड दिले. "हृदयी अमृत, नयनी पाणी" असे त्यांचे जीवन होते. नव्या-जुन्याचा समन्वय त्यांनी साधला होता. आपल्या भावनांना मुरड घालून दुसऱ्यांना सुखी ठेवण्यात काकींनी आपला देह चंदनासारखा झिजविला. स्वभाव सात्विक होता. तडजोडीशिवाय जीवनात सुख मिळत नसते हे त्यांच्या जीवनाकडे दृष्टी टाकल्यावर कळते.

अण्णा शिबिरात गेले. व २० लोकांची पहिली तुकडी घेऊन शिरोड्यास पोहोचले. मीठ लुटले. पोलिसांचा लाठीमार सुरू झाला. लाठीमाराच्या जोरदार तडाख्यात स्वयंसेवकांची पळापळ सुरू झाली. श्री. वि. स. खांडेकरांनी 'दोन टोके' या पत्रात्मक कथेत वर्णिल्याप्रमाणे 'खानदेशाची माती चिवट असते हे दाखवीन' हा जो शिरोड्याच्या सत्याग्रहाच्या वेळी उल्लेख केला आहे तो अण्णांना तंतोतंत लागू पडला. अण्णा लाटीहल्ला सहन करीत राहिले. आपली जागा वा मुठीतील मीठ त्यांनी सोडले नाही.

"असेन जातना मराटा! पन हाऊ बामनच खरा मराठा से" कापडण्याच्या माधवरावांची प्रतिक्रिया.

पूर्व खानदेशमधील टोळीचे कॅप्टन श्री. मल्हारराव चिकाटे होते.

अण्णा म्हणत, "मल्हारराव नावाप्रमाणे चिकाटे ठरला. लाठीमारात त्याचे हाड न् हाड तुटले होते, पण त्यानेही मीठ सोडले नव्हते. धुळ्याचा एक चित्रडाविक्याही याच सत्याग्रहात अपंग झाला."

खानदेशच्या चिवट युवकांनी शिरोड्याचा सत्याग्रह गाजविला. महात्माजींना अटक झाल्यावर असहकार व सत्याग्रह चळवळीचे नेतृत्व ना. म. गोखले यांच्याकडे आले, नवलभाऊंचे वडील शालक सवाई मुकटीचे पुंडलिक भिका हकीगत सांगत होते, "शिरोड्याला आम्हाला पकडल्यावर एक महिना सावंतवाडीत ठेवले. जेलमध्ये आम्हा लोकांना 'बी' वर्ग दिला. तेथे तांदळाचा वापर जास्त. गहू दिलाच जात नव्हता. खानदेशी लोकांना तो मानवेना. अण्णांनी जेलमध्ये सत्याग्रह केला. जेलरने गहू द्यावयाचे ठरविले, पण 'पोळ्या तुम्हालाच कराव्या लागतील' ही अट घातली. बरोबरच्यांना पोळ्या येत नव्हत्या. अण्णा चांगल्या पोळ्या करीत. त्यांना स्वोद्धारक विद्यार्थिगृहात स्वयंपाक करण्याची चांगली सवय होती. मलाही पोळ्या येत. आम्ही ही कामगिरी अंगावर घेतली.

"सावंतवाडीहून एक महिन्यानंतर रत्नागिरीला एक महिना ठेवले. रत्नागिरीचा तुरुंग कसा काय आहे? समुद्रातील प्रवास मानवेल की नाही ही भीती स्वातंत्र्यसैनिकांना पडली. सैनिक गाड्यांपुढे अडवे पडले. सावंतवाडी त्या वेळी संस्थान होते. संस्थानातील जनतेने पोलिसांवर बहिष्कार टाकला होता. त्यांना काही ते मिळू देत नसत. मात्र अटक झालेल्यांना जनतेने श्रद्धेने, भावुकतेने सर्व काही पुरविले. त्यांच्या दृष्टीने सत्याग्रही वंदनीय होते. जेव्हा सैनिक गाड्या रत्नागिरीकडे नेऊ देत नव्हते व गाड्यांपुढे आडवे पडले होते त्या वेळी पोलिसांनी गाड्या पुढे काढण्याबद्दल ड्रायव्हर्सना सांगितले, 'साहेब,

गोळ्या घाला पण आम्ही यांच्यावर गाडी घालणार नाही." ड्रायव्हर्सकडून हे उत्तर ऐकल्यावर स्वातंत्र्यसैनिकांना मागणीप्रमाणे आश्वासन मिळाले. एक महिनाभर रत्नागिरी जेलमध्ये ठेवल्यानंतर कोल्हापूरच्या सरहद्दीवर अण्णांना सोडले खरे, पण पुढे काय? अण्णांजवळ काहीच नव्हते. पण अण्णांना कोल्हापूर खादी प्रचार केंद्राकडून मदत मिळाली. ती मदत घेऊन अण्णा किर्लोस्करवाडीला त्यांची धाकटी बहीण सुभद्रा होती, तिच्याकडे गेले. तिच्याकडून पैसे घेऊन ते धुळयास परतले."

## लळिंग व दिवाळेमाळ जंगल सत्याग्रह

धुळ्यात आल्यानंतर अण्णा स्वस्थ बसले नाहीत. हायस्कूल शिक्षणाला त्यांनी शिरोड्याला जाण्यापूर्वी रामराम ठोकला होता. 'प्रथम स्वातंत्र्य, बाकीच्या गोष्टी नंतर' अण्णा म्हणायचे. पुढे अण्णांनी दारूबंदी चळवळीत भाग घेतला. पिकेटिंगच्या वेळी म्हणण्यासाठी कवने तयार केली.

याच वेळी श्री. बाळूभाईंच्या नेतृत्वाखाली अण्णांनी लळिंग जंगल सत्याग्रहात भाग घेतला. पुढे साक्री तालुक्यात दिवाळेमाळ जंगल सत्याग्रहाची तयारी केली. इंदवे येथील कोंडवाडा फोडला व धनगर लोकांचा सामुदायिक सत्याग्रह घडविला. त्या वेळी पिंपळनेर येथे अटक झाली. सन १९३२ ला दोन महिने धुळे तुरुंगात ठेवले. नंतर रोज हजेरी देण्याची अट घालून सरकारने सुटका केली. पण अण्णांनी हजेरी एकही दिवस न देता भूमिगत होऊन काम केले. या वेळी अण्णांच्या नावाचे जाहीर वॉरंट निघाले. अण्णांचे एक स्नेही श्री. ज. ना. जोशी ऊर्फ आबासाहेब यांचे एक आप्त पोलिस खात्यात होते. श्री. जोशींचे त्यांच्याकडे जाणे-येणे होते. अण्णांचा ठावठिकाणा आबांना माहीत असलाच पाहिजे असा त्यांचा दृढ विश्वास होता.

"हे बघ, तू टोणगावकरांचा पत्ता सांग. ते जर सापडले तर मला मोठी बढती मिळेल. करशील ना मदत?"

अशी गळ त्या आप्त पोलिसांनी आबांना घातली. आबांनी पत्ता तर दिलाच नाही, परंतु मित्रप्रेमामुळे शेवटी त्या नातेवाईकाकडे जाणेच सोडून दिले.

अण्णा तर केव्हाच सत्याग्रहींची एक तुकडी घेऊन कै. शंकरराव देवांच्या नेतृत्वाखाली होणाऱ्या सत्याग्रहासाठी पुण्यास पसार झाले होते.

## सोलापूर मार्शल लॉ डे – विसापूर जेल

'सोलापूर मार्शल लॉ' — निषेध करायचे त्या वेळी ठरले. निषेध दिन साजरा करण्यासाठी महाराष्ट्राचे प्रतिनिधी म्हणून अण्णांची निवड झाली. तेथे त्यांना अटक

होऊन विजापूर व विसापूर जेलमध्ये पाच महिने कारावास भोगावा लागला. या वेळी अण्णांना चक्की पिसण्याचे काम होते. विसापूरला असतानाच जेलमध्ये ' केशव ' नामक राजबंद्याला मृत्यू आला. त्यावर अण्णांनी छोटेसे भावस्पर्शी कवन केले. त्यात जेलबद्दल अण्णांना काय वाटत होते ते स्पष्ट होते.

## केशव – संदेश

[ विसापूर जेल ]

**अहो केशवाने तुम्हा सोडिले का – स्वता स्वर्गी येथे शवा ठेवियेले।**
**स्वये स्वर्गी गेला प्रभुला कथाया – तुम्हा ठेविले प्रेत संदेश द्याया।**
**विसापूर जेली किती बंधू मेले – सुखानेच काहो अहो सर्व गेले ?**
**तुम्हा सांगती सर्व आर्त स्वराने – करा जेल हा बंद मेलो जयाने॥**

## बेकायदेशीर दिल्ली काँग्रेस अधिवेशन

सन १९३२ ला कै. पंडित मदन मोहन मालवीयजींच्या अध्यक्षतेखाली अखिल भारतीय काँग्रेस अधिवेशन भरणार होते. त्यासाठी प्रतिनिधी म्हणून अण्णा व श्री. नवलभाऊ हे दिल्लीस जाण्यास निघाले. याच वेळी ब्रिटिश सरकारने दिल्ली काँग्रेस बेकायदेशीर ठरविली व तिला उपस्थित राहणाऱ्यांना अटक करावयाचे फर्मान काढले. तरीही ही काँग्रेस भरलीच व ठरावही पास झाला. ती एक मौजच झाली.

आग्र्याला अण्णांची बहीण होती. तेथे काही माहिती घ्यावी म्हणून अण्णा, नवलभाऊ व कापडण्याचे उत्तमराव पाटील आग्र्यास उतरले. त्यांना माहिती मिळाली की, ' Which is the way to Jamuna River ? ' हा परवलीचा शब्द उच्चारावयाचा म्हणजे बरोबर अधिवेशनाच्या जागी स्वयंसेवक घेऊन जातील. स्वयंसेवक दिल्ली स्टेशनवर असतील पण ही मंडळी दिल्लीला पोचण्यापूर्वीच पोलिसांनी दिल्लीच्या अगोदरच्या स्टेशनवरच प्रवेश केला. त्यांना स्वयंसेवकांची कशी माहिती मिळाली होती, कोण जाणे. पण दोन पोलीस अण्णा व नवलभाऊंच्या आजूबाजूला जाऊन बसले. उत्तमराव पाटील त्या वेळीं संडासात गेले होते. बाहेर आल्यावर ते लांबच राहिले.

दिल्ली स्टेशनवर सर्व बाजूंनी आलेल्या प्रतिनिधींना पोलिसांनी अटक केली. दोघादोघांच्या हातांत एक बेडी व सर्वांना बांधणारा मधून दोर. पायात बेडी. या सर्वांजवळ सामान होते. साहित्य होते, चोपड्या होत्या. त्याचा पोलिसांनी पंचनामा केला. पंचनाम्यावर प्रतिनिधींच्या सह्या घेतल्या.

श्री. नवलभाऊ म्हणाले, “ आम्ही सर्वांनी पटापट सह्या केल्या. अण्णांनी मात्र सही केली नाही. कारण तो पंचनामा उर्दूत होता. तेव्हा अण्णांचे म्हणणे की, ‘ समजल्या-उमजल्याशिवाय सही करणार कशी ? एखाद्या गुन्ह्याची कबुली कशावरून लिहून घेतली नसेल ? तेव्हा पंचनामा देवनागरी लिपीत वा इंग्रजीत लिहिलेला हवा. ’ अण्णा पोलिसांशी हुज्जत घालीत राहिले. दिल्ली पोलीस वैतागले. ‘ हम पढकर बताते हैं। ’ म्हणून म्हणाले पण अण्णा म्हणाले, ‘ तुमच्या वाचून दाखविलेल्या मजकुरावर आमचा विश्वास नाही. ’ शेवटी कंटाळून त्यांनी एक देवनागरी लिहिणारा शोधला; त्या पंचनाम्यावर अण्णांनी सही केली. पुढे दिल्लीला १० दिवस नजर कैदेत असताना अण्णा उर्दू लिपी शिकले.

दोघादोघांच्या रांगेतून मागून पुढून पोलीस असलेली आमची मिरवणूक निघाली. त्या वेळी पठाण तरुणांनी पहाडी आवाजात गायला सुरवात केली.

**हाथ में हो हाथकडियाँ**
**पैर में जंजीर हो**
**शूरता की है यह निशानी**
**इसे शरमाना नहीं।**

या गाण्याला सर्वांनी साथ द्यायची व त्या वेळी हातापायांतील बेड्या जोरात खणखणावयाच्या. आजूबाजूला आम्हाला पाहावयास लोकांची गर्दी व्हावयाची. मिरवणूक ‘ चाँदनी ’ चौकात येऊन पोहोचली. पण तेथे अगोदरच एक लग्नाची मिरवणूक येऊन पोहोचली होती. बँड जोरात वाजत होता व सर्व रस्ता अडवलेला होता. पोलिसांनाही सर्व बंद्यांसह नाइलाजाने थांबावे लागले. तेवढ्यात बँड थांबला. बँडसारखा आकार असलेला एक भोंगा एकाच्या हातात होता. त्याने लिहून आणलेला ठराव वाचून दाखविला. सर्वांनी टाळ्या वाजविल्या. ती मिरवणूक लग्नाची नसून वेषांतरित स्वयंसेवकांची होती व अधिवेशन बेकायदेशीर ठरविले होते तरी भर चांदणी चौकात त्याची सांगता झाली. पोलिसांच्या लक्षात आल्यावर त्यांची धावपळ झाली व सर्वांना अटक करण्यात आली. देशभक्तांचे चेहरे मात्र देशप्रेमाने पुलकित झालेले होते. ”

कैद्यांना ठेवायला जागा नव्हती म्हणून तंबू ठोकले गेले. अण्णा व नवलभाऊंना १० दिवस नजरकैदेत ठेवून २४ तासांत दिल्ली सोडावी म्हणून सोडून देण्यात आले. श्री. नवलभाऊंजवळ ‘ फ्री प्रेस ऑफ इंडिया ’तील त्या वेळच्या बातमीचे पुढील कात्रण मिळाले त्यावरून पुढील माहिती मिळते.

## RELEASE OF MAHARASHTRA DELEGATES

[ Free Press of India ]

Delhi, May 6.

Out of–the fifty delegates sent for the Delhi Session of the Congress from Maharashtra, about 36 managed to reach Delhi, while others seem to...... sent back by the authority of these 36 four...... were not arrested. They might have returned home.

सुटका झालेल्यांच्या या बातमीत पुण्याचे खेडकर, नगरचे सातभाई, रत्नागिरीचे केळुसकर, पूर्व-पश्चिम खानदेशचे पाटक, नवल पाटील, कुलकर्णी व टोणगावकर आदींच्या नावांचा उल्लेख आहे. कात्रण जीर्ण असल्यामुळे फाटलेले असले तरी बातमीची कल्पना येते.

१९३६-३७ मध्ये अण्णा पश्चिम खानदेश जिल्हा काँग्रेस कमिटीचे सेक्रेटरी झाले. प्रांतिकवरही ते निवडले गेले. महाराष्ट्र विधायक कार्य समितीवर त्यांना आग्रहाने घेतले. शांतता काळातील विधायक कामे सुरू झाली. ही कामे चालू असतानाच पुन्हा धरपकडीचे सत्र सुरू झाले. १९३९ ला अण्णा पकडले जातील असे वाटत होते, कारण त्यांच्या नावाचे वॉरंट निघाल्याचे कळले होते, पण त्याची अंमलबजावणी त्या वेळी झाली नाही. याच वेळेला १७ नोव्हेंबर १९३९ ला अण्णांना पुत्ररत्न लाभले.

## ‘ चले जाव ’ ९ ऑगस्ट १९४२

९ ऑगस्ट १९४२ हा दिन भारतीय स्वातंत्र्याच्या दृष्टीने अती महत्त्वाचा ठरला. गांधींनी ‘ चले जाव ’ ‘ भारत छोडो ’ हा प्रस्ताव करावयाचे ठरविले. त्यामुळे संपूर्ण भारतातून प्रतिनिधींचा ओघ मुंबईकडे वाहू लागला. ८ ऑगस्टला गवालिया टँकवरच्या भव्य मंडपात महात्मा गांधींनी ‘ चले जाव ’ ‘ भारत छोडो ’ आदेश देणारे ठराव पास केले. या सभेस अण्णा गेले होते.

९ ऑगस्टचे झेंडावंदन गांधी-नेहरू प्रभृतींच्या उपस्थितीत झाले नाही. कारण त्यांना अगोदरच पोलिसांनी कैद केले होते. समुदाय उपस्थित झाला. कस्तुरबांच्या नेतृत्वाखाली झेंडावंदन सुरू झाले. ‘ करेंगे या मरेंगे ’ च्या घोषणा जनसागरातून गगनापर्यंत निनादू लागल्या. तोच चहूबाजूंनी घोड्यावर बसलेल्या मिलिटरीने देशभक्तांना घेरले व भराभर अश्रुधुराची नळकांडी फोडली गेली. मुंबईकरांना याचे शिक्षण मिळाले

होते, कारण परकीय हल्ल्यापासून बचाव करता यावा याकरिता त्यांना युद्धकाळातच शिक्षण दिले गेले होते. ती मंडळी भराभर अडवी झाली. कोणीकोणी वाळूच्या पिशव्या बरोबर आणलेल्या होत्या, त्या नळकांड्यांवर टाकू लागले. पण फारच ससेहोलपट झाली. पाऊस पडून गेल्यामुळे चिखल झालेला होता. तशात डोळ्यांना काही दिसेना; पोलिसांनी गोळीबार सुरू केला, परंतु बऱ्याच देशभक्तांना तेथून दूर जाण्यात यश मिळाले. बरेच पकडले गेले. सबंध देशभर धरपकडीचे सत्र सुरू झाले.

## भूमिगत कार्य

ब्रिटिश सरकारने अगोदरच बंदोबस्त करून ठेवला होता. ठिकठिकाणी धरपकड झाली. अण्णांचे मित्र हरिभाऊ उपासनी, नवलभाऊ, नानाशेट शिंपी आदी राहत्या घरीच पकडले गेले. मुंबईस गेलेली मंडळी घरी आलीच नाहीत. अश्रुधुरामुळे डोळे लाल होऊन, सुजून पाणी गळत असतानाच धुळ्यातील मंडळी भूमिगत झाली. हरप्रयत्नाने ती शिंदखेडे तालुक्यातील देवमण दादांच्या दलवाडे गावी पोहोचली. जंगलात मुक्काम ठोकला. सर्वश्री बाळूभाई मेहता, शंकरराव ठकार, अण्णा, विष्णू पाटील हे प्रमुख. १३–१४ ऑगस्टला महात्मा गांधींनी दिलेल्या आदेशावर या सर्वांनी खल केला. बाळूभाई म्हणत, 'गांधीजींच्या म्हणण्याचा अर्थ शांततेच्या व अहिंसेच्या मार्गानेच जावयास सांगितले आहे. फक्त तुरुंगभरती करावयाची ' विष्णुभाऊ पाटील ( कापडण्याचे ) म्हणू लागले, 'गांधीजींनी उघड बंडाचा आदेश दिला आहे. कोणत्याही मार्गाने सरकार उलथवून पाडायचे आहे.'

विष्णुभाऊ म्हणाले, "अण्णा अत्यंत कमी बोलत व हळू बोलत. पण त्यांनीही माझ्याच म्हणण्याला दुजोरा दिला. ते म्हणाले, 'करेंगे या मरेंगे या आदेशाचा अर्थ असाच निघतो की, कोणत्याही प्रकारे सरकारला कोंडीत धरावयास हवे' कोणता मार्ग पत्करावयाचा ? बंडाचा की अहिंसेचा ? घातपात करावे की नाही ? निर्णय लागेना. शेवटी सर्वांनी एक प्रश्नावली तयार केली. त्याची उत्तरे वर्ध्याहून मागवावी असे ठरले."

विष्णुभाऊ १६ ऑगस्ट १९४२ ला वर्ध्यास पोहोचले. त्याच दिवशी वर्ध्यात जमनालाल बजाजांनी 'पुढे काय ?' ह्याचा खल करण्याकरिता एक गुप्त सभा आयोजित केली होती. चरखा संघाचे जाजूजी व किशोर मश्रुवालाही या सभेत होते. धुळे जिल्ह्यातील कार्यकर्त्यांच्या मनातील प्रतिबिंबच येथे पडले. एक पक्ष प्रतिपादीत होता, 'मनुष्य हत्या नको, मोडतोड नको.' दुसऱ्या पक्षाचे म्हणणे आदेशात नुसते 'मरेंगे' म्हटलेले नाही तर 'करेंगे' पण आहे. प्रश्न अनिर्णीत राहिला. पण सूर एकच, ब्रिटिश 'सरकारची हकालपट्टी.'

धुळे जिल्ह्याचे नेतृत्व सर्वश्री बाळूभाई मेहतांकडे सोपविले. कार्याच्या दृष्टीने धुळे जिल्ह्याचे विभाजन केले. कै. शंकरराव ऊर्फ नानासाहेब ठकारांकडे शहादा, तळोदा, नवापूर व नंदुरबार हे तालुके सोपविले, तर साक्री, धुळे, शिरपूर, शिंदखेडे हे तालुके अण्णा व विष्णुभाऊ यांच्या वाट्याला आले.

सत्याग्रही तयार करणे व सनदशीर मार्गाने सत्याग्रह करून त्यांची तुरुंगभरती करणे असा अहिंसात्मक कार्यक्रम बाळूभाईंनी सांगितला. अण्णांचा तरुणांशी बराच संपर्क होता. शिवाय शैक्षणिक कार्यामुळे त्यांच्याजवळ युवकसेनाही होतीच. सबंध जिल्ह्यातील बुलेटिन तयार करून त्याची प्रसिद्धी करणे, सत्याग्रहींना शिदोरी व साहित्य पुरविणे इत्यादी कामे अण्णांच्या वाट्याला आली. धुळ्याच्या खादी-भांडारचे श्री. कमलाकर जोशी यांची या कामी फार मोठी मदत झाली.

विष्णुभाऊ व इतर काही क्रांतिकारक तरुणांनी सरकारी बंगले जाळण्याचा, तारा-यंत्राच्या तारा तोडण्याचा व रसद लुटण्याचा कार्यक्रम हाती घेतला. याकरिता डांगुरणे येथील जंगलात ५ सप्टेंबर १९४२ ला एक गुप्त सभा घेतली. जिल्ह्यातून १०० कार्यकर्ते आले होते. जास्त लोक असले की गवगवा होऊन पोलिसांना सुगावा लागेल; म्हणून निवडक कार्यकर्त्यांना घेण्यात आले व बाकीच्यांना किरकोळ कामे सांगून परत पाठविण्यात आले.

निवडक कार्यकर्त्यांची बैठक होऊन शिरपूर, शिंदखेडे, धुळे व साक्री या तालुक्यांतील सरकारी बंगले एकाच वेळी जाळण्याचे ठरविले. श्री. व्यंकटराव धोबींनी बोराडीचा (शिरपूर), विष्णुभाऊ पाटलांनी चिमठाण्याचा (शिंदखेडे), रामचंद्र पाटलांनी धुळ्याचा, देऊरच्या नेत्यांनी साक्रीचा बंगला जाळावयाचे ठरवले. पण प्रत्यक्षात मात्र बोराडीचा व चिमठाण्याचाच बंगला जाळला गेला. या कामी अप्रत्यक्षपणे साक्रीकडचे श्री. यशवंत सुकदेव, शिंदखेड्याचे श्री. बाबुराव सोमा गुरव, शहाद्याचे सखाराम सुपडू शिंपी, धुळ्याचे श्री. माणिकलाल छाजेड व श्री. नानासाहेब पाटील, मोहाडीचे श्री. रामचंद्र पाटील, डांगुरण्याचे दयाराम भावडू, तोरखेड्याचे नरोत्तमभाई आदी बऱ्याच मंडळींनी भाग घेतला होता. रॉकेलचे डबे, रोख पैसा, काळ्या रंगाचे पोशाख पुरविणे, पोलिसांवर नजर ठेवणे व त्याबाबत नेत्यांना सूचना देणे आदी बरेचसे सहकार्य देशभक्तांनी केले. श्री. रामेश्वर पोद्दारांनी १,००० रुपये व श्री. अण्णासाहेब सहस्रबुद्धे यांनी २,००० रुपये देशभक्तांना खर्चासाठी मदत दिली.

बोराडी व चिमठाणे येथील सरकारी बंगले देशक्रांतिकारकांनी जाळले असे वृत्त अण्णांनी बुलेटिन काढून प्रसारित केले. पोलिसांना या कार्याचा सुगावा लागला. अण्णांना पकडण्याकरिता यंत्रणा उभी राहिली पण अण्णा सापडेनात. तेव्हा गॅझेटमध्ये त्यांना एक जाहीर वॉरंट निघाले. त्याची एक प्रत घराच्या बंद दारावर चिकटवली. वॉरंट पुढीलप्रमाणे होते :

**Bombay Govt. Gazette Part I**

**Page 3814, dated 29–10–1942**

No. M. A. G. S. R. 15—Whereas the Govt. of Bombay has by notification in the Home Dept. (Political) No. S. D./W. 3401, dated the 19th Dec. 1941 and No. S. D. V. 30 dated the 7th Aug. 1942 directed that the powers conferred on it by rule 26 of the Defence of India Rules shall also be exercisable by the District Magistrate. And whereas I, R. A. Mahamadi, Esq. I. C. S., District Magistrate, West Khandesh, am satisfied that one R. R. Tongaonkar of Dondaicha, against whom a detention warrant has been concealing himself so that the order of detention cannot be executed, the said R. R. Tongaonkar shall appear before the Magistrate, First Class, Taluka Sindkheda at Sindkheda within thirty days from the date of publication of this order.

Failure to comply with the above said order is punishable with imprisonment for a term which may extend to seven years or with fine or with both.

Dated at Dhulia this 22nd day of Oct. 42

**R. A. Mahamadi**

Dist. Magistrate, West Khandesh

एक महिन्यात अण्णा मॅजिस्ट्रेटसमोर हजर झाले नाहीत, तर सात वर्षे शिक्षा, अधिक दंड अशी धमकी जरी वॉरंटमध्ये होती तरी अण्णांना या गोष्टीची यत्किंचितही भीती वाटली नाही. ते वॉरंटकडे पाहून हसत राहिले. याचे मूळ त्यांच्या ‘ प्रतिज्ञा ’ या काव्यात सापडते—

दत्ताजी काय वदला ‘ लढेन पुनरपि जगेन जरि यात ’
कैदी जरी मी झालो– परि सुटताची दिसेन युद्धात ॥
देशास्तव झाशीची राणी लढली असून ती अबला
पौरुष जन्मा येउनी स्वस्थ राहणे रुचेल केवि मला ॥

घराच्या बंद, बाहेरून कुलूप असलेल्या दारावर वॉरंट लावले जात होते पण खरे म्हणजे अण्णा व त्यांचे शिष्य त्या दिवशी मागील दाराने घरातच होते. आपल्या शिष्यांना अधिकाधिक सनदशीर मार्गाने चळवळीत कसे पडता येईल, याचे धडे ते घरातच देत होते. अण्णा खरे पाहू जाता स्वोद्धारकाचे सेवक. स्वोद्धारक संस्थेचा पूर्ण पाठिंबा अण्णांना होता. स्वोद्धारकाच्या साऱ्या कार्यकर्त्यांनी या कामी हातभार लावला. तात्यासाहेब देशपांडे, काकासर, मदनभाई, मामासर सारेच अण्णांच्या निरोपाची वाट पाहात. निरोपाप्रमाणे सारे काही संकेत स्थळी रवाना करीत. ‘ तुम्ही सर्वांनी एवढी मदत केली, संस्था संभाळली तर तीही एक मोठी देशसेवा आहे ’ असे अण्णा सांगत.

अण्णा स्वोद्धारकच्या कितीतरी विद्यार्थ्यांकडून भूमिगतांची कामे करवून घेत असत त्यांत प्रामुख्याने शिवाजीराव गिरधर पाटील, ब्रिजलाल पाटील, लादूभाऊ सोनार, पी. के पाटील, तुकाराम जाधव आदींचा समावेश होता. घराला वॉरंट लावले जात होते, पण बोराडी व चिमठाणे येथील सरकारी बंगले जाळल्याच्या वृत्तावरून पोलिस यंत्रणा क्रांतिकारकांना पकडण्यास सज्ज झालेली होती. त्यांना हेही कळून चुकले होते की दलवाड्याच्या जंगलात ही मंडळी आहेत. तेव्हा भूमिगतांना तेथे राहणे धोक्याचे वाटले तेथून पसार होणे भाग होते.

या वेळी रंजाणे येथील श्री. कोमलसिंग यांनी एक टांगा भूमिगतांना घेऊन दिला. या टांग्याला विविध रंगाचे ४–५ पडदे तयार करून लावण्यात आले होते. गाव दिसेनासे झाले की पडदा बदलला जाई. पोलिसांना कळलेच का लाल पडद्याच्या गाडीतून मंडळी चालली आहेत तर गावकऱ्यांना विचारल्यास उत्तर बरोबर मिळत नसे. कारण तो लाल पडदा पुन्हा दृष्टीस पडतच नसे. फरारी होऊन २–२॥ महिने झालेले होते. या काळात मिशा–दाढ्या वाढलेल्याच होत्या. विष्णुभाऊ पाटील पूर्ण ग्रामीण पोशाखात गाडी हाकावयास बसत तर अण्णा व बाळूभाई पडद्यात. बाळूभाईंना अशा रीतीने पडद्यातून प्रवास करणे आवडत नव्हते; परंतु तुरुंगभरतीच्या चळवळीत खंड पडू नये म्हणून हे करणे आवश्यक होते. विष्णुभाऊ व अण्णा या दोघांनी मिशा वाढविल्या होत्या. अण्णा मोती विकणाऱ्या व्यापाऱ्यासारखे वेषांतर करीत. डोक्यावर काळी टोपी, काळा कोट, गॉगल, हातात छोटीशी ॲटॅची. एकदम पाहणाऱ्यांना ते ओळखू येत नसत. कोणासही सुगावा लागू नये, पकडले जाऊ नये व भूमिगत राहूनच अधिकाधिक कार्य करता यावे हा या मागचा हेतू होता.

दलवाड्याच्या जंगलातून ही मंडळी डांगुरण्याच्या जंगलात आली. पण त्यांच्या पाठीवर पोलिस होतेच. तेथून कापडण्याच्या जंगलात ही मंडळी येऊन पोहोचली. कापडणे म्हणजे विष्णुभाऊंचे गाव होते. भूमिगतांना मदत करणारी मंडळी जवळपास असल्याशिवाय काम पार पाडले जात नसे. कारण त्यांच्या कार्याकरिता लागणारे साहित्य पुरविणे, शरीररक्षणार्थ लागणारे भोजन व कपडे पुरविणे ही कामे करणारी मंडळी अज्ञात असली तरी त्यांची कामगिरी फार मोठी होती.

दलवाडे, डांगुरणे येथे शिबिरे भरविली होती. त्याचप्रमाणे कापडण्यास शिबिर भरले होते. ही शिबिरे जंगलातून गुप्त स्थळी होत. शिबिरातून चर्चा करून, कार्याची विभागणी करून कार्यकर्त्यांवर कामे सोपविली जात. याच सुमारास सुधाकर मदाने वर्शी येथे तारा तोडताना पकडले गेले; त्यांचा अतोनात छळ करून पोलिसांनी त्यांच्याकडून बरी-चशी हकीगत काढून घेतली. पोलिस पार्टी कापडणे येथे रात्री येऊन पोहोचली. विष्णुभाऊ त्या दिवशी घरीच होते; बाकीची मंडळी जंगलात. विष्णुभाऊंनी प्रसंगावधान राखून चाऱ्याची कुट्टी भरलेले मोठे खिरडे म्हणजे टोपली डोक्यावर घेतली, त्यात चपला व कपडे भरले व पोलिसांच्या अंगावरून उघड्या अंगाने बाहेर पडले. पोलिसांनी हटकले व विष्णुभाऊंबद्दल चौकशी केली तर खानदेशी भाषेतच ' इच्चारा मालकीन बाईले ' असे म्हणून गोठ्याकडे गेले. पोलिसांनी आतल्या मंडळीस विचारावयास जो वेळ घेतला तेवढ्या वेळात अंधाराचा फायदा घेऊन ते पसार झाले व तडक भूमिगतांच्या आश्रय-स्थानी पोहोचले. अंधारातच सर्वांना तेथून फरारी व्हावे लागले. कापडणे सोडून रातोरात पायीच आडमार्गाने ही मंडळी धुळ्याच्या गोशाळेत येऊन पोहोचली. श्री. रामेश्वर पोद्दारांची त्यांना बहुमोल मदत झाली; परंतु शहरात राहणे धोक्याचे, तशात एल्मार नावाचा विद्यार्थी स्फोटक पदार्थ घेऊन धुळ्याचे कोर्ट जाळण्यास निघाला असता स्वतःच पेटला गेला. त्या वेळी पोलिसांनी त्याला पकडले, त्याच्याकडून सूत्रधार कोण कोण हेही कळले व स्फोटक पदार्थ मुंबईहून काही क्रांतिकारकांकडून आला असेही कळले; त्यामुळे पोलिसांची हालचाल वेगात सुरू झाली.

धुळे सोडून ही मंडळी चाळीसगावजवळील हिरापूरच्या जंगलात टाण मांडून बसली, व तारायंत्रे निकामी करून ब्रिटिश सरकारी यंत्रणा काही प्रमाणात बंद पाडण्यात यशस्वी झाली. गोशाळेच्या संचालकांच्या घराची पोलिसांनी झडती घेतली पण त्यांनी सुगावा लागू दिला नाही.

या वेळी श्री. एच्. ए. केदारी, पी. एस्. आय्. यांच्याकडे धुळे जिल्ह्यात स्वातंत्र्य सैनिकांना पकडण्याची कामगिरी सोपविली होती. अण्णांना पकडण्याकरिता चोपडे, अंमळ-नेर, धुळे, शहादा, कापडणे इत्यादी ठिकाणी त्यांनी तपास केल्याचे सांगितले.

' Mr. Kedari gives us details as to how and where he made searches for the accused at various places such as Chopada, Amalner, Dhulia. Shahada and Kapadane. '

—जज्मेंटवरून

चोपड्याला अण्णा आल्याचा सुगावा सी. आय्. डीं. ना लागला. अण्णांचे श्वशुर नारायण श्रीधर मोहनी हे चोपडे कचेरीत तलाठी होते. त्यांना हितचिंतकांनी बातमी दिली. घरी निरोप गेला. अण्णा घरातच होते. दिवस असल्याने प्रश्न पडला. शेजारीच

फॉरेस्टचे हवालदार श्री. पाटील राहात होते. ते फिरतीवर गेले होते. अण्णांना त्यांच्या खोलीत बसवले व कुलूप लावले.

'अण्णांना बाहेर काढा.' म्हणून अण्णांच्या तीन वर्षीय पुत्राने भोकाड पसरले.

'दार उघडा, नाहीतर मी आताच बंदिवान झालो म्हणून समजा.' अण्णा म्हणाले त्यांना बाहेर काढण्यात आले. व ते पसार झाले.

'काय वहिनी, आमच्या अण्णांची काही खबरबात. मी त्यांचा लंगोटीमित्र. मला माझ्या या मित्राचा फोटो तुमच्यासह असला तर द्या ना.' आलेले सी. आय्. डी. उद्गारले.

पण त्यांची डाळ शिजली नाही. अण्णांच्या लक्षात एक गोष्ट आली होती की, पोलीस यंत्रणा त्यांना व्यक्ती म्हणून ओळखत नव्हती. त्यामुळे घरातून सर्व फोटो काढून टाकले होते. अण्णा रात्री एक वाजता घरी परतले व पहाट होण्यापूर्वीच पसार झाले. परंतु पुढे मकरसंक्रांतीला पत्नीस भेटण्यास निघाले. अमळनेरच्या कार्यकर्त्यांचीही भेट घ्यावयाची होती. म्हणून अण्णा आपल्या बंधूंकडे अमळनेरला थांबले असताच– पोलिसांची गाडी आली. त्यांनी घराला घेराव घातला व सर्व नाकेबंदी करून अण्णांवर दि. ७–१–४३ ला वॉरंट बजावले व काढण्या बांधून, बेड्या घालून धुळयास व नंतर शिंदखेडे येथे नेले.

"तू आता परावलंबित्व सोडून स्वावलंबी व्हावं, स्वतःचा चरितार्थ चालवावा, या दृष्टीने नोकरी धर." अण्णांचे जेलमधून पत्नीला पत्र गेले.

योग असा की, दोंडाइच्यास मारवाडी पंचायतीने चालविलेल्या हिंदी शाळेत पत्नीस नोकरी मिळाली. राहात्या घराला गॅझेटेड वॉरंट चिकटविले होते, म्हणून मालकांनी घाबरून घर दुसऱ्यास दिले. या वेळी अण्णांचे शिष्य, हायस्कूलमधील शिक्षक श्री. मदन बधू चौधरी यांनी अण्णांच्या पत्नीची जबाबदारी उचलली व आपल्याच घरी ठेवून घेतले. पुढे अण्णांचे मित्र नानाजी तुकाराम शिंपी जेलमधून सुटून आल्यावर त्यांनी आपल्या घरातीलच एक खोली त्यांना दिली.

## अण्णांची सुटका

अण्णा १० जुलै १९४३ ला सुटून आले. अण्णा पकडले गेले होते, डिफेन्स ऑफ इंडिया रूल २६ (६) अन्वये, परंतु पकड वॉरंटमधील संपूर्ण नाव रघुनाथ राजाराम टोणगावकर असे होते; अण्णांचे म्हणणे, "मी रघुनाथ नाही, रंगनाथ आहे. गॅझेटमधील वॉरंटमध्ये 'One R. R. Tongaonkar of Dondaicha' प्रसिद्ध झाले आहे. मलाच ते वॉरंट लागू आहे, हे मी कसे समजावे? माझ्या पत्नीचे विवाहातील नाव रमा आहे व माझा मुलगा रवींद्रनाथ आहे; तेव्हा आम्ही तिघे आर. आर. टोणगावकर झालो. सरकारने निश्चित व्यक्तीच्या नावाचा कुठे उल्लेख केला आहे?"

अण्णांनी खटल्यात आपली बाजू मांडण्यास प्रथम नकार दिला होता, परंतु खटला सेशन कमिट झाल्यावर धुळे येथील सुप्रसिद्ध कायदेपंडित, पत्रपंडित व देशभक्त कै. अ. वि. टिळक यांनी अण्णांची जेलमध्ये भेट घेऊन खटल्याची सम्मती मिळविली व एक कपर्दिकही न घेता खटला चालविला. एकही वॉरंट पकडण्यासाठी, स्पष्ट नाही हे सिद्ध केले. कै. टिळकांच्या युक्तिवादाचा प्रभाव ज्यूरींवर तसाच त्या वेळचे न्यायाधीश 'व्ही. एन्. सरदेसाई' यांच्यावर प्रभावी ठरला व निव्वळ वॉरंटमधील नावाच्या तांत्रिक अडचणीमुळे व संदिग्धतेमुळे अण्णांना सोडून देण्यात आले. न्यायाधीशांनी पोलीस खात्यावर ताशेरे झाडले.

सेशन कमिट खटला असल्यामुळे अण्णांना ७ जानेवारीपासून १० जुलैपर्यंत कारावासातच राहावे लागले. वकिलांनी अण्णांच्या कुटुंबियांना सांगितले होते की, जरी हा निकाल लागून अण्णा सुटले असले तरी कोर्टातून बाहेर पडल्यावर दुसऱ्या वॉरंटने त्यांना पुनश्च पकडतील. पण तसे झाले नाही. विष्णुभाऊंसारखे अण्णांचे काही मित्र अजून भूमिगत होते. त्यांना पकडण्याच्या दृष्टीने अण्णांना मोकळे ठेवणे पोलीस खात्याला महत्त्वाचे वाटले. कारण नंतर अण्णांवर गुप्त पोलिसांचे बारीक लक्ष आहे याबद्दल अण्णांना गुप्त रीतीने सूचना मिळत असत.

याच वेळी बऱ्याचशा कार्यकर्त्यांची धरपकड झाली होती. अखिल भारतीय कॉंग्रेसचे नेतृत्व श्री. जयप्रकाश नारायण यांच्याकडे व मुंबई कॉंग्रेसचे नेतृत्व श्री. अच्युतराव पटवर्धन यांच्याकडे होते. श्री. अण्णासाहेब सहस्त्रबुद्धे यांच्यामार्फत येणारा पैसा बंद झाला होता. म्हणून धुळे जिल्ह्यातील लोकांनी साताऱ्याच्या क्रांतिकारकांच्या साहाय्याने खजिना लुटीचा कार्यक्रम आखला व प्रसिद्ध पावलेला ५॥ लाखांचा खजिना लुटण्यात क्रांतिकारकांना यश आले. श्री. विष्णुभाऊ व शिवाजीराव पाटील यांना नंतर, नाशिक, नागपूर, कानपूर, लखनौ असे फिरावे लागले. अण्णांच्या पत्नी मंदाकिनीबाई यांच्या आत्या पू. कमलाबाई होस्पेट, मातृसेवा संघ नागपूरच्या संचालिका यांची मदत धुळे जिल्ह्यातील कार्यकर्त्यांना खूपच झाली. आर्थिक व संरक्षित मदत त्यांनी दिली. पण शेवटी सर्वच कार्यकर्ते स्थानबद्ध झाले. अण्णांनी या वेळी प्रत्यक्ष भाग घेतला नव्हता; अप्रत्यक्ष मदत दिली त्यामुळे ते बाहेरच राहिले. धुळ्याचे सर्वच भूमिगत कार्यकर्ते पकडल्याने १९४२ ची क्रांती धुळ्यापुरती तरी थांबली.

## अण्णांचे विधायक कार्य

अण्णांचे विधायक कार्य हे त्यांच्या स्वातंत्र्य चळवळीशी निगडित होते. अण्णा जेलमधून सुटून आले तरी स्वस्थ बसले नाहीत. गुन्हेगार जमातींचे प्रश्न अण्णांनी हाती घेतले.

साक्षरता प्रसार मोहीम चालूच होती. राष्ट्रभाषेचा प्रचार झपाट्याने करावयाचे ठरले. धुळ्यातील नागरिकांचा राष्ट्रभाषेशी संपर्क नव्हता तो स्वो. वि. संस्थेने १९३४ सालीच करवून घेतला, हे पुढील बातमीवरून लक्षात येईल.

प्रबोध
२ डिसेंबर १९३४

" हिंदी राष्ट्रभाषा या नात्याने हिंदी भाषेला दिवसेंदिवस महत्त्व येत आहे. ठिकठिकाणी वर्ग चालविले जातात, परंतु धुळ्यात हिंदी शिक्षणाची सोय नाही, ती व्हावी म्हणून स्वोद्धारक विद्यार्थी गृहात हिंदी शिक्षणाचा वर्ग आज दुपारी २ वाजता सुरू होईल. काशी विद्यापीठाचे स्नातक पं. वासुदेव झा हे वर्ग चालवतील. फी पडणार नाही. "

अण्णांनी आपल्या पत्नीलाही राष्ट्रभाषा शिकविली व तिचा प्रचार करावयास लावला.

राष्ट्रसेवादलाचे काम अण्णांनी हाती घेतले. युवकांना आव्हानात्मक पेटविल्याशिवाय स्वातंत्र्य जवळ येणार नाही, म्हणून युवा शक्तीला एकत्रित आणण्यासाठी व देशप्रेमाने प्रेरित करण्यासाठी सेवादलाची आवश्यकता अण्णांना वाटे. अण्णांचे विद्यार्थी अण्णांच्या शिकवणीने भारावून जात व उच्च स्वरात अण्णांचे कवन म्हणत—

**' वीरा स्मरू, एकी करू, निज भू मातेला ।**
**गाऊ चला, सेवू चला, सोडूनि स्वार्थाला ।**

**चाल– जन्मभूमि ही, कर्मभूमि ही, मायभूमि ही ।**
**श्री शिवबाजी, तानाजीच्या, स्मराच कार्याला ' ॥ १ ॥ गाऊ चला**

सन १९४१ मध्ये अण्णांनी ' तनु ही दिव्य करू ' म्हणून खास सेवादल सैनिकांसाठी क्रीडांगणावर म्हणावयाचे काव्य तयार केले होते.—

**' सजले सारे क्रीडांगण हे–दल सैनिक या खेळ करू–तनु दिव्य करू । '**
जे काय करावयाचे ते सारे देशासाठीच, देश स्वतंत्र तर आम्ही स्वतंत्र–
**' अवघ्या देशा भक्कम करण्या–बलशाली पिळदार करू '**

सन १९३६ ला कौन्सिलच्या निवडणुका आल्या होत्या. त्या वेळी अण्णांचे म्हणणे होते की व्यक्तिगत प्रचार करू नये; प्रचार पक्षीय असावा. त्यांनी त्या दृष्टीने एक गाणे रचले होते—

**या गरिबांनो या । या श्रीमंतांनो या । कॉंग्रेसला सारी मते द्याहो ।**
**या शेतकऱ्यांनो या । या कामकऱ्यांनो या । कॉंग्रेसला सारी मते द्याहो ।**

या वेळी अण्णांनी पक्षाकरिता केलेला प्रचार अण्णांच्या दिलदार स्वभावाची ओळख करून देणारा आहे, सर्वग्राही वृत्तीचे दर्शन या वेळी घडते. दोंडाइच्या

भागात हिंदू महासभेचा श्री. भोपटकरांसाठी प्रचार सुरू झाला होता. श्री गोविंद शास्त्री, एस्. व्ही. तेली आदी मंडळी त्यात होती. श्री. जेधे व श्री. गाडगीळांसाठी काँग्रेसतर्फे अण्णांचा प्रचार चालू होता.

कधी कधी दोन्ही बाजूंच्या प्रचारकांची एकाच ठिकाणी गाठ पडे. अण्णा विचारीत, ' आधी तुमची सभा घेता की मी घेऊ ? ' एकाची सभा संपली की दुसऱ्याची सभा होई. पक्षोपपक्षातील तणाव नाहीसा होऊन दिलखुलास चर्चा होई. प्रचार संपल्यावर दोन्हीही पक्षांचे प्रचारक केव्हा केव्हा एकाच गाडीत बसून निघून जात.

" व्यक्तिगत द्वेष कशासाठी ? ज्याच्या तत्त्वांची जवळीक समाजाला वाटेल तो पक्ष यशस्वी होईल. पक्षभेद असावा परंतु पक्षद्वेष नसावा. " अण्णा म्हणत.

एकदा संघाच्या लोकांनी दसऱ्याच्या सभेला अध्यक्ष म्हणून अण्णांना आमंत्रण दिले व अण्णांनी ते स्वीकारले. त्या वेळी काँग्रेस पक्षात गदारोळ उठला.

" मी तर ही सुवर्णसंधी समजतो. आपली तत्त्वं, आपले विचार प्रतिपक्षाला ऐकवले नाहीत तर देवाणघेवाण केव्हाच होणार नाही. कदाचित मी त्या सभेला जाऊन आपला पक्ष त्यागीन असे तुम्हाला कसे वाटले ? मला तर असे वाटते की, सर्वांच्या सभेचे व्यासपीठ एक असावे, व जनतेला सर्व तऱ्हेचे विचार ऐकवावे. सुज्ञ जनतेलाच सारासार विचार करावयाची दीक्षा द्यावी " अण्णा उत्तरले.

प्रेम-रंगात रंगलेल्या रंगनाथाने प्रतिपक्षाबद्दल अढी न धरता वातावरण शुद्ध व निर्मळ ठेवले होते. ते सर्वांची सोय पाहात. अण्णांची ही आठवण संघाचे कार्यकर्ते एस्. व्ही. तेली यांनी सांगितली.

आणखी अशीच एक आठवण एस्. व्ही. तेलींनी सांगितली. १९४७ च्या नोव्हेंबर महिन्यात दोंडाइचे येथे प्लेगची साथ जोरात होती. सारे गाव गावाबाहेर झोपड्या करून राहू लागले. अण्णांनी खटपट करून झोपड्यांकरिता पत्रे मिळविले. अण्णा या साऱ्या: झोपड्यांतून आलेल्या वैद्यकीय पथकाला बरोबर घेऊन फिरत व जातीने प्रत्येकाच्या अडचणीची चौकशी करीत.

याच सुमारास ३० जानेवारी १९४८ च्या गांधीवधानंतर आर. एस्. एस्. च्या अनुयायांवर सरसकट अत्याचारांची कुऱ्हाड कोसळली होती. पण या मंडळींना अण्णा भेटून " काही त्रास नाही ना ? काहीही त्रास झाला तर कळवा. मी आहे मदतीला " असे सांगत. अनंतराव कुलकर्णी, अनंतराव फाळके, का. ब. जोशी यांना लोकांनी धक्काबुक्की केली. अण्णांनी मध्यस्थी करून त्रास मिटविला होता.

अण्णांचे प्रतिपक्षाबद्दल कोठेही चुकले तर म्हणणे असे की, " तेही आपलेच बांधव आहेत. त्यांना वळणावर आणणे आपलेच काम आहे. " अण्णांच्या मनाची विशालता दिसते ती या ठिकाणी !

## ध्वज फडके गगनी

सन १९४७ ला अण्णा पश्चिम खानदेश (धुळे) जिल्हा काँग्रेसचे अध्यक्ष म्हणून निवडले गेले. 'चले जाव' आंदोलनाचा परिणाम झाला होता. हिंदुस्थानच्या स्वातंत्र्याला ब्रिटिशांनी मान्यता दिली. १५ ऑगस्टला–१४ ऑगस्टच्या रात्री १२ नंतर– भारताचे स्वातंत्र्य जगाला जाहीर झाले. लाल किल्ल्यावर राष्ट्रध्वज फडकला. सबंध भारत-भर आनंदोत्सव साजरा झाला. धुळ्यास कलेक्टर कचेरीवर व पोलीस ग्राउंडवर अण्णांच्या हस्ते 'यूनियन जॅक' खाली उतरवून 'तिरंगी झेंडा' फडकविला गेला.

## धन्य तोची क्षण पाहिला म्यां डोळा

ज्या ध्येयाने अण्णा झपाटले होते, ते ध्येय परिपूर्ण झालेले त्यांनी 'याची देही याची डोळा' अनुभवले. ते कृतकृत्य झाले. त्यांच्या अंतःकरणाला ज्या शल्याची बोच होती ती दूर झाली. त्यांचे शल्य पुढीलप्रमाणे होते,—

> 'स्वातंत्र्य कार्यी दिले प्राण ज्यांनी, तयांच्या कुली जन्म माझा असे।
> दास्यत्व येई परी आज माते, मना शल्य हे नित्य बोचीतसे ॥'

अण्णांचे मन सुखासमाधानाने भरून आले, आनंदाश्रू वाहू लागले.

"माझ्या जीवनातील हा सुखाचा अत्युच्च क्षण आहे. यूनियन जॅक खाली काढून माझ्या स्वतंत्र भारताचा ध्वज जिल्हा कचेरीवर मी फडकविला. माझे जीवन सार्थ झाले." अण्णा उद्गारले.

## झंझावाती प्रचार–मुख्य मंत्र्यांची भेट

अण्णा काँग्रेस कमेटीचे अध्यक्ष असल्यामुळे त्यांचे झंझावाती कार्य सुरू झाले. दि. १७-४-४८ ला मुंबई इलाख्याचे मुख्यमंत्री ना. बाळासाहेब खेर यांची भेट आदिवासी विभागाला झाली. नंदुरबारला प्रचंड सभा भरली. सर्व ठिकाणी सभेच्या अध्यक्षस्थानी अण्णा होते. दि. २०–२१ एप्रिल १९४८ ला उपमंत्री द. न. वांद्रेकर यांचा दौरा व भाषणे झाली. आदिवासी भाग जगापासून तुटलेला. तेथपर्यंत पोहोचणे कठीणच. म्हणून हा दौरा आदिवासी समाजाच्या दृष्टीने उपयुक्त ठरला. कारण तळोदे ते धडगाव व अक्कलकुवा ते काठी हे रस्ते बैलगाडी जाईल असे करावे असे ठरले.

अण्णा धुळे जिल्ह्याचे अध्यक्ष असतानाच अत्यंत दुःखद व शोचनीय घटना घडली. ३० जानेवारी १९४८ ला पू. बापूजींचा खून झाला. अण्णांनी १० दिवस



मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
२८२ नवि. कृ.
दा. क्र. २२५५३

राष्ट्रपित्यासाठी अशौच्य पाळले. महात्माजींच्या अस्थी पवित्र क्षेत्री विसर्जनाकरिता हिंदुस्थानभर ठिकठिकाणी पाठविल्या. धुळे जिल्ह्यातला अस्थिकलश अण्णांनी आणला. धुळे जिल्ह्यातील प्रकाशे येथे अस्थिविसर्जनाचे काम शिवाजीराव भावे (विनोबांचे कनिष्ठ बंधू) यांनी वेदोच्चाराने केले. आपल्या मृत्यूपर्यंत अण्णांनी १२ फेब्रुवारीला प्रकाशाला जाण्याचे कधी टाळले नाही. प्रतिवर्षी राष्ट्रपित्याचे संस्मरण त्यांनी न चुकता केले.

## निर्लोभी अण्णा

देश स्वतंत्र झाला. आता आपले काम संपले असे अण्णांनी मात्र कधीच मानले नाही. खराखुरा देशसेवक कधीच निवृत्त होत नाही. २६ जानेवारी १९५० ला भारतीय घटना सम्मत झाली व प्रजातंत्र राज्याची मुहूर्तमेढ रोवली गेली. निवडणुका जाहीर झाल्या. अण्णांनी ठरविले असते तर अण्णा सहज निवडून आले असते, कारण ते धुळे जिल्ह्याच्या राजकीय क्षेत्रात अग्रभागी होते.

'देशाचे स्वातंत्र्य खेचून आणण्याची आपची प्रतिज्ञा होती, ती आम्ही पार पाडली आहे. राजकारणापेक्षाही स्वराज्याचे सुराज्य करण्यासाठी समाजकारण आता कोणीतरी करावयास हवेच.' अण्णांचे म्हणणे.

अण्णा सत्तेच्या राजकारणात केव्हाही पडले नाहीत. त्यांनी श्री. ज. दौ. राऊळ यांचे नाव शिंदखेडे मतदारसंघातून सुचविले व त्यांना निवडूनही आणले.

'सत्तेकरिता सर्वांची स्पर्धा चालेल कारण त्यात अधिकार व मान आहे. समाजसेवेत त्याग व सेवा आहे, मनःशांती आहे. मला तेच करू द्या.' अण्णा आपल्या ज्येष्ठ बंधूंना म्हणाले.

ज्येष्ठ बंधूंना अण्णांनी राजसत्तेपासून अलिप्त राहावे असे वाटत नव्हते. ते भरल्या आवाजात म्हणाले, "बालपणापासून तू स्वातंत्र्याकरिता सर्वस्वाचा होम केलास, अनेक वेळा कारावास भोगलास, आता आलेले वैभव तू दूर लोटावेस असे आम्हाला वाटत नाही." पण अण्णांनी निर्लोभी उत्तर दिले, 'मी समाज सेवा करणार.'

१९४७–४८ मध्ये अण्णा जिल्हा दारूबंदी समितीवर कमांडिंग स्टाफ ऑफिसरही झाले होते. पण त्याचा गाजावाजा अण्णांनी कधी केला नाही. लोकांना दारूपासून कसे परावृत्त करता येईल याचाच विचार त्यांनी केला. विचार तशी अण्णांची कृतीही होती.

## बिना सहकार नही उद्धार

सन १९४५ ला महायुद्ध संपले. देशात जीवनावश्यक वस्तूंची टंचाई व महागाई वाढू लागली. नागरिकांच्या या गरजा भागविण्यासाठी अण्णांनी गिऱ्हाईक संस्था उभारली.

स्वतः अण्णा त्या संस्थेचे चीफ प्रमोटर व पहिले चेअरमन होते. संस्थेने मूळ धरले तसे अण्णा आपणहून बाजूला झाले. त्यांनी तुळशीराम गणपत भोई या मागासलेल्या जमातीतील सुज्ञ व्यक्तीच्या हाती संस्था सोपविली.

अण्णांनी अनेक सहकारी संस्था सुरू केल्या. त्यांतील काही पुढीलप्रमाणे—लोह सरंजाम सहकारी संघ, तेल गिरणी कामगार संघ, प. खानदेश भंगीसेवा समाज, आदी.

कार्यकर्त्यांवर अण्णांचा पूर्ण विश्वास होता. दोंडाइचे येथे गिऱ्हाईक संस्थेचे अण्णा चेअरमन असताना श्री. एस्. व्ही. तेली हे मॅनेजर होते. ते सांगतात—

'कोऱ्या चेक्सवर अण्णा सह्या करून आमच्या स्वाधीन करीत. त्यांच्या मनात कधीही अविश्वासाला थारा नसे; तसेच त्यांना फसविणे आमच्या स्वप्नीही नव्हते. हिशेबालाही अण्णा तितकेच चोख होते. याबाबत मी त्यांना गुरू मानले आहे.'

दोंडाइचे येथील सहकारी चळवळीचा पाया अण्णांनी घातला असे म्हटले तर चुकीचे होणार नाही.

दि. २८–९–४८ च्या स्वतंत्र भारतात या दृष्टीने बोलकी बातमी आहे—
" जिल्हाध्यक्ष श्री. टोणगावकर व श्री. नानाशेट शिंपी यांनी कंजर समाजात जागृती करून कंजर सेवा मंडळाची स्थापना केली. या कामी श्री. बा. ल. मेहता यांचीही मदत झाली.

धुळे मिलचा संप, कॉंग्रेस सेवादल, जिल्हा तक्रार निवारण समिती, कापड उपसमिती, जिल्हा ग्रामविकास मंडळ या सरकारने नेमलेल्या कमिट्यांतूनही जिल्ह्यातील कॉंग्रेस कार्यकर्त्यांनी बहुमोल अशी कामे केली आहेत. मुंबई प्रांतात धान्य व कापड वाटपाच्या कामी प. खानदेशातील योजना अव्वल दर्जाची ठरली आहे हे नमूद करण्यास अभिमान वाटतो "

सहकारी चळवळ फोफावली पाहिजे असे अण्णांचे मत होते.

## शैक्षणिक प्रसार

अण्णांनी अंगीकारलेल्या शिक्षणाचा प्रसार सार्वत्रिक करावयाचे ठरविले. ते व त्यांचे जिवलग मित्र नवलभाऊ दोंडाइचे येथे स्वो. वि. संस्थेने चालविलेल्या अँग्लो व्हर्नाक्युलर स्कूलचे व त्यास संलग्न असलेल्या वसतिगृहाचे संस्थापक व व्यवस्थापक होते. हे काम सांभाळून तालुक्यातून तसेच जिल्ह्यातून ग्रामीण भागात शिक्षण प्रसार करण्याची योजना अण्णांनी आखली. धुळे जिल्ह्यात अण्णांनी साक्षरता प्रसारक शाळांचे जाळेच विणले. ते जवळजवळ १२५ शाळा चालवीत.

सन १९३८ ते १९४५, अण्णा शिंदखेडे तालुका साक्षरता प्रसार शाखेचे संस्थापक व चेअरमन होते. सन १९३९ ते १९५० पर्यंत ते महाराष्ट्र साक्षरता प्रसार शाखेच्या कार्यकारिणीचे सभासद होते.

अण्णा व नवलभाऊ सायकलींनी खेड्यांत जात, कशाचीही अपेक्षा न करता शिक्षक प्रमाणिकपणाने काम करतात की नाही याची पाहणी करीत. खेड्यांतील लोकांशी चर्चा करणे, विद्यार्थी जास्तीत जास्त मिळविणे अशी कामे चालत.

अण्णा प्रौढांकरिता रात्रीच्या शाळा चालवीत. सोप्या शब्दांत परंतु त्यांच्या वयाला योग्य अशी हस्तलिखित पुस्तके अण्णांनी लिहिली होती. या शाळांना दोंडाइच्यातील जनता 'डंगरी शाळा' असे संबोधून हिणवीत असे. पण अण्णांनी आपले कार्य बंद केले नाही.

अण्णांनी आपल्याला भिंगरीसारखे अनेक कार्यांत गुंतवून घेतले. दोंडाइचे गावात नदीच्या पात्रात लोक प्रातर्विधी उरकतात. अण्णा व राजकारणातील त्यांचे एक मित्र नाना शिंपी इतस्ततः पसरलेला मैला उचलून एका खड्ड्यात टाकीत. या कार्याची लोक कुचेष्टा करीत व म्हणत, 'या लोकांना वेड लागले आहे.'

'मैलासफाईत कमीपणा नाही, उलट गाव स्वच्छ ठेवायचे असेल तर त्याची प्रथम आवश्यकता आहे. मैला उचलणारा मेहेतर मानवच आहे ना?' अण्णांच्या बहुविध कार्यांमुळे त्यांनी हे काम फार थोडे केले. पण नानाशेट मात्र खूप वर्षे करीत होते.

अण्णा प्रत्येक वेळीं सर्वांना सांगत, 'केल्याविना होत नाही रे, आधी केलेच पाहिजे.' 'कृतीविना उक्ती म्हणजे नुसतीच वाचाळता.' आम्हाला वाचाळवीर नकोत. कृतिवीर हवेत.

## स्वोद्धारक विद्यार्थी संस्थेचे शिल्पकार

### जन-जागरणाचे प्रभावी अस्त्र

स्वोद्धारक विद्यार्थी संस्थेचे संस्थापक नानासाहेब देशपांडे, यांचा अण्णांवर फार लोभ. त्यांनी काही कल्पना अण्णांपुढे मांडली की, अण्णा लगेच तिला योजनाबद्ध करीत. अज्ञानांधकारात बहुसंख्य भारतीय जनता चाचपडत असल्यामुळेच स्वराज्याचा काय किंवा सुराज्याचा काय दिव्य प्रकाश त्यांना दिसूच शकत नाही. जन जागरणाचे प्रभावी अस्त्र शिक्षण आहे याची या गुरू शिष्याला तीव्र जाणीव होती. द. के. देशपांडे व ना. गो. वैद्य यांनी सन १९२१ ला स्वोद्धारक विद्यार्थी संस्थेची मुहूर्तमेढ रोवली तर सन १९२९ मध्ये अण्णासाहेब टोणगावकर व नवलभाऊ पाटील या द्वयाने दोंडाइचे येथे त्याची शाखा काढली.

# औद्योगिक शिक्षण

नुसत्या पुस्तकी शिक्षणाने जनजागरणाचे काम भागणार नाही तर आधुनिक पुस्तकी-शिक्षणाला ' औद्योगिक शिक्षणाची जोड असल्याशिवाय तरणोपाय नाही ' ही त्यांची विचारसरणी ' प्रबोध १९३४ 'मधील ' सा विद्या या विमुक्तये ' या लेखावरून आढळून येते. औद्योगिक शिक्षणाकरिता शिक्षकांची नितांत गरज म्हणून अण्णांनीच सन १९३३ ला मुंबईस जाऊन शिक्षण घेतले.

' I have completed the course in ' Dying & Printing ' in the private institute named ' Udyam Mandir ' which is conducted by the Saraswat Samaj at Dadar in the year 1933. ' धुळे येथील न्यू प्रताप मिलच्या ' डाइंग मास्तर ' ना केलेल्या अर्जावरून.

याशिवाय मुंबईत फ्रेटवर्क, फ्रेमवर्क यांचे शिक्षणही अण्णांनी घेतले. धुळ्यात ते खाजगीरीत्या बाळा मिस्त्रींकडे सुतारकाम, लोहारकाम शिकले. डॉ. राजाभाऊ देशपांडे यांचेकडे व ' प्राणी– रक्षण संस्थेत ' डॉ. मानेकरांकडे अण्णांनी वैद्यकी शिकण्याचा प्रयत्न केला. सार्थ वाग्भटाचे दोन भाग त्यांच्या संग्रही होते.

धुळे जिल्ह्याच्या ' प्रबोध ' नामक मुखपत्रात २५ मे १९३४ व ३१ मार्च १९३५ ला प्रसिद्ध झालेल्या वृत्तांवरून औद्योगिक शिक्षणाची कल्पना येते.

प्रबोध

२५ मे १९३४

" विद्यार्थ्यांना सर्वांगीण शिक्षण देऊन स्वावलंबी बनविणे हे संस्थेचे ध्येय आहे. ते साधण्यासाठी धंदेशिक्षण आवश्यक आहे. विद्यार्थी गरीब स्थितीतील असल्यामुळे थोडया भांडवलावर, थोडया मनुष्यबळावर व कोठेही चालविता येतील अशा धंद्यांमुळे त्यांच्या पोटापाण्याचा प्रश्न सुटेल.

सूत कातणे, विणकाम, रंगकाम, छापकाम, खडीकाम, शिवणकाम, टिनकाम, कल्हईकाम, लोहारकाम, याचबरोबर विद्यार्थ्यांची संस्कृती जेणेकरून वाढेल असे बौद्धिक शिक्षण म्हणजे मराठी भाषेचे चांगले ज्ञान, हिंदी राष्ट्रभाषा म्हणून व संस्कृत भाषा धर्मभाषा असल्याने त्यात सोपे ग्रंथ वाचता येतील एवढे शिक्षण दिले जाईल.

शारीरिक व आचार प्रधान, धार्मिक शिक्षण देण्याची संस्थेतच सोय होईल, तसेच चित्रकला, कागदकाम, फ्रेटवर्क, भरतकाम असे कलात्मक शिक्षणही देण्यात येईल.

संस्थेतील विद्यार्थी हे बहुधा खेडेगावात जाऊन राहतील हे उघड असल्याने त्यांस शेतकीचे शक्य तेवढे पुस्तकी व प्रत्यक्ष शिक्षण अवश्य दिले जाईल. तसेच आर्य-वैद्यक, ज्योतिष, सहकारी चळवळ, प्रथमोपचार इ. विषयांचे कामचलाऊ शिक्षण दिले जाईल. "

" विद्यार्थी धंद्याचे शिक्षण घेऊन जी कामे करतील त्यात होणाऱ्या नफ्यापैकी काही भाग त्यांस दिला जाईल."

वृत्त पूर्णपणे उद्धृत करण्याचे कारण स्वातंत्र्य-पूर्व काळात नानासाहेब देशपांडे, श्री. भावे गुरुजी व अण्णा या त्रयीने केलेला हा प्रयोग धाडसीच ठरणार होता. कोठल्याही सरकारी वा निमसरकारी अनुदानाशिवाय हा प्रयोग चालणार होता, परंतु अण्णांना चरितार्थाकरिता दुसरा मार्ग शोधणे भाग होते. म्हणून त्यांनी मिलमध्ये नोकरीचा अर्ज केला.

स्वोद्धारकच्या विनामूल्य सेवेकरिता अण्णांनी मिलची नोकरी धरली, परंतु मजुरांची दयनीय अवस्था पाहून त्यांना अती दुःख झाले. सन. १९३६ ला अण्णांनी 'खादीची पवित्रता' काव्यरचना केली. त्यात मिलमुळे निर्माण झालेल्या पापाची ते जाणीव करून देतात

**" धंदा नसे कुणाही-बेकार सर्व झाले**
**श्रीमंत भोगी चैन हा मीलचा प्रताप।"**

स्वतंत्र वृत्तीच्या अण्णांच्या स्वभावाला मिलची नोकरी मानवत नाही हे गुरुवर्य देशपांडे यांनी हेरले व पुनश्च दोंडाइचे येथील शाखेवर अण्णांची नियुक्ती केली. देशकार्याकरिता अण्णा जसे झपाटले होते तसेच स्वो. वि. संस्थेच्या बीजाचा विशाल वटवृक्ष कसा होईल याकडे त्यांचे सारे लक्ष केंद्रित झालेले असे.

आर्थिकदृष्ट्या अत्यंत दुर्बल अशा शैक्षणिक संस्थेचा विकास करावयाचा होता. पण अण्णांनी हार मानली नाही. करणाराला सर्व मिळते, 'आधी केलेच पाहिजे' हे त्यांचे मत. 'उदार दानशूरांच्या अंतःकरणाला भिडले पाहिजे' असे ते म्हणत. दोंडाइचे येथील सुप्रसिद्ध शिक्षणप्रेमी व सामाजिक कार्यकर्ते श्री. गोविंद बाळकृष्ण ऊर्फ बापूसाहेब साठे हे सहज बोलून गेले–

" मदत करण्याची कोणालाही इच्छा होईल असे हे कार्य आहे."

अण्णांनी त्यांच्या बोलण्याचा तेवढाच धागा पकडला, " बापूसाहेब, संस्थेला स्वतःची जागा मिळाली तर तिचा पसारा झपाट्याने वाढेल, म्हणून आपण आम्हास जमीन व आर्थिक मदत द्याच." बापूसाहेबांचे अण्णांवर फार प्रेम होते. त्यांच्या कार्याची ते प्रशंसा करीत.

" मी जमीन कायमची दान करतो, परंतु हे २,००० रुपये परत करण्याच्या बोलीने देतो." बापूसाहेब उत्तरले. पुढे ते पैसेही त्यांनी संस्थेला दान केले.

अण्णांना गगनात न मावणारा आनंद झाला. विद्यार्थ्यांच्या श्रमदानाने इमारत तयार झाली. आजही माजी विद्यार्थी संस्थेत येतात तेव्हा म्हणतात,

" ही झाडे आम्ही लावली आहेत."

" ही विहीर आम्ही खोदली आहे."

" या इमारतीचा पाया आम्ही खोदला आहे, इमारतीचे सरे वर चढविले आहेत."

श्रमदानाच्या जोडीला विद्यादान आलेच. अण्णांचे मत असे की मुलांना शाळेतच चांगले शिकविले जावे; त्यांना शिकवण्या ( Tution ) लावावयाची वेळ येऊ नये. जे मागे पडले असतील त्यांना स्पेशल कोचिंग देऊन वर्गाबरोबर आणण्याची जबाबदारी शिक्षकांचीच आहे. सेवक एकदा शिकवण्या करण्यात रमला की तो स्वार्थी बनेल, संस्थेच्या मूळ ध्येयाकडे त्याचे दुर्लक्ष होईल–असे अण्णा म्हणत. सेवकांचे पगार यथातथाच. पगारात भागेना. पूरक उत्पन्न हवे होते.

" अण्णा, तुम्हीही सेवक आहात. मूळ संस्थेचे काम सोडून तुम्ही चळवळीचे– काँग्रेसचे काम करताच की नाही ? चळवळीऐवजी आम्ही शिकवण्या करतो इतकेच. तुमचा त्याला विरोध का ? "

अण्णांच्या चेहऱ्यावर खेद पसरला. आपल्या कार्याची व शिकवण्याची तुलना व्हावी यामुळे त्यांना दुःख झाले. दुःखद अंतःकरणाने परंतु भेदक शब्दांत अण्णा म्हणाले—

" ही तुलनाच अप्रस्तुत आहे. देशकार्य हे विशाल सामाजिक कार्य आहे. चळवळीचे कार्य पोटार्थी नाही, तो त्याग आहे, भोग नाही. आजच्या घडीला राष्ट्राची सर्वात मोठी व पहिली गरज स्वातंत्र्य सैनिक निर्मितीची आहे. ते मी करतो, म्हणूनच विशाल व उदार अंतःकरणाने संस्थाचालक मला परवानगी देतात. त्या कार्यापासून मला एकही कपर्दिक मिळत नाही, उलट डोक्यावर टांगती तलवार आहे.

माझ्या म्हणण्याचा तुम्ही विपर्यास करीत आहात. शिकवण्या ह्या वैयक्तिक स्वार्थासाठी आहेत. एकदा बाहेर खाजगी शिकवण्या सुरू केल्या की शाळेत शिकविण्याकडे फारसे लक्ष राहणार नाही. खाजगी शिकवण्या वर्गभेद वाढवतील. सर्वांना समान शिक्षण हवे. शिकवण्या हे शिक्षण क्षेत्रातील ' मूले कुठाराघात ' आहे. "

सेवकांच्या मीटिंगमध्ये असे वाद नेहमी असायचे – संस्थेसाठी प्रचार, सेवकांची कामे, विविध अभ्यासक्रम असे अनेक विषय सेवकांपुढे यायचे आणि वाद व्हायचे !

अण्णांचा दृष्टिकोण नेहमी राष्ट्रीय असावयाचा. सेवकांचा व्यावहारिक असावयाचा. अण्णांचे जीवन चाकोरीबद्ध नव्हते. त्यात काही आगळेपणा होता, राष्ट्राविषयी श्रद्धा होती, ज्ञान होते, निर्भयता होती, निःस्वार्थ होता, स्वावलंबन होते. अनेक जीवनमूल्ये त्यांनी हृदयाशी कवटाळली होती.

सेवकांच्या या दोन बाजूंचे समन्वयपण मजेशीर होत असे. आजन्म सेवक नानासाहेब देशपांडे त्यावर समतोल पडदा पाडायचे. अगदी त्यांनी सूचना देऊन ठेवली होती की काय न कळे ! काकी ( नानांच्या पत्नी ) यायच्या—

" अरे अण्णा, भात गार होतो आहे ना ? "

सारे सेवक वाटच पाहायचे. वाद तेथेच संपायचा आणि सर्वांनी नानांकडे व्यवस्थित ताव मारायचा. उन्हाळ्यात तर आंबरसपुरी आणि भजी असायची.

" नको काकी ! पुरे आता, पानावर उरवायचे नाही हा माझा पण आहे."

" अरे वाद करून दमलास ना ? घे एक पुरी ! "

असे हे नेहमी चालायचे. मीटिंग संपली की वाद संपला. पुन्हा सारे एक. कधी कधी सारेच एकत्र करमणुकीसाठी सिनेमाला, नाटकालाही जात. नाना व अण्णा यांनी लावलेले हे वळण होते. अण्णांनी तुटेपर्यंत कधीच ताणून धरले नाही. वाद तेथेच सोडून द्यायचा, पटविण्याचा प्रयत्न करीत.

" एखादे दिवशी तरी माझे म्हणणे पटेल, अजून वेळ आली नसेल, किंवा माझ्या म्हणण्यात प्रभावीपणा नसेल. " अण्णा म्हणत.

## व्यापाऱ्यांशी संघर्ष

सन १९३७ मध्ये व्यापारी व अण्णा यांच्यात खटका उडाला. मार्केटमध्ये व्यापारी शेतकऱ्यांच्या मालाचा तोल बरोबर करीत नसत. काटा झुकतो न झुकतो की भराभर तराजूचे पारडे ओतून दिले जाई किंवा पायाने ते लोटले जाई. शेंगांमध्ये फार माती आहे असे म्हणून पुन्हा मालाच्या किमतीत कपात होई. शेतकरी नाहक नागवला जात आहे, तर दुसरीकडे एक व्यापारी आपले रुपये तागडीने मोजत आहे, हे समाजसेवेचे कंकण बांधलेल्या अण्णांना सहन झाले नाही.

त्यांनी मार्केटमध्येच शेतकऱ्यांची सभा घेतली. व्यापाऱ्यांना त्याबाबत तडजोड करण्यास सांगितले, परंतु एक तरुण मास्तर आपल्याला शिकवतो काय ? ' थांब तुझी भाकरीच बंद करतो ' अशा विचाराने व्यापारी अण्णांवर खूप चिडले. अण्णांनीही निर्धाराने शेतकऱ्यांची एकही गाडी मार्केटला येऊ दिली नाही. दोंडाइचे मार्केट फार मोठ्या प्रमाणात उलाढाली करीत असे. दिल्ली, मद्रास, पंजाबहून–दूरदूरचे व्यापारी येथे माल घेण्यास येत–आजही येतात. दूरचे व्यापारी परत गेले तर नंतर स्थानिक व्यापाऱ्यांचा माल तसाच राहिला असता. तीन दिवस मार्केट बंद. काही शेतकऱ्यांनी आपल्या गाड्या परगावच्या मार्केटमध्ये नेल्या. व्यापारी चिडले.

व्यापारी स्वो. वि. गृहाला वर्षाला सुमारे १५०० रुपये लागा देत असत. लागा म्हणजे व्यापारी शेतकऱ्याकडून प्रत्येक गाडीवर काही रक्कम अधिक आकारीत. त्याला ' लागा ' म्हणत व ही जमा झालेली रक्कम धार्मिक, सामाजिक, शैक्षणिक कार्याकरिता वाटून देत.

लागा बंद झाला. संस्थेला मिळणारी आर्थिक मदत बंद झाली. याला कारण अण्णाच ! लोकांनी दोषाचे खापर अण्णांच्या माथी फोडले.

" व्यापारी संस्थेला कुलूप ठोकणार " अशी बातमीही पसरली. अण्णा तसे डगमगले नाहीत. त्यांनी लागा चालू ठेवावा म्हणून प्रयत्न करून पाहिले. व्यापारी ऐकेनात.

अण्णांनी उपोषण सुरू केले. " जोपर्यंत व्यापारी लोकांची मने शुद्ध होत नाहीत आणि लागा सुरू करीत नाहीत तोपर्यंत मी अन्नग्रहण करणार नाही. माझा राग संस्थे-वर का ? "

अण्णांचा निर्धार व्यापाऱ्यांनी पाहिला. पुढे अधिक ताणणे बरोबर नाही, म्हणून उपोषणाच्या तिसऱ्या दिवशी त्यांनी लागा सुरू केल्याचे जाहीर केले. अण्णांचे उपोषण सुटले.

स्वो. वि. संस्थेच्या व्यवस्थापक मंडळाची सभा झाली. अण्णांचे अभिनंदन ठरावाने केले. अण्णांनी आपले निर्भीड मत या वेळी व्यक्त केले.

" व्यापारी, व्यापारी दृष्टिकोणातून संस्थेशी संबंध ठेवू पाहतात. त्यांची मदत निरपेक्ष नाही. वास्तविक हा लागा शेतकऱ्यांचाच म्हणजे समाजाचा आहे. व्यापारी आपल्या तिजोरीतून पैसे देत नाहीत. पण त्या पैशाच्या जोरावर जर ते संस्थेला अग-तिकता आणीत असतील तर हा संबंध तोडलेला बरा. व्यापारी व शेतकरी यांच्या परस्पर सहकार्याविना देशाची आर्थिक बाजू बळकट होणार नाही. व्यापारी माझे शत्रू नाहीत पण शेतकऱ्यांच्या अज्ञानाचा व अगतिकतेचा फायदा ते स्वार्थापोटी उठवीत असतील तर त्यांना माझा प्रखर विरोध राहील. संस्थेला लागा हवा आहे का मी ? संस्थेच्या आर्थिक व्यवस्थेची जबाबदारी मी उचलतो. "

अण्णांनी संपूर्णतया आर्थिक जबाबदारी उचलली व संस्थेने व्यापाऱ्यांचा लागा नाकारला. अण्णांची संपूर्ण हयात समाजसेवी संस्थांकरिता आर्थिक मदत गोळा करण्या-करिता खर्ची पडली. स्वो. वि संस्था, कॉंग्रेस, कस्तुरबा-स्मृती, गांधी-स्मृती, हरिजन सेवा संघ या सर्वांकरिता मदत फंड त्यांनी मिळविला.

अण्णांच्या हातातील मदत-पावती-पुस्तक कधी सुटले नाही.

" अण्णा, भिक्षापात्र अवलंबिणे, जळो जिणे लाजिरवाणे." कोणी गमतीने म्हणत.

" हो पण स्वार्थासाठी; स्वतःच्या उदरभरणासाठी. परार्थासाठी नाही. सामाजिक संसार फार मोठा असतो अन समाजातच हा पैसा विखुरलेला असतो. दात्याचे दातृत्व जागृत करणे व मिळालेला पैसा ज्याचा त्याला पोहोचता करणे हे प्रामाणिक विश्वस्ताचे काम, तेच मी करीत आहे. "

आर्थिक दान देण्याची कुवत नसेल तर अण्णा श्रमदानाकरिता आवाहन करीत. शिक्षकांना पुरेसा पगार नव्हताच, तेव्हा त्यांच्याकडून आर्थिक मदत मिळणे शक्यच नव्हते पण श्रम करता येणार होते.

# समाजाचा विश्वस्त

"माणसाच्या पोटापाण्यासाठी चरितार्थाकरिता माणसाने श्रम केले तर त्यात विशेष नाही. समाजासाठी श्रम करायला हवेत. हेच उत्पादक श्रम होत." असे अण्णा म्हणत.

याच मार्गदर्शनातून शिक्षकांची साथ अण्णांना मिळाली. ७ वी नंतर एका वर्षात एकदम तीन इयत्ता ( इंग्रजी स्पेशल क्लास ) करता येत होत्या. शिक्षकांनी हे वर्ग विनावेतन चालविले. फीचे सारे उत्पन्न संस्थेच्या इमारतीसाठी दिले. जनतेने देणग्या दिल्या. विद्यार्थ्यांनी श्रमदान केले. सर्वांच्या सहकार्याने १९४८ मध्ये स्वो. वि. संस्थेच्या हायस्कूलची पश्चिमाभिमुख दोन मजली इमारत उभी राहिली. 'पुरुषार्थाचे प्रतीक' लोकसत्ताकार म्हणतात, ( दि. ८-४-५७ ) 'नामोल्लेख करून एखादा चिरा या इमारतीस हवा' असे अनेकांना वाटले; परंतु अण्णा आणि प्रसिद्धी कधी एकत्र आल्या का ?

स्वोद्धारकसाठी जी जी मदत मिळे तिचा योग्य प्रकारे विनियोग होतो की नाही हे अण्णा जातीने पाहात असत. नियमित जमाखर्च लिहिणे व पै पैचा हिशेब जनतेसमोर ठेवणे याबाबत अण्णा कटाक्षाने काळजी घेत. प्रतिवर्षी ते अहवाल देत.

"जनतेचा विश्वास संस्थेवर आहे तोपर्यंतच संस्था जिवंत राहील" असे ते म्हणत व तशी काळजीही घेत.

स्वो. वि. गृहाची इमारत भोगावती नदीपलीकडे लेंढूर नाल्याकाठी होती. स्वो. वि. गृहाचे संचालक अण्णासाहेब गावात राहात होते. पुढे पुढे चोरीचे प्रकार फार वाढू लागले.

"अण्णा, आज प्रचारातून मिळालेले सर्व धान्य चोरी गेले."

"आनंद आहे." काहीही नुकसान झाले तर अण्णांची ही प्रतिक्रिया असे. पण अण्णा असे म्हणून स्वस्थ बसले नाहीत. संस्था निर्धन असल्यामुळे व्यवस्थापकासाठी घराची व्यवस्था अशक्यच होती.

सन १९४७ ला दोंडाइचे येथे प्लेग सुरू झाला. सर्व गाव गावाबाहेर पडले. शाळा बंद झाल्या. बरेचसे शिक्षक गावाबाहेरील स्वो. वि. गृहात आले. स्वो. वि. गृहाजवळ जागा भरपूर होती पण फंड नव्हता.

"सर्व शिक्षकांनी संस्थेच्या जागेवर आपापली घरकुलं बांधून घ्यावीत. म्हणजे स्वोद्धारक विद्यार्थी गृहाला 'गुरुकुलाचे' स्वरूप येईल. विद्यार्थीवर्गाकडे जातीने लक्ष देता येईल. विद्यार्थ्यांना संस्कारक्षम शिक्षण मिळेल. आमचे गुरुजी आमचेजवळ राहात म्हणून आमच्यावर संस्कार झाले. पैशांना व्याज नाही व जागेला भाडे नाही. जागा सोडताना संस्था मूळ खर्च देईल."

अण्णांच्या या म्हणण्याला फक्त श्री. अ. शं. ठोमरे यांनी साथ दिली. दोघांनी चार-साडेचार हजार रुपये खर्च करून घरकुलं बांधली.

याबाबत अण्णांना सन १९६४ ला कटू अनुभव आला. त्यांच्या पत्नी मंदाकिनी-बाई व संस्थेचे अध्यक्ष यांच्यात मतभेद झाला. त्यांचा असा गैरसमज होता की, अण्णा याच्या मुळाशी असावेत; परंतु आपल्या पत्नीला वयाच्या २१ व्या वर्षीच अण्णांनी मतस्वातंत्र्य बहाल केले होते. एवढेच काय त्यांनी स्वविचारानेच वागावे असा त्यांचा आग्रह असे. संस्था चालकांनी बाईवरील आकसाने अण्णांना त्यांनी स्वखर्चाने बांधलेले घर त्वरित रिकामे करून द्यावे म्हणून नोटिसांवर नोटिसा लावल्या. अण्णांचे म्हणणे एवढेच की मुलगा वर्ष—दीड वर्षांत दोंडाइच्यास येत आहे, त्या वेळी मला दुसरी जागा पाहावीच लागेल. पण अध्यक्षांना तेवढाही अवधी द्यावासा वाटत नव्हता.

त्याही पुढची पायरी संस्थेच्या अध्यक्षांनी गाठली व २४-६-६५ च्या पत्राने अण्णांना 'मागील जमाखर्च व डेडस्टॉकचा हिशेब त्वरित द्यावा, अन्यथा संस्थेला वेगळा मार्ग पत्करावा लागेल, याची नोंद घ्यावी' असे त्यात फर्माविले.

सन १९५४ लाच अण्णांनी स्त्री. वि. गृहाचे पगारी काम सोडले होते. ते संस्थेचे मानद सेक्रेटरी म्हणून होते.

वास्तविक अण्णांसारख्या रोज रात्री 'एकनाथी जमाखर्च' लिहून पै न् पै जुळविणाऱ्या व संस्थेचे जमाखर्च प्रतिवर्षी जनतेपुढे येतील याची काळजी घेणाऱ्या व्यक्तीला कोत्या विचारांच्या अध्यक्षांकडून असे पत्र जावे हा केवढा दैवदुर्विलास! अण्णांनी निर्भीड शब्दांत सविस्तर पत्र पाठविले. जागे अभावी पूर्ण पत्र उद्धृत न करता काही भाग घेणे सयुक्तिक होईल.

"(१) प्रॉपर्टी रजिस्टरमध्ये नोंद करण्यासाठी आपण इमारतीचे जमाखर्च मजकडे मागता. हे सर्व जमाखर्च संस्था ज्या वेळी चॅरिटी ट्रस्ट ॲक्टान्वये नोंदली गेली त्या वेळेस त्या वेळचे संस्थाप्रमुख यांच्याकडे पाठविले गेले व त्याची सर्व नोंदही माझ्या माहितीप्रमाणे चॅरिटी ट्रस्टच्या ( दि. २७-७-५३ ) कागदपत्रांत झाली असावी. माझा त्या जमाखर्चाशी काही संबंध त्यानंतर राहिलेला नाही. या कायद्याखाली (सन १८६० च्या पब्लिक ट्रस्ट ॲक्ट) संस्था नोंदल्यानंतर माझ्या कारकीर्दीत कोणतीच इमारत बांधली गेली नाही."

"(२) अनेक सार्वजनिक कामांशी माझा संबंध व त्यातून पुन्हा सत्याग्रहाच्या वेळी राजीनामा देऊन बाहेर जाणे, यामुळे मी गृहात अनुपस्थितच असे. ही सर्व कामे करण्यास अर्थात संस्थेची संपूर्ण संमती होतीच. अंतरव्यवस्थेशी माझा संबंध जवळजवळ नव्हताच. माझ्या या सार्वजनिक कामामुळे मला मिळालेल्या 'प्रेस्टिज'चा संस्थेला देता येईल तेवढा फायदा करून देणे व पैसा गोळा करून धुळे व दोंडाइचे स्त्री. वि. गृह, व्हिक्टोरिया ऑर्फनेज व शाळा यांच्यासाठी व्यवस्था करून देणे व अंतरव्यवस्थेबाबत सल्ला देणे हेच माझे काम होते. या दृष्टीने दि. २३-३-५२ चे मा. आजन्म सेवकांचे पत्र व संचालक मंडळाचा ठराव आपल्या प्रोसीडिंग्ज्वरून आपल्या लक्षात येईल."

आजन्म सेवकांचे सर्व पत्र पाहण्याऐवजी त्यातील महत्त्वाचा मजकूर असा—

२३-३-५२

" तुम्ही पुढील कामे करावयाची आहेत—

( १ ) स्वो. वि. गृहाचा मुख्य व्यवस्थापक.

( २ ) शाळेचा सेक्रेटरी

( ३ ) संस्थेचा मुख्य प्रचारक

( ४ ) आजन्म सेवकाचा मुख्य सहायक.

तुमचे मुख्य काम संस्थेच्या प्रचाराचे आहे. संस्थेला स्थैर्य यावे व तिची आर्थिक प्रगती व्हावी या दृष्टीने तुम्ही विशेषतः काम करावयाचे आहे. तुम्हांस सेक्रेटरी नेमले आहे, हे मा. एज्यु. इन्स्पेक्टरसाहेब यांना कळविण्यात येत आहे. "

" मला राजीनामा देऊन ११ वर्षे झाली. **गेली ११ वर्षे आपणच अध्यक्ष आहात.** आपण संस्थांच्या शाखांचे जमाखर्च ऑडिट प्रतिवर्षी करून घेत आहात, मग याच वर्षी ही अडचण व तीही माझ्यामुळे निर्माण झाली हे पाहून तर फारच आश्चर्य वाटते. असो !

**सामूहिक जबाबदारीचे तत्त्व—** दि. १-७-५४ ला मला संस्थेच्या सेवेच्या कामास २५ वर्षे पूर्ण झाली [ माझा तो एक संकल्प होता. ] म्हणून मी स्वोद्धारक विद्यार्थी संस्थेतून निवृत्त झालो. तोपर्यंत दोंडाइचे शाखेला दिडकीचेही कर्ज नव्हते. दैनंदिन पैशाचे देवघेवीचे व्यवहार रोखीनेच होते. उधारीची प्रथा नव्हती.

माझ्या सहकाऱ्यांना संपूर्ण विश्वासात घेऊन त्यांच्या सहकार्याने मी दैनंदिन व्यवहार केले. त्यांना विश्वासात घेण्यासाठी रोज मी घडणाऱ्या घटना लहान मोठ्या सर्व सेवकांना सांगत असे व सारे श्रेय त्यांना देत असे. म्हणून मी २५ वर्षे निर्वेध, कर्जमुक्त अशी संस्था चालवू शकलो व काम सोडले तेव्हा कसलेही देणे मजकडे नव्हते. "

स्वो. वि. संस्थेतील जमाखर्चाबाबत काही गोष्टी शिक्षक अण्णांच्या कानांवर टाकीत असत. अण्णांना सार्वजनिक संस्थांतून नव्यानेच आलेला भ्रष्टाचार पसंत नव्हता. देणग्या घेणे पण त्यांच्या पावत्या न देणे वगैरे त्यांना खपत नव्हते, म्हणून त्यांनी जमाखर्च निदर्शनास आणण्याची मागणी केली त्यातून वरील प्रकरण उद्भवले. अण्णांना वैयक्तिक स्तोम—व्यक्तिमाहात्म्य मुळीच पसंत नव्हते ते सांघिक माहात्म्य मानत. अण्णांच्या विरुद्ध कोणी कितीही गदारोळ उठविला तरी त्यांच्या मनात कुठलीही अढी राहात नसे. ' होईल पश्चात्ताप त्यांना केव्हातरी ! ' असे ते म्हणत.

' मना बोलणे नीच सोशीत जावे ' रामदासांची शिकवण अंगी मुरलेली होती. याउलट हरिजन सेवक संघाच्या अध्यक्षांचा अण्णांवर फार मोठा विश्वास. अण्णा सतत दोन महिने प्रचारासाठी दौऱ्यावर होते. घरी आले अन् अचानक त्याच रात्री परलोकवासी

झाले. हिशेब द्यावयाचा तसाच राहिला. कै. अप्पासाहेबांनी चिठ्ठी देऊन श्री. बाविस्कर यांस पाठविले.

महाराष्ट्र हरिजन सेवक संघ, धुळे

अध्यक्ष

**वि. नी. उपाध्ये**, बी. ए.

८-१०-१९६८

डॉ. रवींद्रनाथ

यांसी

कै. अण्णासाहेबांच्या आकस्मिक निधनानंतर तुम्ही जी धीरोदात्त वृत्ती दाखविली हे पाहून धन्यता वाटली. बापसे बेटा अशीच तुमची वृत्ती आहे. तुम्हाला तुमची पत्नी अनुकूल मिळालेली आहे. तेही भाग्य आहे. तुमच्या मातुःश्रींचा शोकावेग मी समजू शकलो. तथापि त्यांनीही आपले मन आता विवेक बुद्धीने शांत केले असेल, अशी खात्री आहे. अण्णासाहेब देहाने गेले तरी चैतन्य रूपाने आपल्या तिघांच्या ठिकाणी, नव्हे आपल्या चि. राजश्रीसह चौघांच्या ठिकाणी ओतप्रोत भरून राहिलेले आहेत. याची जाणीव तुम्ही सर्व सदैव ठेवालच व ते चैतन्यच तुम्हाला यापुढे आधारभूत व मार्गदर्शन-पर होऊन राहील, यात शंका नाही.

आज श्री. बाविस्कर यांना मुद्दाम पाठवीत आहे. कै. अण्णासाहेब रोज झोपण्यापूर्वी आपला हिशेब पै, पै-पैशाने जमवीत असत व लिहून ठेवीत असत. परंतु मृत्यू अचानक आल्यामुळे व सारखे प्रवासात असल्यामुळे आणि येथे आल्यावर लगेच दोंडाइचे येथे गेल्यामुळे त्यांचे ऑगस्ट-सप्टेंबर १९६८ अखेरच्या दोन महिन्यांचे अहवाल व जमाखर्च, येथे मिळण्याचे राहून गेले आहे. त्या दृष्टीने श्री. बाविस्कर त्यांच्या डायरीवरून व पावती पुस्तकांवरून आणि काही इतर कागद-पत्रांवरून लिहून काढणार आहे तरी त्यांच्या पिशवीतून सदर कागद-पत्र वगैरे त्यांचेकडे द्यावेत अशी विनंती.

तुम्हाला सर्वांना या संकटात धीर देण्यासाठी हजारो मित्रांची—चाहत्यांची सहानु-भूती तुमच्या पाठीशी आहे हे लक्षात ठेवालच. कळावे.

तुमचा

**वि. नी. उपाध्ये**

## प्रशंसनीय चोख हिशेब

अण्णा रोज रात्री हिशेब जुळवीत असत. हिशेब दि. २ ऑक्टोबर १९६८ पर्यंत पूर्ण केलेले होते. दि. ३ ऑक्टोबरला सकाळी ते घरी दोंडाइच्यास आले व रात्री हिशेब पूर्ण

करण्याआधीच प्रदीर्घ प्रयाण करते झाले. म० अध्यक्षांनी त्यांची खूप प्रशंसा केली. कारण त्या दोन महिन्यांत अण्णांनी स्वतःसाठी फक्त ५०–५५ रुपये उचलले होते. प्रवासाचासुद्धा बराच खर्च घरून केला होता. परंतु प्रचारकांना मात्र त्यांचे वेतन दिले होते. अण्णांना आपल्या प्रचारकांचीच अधिक चिंता असायची. हरिजन सेवक संघाने ४५० रुपये अण्णांच्या चिरंजीवास ताबडतोब पाठविले.

अण्णांचा जमाखर्च ही एक विशिष्ट बाब होती. त्यांच्यातील तो गुण प्रशंसनीय होता. सन १९४० च्या सुमारास तर त्यांच्याकडे चिटणीस वा चेअरमन या नात्याने साक्षरता-प्रसार, काँग्रेस पक्ष, स्वो. वि. गृह इत्यादी संस्थांचा पैसा असे. परंतु रात्री झोपताना सर्व पैशाची मिळवणी झाल्याशिवाय ते झोपत नसत. घरातल्यांनाही तीच सवय लावली होती.

" खर्च कोणी, किती व कसा करावा हा माझा वाद नाही. परंतु जे काय जमा वा खर्च असेल याची बारीकसारीक नोंद करावी. त्यावरून आपल्याला आर्थिक नियोजन करता येते व अनावश्यक खर्च टाळता येतो. " अशी अण्णांची शिकवण होती.

## एक सच्चा हरिजन सेवक

१५ ऑगस्ट १९४७ ला भारताला स्वातंत्र्य मिळाले. अण्णांच्या ध्येयांपैकी एकाची पूर्ती झाली. स्वोद्धारक विद्यार्थी गृहाने सुरवातीला दोंडाइचे येथे स्थापन केलेल्या अँग्लो-व्हर्नाक्युलर शाळेचे मिडल् स्कूलमध्ये रूपांतर झाले. इ. स. १९४८ ला त्या स्कूलचे रूपांतर हायस्कूलमध्ये झाले. अण्णांच्या कल्पनेप्रमाणे उद्योगप्रधान शिक्षण देण्याची सोय हायस्कूलमध्ये झाली. अण्णांचे हे दुसरे ध्येय परिपूर्ण झाले.

अण्णांच्या मनाची खंत होती की दलितोद्धाराच्या कार्यात आपला सहयोग नाही. महात्माजींची ' एकादश–व्रते ' त्यांनी अंगीकारलेली होती. धुळ्यातच महाराष्ट्र हरिजन सेवक संघाची कचेरी होती. अण्णांचा संबंध संघाचे अध्यक्ष कै. काकासाहेब बर्वे यांच्याशी वारंवार येई. त्यांनी काकासाहेबांजवळ आपल्या मनाचा संकल्प बोलून दाखविला. काकासाहेबांनीही अण्णांना आपल्या कार्यात सामावून घ्यावयाचे ठरविले; परंतु अचानक काळाचा घाला पडला व काकासाहेब कालवश झाले. अप्पासाहेब उपाध्ये संघाचे मंत्री होते ते अध्यक्ष झाले व त्यांची स्वतःची जागा रिकामी झाली. त्या जागेकरिता जाहीर निवेदन प्रसृत होताच अण्णांनी अर्ज केला. अप्पासाहेबांनी अण्णांचे कार्य जवळून पाहिले होतेच. त्यामुळे त्यांनी अण्णांना मंत्री म्हणून घेण्याचे ठरविले व त्याप्रमाणे बॅकवर्ड क्लास वेल्फेअरच्या डायरेक्टरकडे कळविले. त्यांनी मान्यता दिली नाही. पत्रातील काही मजकूर—

No. AM | X | S-R29/4 (b)
Poona 26 June 1954

" ...... and that he should have rendered more than five years service as a full time social worker with a recognised Voluntary Agency as per government orders. Shri R. R. Tongaonkar does not appear to fulfill the second condition in particular, his case cannot be considered for enhanced rate of Pay and T. A.......

अण्णांचा पिंड मूळ समाजसेवकाचा. १९५४ पर्यंत तर त्यांच्या पाठीशी समाजसेवेचा भरपूर अनुभव होता; परंतु ठराविक चाकोरीत आपण बसत नाही असे पाहून त्यांनी आपल्या कार्याचा आढावा, अप्पासाहेबांच्या शिफारशीसह बॅकवर्ड क्लास खात्याचे मंत्री ना. तपासे व उपमंत्री ना. वांद्रेकर यांच्याकडे पाठविला. अन् अण्णांची नेमणूक ऑगस्ट १९५४ ला महाराष्ट्र प्रांतिक हरिजन सेवक संघाचे मंत्री म्हणून झाली.

अण्णांच्या नियुक्तीने धुळ्यातील कार्यकर्त्यांना खूप आनंद झाला. 'स्वतंत्र भारत'चे ज्येष्ठ व प्रभावी संपादक अ. वि. टिळक यांनी 'भूदान-यात्रा' विशेषांकात दि. १५-८-१९५४ ला ठळक बातमी दिली. ती अशी—

## अभिनंदनीय नियुक्ती

महाराष्ट्र हरिजन सेवक संघाचे चिटणीस म्हणून श्री. रंगनाथ राजाराम टोणगावकर यांची १ ऑगस्टपासून नियुक्ती झाली, हे वृत्त सादर करण्यात आम्हास आनंद वाटत आहे.

पश्चिम खानदेशच्या सार्वजनिक जीवनात श्री. टोणगावकर यांचा बराच मोठा वाटा आहे. स्वातंत्र्य प्राप्तीच्या ध्येयाने १९३० च्या आंदोलनात शाळा सोडून खेड्यापाड्यांतून जागृती करीत फिरणाऱ्या तरुण मंडळींत श्री. नवल पाटील यांच्या सहकाऱ्यांपैकी श्री. टोणगावकर हे प्रमुख आहेत. १९३२ च्या बेकायदेशीर ठरविलेल्या काँग्रेसच्या अधिवेशनाचे प्रतिनिधी म्हणून ते दिल्लीस गेले होते. सोलापूरच्या झेंडा सत्याग्रहातही ते सामील झाले होते. पुढे जिल्हा काँग्रेसचे ते चिटणीस होते व नंतर अध्यक्ष होते. या विविध नात्यांनी त्यांचा महाराष्ट्राच्या निवडक कार्यकर्त्यांशी वेळोवेळी संबंध आला आहे.

जिल्ह्यातील साक्षरता प्रसाराच्या कार्याचे ते प्रमुख चालक होते. स्वोद्धारक संस्थेत राहून ते आपली सारी कामे गाजावाजा न करता करीत आले आहेत. ते प्रचलित विषयावर कविताही करीत असतात. असा निष्ठावंत कार्यकर्ता, महाराष्ट्र हरिजन सेवक संघाचे नूतन अध्यक्ष श्री.

अप्पासाहेब उपाध्ये यांना नूतन चिटणीस म्हणून लाभला आहे. त्यांच्या हातून हे नवे कार्यही सुयोग्यरीत्या पार पडो.

नियुक्तीच्या वेळी केलेल्या निवेदनामुळे तरी प्रसिद्धिपराङ्मुख असलेल्या अण्णांच्या कार्याचा व्याप कळला. चार भिंतींच्या अडोशातील चाकोरीबद्ध जीवन अण्णांना कधीच मानवले नव्हते. ' विचार करतो विश्वाचा ' या श्रीसमर्थ उक्तीप्रमाणे ते वैवाहिक जीवनात कधीच गुरफटलेले नव्हते. समाजविचाराने ते भारावलेले असत.

घरात जातीयतेला मूठमाती दिलेलीच होती. ' आपणांसारखे करिती तात्काळ ' या वचनाप्रमाणे त्यांनी आपल्याभोवतीच्या मंडळींनाही बनविले होते. काही प्रसंग डोळ्यांपुढे तरळतात.

काँग्रेसची चळवळ जोरात सुरू होती. हिंदू-मुस्लिम ऐक्यावर गांधीजींचा भर होता. तसे वातावरण निर्माण व्हावे म्हणून कार्यकर्त्यांचे प्रयत्न होते.

अण्णा कार्यकर्ते; म्हणून उत्तर हिंदुस्थानातील एक मुस्लिम कार्यकर्ता त्यांना भेटण्यास आला होता. अण्णांनी त्याला घरी जेवावयास बोलाविले व तसा निरोपही दिला. सन १९४० चा हा प्रसंग. एका हिंदू ब्राह्मणाच्या घरी एक मुसलमान जेवणार! थोडी अस्वस्थता निर्माण झाली.

" थोड्या पत्रावळी मागून घेतोस का ? " असे काकी म्हणाल्या.

" का ? "

" जेवल्यावर पत्रावळी फेकता येतील. "

" ताटात जेवलो तर ताटही फेकून देणार की काय ? " मोठीच अडचण निर्माण झाली.

" मग मीही आजपासून पत्रावळीवरच जेवणार! आजपासून ताट बंद " अण्णांनी सौम्य पण निर्धारयुक्त भाषेत सांगितले आणि आश्चर्य!

सर्वांची ताटे वाढून तयार झाली. सारे ताटातच जेवले. मुस्लिम कार्यकर्ता सर्वांच्या पाटाला पाट लावून जेवला. अन्न तेच, पाणी तेच, भांडी तीच. ' भेदाभेद अमंगळ ' ही संतांची शिकवण आचरणात आणली.

बँड मास्तर किसन हा चारित्र्याने शुद्ध, वागणुकीत सौम्य. स्वोद्धारकच्या संस्थापकांनी उत्पन्नाचे साधन म्हणून एक बँडपथक उभारले होते. किसन मास्तर त्याचा प्रमुख. वडील धुळे जेलरकडे होते, ते वारले; त्यामुळे स्वोद्धारक संस्थेने झीज सोसून चालविलेल्या व्हिक्टोरिया ऑर्फनेज (दयाराम बालकाश्रम) मध्ये दाखल झाला. अण्णांचा तो पट्टशिष्य. त्यांच्याच खोलीत राहावयाचा. दोंडाइच्यास त्यांच्याबरोबर घरी आला की स्वयंपाकगृहातच अण्णांच्या पाटाला पाट लावून बसायचा. अण्णांची आई त्याला वाढी व प्रसंगी उष्टेही काढी. किसन जातीने हरिजन. अण्णांच्या आई म्हणत, ' राजसूय यज्ञात कृष्णानं नाही उष्टी काढली ? मग आपली काय कथा ? '

सन १९४४ च्या ऑगस्ट महिन्यात कै. पू. साने गुरुजी दोंडाइच्यास आले होते. वास्तव्य अण्णांकडे होते. त्या वेळीं अस्पृश्योद्धार चळवळीवर या लोकांचा अधिक भर होता. अण्णांकडे स्पृश्यास्पृश्य सहभोजन करायचे टरले. त्या वेळीं अण्णांच्या पत्नी आपल्या मुलासह हिंगण्यास शिकत होत्या, घरात कुटुंबातील इतर मंडळी होती.

" अण्णा आज महार-मांगांना घरात आणणार आणि त्यांच्यासह साने गुरुजी व अण्णा जेवण घेणार आहेत. सगळाच भ्रष्टाचार. आपण विरोध केला पाहिजे. बाहेर काय हव्वं ते करा म्हणावं. " इती काही कुटुंबीय.

" एकनाथमहाराजांनी पूर्वजांच्या श्राद्धाचा स्वयंपाक याच लोकांना पोटभर जेवू घातला होता; त्याचं रसभरीत वर्णन तुम्ही कथा-कीर्तनातून करता व अभंगांतून गाता. आम्ही तेच करीत असताना आम्हाला तुमचा विरोध का ? या घरात ' विटाळ ' या शब्दाचा विटाळ राहील. " अण्णा सात्त्विक संतापाने बोलत होते.

' पू. साने गुरुजींच्या सहभोजन कार्यक्रमाच्या वेळी तुझी उणीव भासली. ' असे अण्णांनी या वेळी पत्नीला हिंगण्यास कळविले.

' मी व शांता जाधव ( हरिजन ) येथे एका खोलीत राहत आहोत. हिंगण्यासही वसतिगृहात जातीयता नाही हे पू. साने गुरुजींना कळवा म्हणजे त्यांना बरे वाटेल. ' अण्णांच्या पत्नीचे उत्तर आले.

' धर्म व अस्पृश्यता संवाद ' या कवितेत सन १९३६ लाच अण्णांनी अस्पृश्यते-विरुद्ध आपला आवाज उठविला होता. माणुसकीहीन असे हिडीस स्वरूप स्पृश्यांनी धर्माला आणले होते, त्यावर रोकडा सवाल टाकून स्पृश्यास्पृश्य हा भेद ईश्वरनिर्मित नसून मानवनिर्मित आहे असे अण्णांनी आपले मत व्यक्त केले होते.

**" दगड मातीची करी पूजा अन् – झाड नदी आणि नागाची**
**मानवास परी तुच्छ लेखितो – अजब भावना धर्माची. "**

हे अण्णांचे विचार. अंतरीची तळमळ एकच की स्पृश्यास्पृश्य भेद नष्ट झाला पाहिजे. त्यामुळे हरिजन सेवक संघाच्या कार्याच्या निमित्ताने हरिजनांच्या अंगणात–अंतरंगात अण्णांनी शिरकाव करून घेतला व त्यांना अंगावर काटा उभा राहील असे शिष्ट म्हणणाऱ्या समाजाकडून अस्पृश्यांच्या होणाऱ्या छळाचे दर्शन झाले. १९३६ ला असलेली परिस्थिती ( काव्यात वर्णन केलेली ) स्वातंत्र्य प्राप्तीनंतर १० वर्षे होत आली होती तरी बदललेली नव्हती.

**" शिवाशिवीचे बीज पसरले – समाज अंगी सर्वत्र**
**भेद माजवी सुरू करी जे – मानव मरणाचे सत्र. "**

सगळीकडे अमंगलच. त्यामुळे 'सत्यम्, शिवम्, सुंदरम्'चे दर्शन होणेच शक्य नव्हते. जीवन जगण्यासाठी लागणाऱ्या प्राथमिक गरजाही अस्पृश्यांच्या हातातोंडाशी येत नव्हत्या. तहानेने व्याकुळलेल्यांना समोर जीवनामृताने तुडुंब भरलेल्या विहिरीचा उपयोग करता येत नव्हता. दूरवर तीन तीन मैल चालून गेल्यावर जेथे कोठे पाण्याचे घाणेरडे डबके असेल, तेथून पिण्याच्या पाण्याचा घडा डोक्यावर आणावा लागे. मग स्वच्छतेकरिता लागणाऱ्या पाण्याचा प्रश्न तर दूरच. अण्णा आपल्या प्रचार कार्यात प्रथम पाण्याच्या प्रश्नाची चौकशी करीत.

दि. ९–५–५६ ची घटना. ठाणे जिल्ह्यातील, शहापूर तालुक्यातील उंभरई गावची. पाण्याची विहीर फक्त स्पृश्यांसाठी. देशमुख लोकांची वस्ती अधिक. हरिजनांना त्या विहिरीवर पाणी भरण्याची सक्त मनाई. दूरवर जाऊन डबक्यातून पाणी आणावे लागे. दिवस उन्हाळ्याचे, डबकेही हळूहळू नकार देऊ लागले. अण्णांच्या बरोबर प्रचारक उल्हास भोईर होते. सत्य घटना पाहिली पाहिजे म्हणून या दोघांनी दूरवर जाऊन हरिजन जेथून पाणी आणीत ती जागा पाहिली. सुकत चाललेला पाणवठा पाहिल्यावर या सहृदयांच्या डोळ्यांत ते सुकत चाललेले पाणी तरळू लागले. या प्रश्नाची तड लावावयाची ठरवूनच ते गावात परतले. अनायासे त्या दिवशी मा. मामलेदार-साहेबांचा मुक्कामही तेथे होताच. तेव्हा अण्णांनी पाण्याचा प्रश्न धसास लावण्याची विनंती केली. मामलेदारसाहेबांनीही पाटलांना बोलावून विहीर खुली करण्यास सांगितले.

"आम्ही आमच्यासमोरच विहिरीवर अस्पृश्यांकडून पाणी भरवून घेतो. आम्ही ते पितो म्हणजे लोकांच्या मनात शंका राहणार नाही." अण्णा बोलले. सर्वांनी मूक सम्मती दिली.

अण्णा व श्री. भोईर हरिजन वाड्यावर गेले. हरिजन विहिरीवर येण्यास प्रथम तयारच होईनात. त्यांचा भविष्याचा अभ्यास चांगला होता. ग्रहमान ठीक नाही हे ते जाणून होते. तरीपण अण्णांना त्यांना नकार देणेही जमले नाही. ही मंडळी विहिरीकडे गेली. तेवढ्यात चमत्कार व्हावा तसा आबाल-वृद्ध, स्त्री-पुरुष यांचा घोळका वेगाने विहिरीकडे येताना दिसला. अण्णांना वाटले या पवित्रसमयी माणुसकीच्या ज्योती फुल-विण्यासाठी हे अनंत हात येत आहेत. ते निर्भयतेने हरिजनांकडून पाणी काढून घेत होते. त्यांच्या मनालाही हल्ल्याच्या कल्पनेचा स्पर्श झाला नव्हता, परंतु पाठीत एक मोठा दगड बसला. मागे वळून बघतात तो लहान मोठे स्त्री-पुरुष सर्वांच्या हातांत दगड होते. ते दगडांचा वर्षाव करीत होते. हरिजन तर जीव घेऊन केव्हाच पळाले, परंतु श्री. भोईर व अण्णा यांना जबर मार बसला. अण्णांच्या डोक्यावर काठीचा एक फटका बसला, त्यामुळे डोक्याला मोठी जखम झाली. तेवढ्यात अण्णांनी आपल्या जवळील छत्रीचा बराच आधार घेतला पण ते जमिनीवर पडलेच. श्री. भोईर यांचा ओठ फाटला,

काही दात दुखावले. एवढे रामायण झाल्यावर मंडळी पसार झाली. तदनंतर पोलीस पाटील आले. त्यांनी काही पंचनामा केला. अण्णा व भोईर उंभरईहून किनवलीला गेले. तेथून शहापूरला सरकारी दवाखान्यात गेले. तेथे अण्णांच्या डोक्याला टाके घालण्यात आले. वार्ताहरांनी अण्णांना बातमीबद्दल विचारले असता अण्णा म्हणाले,

"बातमी देण्यासारखे काही नाही, हे दैनंदिनच आहे. पण जर तुम्हांला बातमी द्यायची असलीच तर ती तीन दिवसांनी प्रसिद्ध करा. तोपर्यंत मी घरी गेलेला असेन. घरच्यांची पळापळ नको."

दुसऱ्या दिवशी अण्णा पुन्हा उंभरईला गेले. तेथे लोकांची भेट घेऊन दि. ११-५-५६ ला सचिवालयात जाऊन सर्व हकीकत कथन केली. त्यानंतर ४० लोकांना अटक झाली. पण पुढे ते सर्व निर्दोष सुटले. ते पाहून अण्णांना खूपच आश्चर्य वाटले; 'न्यायदानातही भ्रष्टाचार सुरू झालेला दिसतो.' अण्णा उद्गारले. विहीर मात्र अस्पृश्यांकरिता खुली झाली पण तिचा उपयोग हरिजनांना किती झाला हे एक प्रभूच जाणे !

अण्णा दि. १२-५-५६ ला घरी आले. त्यांच्या डोक्याच्या बॅंडेजकडे लक्ष गेल्यावर त्यांच्या पत्नीने व पुत्राने एकदमच विचारले, 'हे काय ?'

'पवित्र कर्माची पावती. स्वातंत्र्यप्राप्तीकरिता शिरोड्याला मिळालेल्या मारानंतर जातीयता दूर करण्याच्या प्रेरणेकरिता मिळालेला हा प्रसाद आहे. त्या वेळी परकीयांशी लढाई होती, आता तर स्वकीयांशीच लढावे लागत आहे. महाराष्ट्रात जातीयतेचे विष कसे भिनले आहे याचे जिवंत उदाहरण. हिंदीत म्हण आहे ना– 'मुखमें राम बगलमें छुरी' तसा प्रकार सगळीकडे दिसतो. कथा-कीर्तनांतून एकनाथांच्या कथांचे रसभरीत वर्णन ऐकायचे, की त्यांनी काशीची गंगा तडफडणाऱ्या गाढवाच्या तोंडात ओतली, ऐकताना माना डोलवायच्या अन् माणूस पाण्याने तडफडतोय तर निसर्गाने दिलेल्या जल-संपत्तीतून एक थेंबही त्याला मिळू द्यायचा नाही, त्याला पाण्याला स्पर्श करू द्यायचा नाही. पाणी देत नाहीत तर अन्न काय देणार ! नराचा नारायण बनणाऱ्या मानवातील ही काळीकुट्ट बाजू आहे– सैतानाची, मायावी राक्षसाची, कधी आम्ही खरे मानव होणार आहोत कोणास ठाऊक ! युगानुयुगे तेच चालले आहे. सुधारणा ही व्याख्यानात आहे. कागदोपत्री आहे. **कागदपत्रांतून, दाखल्यांतून जो जात व धर्म, जाति-वाचक म्हणी यांचा उल्लेख केला जातो तो काढूनच टाकला पाहिजे म्हणजे आमची भावी पिढी तरी जाति-धर्मविरहित होईल.**' अण्णांच्या उद्वेगाला नुसती भरती आली होती. चेहऱ्यावर खेद पसरलेला होता.

सध्या शहादे येथे वास्तव्य असलेल्या डॉ. डोईफोडे यांनी सन १९६७ ची आठवण सांगितली. ते आदिवासी भागात कार्य करू इच्छित होते म्हणून धुळ्यास हरिजन सेवा संघाच्या कचेरीत गेले. तेव्हा (talking about exploitation) हरिजन–

गिरिजनांवरील अमानुष अत्याचारांबद्दल बोलताना अण्णांना अत्यंत चीड आली. अण्णा म्हणाले,

'भारतात मानवाला मानव म्हणून जगता येत नाही, इतकी जातीयता पराकोटीला गेली आहे. स्वराज्याचे सुराज्य बनविण्याचे स्वप्न आम्ही उराशी बाळगले होते. पण हरिजन-गिरिजनांना साधे जगणे अशक्य करविले आहे.'

## हरिजन कार्यात झपाटलेले अण्णा, मातुःश्रींचे निधन

अण्णा हरिजन सेवक संघाच्या कार्यात झपाटल्यासारखे फिरत होते. त्या वेळी त्यांच्या मातुःश्रींची प्रकृती बिघडली होती; परंतु ते आपल्या कार्यात मग्न होते. दि. २२-८-५४ ला चाळीसगाव येथे समस्त महार पंचायतीच्या अर्जाची चौकशी करण्यास ते गेले होते. त्यांच्या देवडीच्या जागेवर म्युनिसिपालिटीने इमारत बांधली होती. बांधतेवेळी शर्त होती की खालचा मजला त्यांच्या पंचायतीसाठी राखून ठेवावा, पण प्रत्यक्षात मिळेना.

दि. २३-८-५४ ला विमोचित जमातीच्या मुक्तिदिनासाठी ते दोंडाइच्यास आले. कंजर-मांग-गारोडी वस्तीस त्यांनी भेट दिली. उन्नतिमंडळाचे संचालक त्रिवेदी व रामसिंग कंजरभाट यांची भेट घेतली.

दि. २४-८-५४ ला त्यांना चॅरिटी कमिशनरची भेट धुळे येथे घ्यावी लागली. मातुःश्रींची प्रकृती बरीच बिघडलेली होती. परंतु त्यांना दि. २५ ला परत चाळीसगावी जावे लागले. दि. २२ ला त्यांनी देवडीच्या जागेची कारवाई केली होती त्याप्रमाणे ताबा मिळाला की नाही हे प्रत्यक्षात पाहावयाचे होते. दुपारी मातुःश्री अत्यवस्थ म्हणून त्यांना श्री. न. दौ. पाटील यांच्याबरोबर निरोप गेला. अण्णा धुळ्यास परत आले. तर मातुःश्रींचे निधन झाले होते.

प्रेमळ अंतःकरणाच्या अण्णांना अतीव दुःख झाले, परंतु त्यांनी कार्यात खंड पडू दिला नाही. दि. २८-८-५४ ला अंबरनाथ येथील हाउसिंग सोसायटी व सुभाष छात्रालय यांना श्री. श्रीकांतभाईंची भेट होती, तेथे त्यांना उपस्थित राहावयाचे असल्याने ते दि. २७ लाच मुंबईस गेले.

आपल्या अंतःकरणातील वैयक्तिक दुःखाचे अण्णांनी प्रदर्शन केले नाही, उलट स्थितप्रज्ञच राहिले.

अण्णा हरिजनांची किंवा मागासलेल्यांची मुले बौद्धिकदृष्ट्या प्रगती कशी करतील हे नेहमी पाहात. त्यांना प्रसंगी आर्थिक मदतही करीत. सन १९६६ च्या ऑक्टोबरमधील घटना. स्वो. वि. गृहाचा एक विद्यार्थी, अण्णांच्या पुत्राचा मित्र शिवाजी सोनू कोळी एम्. एस्सी., पीएच्. डी. झाला. त्याने कॅनडा सरकारशी संधान बांधले व तेथील 'सॅस्कॅटून युनिव्हर्सिटी'त जागा मिळवली. तेथे पोहोचल्याबरोबर त्याला प्रवासाचे पैसे

परत मिळणार होते. पण जाताना काय ? त्याला निदान ११०० ते १५०० रुपयांची मदत कोणाकडून तरी घेणे अवश्य होते. त्याने विनंती केली आपल्या बाईजवळ ( मंदाकिनीबाई ).

" पैसे देण्यास माझी मुळीच हरकत नाही, परंतु रवींद्र आता एम्. एस्. होतोच आहे, तेव्हा हॉस्पिटल काढावयास पैसे लागतील. काय करावे समजत नाही. " मंदाकिनीबाई म्हणाल्या.

" शिवाजीच्या जीवनातील ही अमूल्य संधी पैशाच्या अभावी हुकलेली मला आवडणार नाही. आपल्याला आणखी एक मुलगा आहे असे समजू या. तू विद्यार्थ्यांवर पुत्रवत प्रेम करतेस ना! मग प्रश्न पडणार नाही. एक ग्रामीण मागासलेला विद्यार्थी ज्ञानाकरिता मार्ग शोधतो आहे याचा अभिमानच वाटला पाहिजे आपल्याला. "

अण्णांनी रवींद्राला शिवाजीबरोबर एक चिठ्ठी पाठविली. ' तुझ्या बँकेतील शिलकेतून शिवाजीला जेवढे आवश्यक पैसे असतील तेवढे दे. '

शिवाजी कॅनडाला गेला. त्याचे भारावलेले पत्र आले. त्याच्या पाठोपाठ त्याने पैसेही पाठविले. अण्णा म्हणत ' माणसातल्या देवत्वाला पाहायला शिका. '

अण्णा आपल्या दौऱ्यातून मागासलेल्यांची मुले शाळेत जातात की नाही हे पाहात. त्याचबरोबर त्यांच्या अडचणी सोडविण्याचा प्रयत्न करीत. त्यांच्या डायऱ्यांवरून असे दिसते की, मेहेतर लोक हरिजनवाडा झाडण्यास नाकारीत, त्यांचे केशकर्तन करण्यास नाकारले जाई, काही ठिकाणी अस्पृश्यांना हॉटेलमध्ये जाण्यास बंदी असे तर काही ठिकाणी कपबशा अलग ठेवलेल्या असत. अनेक ठिकाणी मैला डोक्यावर वाहून न्यावा लागे. अण्णा आपल्या प्रचारात निर्भंगी संडासांचा प्रचार करीत. त्याकरिता हरिजन सेवक संघाकडून मदत पाठवीत.

भूदान-शिबिरातून ( सन १९५४–५५ ) अण्णांची उपस्थिती असे. भूदान होणारच असेल तर ते मागासलेल्यांना मिळो ही त्यांची इच्छा. त्या दृष्टीने ते प्रयत्न करीत. कारण त्यांचे निश्चित मत होते की, चरितार्थाचे साधन जवळ असल्याशिवाय गुलामी मनोवृत्ती नष्ट होणार नाही व ती नष्ट झाल्याशिवाय समानता स्वप्नातही दिसणार नाही. याकरिता शिक्षणाची विशेषतः धंदेशिक्षणाची जोड आवश्यक. पांचाळ जमातीतील लोकांची उन्नती व्हावी म्हणून त्यांनी सरकारकडून आर्थिक मदत मिळवून देण्याचा प्रयत्न केला. लोखंडी पत्रा नियंत्रित दराने मिळवून दिला. त्यांची लोह सरंजाम संस्था काढली. धनगर लोकांना मेंढ्यांपासून निघणाऱ्या उत्पादनाला मार्केट मिळवून दिले तरच त्यांची प्रगती होईल म्हणून तसे प्रयत्न केले.

आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी झाल्याशिवाय व शिक्षण घेतल्याशिवाय अस्पृश्यता नष्ट होत नाही. नोकऱ्यांपेक्षाही त्यांच्या प्राथमिक अवस्थेतील धंद्यांना भांडवल पुरवून औद्योगीकरण झाले पाहिजे व त्यात अधिकाधिक ग्रामीण व मागासलेल्यांनाच प्राधान्य दिले पाहिजे, असे ते म्हणत.

धुळे जिल्ह्यात गुन्हेगार म्हणून गणल्या गेलेल्या कंजर लोकांची वस्ती बरीच आहे. दोंडाइचे–नंदुरबार येथे या लोकांचा व्यवसाय म्हणजे वाटमारी, खिसेकापूपणा व लुटालूट हा एवढाच होता. लोकांना ते कर्दनकाळ वाटत. सन १९४० मध्ये अण्णा त्यांच्या अंतरंगात शिरले. त्यांना माणूस वा गृहस्थ बनविणे भाग होते. या लोकांना एका दुष्ट चक्रातून बाहेर काढणे आवश्यक होते. पोलीस ठाण्यावर जाऊन त्यांना सकाळ-संध्याकाळ हजेरी द्यावी लागे. अण्णांनी त्यांची ती हजेरी बंद करविली. त्यांना काही शेती मिळवून दिली. घरांकरिता जागा मिळवून दिली.

सन १९४८ ला त्यांच्याकरिता कंजर सेवा मंडळ काढले. पुढे समाज कल्याण खात्याचे लक्ष त्यांच्याकडे वेधवले. त्यांच्यातील काही अनिष्ट चाली दूर केल्या. स्त्री पतिता आहे ही शंका आल्यास त्यांचा पुरोहित कुस्सा ( लोखंडी अवजार ) तापवून लाल करीत, १० फुटांवर वाळलेल्या काटक्यांचा छोटासा ढीग असे, जी पतिता असेल तिच्या दोन्ही हातांवर एक एक ओले पान ठेवले जाई व कुस्सा चिमट्यांनी पकडून हातावर ठेवीत. तिने हूँ की चूँ न करता सावकाश चालत जाऊन काड्यांवर कुस्सा टाकावयाचा वाळक्या काड्या पेट घेत. या वेळीं स्त्री ओरडली नाही तर ती पतिता नाही असे मानले जाई.

हा विधी पाहण्यासाठी अण्णांना बोलावणे आले.

‘ तुला यायचे आहे का ? ’ अण्णांनी पत्नीला विचारले.

‘ शू–शू ! असले अघोरी कृत्य मला पाहवले नाही जाणार, मी नाही येत. ’

‘ मला जावेच लागेल. या अनिष्ट प्रथा मोडल्याच पाहिजेत. प्रत्यक्ष पाहिल्याशिवाय व बोलल्याशिवाय समजायचे नाही. ’ अण्णा व नानाशेट गेले. तेथे दोघांनी ही अनिष्ट व अघोरी प्रथा बंद पाडण्यास सांगितले. पुढे ही प्रथा बंद झाली.

मुलाच्या विवाहाची टोपपदरी इरकली साडी अण्णांनी आपल्या घरच्या काम करणाऱ्या धनगर बाईला प्रथम घेतली व नंतर इतरांना.

## वसुधैव कुटुंबकम्

अण्णांचा जन्म १२ मार्च १९०९ ला झाला. हा दिवस रंगपंचमीचा. त्यामुळे अण्णांचे पाळण्यातले नाव रंगनाथ ठेवले. तेच कागदोपत्री रूढ झाले. परंतु त्यांच्या आत्याचे अण्णा फार लाडके. तिने त्यांना आपल्याकडे नेले. घरच्या गाईचे धारोष्ण दूध पाठीशी असलेल्या भाच्याला देताना तिला आनंद वाटे. त्या वेळी तिच्या नजरेसमोर कृष्णाची दुग्धप्राशन करणारी मूर्ती उभी राही. म्हणून तिने त्यांचे लाडके नाव ‘ कृष्ण ’ ठेवले व रंगनाथाचा कृष्ण बनला.

## कृष्ण नावाची सार्थकता

आत्याच्या लाडक्या कृष्णाने स्वोद्धारक विद्यार्थी गृहात दिवसाच प्रवेश करून क्रीडा करणाऱ्या नागराज युगुलाचे दमन १९५२ च्या गोकुळअष्टमीला केले तेव्हा काकींना (अण्णांच्या आईला) धन्यता वाटली. अण्णांच्या धाडसाचे त्यांना खूपच कौतुक वाटले. जमलेल्यांना त्या म्हणाल्या–

'कृष्ण आहे ना तो, कालियामर्दन झालं पाहिजे. नुसतं दूध पिणारा कृष्ण काय उपयोगाचा ? कुठंही अन्याय दिसला की तो धावून जातो ते कृष्ण म्हणूनच.'

त्या नागाच्या जोडीला मारल्यावर अण्णांनी शेपट्या धरून वर उचलले. अण्णांचे हात वर गेले तरी ती धुडे जमिनीवर लोळत होती यावरून त्यांच्या लांबीची कल्पना यावी. नाग मारण्यास कोणी धजले नाही. लोक लांब जीव मुठीत धरून उभे होते. अण्णांची पत्नी त्यांच्याजवळ उभी होती. फक्त डोळा दिसणाऱ्या अर्जुनाप्रमाणे एकाग्र होऊन अण्णांनी लाठीचा जबरदस्त तडाखा दिला त्या वेळी एक हातभर वर शरीर तोलून जिवावर उदार होऊन लढण्याच्या पावित्र्यात नागराजाने फुस केले व अण्णांची पत्नी विचलित होऊन दोन हात मागे सरली. अण्णांनी प्रथम नागराजाचा व नंतर नागिणीचा समाचार घेतला.

'मला नागांना मारताना दुःख झाले. परंतु वसतिगृहातील मुले दिवसा-रात्री इतस्ततः फिरतात. तशात त्यांच्याजवळ बॅटऱ्या, दिवे नसतात. त्यांच्या संरक्षणाकरिता मला यांचा नाश करावा लागला' अण्णा म्हणाले.

## सुखी कुटुंबाचा मूलमंत्र

अण्णा 'वसुधैव कुटुंबकम्' वृत्तीचे होते. पति-पत्नी-पुत्र एवढेच कुटुंब त्यांना पसंत नव्हते. त्यामुळे अण्णांचे तसेच त्यांच्या पत्नीचे सर्व नातेवाईक अण्णांच्या घरी हक्काने येऊन राहात. त्यांची मित्रमंडळी तसेच अनेक कार्यकर्ते आले की अण्णा म्हणत, 'साधुसन्त येती घरा तोची दिवाळी दसरा.' एरवी घरात काटकसर पण कोणी आले की सढळ हाताने व्यवस्था होई. आपल्या पत्नीचे नातेवाईक आले म्हणून अण्णांच्या कपाळाला कधी अठी पडली नाही की ओठाला मुरड पडली नाही. एरवी भाजी-भाकरी खाणाऱ्या अण्णांच्या कुटुंबात या वेळी टोपल्यांनी भुईमुगाच्या शेंगा, पेरू, आंबे, कलिंगडे, खरबुजे येत व रात्री गोलाकार बसून त्यांचा समाचार घेत. गप्पागोष्टी हास्य-विनोद सुरू होई. अण्णा अत्यंत प्रेमळ वृत्तीचे होते. आपल्या काव्यात या प्रेमाचा आविष्कार ते करीत—

**'प्रेम देऊ, प्रेम घेऊ फुलवू प्रेमवेली ही**
**भरवू प्रेम पुष्पांनी प्रेम फळांनी मही॥'**

घरात काहीही नुकसान झाले तरी अण्णा 'आनंद' आहे असे म्हणत. १९५० च्या मे महिन्यात अण्णांच्या पुतण्या सुट्टीकरिता दोंडइच्यास आल्या. चोरांना संधी मिळाली व चोरी झाली. पण अण्णा निर्विकार, 'आनंद आहे. गेल्याचा काय शोक करायचा व त्याच्याकरिता हळहळायचं ?'

अण्णा नेहमी म्हणत, 'समाजातील विषमतेचा परिणाम चोऱ्या.' चोरी झाली त्यात चोरांचा दोष नाही. समाजात एक वर्ग अनावश्यक पैशाचा चुराडा करतो, साठवतो; तर दुसऱ्याला शरीरधर्माला आवश्यक बाबीही मिळत नाहीत. चोऱ्या करण्यास उद्युक्त केले जाते. समाजपुरुषाच्या अंगावर आलेल्या गळवांचा निचराच आहे हा.

## शुभमंगल

खरे तर अण्णांना आपला शुभमंगल विवाह घडवून आणावयाचा नव्हता. विवेकानंदांचे ग्रंथ, रामदासस्वामींचा दासबोध यांचे ते वाचक. या प्रभृतींप्रमाणेच सोनगीरचे केशवदत्त महाराज, पू. साने गुरुजी, शंकरराव ऊर्फ दादासाहेब देव, मंदाकिनी-बाईंचे एक काका हरिभाऊ मोहनी, पू. भावे त्रिमूर्ती–विनोबाजी, शिवाजीराव, बाळकोबा–यांचे प्रभावी ब्रह्मचर्य त्यांना मोहवीत होते. देशोद्धारासाठी आपणही ब्रह्मचर्याचे कंकण हाती बांधावे ही प्रबळ इच्छा. परंतु आईला त्यांनी दुखविले नाही. दि. २१ जून १९३५ ला अण्णा विवाहबंधनात बद्ध झाले. नारायण श्रीधर मोहनी यांची वडील सुकन्या सिंधू हिच्याशी त्यांचा विवाह संपन्न झाला. 'मी पत्नीचे शिक्षण पूर्ण करणारच' म्हणून दोन्ही घराण्यांतील वृद्धांना त्यांनी ऐकविले व आपला पण पूर्ण केला.

घरात भांड्याला भांडे लागून निनाद झालाच तर अण्णा कोणाचीही बाजू घेत नसत. पण आपल्या विनोदाने भांडणावर विरजण टाकीत.

'मूर्खपणा केला, ब्रह्मचर्यत्व सोडलं. आता संन्यासाचा मार्ग स्वीकारणं भाग आहे. लोक संसारात उदासीन का होतात ? संन्यासी का होतात ? हे आता कळलं.'

'अग अग म्हशी, मला कुठं नेशी म्हणू नका म्हणजे झालं.'

'माझा निश्चय म्हणजे काळ्या दगडावरची रेघ आहे, हे तुम्हाला माहीत नाही ?' वादविवाद तेथेच थांबत.

अण्णा सोने-चांदी मृत्तिकेसमान मानीत. 'भूमिगत धन व अंगावरील सुवर्णा-लंकार शून्य किंमतीचे. राष्ट्राच्या आर्थिक घडामोडीत त्यांचा काहीच उपयोग नाही. भारतात बँका नव्हत्या, तेव्हा बचतीसाठी तो एक मार्ग होता. बँकांत पैसे ठेवले म्हणजे स्वहित व राष्ट्रहितही साधते. जगात फक्त भारतीय स्त्रियांनाच दागिन्यांचा सोस आहे.'

पत्नीला माहेरून सुवर्णालंकार मिळाले होते. जेव्हा १९६२ ला चीनने आक्रमण केले त्या वेळी मा. जवाहरलालजींनी आकाशवाणीवर महिलांना सुवर्ण देण्याबाबत भरल्या आवाजात आवाहन केले. अण्णांच्या पत्नीने आपल्या सुवर्णाच्या बांगड्या काढून दिल्या.

अण्णांना खूपच आनंद वाटला. तेवढ्यात आजचे मा. पंतप्रधान मोरारजीभाई यांनी आकाशवाणीवरून जनतेकडून सोने 'गोल्ड बाँड'च्या रूपात स्वीकारले जाईल, ही घोषणा केली. दि. २१ नोव्हेंबर १९६२ ला अण्णांनी धुळे येथील बँकेत हे गोल्ड बाँड घेतले. धुळ्यात अण्णा हे पहिले गोल्ड बाँड घेणारे निघाले. बँक कर्मचाऱ्यांना खूप आनंद झाला.

अण्णांची वृत्ती सर्व नातेवाईकांना व इष्टमित्रांना माहीत असल्यामुळे, मंगल समारंभात सोने वा चांदीच्या रूपात ते भेटी देत. अण्णा नाखुश असत, परंतु याबाबत कोणीही त्यांचे ऐकत नसत. "बरं झालं, राष्ट्राच्या संकटकाली फूल नाही तर फुलाची पाकळी देण्यास उपयोगी पडेल." अण्णा म्हणत.

पत्नीने मुलगा झाल्यावर शिक्षण अर्धवटच सोडून दिले होते- त्या वेळी आपली पुस्तके विकून आलेल्या पैशात तिने मुलाला काही अलंकार आणले. अण्णांना अतीव दुःख झाले. "लोक परिस्थितीमुळं अलंकार विकून शिक्षण घेतात तर तू पुस्तकं विकून अलंकार आणलेस. अजब आहे बुवा तुझी अलंकाराबद्दलची कल्पना!"

अण्णांचे 'ठोठवा म्हणजे उघडेल' हे तत्त्व त्यांना त्यांच्या जीवनात अनेक ठिकाणी उपयोगी पडले. पत्नीचे अर्धवट शिक्षण पूर्ण करण्यासाठी हिंगण्यास पाठवायचे होते. पण मुलाला घरीच ठेवावे लागणार होते. याला मंदाकिनीबाईंची तयारी नव्हती. अण्णांनी पत्राने गुरुवर्य अण्णासाहेब कर्व्यांचे दार ठोठावले, "मी स्वातंत्र्य सैनिक. स्वातंत्र्य मिळालेलं नाही, पत्नी स्वावलंबी नाही, त्यामुळे मी मनाच्या द्विधा अवस्थेत आहे. तिला मुलासह प्रवेश दिला तर आभारी होईन." उलट टपाली मंदाकिनीबाईंना मुलासह प्रवेश मिळाल्याचे महर्षी अण्णासाहेबांचे पत्र आले.

प्रवेशाच्या वेळी अण्णा पोहोचविण्यास आले. त्या वेळी गुरुवर्य अण्णासाहेब मंदाकिनीबाईंना म्हणाले, "तुझ्या प्रश्नामुळं स्वातंत्र्य सैनिकांच्या पत्नींना प्रवेशाकरिता अग्रक्रम देण्याचं आमच्या लक्षात आलं आहे." तदनंतर हुतात्मा भाई कोतवालांची पत्नीही मुलासह हिंगण्यास दाखल झाली.

अण्णांचा पुत्र रवींद्र वैद्यकीय शिक्षण घेण्यासाठी बी.जे. मेडिकल कॉलेजमध्ये पुण्यास दाखल झाला. इंटर सायन्सपर्यंत त्याला शिष्यवृत्त्या होत्या. तशाच पुढेही मिळतील असे त्यांना वाटले, परंतु तो विशेष प्रावीण्यासह प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण झाला तरी पारितोषिकाशिवाय त्याला काही मिळाले नाही. त्याने तिसऱ्या वर्षात पदार्पण केले. मध्यम परिस्थितीतल्या कुटुंबांना हे महागडे शिक्षण परवडणारे नाही हे अण्णांना कळून चुकले. पैशाच्या अभावी बुद्धिमान मुलांना सरकारी मदतीशिवाय–शिष्यवृत्तीशिवाय–शिक्षण घेता येणार नाही. अन् हुशार तरुण तर राष्ट्राची संपत्ती. तेव्हा त्यांनी आरोग्य खात्याचे लक्ष वेधण्यासाठी ना. तत्कालीन, केंद्रीय आरोग्य मंत्री डॉ. सुशिला नायर यांच्याकडे पत्र–व्यवहार सुरू केला. प्रथम त्यांच्याकडून 'अशा शिष्यवृत्त्या आहेत, तुमच्या मुलाला याची कल्पना नसेल,' म्हणून उत्तर आले. अण्णांनी रवींद्राला याबद्दल लिहिले. तेवढ्याने

ते थांबले नाहीत; त्या वेळचे बी. जे. मेडिकलचे डीन डॉ. मोदी यांच्याकडून त्यांनी उत्तर मागविले की मेडिकलच्या विद्यार्थ्यांना अशा प्रकारची केंद्र सरकारकडून वा राज्य सरकारकडून कोठलीही शिष्यवृत्ती नाही. ते उत्तर त्यांनी पाठविले. राज्य सरकारच्या आरोग्य खात्याकडून उत्तर आले की, आम्ही या बाबीवर विचार करू. आमच्या लक्षात ही बाब आपण आणून दिल्याबद्दल आम्ही आभारी आहोत.

'आपल्या मुलाचे शिक्षण होत आले; मिळाली शिष्यवृत्ती तरी आपल्या काय उपयोगाची ?' मंदाकिनीबाई म्हणाल्या.

'नुसता स्वार्थच पाहू नये. असे अनेक रवी अनेक कुटुंबांतून असतील. तुझं शिक्षण झालं, तू नोकरी स्वीकारलीस, त्यातून एकच अपत्य म्हणून आपण हे महाग शिक्षण देऊ शकलो, बुद्धिमान मुलं हीच खरी राष्ट्राची संपत्ती असते. त्यातून सरकार म्हणजे तरी कोण ? जनताच ना! एखादी गोष्ट नजरेतून सुटली तर ती लक्षात आणून द्यावयासच हवी. आजा झाड लावतो तेव्हा नातू फळ खातो' अण्णा उद्गारले. अशा रीतीने अण्णा ठोठाविण्याचे काम करीत असत व त्यांच्या प्रयत्नांना यश येऊन दालन उघडलेही जाई.

अण्णांचे आर्थिक नियोजन फार योजनाबद्ध असे. मुलाच्या वाढदिवशी ते १०० रुपये पोस्टात बचतखाती टाकत. पुढे तो १० वर्षांचा झाल्यावर त्यांनी २०० रुपये टाकावयास सुरवात केली. मात्र घरातील वा कुटुंबातील अडचणीमुळे जर कोणी या पैशाची मागणी केली तर ते त्याला हात लावीत नसत. ते म्हणत हा गृहस्थधर्म पार पाडत आहे. आईचा सांभाळ चांगला करून पूर्वजांचे ऋण फेडीत आहे, पगारातला सहावा हिस्सा भूदानाला देऊन वा अडलेल्यांना मदत करून समाजऋण फेडीत आहे. पुत्रही ऋणको आहेच, त्याची फेड अशी करीत आहे.

रवींद्र २५ वर्षांचा झाल्यावर त्यांनी त्याला पत्र पाठवून कळविले की तुझे ब्रह्मचर्यव्रत संपवून आता गृहस्थाश्रम स्वीकारावयास हरकत नाही. आपल्या मुलाने स्वतः कोणतीही मुलगी नियोजित वधू म्हणून ठरविलेली नाही, हे पाहिल्यावर व मित्रांच्या सल्ल्याने हरिजन सेवक संघाचे अध्यक्ष अप्पासाहेब उपाध्ये यांच्या मुलीची वा सुनेची भाची आशा गोविंद रानडे ही आपली स्नुषा म्हणून ठरविली. आंतरजातीय विवाहाला तशी सर्वांची तयारी होती, पण ते जमले नाही. आशाचे आई-वडीलही सामाजिक कार्य करणारे शिक्षक होतेच, सौ. शकुन्तलाबाई रानडे या नगरच्या यशस्वी अध्यापिका तर गोविंदराव हे समाजवादी कार्य करणारे अध्यापक. विवाह २५ डिसेंबर १९६६ ला संपन्न झाला.

रवींद्राने उच्च शिक्षण घेऊन शहरात आपले हॉस्पिटल स्थापू नये असे त्यांना वाटले. 'भारत हा खेड्यांचा देश आहे. ग्रामीण जनतेला उच्चविद्याविभूषितांचा लाभ होऊ द्या.' ते म्हणाले.

हॉस्पिटलकरिता जागा मोठी हवी होती. अशी जागा दोंडाइच्यात स्वीडिश मिशनच्या ताब्यात होती. रवींद्राला मेडिकलला पाठवावयाचे ठरल्यपासूनच या जागेकडे अण्णांचे लक्ष होते. भारताच्या स्वातंत्र्यप्राप्तीनंतर मिशनऱ्यांना भारतात काम उरणारच नाही हे त्यांचे मत. त्यांनी य. बा. देशपांड्यांचे मित्र श्री. शंकरराव जोशी नंदुरबार, यांच्या मार्फत मिशनऱ्यांशी बोलणी केली व ही जागा हॉस्पिटलकरिता भाड्याने मिळविली.

हॉस्पिटलच्या उद्घाटन प्रसंगी दिनांक १० एप्रिल १९६७ ला मिशनचे चेअरमन श्री. ओल्सन् म्हणाले, "वैद्यकीय मदत, शिक्षण प्रसार, गरिबांची सेवा ही कामे मिशनची ध्येये. आमच्या जागेत डॉ. रवींद्रसारखे कुशल सर्जन हॉस्पिटल काढीत आहेत हे आमचे भाग्यच. त्यांची उत्तरोत्तर प्रगती आमच्या जागेत होवो, ही सदिच्छा."

अण्णांनी रवींद्राला सांगितले, 'तू मिशनरी होऊनं काम कर. गोष्टीत आपण सांगतो त्याप्रमाणं खरोखरीच सातासमुद्रापलीकडून हे मिशनरी येथे आले. डोंगरदऱ्यांत पसरले व जनसेवा करीत आले. त्यांचा धर्मप्रचार ही बाब सोडली तर त्यांच्यासारखे काम करणारे भारतीय बोटांवर मोजण्याइतकेही मिळणार नाहीत. शहरवासियांची झकपक तुम्हांला येथे दिसणार नाही. परंतु ग्रामीण जनतेचं अंतःकरण तुम्हांला येथं मिळेल.'

रवींद्राला १० मार्च १९६८ ला कन्यारत्न प्राप्त झाले. कोणीतरी म्हणाले, 'मुलगीच का? पहिला मुलगा झाला असता म्हणजे बरं झालं असतं!' अण्णा हसायला लागले, "वर्षानुवर्षे अंगी मुरलेला भेदाभेद जात नाही अजून! स्वतंत्र भारतात तरी हा भेद राहू नये."

अण्णा कौटुंबिक सुखाने भारावले होते.

'अण्णा, आता मात्र तुम्ही काम सोडाच व कुटुंबियांच्या सान्निध्यात राहा. डोळ्यांनी दिसत नाही, कुठं पडला म्हणजे पंचाईत येईल. तुम्ही फार हाल सोसले आहेत.'

'यंदा सुरू होत असलेली गांधीशताब्दी पूर्ण करतो अन् मग मी येतो घरी.'

परंतु परमेश्वराला ते मान्य नव्हते. २ ऑक्टोबरला धुळ्यात गांधीजयंती साजरी करून ३ ऑक्टोबर १९६८ ला अण्णा घरी आले व रात्री बोलता बोलता मागे टेकले. हॉस्पिटलमधील एक्स रे मशिनमध्ये बिघाड झाला होता. अण्णांनी रवीस कंपनीला पत्र लिहिण्यास सांगितले. रवीने विचारले, 'काय लिहू?' अण्णा म्हणाले, कंपनीस कळव, 'Fault in the machine' हे त्यांचे शेवटचेच वाक्य, आणि तिथेच त्यांचे शारीरिक मशिन कायमचे बंद झाले.

# अण्णांचे अखेरचे पत्र

## ( कौटुंबिक )

डोंबिवली
२७-९-६८

अ. अ.

धुळयास एक दिवस थांबून लगेच इकडे आलो. कुडूस, वाडा, पालघर, बोथसर, वाणगाव, चिंचणी, डहाणू, कोसबाड, बोर्डी, घोलवड, उंबरगाव, वसई, विरार, पुना, वाडा इ० आटोपून काल ठाणा-अंबरनाथ झाले.

चि. सुमंताचा मर्फी रेडिओ परवा ४२४ रु. चा खरेदी केला. त्याने २४० रोख दिले. आपणाकडील ६० होतेच. पुन्हा रु. १३१ घालून रेडिओ घेतला. कोसबाडला चि. आशाचे मामा-मामी भेटले. डहाणूला ताईमावशी ( मेहेंदळे ) यांच्याकडे उभ्या-उभ्या गेलो होतो. नवरात्रामुळे तूर्त त्या येत नाहीत. कदाचित नंतर येईन असे म्हणाल्या.

दसऱ्याला चि. कुन्दाकडे श्रीसत्यनारायण पूजा आहे, ती आटोपून नंतर धुळे दोंडाइचेकडे येईन. सुमंत व सरला बहुधा सुट्टी लागताच तिकडे येतील, त्यांना पत्र लिहून येताना आळूचे कंद, गवती चहाचे कंद व तोंडल्याचे वेल आणण्याची आठवण द्यावी. ती. स्व. अप्पा ठीक आहेत. दसऱ्यास चि. नलू वगैरे चि. सौ. कुन्दाकडे भेटतीलच बहुधा इकडील सारे सुट्टीत दोंडाइचे येथे येतील.

ती. स्व. श्री. दादाकडे दसऱ्यानंतर ५० रुपये मुलांच्या कपड्यांसाठी पाठवून द्यावेत. मी ३-४ तारखेला येईन व लगेच तीन-चार दिवसांनी परत दौऱ्यावर जाईन म्हणजे सुट्टीत घरी राहता येईल. प्रकृती चांगली आहेच. बाकी नवीन विशेष नाही. चि. राजश्रीला गोड पापा. सगळ्यांना अ. अ.

तुझा
**अण्णा**

[ या पत्रावरून अण्णांच्या विशाल कुटुंबाची कल्पना येते. यात मोहनी व टोणगावकर मंडळींची विचारपूस आली; तसेच सुनेचे मामा-मामी व मावशी यांचीही आस्थेवाईक भेट आली. अण्णा आपल्या अकृत्रिम प्रेमाने सर्वांना आपलेसे करीत. त्यामुळे अण्णा सर्वांना हवेहवेसे वाटत. प्रदीर्घ प्रचार-दौऱ्यावरून परतल्यानंतरही तीन-चार दिवसांनी लगेच दौऱ्यावर निघणार होते; परंतु परमेश्वराला ते मान्य झाले नाही. ]

# २ : स्मृतिमंजुषा

## असा ध्येयवादी व सेवाभावी कार्यकर्ता विरळा

—वक्तृत्व फार मोठे आकर्षक नसले तरी, मूलग्राही विचार ते ठामपणे मांडीत. जशी वाणी तशीच लेखणीही प्रभावी. प्रवास व अनुषंगिक कामे सांभाळून ' दलित-सेवक 'साठी वेळेवर लेख पाठवून देत व त्यामधूनही समाजात विषमता वाढविणाऱ्या अनिष्ट विचारसरणीवर प्रहार असत. तसेच ' पत्रकार ' ह्या नात्यानेही कित्येक सभा, बैठकी, अधिवेशने ह्यांतून मनापासून भाग घेत.

— गेल्या मार्चमध्ये त्यांच्या वयास साठावे वर्ष सुरू झाले होते, म्हणून प्रकृतीला जास्त ताण नको असे कोणी म्हटले तर " आता गांधीशताब्दीनिमित्त तर अधिक जोमानं काम केलं पाहिजे." असं निग्रहानं सांगत.

—ते एक उत्कृष्ट कवीसुद्धा होते. राष्ट्रीय दृष्टिकोनातून त्यांच्या विविध कविता निरनिराळी वृत्तपत्रे व काव्य संग्रहांतून प्रसिद्ध झाल्या आहेत.

— ध्येयवादाने झपाटलेले जीवन कंठणारे सेवाभावी कार्यकर्ते आजच्या काळी विरळाच सापडतात आणि आता तर अशांची नितांत गरज आहे.

—श्री. अण्णासाहेब टोणगावकर यांच्या निधनाने मोठीच हानी झाली आहे, ती कुटुंबियांची अधिक झाली का दोंडाइचे गावाची ? खो. वि. संस्थेचे जास्त नुकसान झाले की हरिजन सेवक संघाचे ? साध्या सोप्या उत्तराने अशा प्रकारचे निराकरण कसे होणार ?

—कुटुंबियांनी ती हानी आपल्यापुरती मानू नये; असे सांत्वन सारी मंडळी देतात तर " माझा पोशिंदा गेला... ! " असे म्हणणाऱ्या चुलत्याला ' अण्णांच्या जागी मी आहे ' असा धीर रवींद्र देत आहे. ह्यावरून ह्या हानीची कल्पना यावी... त्याबरोबरच ती भरून काढण्याचा मार्ग सर्वांना दिसावा !

—पतीची सावली, पित्याचे छत्र नित्य हवेहवेसेच असते व त्या 'हव्या'तूनच पुढची शक्ती मिळालेली असते. तो वारसा चालविण्याचे कुटुंबवासियांचे सामर्थ्य पुढेही टिकून राहो.

— अण्णांचे जुने नवे सहकारी खो. वि. संस्था व धुळे–दोंडाइच्याचा व्याप पुढेही सांभाळोत.

— महाराष्ट्राच्या हरिजन कार्याचीसुद्धा हानी कमी झाली नाही, ' माझा उजवा हात गेला ' हे पू. अप्पासाहेब उपाध्ये ह्यांचे म्हणणे काय चूक आहे ? पण

त्यांनाही असाच सहयोगी मंत्री लाभो. आणि 'दलित-सेवक' हे 'स्वतंत्र भारत'चे भावंड म्हणून, पुढे वाढत राहो... ते बळ आम्हांला लाभो... हीच शेवटी प्रार्थना!

**कांतिलाल गुजराथी**, धुळे
[ स्वतंत्र भारत– ८-१०-६८ मधून ]

## विषमतेचे दुष्मन

काही मंडळी सतत वृद्ध व काही सतत तरुण असतात! अण्णासाहेबांना मी सतत तरुणच पाहिलेले आठवते. त्यांनी साठाव्या वर्षात गेल्या मार्चमध्ये पदार्पण केले यावर माझा विश्वासच बसला नाही. गेली दोन तपे ते सतत त्याच उत्साहाने वावरताना मी पाहिले. शिबिरात येणाऱ्या प्रत्येक लहान थोराचे विचार ते अतिशय अगत्याने ऐकत.

ते स्वतः तळमळीचे वक्ते व लेखक होते. त्यांच्या शब्दांत एक प्रकारचा त्वेष असे. सामाजिक समतेची त्यांना तीव्र आस होती. त्यामुळे विषमतेविरुद्ध ते निकराने तुटून पडत. सत्तासंपत्तिवानांचा मग ते मुलाहिजा ठेवीत नसत. दलितांच्या कैवाराने महाराष्ट्रात कोठेही ते त्वरेने धावून जात. पाणवठ्याचा प्रश्न असो, की शाळेत अस्पृश्य मुलांना बसविण्याचा असो, केस कापण्याचा असो, की भंग्यांच्या डोईवरील टिपड्याचा असो, गोव्यातल्या हरिजनांचा असो की मराठवाड्यातील वंशपरंपरागत सफाईच्या वतनाचा असो, अण्णासाहेब त्याची इत्थंभूत चौकशी करीत आणि त्या त्या प्रश्नांवर स्वच्छ प्रकाश टाकीत.

१९३० साली त्यांनी स्वातंत्र्य-संग्रामात उडी टाकली आणि स्वातंत्र्य-सैनिकाचा गंडा बांधला. काँग्रेसच्या हुकमी सैनिकांत ते होते. स्वातंत्र्य आले आणि सत्तेचे राजकारण उतास आले. अण्णासाहेब विनम्र भावाने दूर झाले व हरिजन कार्याकडे ते वळले. स्वातंत्र्य-प्राप्तीनंतर सामाजिक कार्य मागे पडले ते सावरण्यासाठी ते पुढे सरसावले. कोणाबद्दलही मनात कटुता न बाळगता गांधीजींचे, नीटनेटकेपणाचे, शिस्तीचे अनेक गुण त्यांनी आत्मसात केले होते. त्यांची कार्यतत्परता आणि कार्यकुशलता सहजी नजरेत भरते. निरलसपणा त्यांचा अंगभूत गुण झाला होता. महाराष्ट्रातील दलित-सेवकांच्या तुकडीतील ते एक बिनीचे सैनिक होते.

## उरलो उपकारापुरता

एम्. बी., बी. एस्., एम्. एस्. या परीक्षांत अव्वल यश संपादन करणाऱ्या त्यांच्या मुलाने – रवींद्राने धुळे जिल्ह्यात दोंडाइचेसारख्या तालुका नसलेल्या मूळ गावाकडे

मोर्चा वळवला अन् अण्णासाहेबांना धन्य धन्य झाले. उरलो उपकारापुरता अशी त्यांच्या मनाची स्थिती झाली. त्यात गांधी जन्मशताब्दीचे वर्ष. अनेक मनोरथ त्यांनी उराशी बाळगलेले होते. भंगीमुक्तीचा संकल्प सुटलेला आहे तो पूर्ण व्हावा अशी त्यांना तळमळ होती. अस्पृश्यतेचा कलंक स्वातंत्र्योत्तर दीड तपातही दूर झाला नाही, याची त्यांना चीड होती. इतर प्रांतांच्या मानाने महाराष्ट्र पुढे आहे याचे त्यांना किंचितही समाधान नसे.

२ ऑक्टोबरला गांधीजयंतीच्या दिवशी धुळ्यात त्यांनी तरुणांपुढे किती कळकळीने भाषण केले. तेथून ते दोंडाइच्यास गेले काय आणि ३ तारखेला रात्री त्यांचे देहावसान झाल्याची बातमी आली काय! अनेक उमेदी व तळमळी मनात राखून अण्णासाहेब अचानक गेले!

**स्नेहवर्धन**

[ दि. १२-१०-१९६८ साधनामधून ]

## अण्णांनी कार्यकर्ते घडविले

### ज. दौ. राऊळ (दोंडाइचे)

४०-४२ वर्षांपूर्वीची गोष्ट. स्वोद्धारकच्या राष्ट्रीय शाळेत मी दाखल झालो होतो. शिरपूरचे सभापती इंद्रसिंग भाऊसाहेब, पत्रकार संघाचे श्री. ब्रिजलाल पाटील, श्री. शिवाजीराव पाटील, ज्ञात-अज्ञात अनेक मंडळीं या संस्थेत होती. स्वावलंबी शिक्षण व राष्ट्रीय संस्कार हे त्या शाळेचे ब्रीद होते. स्वच्छता, शेतीवरची कामे, इतर स्वावलंबी व्यवसाय सर्वांनाच करावे लागत. अण्णांची शिस्तही कडक होती. कोठलाही भेदाभेद केला जात नसे. अण्णांच्या घरी हरिजनांची मुले सहजतेने वावरत असत. साहजिकच समता गुणाचा प्रभाव माझ्यावर पडला.

गरिबांच्या शिक्षणासाठी काढलेल्या स्वोद्धारक संस्थेसाठी मदत मिळविण्यात अण्णा अग्रणी असत. मीही त्यांच्याबरोबर तो अनुभव घेतला. हा अनुभव मला आज उपयोगी पडत आहे, कारण कोणतीही सार्वजनिक संस्था मदतीवरच चालते. त्याच-बरोबर कळत न कळत दातृत्व माझ्या अंगी मुरले. पुढे अण्णांनी शाळेतील मुलांना स्वावलंबी शिक्षण देता यावे म्हणून शेतीचे दान मागितले. अण्णांनी हा संस्कार पूर्वीच रुजविला होता; त्यामुळे घरातल्या वडीलधाऱ्या मंडळींची संमती घेऊन मी स्वोद्धारकला ३६ एकर शेत जमिनीचे दान दिले आणि त्यामुळे आज कितीतरी मुले या शेतीच्या आधारावर कृषि-शिक्षण सहप्रयोग घेत आहेत.

एकदा नवलभाऊ, अण्णा, बाबा नाईक, आदी मंडळीं खादी गठ्ठे घेऊन आमच्याकडे आली. शाळेत असताना स्वदेशी व्रताचा संस्कार त्यांनी आमच्यावर

रुजविला होता. अण्णांनी सांगितले आणि मी खादी अंगावर चढविली. तेव्हापासून मी हे व्रत सोडले नाही. अण्णांच्या अनेकविध कार्यांपैकी खादी प्रसार हे त्यांचे एक कार्य होते. त्याचा प्रभाव माझ्यावरही पडला.

राष्ट्र सेवा दल चालविणे हे अण्णांचे आणखी एक काम होते. राष्ट्रीय वृत्तीचे पोषण जेथे जेथे होईल तेथे तेथे अण्णांची उडी असे. अण्णांनी माझे नाव राष्ट्र सेवा दलात नोंदविले. थोरामोठ्यांची बौद्धिके ऐकली आणि त्यामुळे माझ्या विचारांची जडण-घडण झाली. मी देशसेवेकडे झुकलो. राष्ट्र सेवा दलाचे पुढे विघटन झाले. अण्णांनी पश्चिम खानदेश जिल्हा काँग्रेस दलाची स्थापना केली.

१९३० पासूनच्या साऱ्या आंदोलनांत अण्णा अग्रभागी होते. कारावासही त्यांनी भोगला. १९३८ मध्ये अण्णा धुळे जिल्हा काँग्रेसचे सेक्रेटरी व १९४७ मध्ये अध्यक्ष होते. १५ ऑगस्ट १९४७ ला देश स्वतंत्र झाला. धुळ्याच्या कलेक्टर कचेरीवर व पोलीस ग्राउंडवर अण्णांच्या हस्ते तिरंगा फडकला. अण्णांचे जीवन धन्य झाले. माझ्या गुरूचा हा सन्मान व हे भाग्य पाहून मी भारावून गेलो.

याच वेळीं अण्णा दारूबंदी समितीचे जिल्हा प्रमुख होते. या क्षेत्रातही त्यांचे कार्य संस्मरणीय झाले. अण्णा सत्तेपासून मात्र दूर राहिले. पुढे त्यांनी हरिजन सेवक संघाचे काम करावयाचे ठरविले; पण ते ग्रॅज्युएट नसल्याने मंत्री होऊ शकत नव्हते. या तांत्रिक अडचणीतून सोडविण्यासाठी मी श्रेष्ठींची मने वळविली. हरिजन सेवेचे व्रत अनेक हालअपेष्टा सोसून व प्रसंगी दगडांचा मार खाऊनही चालू ठेवले. अखेरच्या क्षणापर्यंत त्यांनी हरिजनांची सेवा केली. कंजर समाजाच्या उद्धारासाठीही त्यांनी कार्य केले.

१९४५ च्या महायुद्धानंतर जीवनावश्यक वस्तूंची टंचाई व महागाई जाणवू लागली. याला पर्याय म्हणून अण्णांनी सहकारी तत्त्वावर गिऱ्हाइकांची, गिऱ्हाइकांसाठी व गिऱ्हाइकांनीच चालविलेली अशी संस्था निर्माण केली. ' ना नफा, ना तोटा ' या तत्त्वावर जीवनावश्यक वस्तूंची गरज भागविणे हे या संस्थेचे ध्येय. विश्वासावर माल आणणारी व भांडवल नसलेली ही संस्था आज ३७ लाखांच्या वर उलाढाल करीत आहे.

अण्णांच्या या कार्याचा माझ्यावर प्रभाव पडला. सहकारी संस्थांचे एक जाळेच पुढे दोंडाइचे येथे व अन्यत्र मीही निर्माण करू शकलो. दोंडाइचे येथे मी भारतातील ७ वी व महाराष्ट्रातील १ ली फॅक्टरी उभारली. भारतात तयार झालेली अधिकाधिक मशिनरी मी वापरली. या फॅक्टरीच्या उत्पादनाला सुरवात झाली. मोठा समारंभ झाला. अण्णांची आठवण तीव्रतेने झाली. शिष्याचे कौतुक करण्यासाठी गुरू हवा होता.

निष्ठेने व नेकीने सतत काम करीत राहावे, स्वाभिमानी व तेजस्वी जीवन जगावे, होईल तेवढे दुसऱ्याचे कल्याण करावे, निर्व्यसनी व साधे जीवन जगावे, लोकसंग्रह करावा अशी अण्णांची बहुविध शिकवण आचरणात आणणे यासाठी मी धडपडत असतो. अण्णा गेले नाहीत. त्यांनी जे आमच्यासारखे कार्यकर्ते निर्माण केले त्यांच्या रूपाने

अण्णा आहेत. त्यांचा आदर्श डोळ्यांसमोर ठेवून आम्ही कार्यकर्ते वाटचाल करीत आहोत हीच आमची त्यांच्या चरणी खरीखुरी श्रद्धांजली!

## सेवेचा अहंकार नसावा

१ डिसेंबर १९६८, दलित सेवक

(१) सेवेचा अहंकार नसावा. (ता. ११-१०-६८ च्या श्रद्धांजली सभेत ह. से. संघाचे अध्यक्ष श्री. **अप्पासाहेब उपाध्ये** यांचे विचार—

विद्यार्थ्यांनी वसतिगृहातच राहिले पाहिजे, त्यामुळे जीवनात शिस्त लाभते असे त्यांना वाटत होते. छात्रालयातील लाभलेले संस्कार त्यांनी भावी जीवनात टिकविले. गांधींची व इतर पुढाऱ्यांची शिकवण त्यांनी आत्मसात केली होती.

त्यांनी पत्नीला व मुलाला (बालमंदिरात) हिंगण्यास पाठवून शिक्षित केले. मुलाला खादीधारी बनविले, खादीधारी म्हणून इतर विद्यार्थी बांधवांनी टिंगल केली. त्यास त्याने जुमानले नाही. त्यांनी शिस्त व योजनाबद्ध जीवन घालविले, ते सर्व व्यवहार हिशेबी वृत्तीने करीत असत. त्यामुळे त्यांचे कुटुंब आदर्श बनले. सेवाभावी वृत्ती व स्वतःचे संस्कार त्यांनी कुटुंबियांना शिकविले. आजच्या विद्यार्थ्यांनी त्यांच्याप्रमाणे जीवन साफल्य मिळविण्याचा प्रयत्न करावा. त्यांच्यात सेवेचा अहंकार नव्हता.

२ ऑक्टोबरला गांधी जन्मशताब्दी कार्यक्रमास शुभारंभ करून देऊन त्यांनी दुसऱ्याच दिवशी स्वतःला जीवनमुक्त करून घेतले आहे.

## निर्भीड वृत्तीचे अण्णा

**श्री. दादासाहेब घोगरे**, धुळे

ते म. गांधींचे खरेखुरे अनुयायी होते. त्यांच्यात अहंपणा नव्हता. तीन वर्षांपूर्वी आजारानंतर विश्रांतीची जरूरी असतानाही ते म्हणाले होते की, माणसाने कर्म करीत राहावे व ईश्वराने बोलाविले म्हणजे जावे, असे करण्यातच खरी विश्रांती आहे. शेवटच्या क्षणापर्यंत ते कार्य करीत राहिले. कमी बोलणारे व निर्भीड होते. ह. से. संघाचे त्यांचे कार्य काकासाहेब बर्वे यांच्या खालोखाल होते असे म्हटल्यास त्यात अतिशयोक्ती होणार नाही. त्यांना सेवाभावी पुत्र व पत्नी लाभले आहेत. त्यांचे आयुष्य संस्कारक्षम असे होते. त्यांच्या सेवेने हरिजन सेवक संघ त्यांचा ऋणी राहणार आहे.

## उत्कृष्ट शिबिरार्थी

(प्रा. सदाशिवराव माळी)

अण्णांचे आयुष्य इतक्या लवकर संपेल अशी कोणासही कल्पना नव्हती. कर्तव्याच्या भावना त्यांनी संपूर्ण पाळल्या, शिस्त व स्वावलंबन हे त्यांचे प्रमुख ध्येय होते.

स्वतःचे कपडे ते स्वतः धूत व प्रवासातही हमालाची अपेक्षा ठेवीत नसत. ते उत्कृष्ट शिबिरार्थीही होते, त्यांच्या अलिखित वाङ्मयाचे संकलन केल्यास ते तरुण पिढीला खासच मार्गदर्शक होईल असे मला वाटते.

## ऋणानुबंधी बंधूस भावश्रद्धांजली

कवयित्री– **स्व. सौ. गंगूताई वैद्य**, धुळे
दलित सेवक १-११-६८

**ऋणानुबंधाचे। नाते हे देवाचे। सदा जोडायाचे जीवनात।**
**तोडणे हे सोपे। जोडणे कठीण। कृती केल्याविण बोलू नये॥**

लहानपणच्या प्राथमिक शिक्षकाची आठवण ठेवून, गुरुजींच्या मुलीचे गुरु-भगिनीचे नाते, आत्मीयतेने कायम ठेवणारे, माझे ऋणानुबंधी भाऊ म्हणजेच आमचे अण्णासाहेब टोणगावकर.

त्यांची विधायक कार्यप्रवृत्ती, साधी राहणी आणि उच्च विचारसरणी प्रभावी व तळमळीचे लेखन इ. सामाजिक व राष्ट्रीय गुणांपेक्षाही अण्णांचे मोठे मन आणि आदर्श कुटुंब ह्यांचीच भुरळ माझ्या मनाला फार पडत असे.

त्यांच्या घरी गेले की कसे अगदी माहेरी गेल्यासारखे वाटे. रुचकर जेवणाने पोट आणि गोड वागण्याने मन कसे भरून येई. मंदाकिनीबाईंचे सहकार्य त्यांना ह्या कामीही लाभले आणि आईबापांचा आदर्श रवींद्राने घेतला. असा थोर वारसा ठेवून अण्णा गेले.

आणि आता 'ती' गोड आठवण जन्मभर येत राहील, वर्तमानपत्रातून जाहीर झालेली आणि आकाशवाणीवरून पसरलेली बातमी माझ्यापर्यंत येऊन पोचण्यापूर्वीच अण्णांचे पत्र पुण्याहून सोनगीरपर्यंत येऊन पोहोचले, की तुम्हांला राष्ट्रीय पारितोषिक मिळाले आहे. ह्या आत्मीयतेला मी आज पारखी झाले. अशा माझ्या थोर बंधूला भावश्रद्धांजली वाहून ऋणनिर्देश करते.

## भावश्रद्धांजली

भावश्रद्धांजली तुम्हा रंगनाथा
सेवाकार्थी तुमचा सदा नम्र माथा ॥ ध्रु० ॥

ऋणानुबंधाची जोडावया नाती
केल्या आपुल्याशा तुम्ही सर्व जाती
थोर ह्या दलित– सेवकाची गाथा ॥ भाव ॥ १ ॥

स्वावलंबनाचा आदर्श आगळा
स्वयंप्रकाशित केले रवींद्राला
मंदाकिनीच्या हो थोर भगिरथा ॥ भाव ॥ २ ॥

क्षणार्धात झाला हरिजन मोकळा
स्थितप्रज्ञ काय याहुनी निराळा
गेले कर्मयोगी देऊनिया संथा ॥ भाव ॥ ३ ॥

## संस्मरणीय प्रसंग

**सुमंत नारायण मोहनी**, वाडे

( १ ) आमचा रेडिओ विकत आणण्यासाठी अण्णा वाडे येथे दि. २२-९-६८ रोजी आले होते. त्या वेळेस सहजगत्या ऋषिपंचमीविषयी विषय निघाला. त्यांना विचारले की, ' तुमच्या बागेत बराच भाजीपाला असल्यामुळे जिजीला ( बहिणीला ) अनायासेच ऋषिपंचमी घडली असेल. ' त्यावर ते म्हणाले, ' आम्ही या गोष्टीवर विश्वास ठेवीत नाही. ऋषिपंचमीच्या कहाणीप्रमाणे मी बैल होणार नाही. मी सत्कृत्य केले असल्यामुळे मी आपला मुक्तच आहे. पाठीमागून माझ्या पत्नीलाही मुक्ती मिळेलच. त्यानंतर अवघ्या १५ दिवसांनी त्यांच्या अकस्मात निधनाची तार हातात पडल्यामुळे अत्यंत दुःख झाले.

( २ ) आमच्या येथे दत्ताचे कॅलेंडर होते. अण्णा दारात येरझारा घालीत असताना त्यांच्या दृष्टीस ते पडले. ते म्हणाले– " दत्ताच्या आरतीत ' गांजती पुत्र पौत्र दारा ' अशी ओळ आहे. परंतु माझी बायको, मुलगा, सून मला गांजीत नाही. बरेच लोक सर्व सुख असतानादेखील अंधळेपणाने ही आरती म्हणतात व त्यांची बायका-मुले खुशाल ऐकत असतात. परंतु तोंडातून ते अवाक्षरही काढीत नाहीत. त्यामुळे ही आरती नवीन तयार करावी अशी माझी इच्छा आहे. " परंतु काळाने त्यांना हिरावून नेल्यामुळे त्यांची ही इच्छा अपूर्ण राहिली आहे.

( ३ ) मागच्या वर्षी, अण्णा वर्गणी गोळा करण्यासाठी वाडे येथे आले असताना, त्या दिवसाच्या जेवणात माठाची भाजी केली होती. अण्णा विनोदात म्हणाले, ' मला कसले गवत खाऊ घालता ! ' मी सांगितले, ' अहो अण्णा, गवत नसून माठाची भाजी आहे.' त्यावर ते म्हणतात, ' गवताला फोडणी घातली तर तेही रुचकर लागेल. ' नंतर आम्ही दोंडाइचा येथे गेलो असताना अण्णा इतरांना विनोदाने म्हणायचे, 'ह्यांनी मला गवताची भाजी खाऊ घातली. ' माठाची भाजी दिसली की अण्णांची मूर्ती आमच्या डोळ्यांसमोर उभी राहाते. अशी विनोदी, प्रेमळ व्यक्ती आम्हास कायमची सोडून गेली आहे.

## आदर्श पिता

[ डॉ. रवींद्र टोणगावकर ]

### कोण म्हणतो ते गेले म्हणून ?

' ती. अण्णा आमच्यातून गेले ' हे मला अजून सत्यच वाटत नाही. गुरुवार, दि. ३-१०-१९६८ रोजी सकाळीं त्यांचे नाव काढताच ते दारात दत्त म्हणून उभे राहतात काय, सबंध दिवस आमच्यात राहून रात्री पावणे नऊच्या सुमारास बोलता बोलता बसल्या जागी भिंतीस मान टेकतात काय व नंतर आमच्यातून कायमचे निघून जातात काय–हे काहीच सत्य वाटत नाही.–अजूनही ते फिरस्तीवर गेले आहेत व उद्या येणार आहेत असेच वाटते.

### प्रखर स्वावलंबन

नित्यनियमाने पहाटे लवकर उठून सर्व क्रियाकर्मे आटोपून ते घरातील स्वच्छता, केर काढणे, अंगणात सडा घालणे ह्या गोष्टी करीत. मीही पळावयास गावाबाहेर जाऊन शेण आणून अंगणात सडा घालीत असे. ही सवय कॉलेजपर्यंत होतीच. " कुठल्याही कामाची लाज नको, व हे काम स्त्रियांचे, हे पुरुषांचे असा भेद नको " हे त्यांचे मत. बहुधा उशिरा उठणाऱ्या मला ते लवकर उठवीत. स्वतःबरोबर व्यायाम करावयास लावीत, नंतर लगेच विहिरीवर थंडगार पाण्याने अंघोळ करण्यास घेऊन जात. अंघोळीनंतर कपडे धुणे आलेच. बालपणी त्यांनी लावलेल्या ह्या सवयी आतापर्यंत उपयोगी पडत आहेत. कधी गरम पाण्यासाठी आमचे अडले नाही की, कपड्यासाठी धोब्याच्या वा कामवालीबाईच्या विनवण्या आम्हाला कराव्या लागल्या नाहीत.

### चोख हिशेब

बाजारहाट करणे, पैन्पैचा हिशेब ठेवणे ह्याचेही धडे त्यांनी दिले. त्यांचे हिशेब नेहमी चोख असत. अगदी बारीकसारीक हिशेबदेखील ते ठेवीत. वर्षाकाठी धान्य,

कपडा, तिखट, मीठ, लवंगा, दालचिनी, चांभार, शिंपी इत्यादी प्रत्येक बाबीवर किती खर्च झाला ह्याचे सर्व टिपण त्यांच्याजवळ असे. मरणापूर्वीही अगदी शेवटच्या दिवसापर्यंतचे त्यांचे सर्व हिशेब व्यवस्थित लिहिलेले सापडले.

## मुलांवर सुसंस्कार

त्यांना काडीचेही व्यसन नव्हते व कसलेही व्यसन आपल्या मुलास लागू नये ह्याबाबत ते दक्षता घेत. मुलाने चहा पिऊ नये म्हणून स्वतःच्या आईने गमतीने चहा पाजला असता, उपवास करण्याची धमकी त्यांनी माझ्या आजीस दिली होती. मार देऊन किंवा रागाने बोलून मुले सुधारणे शक्य नसते, हे तत्त्व त्यांना पूर्ण माहीत होते. मला त्यांनी एकदाच मारले होते. चोरी करणे किंवा खोटे बोलणे ह्या सवयी मुलांना माराच्या भीतीने किंवा साध्या साध्या इच्छा अपूर्ण राहिल्यास लागतात हे त्यांचे मत. भीती हा शब्द त्यांच्याजवळ नव्हता व स्वतःच्या मुलानेही भित्रा बनू नये असा त्यांचा कटाक्ष होता, लोकभ्रम भूतपिशाच्च्यांच्या कल्पना भ्रामक आहेत हे पटविण्यासाठी संस्थेतील मुलांबरोबर मलाही अमावास्येला रात्री स्मशानात पाठवीत.

## जागृत पालक

अभ्यासासाठी ते पहाटे उठवीत. ते म्हणत, ' प्रभात-समय हा अध्ययन-काल वा ब्राह्ममुहूर्त समजावा. त्यात केलेला अभ्यास दृढ होतो. रात्री झोप झाल्याने दिवसभरचा थकलेला मेंदू ताजातवाना झालेला असतो, शरीरही साथ देते, वातावरणात शांतता व प्रसन्नता असते; त्यामुळे गुरुकुल आश्रमवासियांप्रमाणे अभ्यासास ब्राह्ममुहूर्तच चांगला. ' त्या वेळी मला ते प्रामुख्याने गणित व शास्त्र करावयास सांगत. माझ्याकरिता पहाटे उठण्याच्या दृष्टीने माझ्या लहानपणी त्यांनी सोप्या भाषेत पद्य-रचना केली होती.

## बालांस

**निजे लौकरी आणि जागे प्रभाती । तयाला जगी द्रव्य आरोग्यप्राप्ती**
**जगी थोर हे नाव ज्यांना मिळाले । तयांनी सदा तत्त्व हे आचरीले ॥ १ ॥**

**उठोनी प्रभाती करी वाचनाते । करावे न लागे कधी पाठ त्याते ।**
**आपोआप वाढावया पाठशक्ती । किती बालकांनो असे सोपी युक्ती ॥ २ ॥**

अण्णांनी लहानपणीच मला पाठांतराची सवय लावली होती. मला वैद्यकीय शिक्षणाकडेच पाठवावयाचे असे त्यांचे मत होते, म्हणून त्यांनी ' रसायन ' व ' विज्ञान ' तक्ते आणले होते.

"आता तुझी संध्या ही. स्नानानंतर नित्यनियमाने रसायन–विज्ञानाचेच मंत्र म्हणावयाचे. परीक्षा रोजचीच आहे असे समजून झालेला अभ्यास साचू न देता नित्य-नियमाने केला म्हणजे परीक्षेचा बाऊ वाटणार नाही."

"वाढ होई नित्य। दिल्याने ज्ञानात।
साठविता त्यास लुप्त होई॥"

हे अण्णांचे तत्त्व माझ्या विद्यार्थी दशेत मला फारच उपयुक्त ठरले. दुसऱ्यांना समजावून देताना आपला तो विषय पक्का होत असतो. अण्णा प्रबळ इच्छाशक्तीवर फार भर देत. 'इच्छाशक्तीने मनुष्य रोगावरदेखील मात करतो व प्रबळ इच्छाशक्तीमुळे विशेष प्रावीण्य संपादन करतो. मात्र इच्छा नसली तर काही अंगरोग नसताही गलित-गात्र होतो. आमचे कमकुवत मनच शक्तिपात करविते. रोज मनाला तयार करविले पाहिजे.' अण्णांचा एक विचार मला आवडे, 'भूतकाळात रमू नका, भविष्याला भिऊ नका, काय करायचे ते आताच करा. वर्तमानाच्या वारूवर बसून भूत–भविष्याचे लगाम खेचून काळावर मात करा.'

अण्णांचे हस्ताक्षर वाच्य असले तरी सुवाच्य नव्हते. पण अण्णांनी माझ्या-करिता कित्ता वही आणली. रोज पाच ओळी सुवाच्य लिहिण्यास लावत–'चांगल्या हस्ताक्षराने व्यक्तीचे व्यक्तिमत्त्व तर कळतेच, परंतु तर्कसंगत, सुसंगत मुद्दे सुवाच्य अक्षरांत मांडले तर आपले निम्मे यश त्यातच सामावलेले असते.' अण्णा पक्के गांधीवादी होते. माझ्या सुवाच्य लेखनाचा सराव कॅलेंडरच्या मागील बाजू, जुन्या वह्यांच्या लाल रेषेवरील कोरा भाग यात चाले. माझ्या परीक्षांतील विशेष प्रावीण्याचे सर्व श्रेय अण्णांनाच आहे. खाऊबरोबर वाचण्याकरिता गोष्टींची पुस्तके आणून त्यांनी वाचनाची गोडी लावली होती.

## आस्वाद – व्रती

अण्णा स्वतः उत्कृष्ट रुचकर स्वयंपाक करीत. त्यांनीच आईला स्वयंपाक शिकविला होता. जेवणाच्याबाबत त्यांचा कटाक्ष असे, जे पानात पडेल ते, 'अन्न हे पूर्ण ब्रह्म उदरभरण नोहे जाणिजे यज्ञकर्म' असे मानूनच खाल्ले पाहिजे. रसनेवर ताबा हवा. मी त्यांच्या उपदेशाप्रमाणे कित्येक दिवस वाढलेले सर्व अन्न एकत्र करून खात होतो.

## गरिबांचा कैवार

गरिबांबद्दलची त्यांची कळकळ तर आम्हास पदोपदी दृष्टीस पडे. घरच्या काम करणाऱ्या बाईला अगोदर जेवावयास दिले की नाही? चांगले अन्न दिले का? याची चौकशी ते करीत. आमच्याकडे काम करणाऱ्या सर्व महिला माझ्या भगिनी, त्यात मेहतराणीपासून सर्वजणी. रक्षाबंधन व दिवाळी सण त्यांच्याकरिता हक्काचे दिवस.

हरिजनच नव्हे तर इतर जातींकडेही ते विशेष आस्थेने लक्ष देत. अण्णांच्या मृत्यूनंतर 'भिमसिंग कंजर' अण्णांच्या पार्थिव देहाच्या पायांवर डोके ठेवून ढसढसा रडला व म्हणाला, 'ह्या माणसाने आम्हांला प्रथम माणुसकी दाखविली. आम्ही चोर, दरोडेखोर नसून माणूस आहोत हे प्रथम ह्याने आम्हास सांगितले. आमची पोलीस स्टेशनवरची रोजची हजेरी बंद केली.' नंदुरबारच्या कंजर जमातीकरिता संस्कार केंद्राच्या उद्घाटन प्रसंगी कंजरांचा पुढारी 'अमृत भैय्या' म्हणाला, 'हम शेर हैं, हम इन फौजदारोंको, कलेक्टरोंको नहीं डरते मगर हमारे रिंगमास्टर है अण्णा!'

गरिबांच्याबाबत त्यांचा दृष्टिकोण सदैव आपुलकीचा होता. तिखटावर तेलाऐवजी पाणी घालून लहानपणी उदरनिर्वाह करणाऱ्या अण्णांना गरिबी ही काय चीज आहे याची पूर्ण कल्पना होती. एकदा प्रवासात ठरलेल्या दरापेक्षा टांगेवाला चार आणे जास्त मागत होता. अण्णा त्याच्याशी हुज्जत घालीत होते. मला जरा त्यांचा रागच आला. मी अक्षरशः त्यांच्या दंडाला धरून बाजूला केले व म्हणालो, 'जाऊ द्या ना अण्णा, चार आणे जास्त दिले तर काय बिघडेल? आपल्याला आता कमी नाही. तो गरीबच आहे.' पण अण्णांचा युक्तिवाद वेगळाच होता. चार आणे जास्त देण्यास त्यांची हरकत नव्हती, पण त्यांच्या मते तो टांगेवाला सोकावेल. युनियनने ठरवून दिलेल्या दरापेक्षा त्याला जास्त पैसे घेण्याची सवय लागेल व तुमच्यासारख्या गिऱ्हाइकांच्याच शोधात तो राहील व उद्या एखादा अडलेला गरीब माणूस आला तर, तो टांगेवाला त्याच्याकडूनही जास्त पैसे मागेल. मग त्याने ते कोठून द्यावेत? त्यांच्यामते आमच्यासारखे लोक अनावश्यक बाबींवरदेखील पैसे उधळतात म्हणूनच महागाई वाढते व गरीब जनता नाडली जाते. गरिबांचा कैवार घेणारा इतका दूरवरचा विचार करणारा माणूस विरळाच!

## नियमित व्यायाम

'बलशाली तनु ज्याची। मनहि तयाचे दिसेल बलवान।
सुदृढ तन मन ज्याचे। धन विद्या त्या मिळेल सन्मान॥

अण्णा व्यायामाचे अत्यंत भोक्ते होते. स्वोद्धारक विद्यार्थी संस्थेचे व्यवस्थापक असताना माझ्यासह सर्व मुलांना सकाळी सूर्योदयापूर्वी व्यायाम करावा लागे. त्यात प्रामुख्याने सूर्य नमस्कार, जोर, बैठका, पळणे इत्यादी गोष्टी असत. सायंकाळी मैदानी खेळ असत. अण्णा हुतूतू फार छान खेळत.

पुढे उतार वयातही अण्णांनी व्यायाम कधी सोडला नाही. फिरणे तर त्यांचे रोजचेच असे व तेही पहाटे, पण सूर्य नमस्कार व योगासने हेही रोज झालेच पाहिजे; मग ते प्रवासात, रेल्वेत असोत, प्लॅटफॉर्मवर असोत, एखाद्या हॉस्पिटलमध्ये असोत किंवा आणखी कोणाच्या घरी असो. ते म्हणत व्यायाम करण्याची लाज कशाला वाटावयास हवी? तसेच त्यांचे म्हणणे असे की, व्यायामाला खास जागेची जरूरी नाही. आपलेच

अंथरुण गुंडाळायचे व त्याच जागेवर व्यायाम करावयाचा. व्यायामाशिवाय त्यांच्या आयुष्यात एकही दिवस गेला नसावा. जसे आमचे मुस्लिम बंधू गाडीतही सकाळ-संध्याकाळ नमाज पढतात तसेच अण्णा व्यायाम करीत.

कदाचित आनुवंशिक मधुमेह असूनही अण्णा साठीपर्यंत जगले त्याचे कारण व्यायामच असावा. हीच शिकवण त्यांनी मला दिली. ते फिरस्तीहून घरी आले की अभ्यासापेक्षा माझ्या व्यायामाचीच चौकशी करीत. पुढे मी कॉलेजात गेल्यावर परीक्षेपूर्वी त्यांची पत्रे येत त्यात अभ्यासापेक्षा प्रकृतीकडे लक्ष देण्याबद्दलच अधिक भर असे. त्यांची आवडती दोन घोष वाक्ये ' शरीरमाद्यं खलु धर्म साधनम् ' व ' शिर सलामत तो पगडी पचास. '

**सत्यनिष्ठ**

सत्याची अण्णांना अतिशय चाड होती. ते असत्य बोलत नसत व कोणी असत्य बोललेले त्यांना खपत नसे. लांडी-लबाडी वा लाचलुचपत त्यांना माहीत नव्हती. एकदा त्यांनी मुंबईहून शस्त्रक्रियेची हत्यारे आणली. ते मुंबई-शहादा गाडीने येणार होते, पण अचानक काही कारणाने गाडी निघाली नाही, त्यामुळे ते धुळ्यास आले व एस्. टी. स्टँडवरच दोंडाइच्यास येणाऱ्या गाडीत बसले. इतक्यात जकात नाक्याचे कारकून तेथे आले व त्यांनी जकात भरली का म्हणून विचारले असता अण्णांनी सविस्तर सांगितले की मी दोंडाइच्यास जात आहे तेथे जकात भरली जाईल, परंतु कारकुनांनी त्यांना ४० रुपये दंड भरावयास लावला. अण्णांनी तो भरला व नगरपरिषदेशी पत्रव्यवहार केला पण पैसे परत मिळाले नाहीत. त्यांनी दोंडाइच्यास ७ रुपये जकात भरली होती. अनेकजण म्हणाले, ' तुम्ही दोन-चार रुपये त्या कारकुनाला का नाही दिले ? तेवढ्याने काम झाले असते. ' अण्णांना पैसे गेल्याचे दुःख नव्हते तर लाच न दिल्याचाच आनंद होता.

## आता माझा आधार गेला

**श्री. बा. दा. दशपुत्रे** [ दलित सेवक १-११-६८ ]

तसेच म्हटले तर कै. अण्णासाहेब टोणगावकरांच्याबाबत मी आठवणी त्या काय आणि किती लिहिणार ? सबंध महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यांत अण्णांचा संचार असावयाचा व सर्व पक्षांच्या अनेक कार्यकर्त्यांना ते भेटत, हे सर्व कार्यकर्ते आपल्या पक्षांचे ' बोचके ' बाजूला ठेवून हरिजन सेवा करणाऱ्या अण्णांना आपआपल्या परीने मदत करीत. अण्णांनी राजकारण केले तेव्हा विरोधकांचा संपूर्ण पाडाव केला, परंतु विरोधकांच्या मनात स्वतः-बद्दल कटुता निर्माण होऊ दिली नाही व राजकारणातून निवृत्त झाल्यावर ज्या काँग्रेसचा

स्वातंत्र्यपूर्व काळापूर्वी त्यांनी हिरिरीने प्रचार केला, त्या ' आजच्या काँग्रेस 'च्या राजकारणाचा त्यांनी कधी विचारच केला नाही. आम्ही कधी प्रचलित काँग्रेसच्या धोरणावर टीका केली तर त्यांना वेदना होत, परंतु कधी कधी ते दुःखाने म्हणत की " ह्या पुढाऱ्यांची कामाची जिद्द संपली आहे. स्वार्थापोटी समाजाचा विचार आजचे पुढारी करूच शकत नाहीत."

आम्ही काँग्रेसच्या ध्येयाबाबत शंका घ्यावयास सुरवात केली, तर अण्णांना राग येई व म्हणत की, " धोरणावर टीका करा व ती विधायक असू द्या." विरोधाकरिता टीका त्यांना मंजूर नव्हती.

मी त्यांचा धाकटा साडू– धाकटा भाऊच म्हणाना! ते नेहमी म्हणायचे, " तुम्ही ध्येयानं वेडे व्हा व त्यात तुमचं कितीही नुकसान झालं तरीही मी सर्वतोपरी मदत करीन." आणि हाच त्यांचा फार मोठा आधार माझ्या पाठीशी होता.

१२ जुलै १९६० रोजी केंद्रीय कर्मचाऱ्यांचा बेमुदत संप झाला. त्या वेळीं मी नॅशनल रेल्वे मजदूर युनियनचा अध्यक्ष असल्यामुळे मला अटक झाली. " तुम्ही स्वार्थाकरिता नव्हे, तर असंख्य कर्मचाऱ्यांवर होणाऱ्या अन्यायाविरुद्ध लढताना जेलमध्ये गेलात, मी तुम्हाला दोष देणार नाही. स्वतःच्या कुटुंबाचा कोणीही विचार करील. दुसऱ्याच्या कुटुंबाचा, उन्नतीचा जो विचार करतो, त्याच्या कुटुंबाची उन्नती ही आपोआपच होते. सरकारी नोकरी गेली तर आहे त्यापेक्षा अधिक चांगलं कार्य तुमच्या हातून पार पडावे अशी परमेश्वरी योजना असेल. म्हणूनच कदाचित तुमची नोकरी सुटेल. पुन्हा जिद्दीनं कार्याला लागा. कोणतंही कार्य संघटनेतून निर्माण होत असतं. तुमचं संघटन मजबूत करा. मी सदैव तुमच्या पाठीशी उभा आहे!"

श्री. अण्णा गेल्याने हा माझा आधार गेला, परंतु त्यांचा उपदेश सदैव माझ्या मनात राहील.

## श्री. रंगनाथ राजाराम ऊर्फ अण्णासाहेब टोणगावकर

### श्री. रा. आ. बेलसरे, मोर्शी

विदर्भ हरिजन सेवक संघाचा अध्यक्ष म्हणून माझी १९५३ साली नेमणूक झाल्यापासून, महाराष्ट्र ह. से. संघाशी माझा संबंध आला. गेल्या काही वर्षांत अप्पासाहेबांची दृष्टी कमकुवत झाल्यामुळे, महाराष्ट्र हरिजन सेवक संघाच्या कार्याचा बहुतांशी भार अण्णासाहेब टोणगावकरच सांभाळीत. अण्णासाहेबांच्याबरोबर भारतातील अनेक राज्यांत हरिजन सेवक संघाच्या कामाच्या निमित्ताने फिरण्याची मला संधी मिळाली व त्यामुळेच त्यांच्या अंगचे अनेक गुण अगदी जवळून अनुभवता आले.

लवकर निजे लवकर उठे । तया ज्ञान आरोग्य संपत्ति भेटे ॥

माझ्या मनावर विशेष पगडा बसविणारा अण्णासाहेबांचा जर कोणता गुण असेल, तर तो त्यांची पहाटे उठण्याची सवय. ते रोज ३-४ च्या दरम्यान उठत. उठल्याबरोबर प्रातर्विधी आटोपून, गार पाण्याने स्नान करून स्वतः आपले कपडे धुऊन मग व्यायाम करीत. लवकर उठावे लागे म्हणून, रात्रीचे जागरण ते सहसा टाळीत. दुसरे काही कार्यक्रम चालू असले तरी ते रात्री ९ वाजता झोपावयास जात.

## उद्योगाच्या घरी ऋद्धिसिद्धी पाणी भरी

सकाळी उठल्याबरोबर स्नानादी प्रातर्विधी आटोपताच ते रोज नियमितपणे कमीत कमी अर्धा तास सूत कातीत, नंतर फिरायला जात. दिवसभर कधीही त्यांना रिकामे पाहिल्याचे आठवत नाही. 'दलित सेवका 'करिता माहिती संग्रहित करणे किंवा लिहिणे हा त्यांचा दुसरा महत्त्वाचा उद्योग होता. हरिजन सेवक संघाची तुटपुंजी अर्थव्यवस्था सांभाळण्याचे कार्य त्यांनी आपल्या मजबूत खांद्यांवर सदैव वाहिले.

स्वातंत्र्यप्राप्ती होईपर्यंत काँग्रेसचा एकनिष्ठ शिपाई ह्या नात्याने त्यांनी आपला जीवनकाल व्यतीत केला. काँग्रेसने राजकीय सत्ता हाती घेतल्यानंतर त्यांनी सत्तेच्या राजकारणास रामराम ठोकला, व दलितोद्धाराच्या आत्मक्लेशाच्या जिकीरीच्या व समाजाकडून अप्रतिष्ठा होणाऱ्या कार्यक्रमास स्वतःला वाहून घेतले. हे कार्य अव्याहतपणे त्यांनी आमरण चालविले व ते करीत असताना जिवावर बेतण्याचे प्रसंग आले तरी त्यांनी कधी माघार घेतली नाही.

## कार्यकर्त्यांबद्दल जिव्हाळा

कै. अण्णासाहेब आपल्या सहकारी कार्यकर्त्यांशी अधिकाराची जाणीव ठेवून कधीही वागले नाहीत. त्यांनी सर्वांना आपल्या बरोबरीच्या नात्याने वागविले. सर्व कार्यकर्त्यांच्या अडीअडचणी समजून घेऊन त्यांना यथायोग्य व यथाशक्य मदत करण्यास ते सदैव तत्पर असत. ह्यामुळेच सर्व कार्यकर्त्यांची त्यांच्यावर नितांत श्रद्धा होती.

## स्वावलंबन

शक्य तेव्हा आपल्या सर्व प्रवासी सामानाच्या दोन पिशव्या आपल्या दोन मजबूत खांद्यांवर घेऊन ते चालत. अनावश्यकपणे मोटार, टांगा, रिक्षा अशा कोणत्याही वाहनाचा उपयोग त्यांनी कधीही केला नाही. परटाकडून धुऊन आणलेले कपडे त्यांनी कधी वापरल्याचे मला आठवत नाही. आपला कोणताही भार दुसऱ्यावर पडू नये ही त्यांची सदैव इच्छा असे. त्यांनी आपला स्वावलंबनाचा निर्धार आपल्या शेवटच्या घटकेपर्यंत पाळला. एम्. एस्. मध्ये पहिला आलेला मुलगा डॉ. रवींद्र, एम्. बी., बी. एस्. झालेली सून आणि स्वतःची सुविद्य पत्नी बाजूला बसली असताना त्यांच्यापैकी कोणासही औषधपाणी, दूध व तीर्थ देण्याची संधी न देता अण्णासाहेब इहलोक सोडून गेले.

ते शास्त्रशुद्ध विचारसरणीचे होते. धार्मिक कर्मकांड व अनिष्ट रूढींचे ते कट्टर विरोधक होते.

## कार्यकर्त्यांचा मार्गदर्शक

**श्री. आ. खं. बाविस्कर**, धुळे

महाराष्ट्रात सामाजिक, विधायक व रचनात्मक कार्य करणारे जेवढे कार्यकर्ते आहेत, त्यांत जिव्हाळा, आत्मीयता व सातत्याने काम करणाऱ्यांपैकी श्री. अण्णासाहेब टोणगावकर हे एक सेवेचे पुजारी होते. त्यांचे अनेक गुण आदर्श होते. ते ज्या कार्यकर्त्यांच्या क्षेत्रात जात त्या त्या कार्यकर्त्यांमध्ये कामाबाबत आत्मविश्वास निर्माण करीत असत. त्यांनी शेकडो विद्यार्थ्यांना तयार करून, शैक्षणिक कार्यात कित्येक हरिजन उमेदवारांना प्रोत्साहन दिले व स्वाभिमानाने जीवन जगण्याचे मोठे श्रेय संपादन केले.

त्यांच्यात कोणता गुण नव्हता असे नाही. जो विचारावा तो होता असेच सांगावे लागेल. संस्थेची परिस्थिती लक्षात घेऊन ते जनजागृती करीत व हरिजनांच्या समस्या निवारण्याचे महत्त्व सर्वांना सविस्तर समजावून देत असत. दात्यांची मनं जिंकून, त्यांच्या परीने संस्थेला आर्थिक साहाय्य मिळवून देण्याचे महत्कार्य त्यांनी केले आहे.

राष्ट्रीय सेवेत एकात्मता प्रतीज्ञा घेतलेल्यांना ते आवर्जून सांगत की, आपण घेतलेली प्रतिज्ञा विसरलात, ती आठवा व आचरण्याचा प्रयत्न करा, आणि इतरांनाही प्रतिज्ञा-भंग होणार नाही, देशात वैमनस्य उद्भवणार नाही, हे ध्यानी आणून देत. तसेच एकात्मतेसाठी दलितांना-हरिजनांना समानतेचे हक्क देवविण्याकरिता ते सर्वांना उद्युक्त करीत.

भेदभाव दूर करण्यासाठी, दारूबंदी होण्यासाठी, भूमिहीनांना जमीन मिळवून देण्यासाठी, सफाई कामगारांना नवीन अवजारे व नवीन धंदा मिळवून देण्यासाठी, शेतकऱ्यांना उत्तम खत मिळावे व भंगी समाज घाणेरड्या धंद्यातून मुक्त व्हावा म्हणून निर्भंगी, निर्गंधी, खतोत्पादक संडास निर्मिण्याकरिताही ते सर्वांना प्रवृत्त करीत.

तसेच गावोगावी फिरताना हरिजनांना समानतेचे हक्क प्राप्त करवून देण्यासाठी ते फार झटत. **काही गावांत भेदभाव पाळला जात नाही, ह्याचीही ते माहिती घेत व तशी प्रसिद्धीही देत.** धुळे जिल्ह्यातील सडगाव हे ह्याबाबत ‘ आदर्श ’ असल्याचे त्यांना आढळले होते. तो लेख त्यांनी ‘ दलित सेवक ’ मध्ये दिला. नंतर ते वृत्त महाराष्ट्र शासनातर्फेच्या ‘ लोकराज्य ’ मध्येही प्रकाशित झाले आहे.

त्यांचे जीवन गरिबीतून, कष्टाने वर आलेले असल्यामुळे गरीब, दुःखी माणसाची त्यांना चांगलीच जाणीव होती. त्यामुळेही त्यांचा कार्यकर्त्यांना फारच मोठा आधार होता.

ते कार्यातील अडी-अडचणी योग्य मार्गाने सोडविण्याचेही प्रयत्न करीत. त्यातच कार्यकर्त्यांना मोठे मार्गदर्शन प्राप्त होई. मी संस्थेचा मंत्री आहे अगर शिबिरसंचालक आहे असा अहंपणा त्यांच्यात मुळींच नव्हता.

त्यांचा माझा गेल्या १२ वर्षांपासून जवळचा संबंध होता. त्यांच्या समवेत पदयात्रा, शिबिरे, संमेलने, प्रवास व निरनिराळ्या संस्थांना भेटी असे कितीतरी प्रसंग घडले. त्या सर्वांवरून त्यांची देशभक्ती व जनसेवा हीच ईश्वरसेवा ही वृत्ती म्हणजे— तो एक सेवेचा पुजारीच होता, हे आम्हा सर्व कार्यकर्त्यांच्या सदैव स्मरणात राहील.

## विनम्र अभिवादन

**श्री. पां. जि. सबनीस**, नाशिक

श्री. रंगनाथ टोणगावकर ह्यांच्या आकस्मिक व अत्यंत शोचनीय निधनाने हरिजन सेवक संघाची कधीही भरून न येणारी अशी अपरिमित हानी झाली आहे...असे वाक्य आम्ही बहुधा प्रत्येक दिवंगत कार्यकर्त्याबद्दल औपचारिकरीत्या नेहमी लिहीत असतो, परंतु श्री. टोणगावकरांच्या बाबतीत त्यातले अक्षर न् अक्षर सत्य आहे.

इतका निगर्वी, कष्टाळू, प्रसिद्धिपराङ्मुख, हसतमुख, अत्यंत साध्या राहणीचा, केवळ अंतःकरणाच्या प्रेरणेने हरिजन सेवा करणारा व निर्भयपणे हरिजन समाजाचे दुःख वेशीवर टांगणारा कार्यकर्ता मला आजपर्यंत आढळला नाही. हरिजनांच्या उद्धाराच्या कार्याची आवश्यकता प्रतिपादित करणारी वक्तृत्वपूर्ण भाषणे करणारे, तसेच म. गांधींच्या नावाची घोषणा करणारे परंतु गांधीजींना अत्यंत प्रिय असलेल्या हरिजन कार्याची पूर्ण उपेक्षा करणारे कितीही उच्चपदी असले तरी श्री. टोणगावकरांच्या टीकास्त्रामधून ते कधीही सुटले नाहीत.

खादीचे कुडते, जाकीट, पायजमा व टोपी असा पांढराशुभ्र पोशाख धारण केलेली त्यांची गौरवर्ण मूर्ती पाहून माझ्या मनात नितांत आदर उचंबळून येई व पंढरीच्या विठ्ठलापुढेही विनत न झालेली माझी मान आपोआप विनम्र होई. ह्या लिहिण्यात वरपांगीपणा मुळींच नाही. त्यांच्याविषयी मला खरोखरीच काय वाटत असे ते आजपर्यंत मी कोठेही व्यक्त केले नाही, परंतु त्यांना ही श्रद्धांजली अर्पण करताना मात्र माझ्या भावनांचा ओघ मला आवरत नाही.

स्व–जातियांच्या हालअपेष्टा पाहून कळवळणारे पुष्कळ असतील परंतु श्री. टोणगावकरांना हरिजनांचा जातिनिरपेक्ष कळवळा असे. एकमेव मानवतेचे अधिष्ठान त्यांच्या हृदयात होते. त्यांच्या मुखावर सदैव विलसणाऱ्या स्मितामागे लपलेले हरिजनांच्या परिस्थितीबद्दलचे दुःख स्पष्टपणे प्रतीत होत असे.

अशा थोर पुरुषाच्या स्मृतीला माझे कर जोडून विनम्र अभिवादन!

दे. का. नागोशे–मूळ

दलित सेवक १९६८

काय दुर्दैव अमुचे ये आडवे । घडते महापाप ते नवे ।
कोणा जाणीव ह्याची नसे अंतरी ॥ १ ॥

दिनरात जे फिरले कष्टले । ध्यास सेवेचा दलितात जे रंगले ।
अण्णासाहेब टोणगावकर माउली ॥ २ ॥

हाय रे दैवा कैसी तुझी ही लीला । हिरा एकेक वेचुनी नेशी भला ।
पोकळी बनली ऐसी सरे सावली ॥ ३ ॥

१ डिसेंबर १९६८, दलित सेवक

## अण्णासाहेब टोणगावकर

[ असाधारण व्यक्तिमत्त्व ]

**अशोक रा. अल्पे** : वडनेर–वैभव

'ता. ३ ऑक्टोबर ६८ रोजी सायंकाळीं अण्णासाहेब ह्यांचा अकस्मात हृदयक्रिया बंद पडून देहांत झाला.' या गोष्टीने धक्का बसला पण काय करणार ? अखेरी 'ते देवाला आवडले म्हणून त्याने त्यांना नेले' अशी समजूत करून घेऊन, शांत बसावे लागले. नाहीतरी आत्मसमाधानापेक्षा मनुष्य काय करू शकतो ?

वैयक्तिकदृष्ट्याही अण्णा शिस्तप्रिय होते. आपले शरीर-स्वास्थ्य उत्कृष्ट ठेवण्यासाठी या वयातसुद्धा ते व्यायाम करीत. अर्थात ह्यामागे केवळ वैयक्तिक स्वास्थ्याचा हेतू नसे. आपले शरीर राष्ट्राचे आहे असे ते समजत असत. कारण 'हा देह माझा नाही; सर्व देशाचा आहे' या उदात्त विचारांचे अण्णा होते.

अण्णांनी केवळ 'हरिजन उद्धार' ही भूमिका स्वीकारली नव्हती, तर 'मानवी-उद्धार' या विशालतेतून त्यांचे आयुष्य बनले होते. अण्णांनी २ ऑक्टोबरला आपणास महान संदेश दिला की, 'अस्पृश्यता नष्ट झाल्याविना गांधी शताब्दी उत्सव निर्जीव ठरेल' आणि ३ ऑक्टोबरला ते आपल्यातून गेले. काय हा दैवदुर्विलास !

अण्णा आमच्याकडे आले असताना केव्हाही स्वस्थ बसत नसत. कधी अध्ययन, तर कधी लेखन, काही वेळा ते एखाद्या गहन मननात स्वतःला बुडवून घेत. त्यांच्या नित्याच्या कार्यावरून मला एक गोष्ट लक्षात घ्यावीशी वाटली की, 'अण्णा अखेरपर्यंत

विद्यार्थी होते, प्रत्येकाने अनंत काल विद्यार्थीच असावे.' ह्या अभ्यासू वैचारिक जीवनातून अण्णा लेखन करीत. ते समाजाला आपल्या ध्येयाची जाणीव मातेच्या मृदू शब्दांत करून देत तर समाजातील दोष पित्याच्या कठोर शब्दांत सांगत असत. याच दृष्टिकोणातून त्यांचे दलित सेवकातील प्रत्येक लेख असत.

अण्णांनी आपले आयुष्य दरिद्री नारायणाच्या सेवेसाठी खर्च केले होते. येथे आल्यावर ते रोज सकाळ-संध्याकाळ हरिजन वस्तीत जाऊन 'हरि'ची पूजा करीत व त्यावरील 'निर्माल्य' काढण्याचा प्रयत्न करीत असत. आपल्या कार्याबाबत अण्णा एका विशिष्ट जादूने भारावले होते. ज्या वेळी देशाच्या शब्दकोशातून 'जाती' व 'भेद' हे दोन शब्द नष्ट होतील त्या वेळी देशाला कुटुंब म्हणता येईल असे ते सांगत.

गांधीवादावर प्रेम करून आपले कर्तव्य पूर्ण करणारे अण्णा खरे गांधीभक्त होते. रस्त्याने जाताना मंदिर दिसताच हात जोडणाऱ्या 'भक्ताप्रमाणे ते नव्हते, तर मंदिर नसले तरी कृतीत, वृत्तीत देवाला अहर्निश स्थान देणारे अण्णा हे खरे गांधीभक्त होते. त्याग, स्वावलंबन, दरिद्री नारायणाची सेवा, सूत-कताई इ. गोष्टी त्यांनी आपल्या जीवनात समाविष्ट केल्या होत्या.

अशा अण्णांच्या वियोगाने केवळ हरिजन सेवक संघालाच काय परंतु उभ्या महाराष्ट्राला त्यांच्याबद्दल दुःख वाटणे साहजिकच आहे.

अण्णांचा आत्मा दारिद्र्याच्या, मानवतेच्या व हरिजन सेवक संघाच्या कार्यासाठी तळमळत होता. त्या कार्याच्या पूर्ततेसाठी आपण सहभागी होणे हेच आपले कर्तव्य आहे.

## निष्ठावान कार्यकर्ता

**अ. दा. सहस्रबुद्धे**, बार्शी

अण्णासाहेब यांनी गेली १५ वर्षे म. ह. से. संघाच्या चिटणीसपदाची जबाबदारी अत्यंत उत्तम रीतीने सांभाळली. कार्याचा विस्तारही वाढविला. ते उत्तम लेखक, वक्ते, संघटक व निष्ठावान कार्यकर्ते होते. त्यांच्या लिखाणात राष्ट्रीय भावना व सामाजिक समतेची तळमळ ओतप्रोत भरलेली असे. साध्या व सोप्या भाषेत कठीण प्रश्नांची उकल करण्याची त्यांची हातोटी अवर्णनीय असे. हरिजन कार्यासाठी वाटेल तो त्याग करण्याची व त्यासाठी सत्ताधिकाऱ्यांचा रोष ओढवून घेण्याची त्यांची तयारी असे.

कडक शिस्तीचे ते भोक्ते होते. शिबिराच्या वेळी कार्यक्रम वेळेवर व व्यवस्थित व्हावेत असा त्यांचा कटाक्ष असे. कार्यकर्त्यांबद्दल त्यांना अत्यंत जिव्हाळा असे.

त्यांचा सात्त्विक व बालकासारखा सदोदित टवटवीत असणारा हसरा चेहरा इतक्या लवकर अंतर्धान पावेल असे वाटले नव्हते. कार्य करता करता ते मरणाला

सामोरे गेले. मृत्यूवर त्यांनी विजय मिळविला. त्यांचे अपुरे राहिलेले कार्य पूर्ण करण्याची प्रेरणा, त्यांची स्मृती कार्यकर्त्यांना सतत देत राहील असा विश्वास वाटतो.

## आमचे अण्णासाहेब आमच्यातच

### दे. दे. भारदे, धुळे

ते कधी कोणावर रागावत नसत. काही चुका झाल्या तरी ते शांततेने व मनमिळाऊपणे समजावून देत. परंतु राग वा संताप हे त्यांच्या ठिकाणी नव्हते. मौजे राजपिंप्री ( जि. औरंगाबाद ) येथील शिबिरात कोणा कार्यकर्त्याने एक क्षुल्लक पदार्थ चोरून खाल्ला, सर्वांना विचारले पण कोणीही कबूल झाले नाही. म्हणून अण्णांनी स्वत: एक दिवसाचा उपवास केला, परंतु ते कोणावर चिडले नाहीत किंवा अपशब्द बोलले नाहीत. त्यांना पोहण्याची कला चांगली अवगत होती. ते पाठीवर तासन् तास तरंगत राहात. एके दिवशी त्यांनी व मी पोहण्याची शर्यत लावली, परंतु मी त्यांच्याबरोबर टिकू शकलो नाही. अशा वयातही ते व्यायाम करीत असत.

तसेच शारीरिक किंवा मानसिक आजाराबाबत मी केव्हा केव्हा त्यांना विचारीत असे. तेव्हा ते मला त्यांच्या अनुभवाप्रमाणे आयुर्वेदिक औषधाचा सल्ला देत. अन्य औषध घेण्याबाबत त्यांची नाखुशी असे.

बाहेरगावी सभा घेतल्या म्हणजे मलाही सवय व्हावी म्हणून ते मला प्रथम बोलण्यास सांगत.

त्यांच्या अशा कितीतरी आठवणी आहेत. त्यांच्या अशा कितीतरी सद्गुणांमुळे ते जणू आम्हाला सोडून गेले नाहीत, ते आमच्या बरोबरच आहेत, ते अमर आहेत, असे आम्हास वाटते.

## स्वोद्धारक विद्यार्थी संस्थेचे शिल्पकार

### श्री. य. बा. देशपांडे

१६ जून १९४१ ला मी अण्णांच्या सहवासात आलो. मुख्याध्यापक पदावर मी रुजू झालो होतो. अण्णांच्या बरोबरीने आपण एक चांगले काम करीत आहोत हा एक माझा आनंद होता. अमळनेरला असताना मी पू. साने गुरुजींच्या सहवासात होतो. त्यामुळे बाहेरच्या सरकारी नोकरीची प्रलोभने मी टाळली आणि अण्णांबरोबर रमलो याचे कारण एकच. अण्णांची निर्लोभी ध्येयवादी वृत्ती. जीवनात अनेक कठीण प्रसंग आले; अण्णासाहेबांनी त्या प्रत्येक वेळीं मला सांभाळले, धीर दिला आणि माझे मनोबल खचू दिले नाही.

अण्णा त्यांच्या तत्त्वासाठी आग्रही होते, खंबीर होते, पण आक्रमकाची भूमिका मात्र त्यांनी कधीच घेतली नाही. अण्णांचा प्रभाव माझ्यावर पडला तो याचमुळे.

अण्णा अजातशत्रू होते. माझे कोणीही शत्रू नाहीत असे ते नेहमी बोलत. माझा शत्रू एकच आणि तो म्हणजे मीच. "कोणाही जीवाचा न घडो मत्सर" अण्णांनी हे जीवनभर पाळले. स्वतःमधल्या उणेपणाची त्यांना जाणीव होती.

संसारातल्या साऱ्या काळज्या आणि दुःख विसरण्याची किमया त्यांच्याजवळ होती. जीवनाची काळजी त्यांनी घेतली. उगाच काळजी उगाळत ते कधी बसले नाहीत. जीवनात अण्णा स्थितप्रज्ञ होते. 'अण्णा आता झोपा' असे अण्णांना म्हणावे आणि खरच अण्णा पाच मिनिटांच्या आत घोरायला लागत. औषधांची गरज त्यांना कधी पडली नाही. याचे कारण अगदी सरळ आहे.

स्वावलंबन त्यांच्या जीवनाचा स्थायीभाव होता. स्वतःच्या कामासाठी इतरांना त्रास देणे त्यांना आवडत नसे. स्वतःची कामे स्वतःच ते करीत. पहाटेस नियमित ४ वाजता उठणे, अंथरूण काढणे, खोलीची स्वच्छता करणे, थंड पाण्याने अंघोळ, त्यानंतर स्वतःचे कपडे स्वतःच धुणे, सूत कातणे, बाग काम करणे हा त्यांचा दररोजचा ठरलेला कार्यक्रम. अपवाद वगळता त्यात फरक पडला नाही. स्वावलंबन, स्वच्छता, टापटीप, शिस्त यांचा आदर्श त्यांनी सर्वांपुढे ठेवला.

त्यांचे जेवण संपूर्ण शाकाहारी व अगदीच साधे असायचे. अण्णांच्या बालपणी त्यांच्या आत्याकडे त्यांना दूध पिण्यास मिळत असे कारण तिच्या घरी दुभते होते. ती त्यांना लाडाने 'कृष्ण' म्हणून म्हणत असे व हेच नाव रूढ झाले होते; परंतु किशोरावस्थेत मात्र अण्णांच्या जेवणात नुसत्या तिखटावर पाणी घालून भोजन करण्याचे प्रसंग आले होते. त्यामुळे जेवणात अण्णांची तक्रार नसे. चमचमीत जेवण अण्णांना आवडत नसे. त्यांचा आहार अतिशय सात्त्विक होता. हिरव्या भाज्या खाण्यावर त्यांचा फार भर असायचा. तेवढ्यासाठी घराभोवती असणाऱ्या जागेत ते भाज्या लावीत. "भाजी मिळत नाही, फार महाग आहे." या कुरकुरीला त्यांनी वाव दिला नाही. लाल मिरचीचे तिखट त्यांना आवडत नसे. हिरव्या मिरचीवरच त्यांचा भर असे.

'उदरभरण नोहे जाणिजे यज्ञकर्म' आहाराबाबत अण्णांची ही धारणा होती. आणि म्हणून 'सत्त्ववृत्तीचा भोगू आहार भोगे' हे ज्ञानेश्वरीचे आहाराबाबतचे तत्त्व त्यांनी तंतोतंत पाळले. आहाराचे महत्त्वाचे काम म्हणजे आपले आरोग्य चांगले ठेवणे हे अण्णा जाणत. ते म्हणत, योग्य आहाराने 'देही आरोग्य लाभते। भाग्य नाही यापरते।'

प्रवासात येईल ते गोड करून घेण्याची त्यांची वृत्ती होती. अमुकच पाहिजे असा आग्रह त्यांनी कधी धरला नाही; आणि क्वचित प्रसंगी जेवणाचा बेरंग झाला तरी ते चिडत नसत. तसे भाव चेहऱ्यावरही उमटू देत नसत. जुळवून घेत असत. अन्नधान्य वाया घालविण्याची त्यांना चीड होती. अन्नधान्याला ते राष्ट्राची अमोल संपत्ती समजत

व जपत. शिळ्या भाकरीचा, पोळीचा मनोहरा अण्णांच्या बरोबर आम्ही कितीतरी वेळा खाल्ला आहे.

अण्णांना बऱ्याच वेळा स्वतः स्वयंपाक करावा लागे. अण्णा पोळया नाहीतर भाकर करीत असत आणि आम्ही त्यांच्याशी गप्पागोष्टी करीत असू. महत्त्वाचे निर्णय याच वेळी घेतले जात. हे प्रसंग अजूनही डोळ्यांसमोर येतात आणि डोळे पाणावतात.

राष्ट्रकार्यासाठी अण्णांना प्रवास करावा लागे. प्रवासाची तयारी स्वतःच ते करीत. सामानही सुटसुटीत. सारे फक्त एका पिशवीत. गळ्यात अडकवली की अण्णा तयार. अवडंबर त्यांना माहीत नव्हते. गाडीची वा मोटारीची वेळही त्यांनी कधी चुकू दिली नाही. सभा असली, व्याख्यान असले की अण्णा बोलावण्याची वाट न पाहता सर्वांच्या आधी हजर. एवढेच नव्हे तर सभेच्या तयारीलाही हातभार लावीत. ते संपूर्ण खादीदारी होते. मृत्यूच्या दिवसापर्यंत ते न चुकता सूत कातीत होते. त्यांचा पोशाखही अगदी साधा नी सुटसुटीत – पायजमा, नेहरू शर्ट, जाकीट आणि टोपी बस! उन्हाळ्यात हातात छत्री.

पण पोशाख साधा असला तरी स्वच्छ व नीटनेटका होता, गबाळेपणा नव्हता. त्यांचा पोशाख आणि त्यांची विचारसरणी यांची सांगड त्यांच्या व्यक्तित्वास उंचावणारी होती. राष्ट्रहिताला पोषक होती. सभेला गेले की अण्णांजवळ पिशवी असायची. चपला बाहेर ठेवल्या की चोरीस जाण्याची भीती. जुन्या वर्तमानपत्रात गुंडाळून चपला पिशवीत ठेवायच्या व त्या पिशवीवर बसायचे. या धोरणामुळे त्यांच्या चपला वा छत्री कधीच चोरीस गेली नाही. त्यांच्या पिशवीत सुई-दोऱ्याचे रीळ, बटने व सेफ्टी पिन्स नेहमी असत. त्यांचे आवडते घोष वाक्य होते.—

'A stitch in time saves nine-' जीवनातल्या कोणत्याही क्षणी फाटू लागले तर ते लगेच टाका घालीत असत. प्रवासी पिशवीत साबण, नीळ, टिनोपॉल सज्ज असत. अण्णा कोठेही असोत, आपले कपडे स्वतः धूत, झटकून वाळत घालीत व रात्री घड्या घालून उशाशी घेत. त्यामुळे प्रवासातदेखील त्यांचे कपडे स्वच्छ असत.

अण्णा धर्म आणि कर्मकांड यांच्याविरुद्ध होते. पण केवळ आईसाठी ते काही गोष्टी करीत. कीर्तन, प्रवचन, साधुसंतांचे दर्शन या गोष्टी त्यांना वर्ज्य होत्या. असे असून ते श्रद्धावान होते. त्यांच्या अंतःकरणात भक्ती होती. वृत्ती निरहंकारी होती. स्वकर्म कुसुमांची ते निष्काम पूजा करीत आणि राष्ट्रदेवतेला राष्ट्रदेवोभव म्हणून अर्पण करीत! यापेक्षा श्रेष्ठ कर्मयोग तो कोणता!

'हाती घ्यावे सत्कर्म। तडीस न्यावे हा धर्म॥' हाच त्यांचा धर्म, हीच त्यांची श्रद्धा आणि हीच त्यांची पूजा होती.

अण्णा रात्री ९ वाजता अंथरुणावर पडल्याबरोबर घोरावयास लागत. पहाटे तीन-साडेतीनला उठत. दररोज नियमाने पहाटेस चिंतन करीत, लेखन करीत. कविता करीत.

त्यांच्या जीवनाचा तो तेजस्वी पैलू आहे. त्यांच्या चिंतनात, लेखनात आणि काव्यात राष्ट्रीय भावना प्रकर्षाने दिसते.

'A busy man always finds time to do a thing in time' असे कोणीतरी म्हटले आहे त्याची आठवण या प्रसंगी होते. वाईट एवढेच वाटते की अण्णांनी त्यांच्या चिंतनातून निर्मिलेले प्रचंड साहित्य आज उपलब्ध नाही. कारण एकच त्यांनी व त्यांच्या कुटुंबियांनी प्रसिद्धीचा हव्यास कधी धरला नाही.

## अण्णासाहेब तुम्ही का रुसलात ?

**श्री. नारायण यशवंत भोईर,** वाडा

दलितसेवक : १ नो. १९६८

अचानक दि. २० सप्टेंबरला पत्र मिळाले की, अण्णा वाडे तालुक्यात दलित सेवकाचे आणि संघाचे वर्गणीदार करण्यासाठी येणार. त्यांचे आम्हा तरुण हरिजन कार्यकर्त्यांवर १० वर्षांपासूनचे मार्गदर्शनाचे उपकार कोण विसरेल ? सारी कामे बाजूस सारून त्यांची वाट पाहात थांबलो. नियमितपणाची कमाल. दोन्ही खांद्यांवर व हातांतही पिशवी. पुढे होऊन सामान घ्यावे तर तेही न देता, घाम पुशीत त्यांनी मुलाबाळांची चौकशी केली. पुढे १५–२० वर्गणीदार केले. विश्रांतीच्या वेळेत सहज म्हटले,

"अण्णा ह्या वयात किती झिजणार ?"

"तुम्हा तरुणांची झीज कमी पडते म्हणून." चटकन उत्तर आले. मान लाजेने खाली गेली.

आम्ही पंचायत समितीमार्फत शारदोत्सवाचे कार्यक्रम ठेवले होते. ही संधी कोण दवडणार ? २४ सप्टेंबरला त्यांचे अस्पृश्यता निवारणावर व्याख्यान ठेवले. सर्व थरांतील ३०० च्या वर मंडळी हजर होती.

आजकाल अस्पृश्यता–निवारण म्हणजे सत्तेच्या विकेंद्रीकरणातील अडगळ !

"अस्पृश्यता हा हिंदू धर्मावरील नुसताच कलंक नसून यामुळे हिंदू धर्मच धोक्यात येईल." असे कर्मयोग्याप्रमाणे त्यांचे जळजळीत उद्गार प्रेक्षकांचे काळीज चिरून जात होते. त्यांच्या रोमरोमांमध्ये अस्पृश्यतेविषयी चीड दिसून यायची.

अण्णासाहेब म्हणजे अस्पृश्यता–निवारणाचा कणा ! परंतु दुर्दैवाने हरिजनांच्या दृष्टीने हा कणाच मोडला !!

अण्णासाहेब आपणास प्रवासाची दगदग झाली का ? वेळी अवेळी जेवणाचा त्रास झाला का ? निद्रानाश झाला का ? अस्पृश्यता–निवारणावर अनेक बाजूंनी उलट-सुलट विचार करून वैचारिक थकवा आला का ? किंवा स्वराज्य मिळून २१ वर्षे होऊन गेली

तरी हरिजनांवरील अन्याय थांबले नाहीत, त्यांना माणुसकीचे जीवन मिळत नाही; त्यांना जिवंत जाळणे व हरिजन स्त्रियांची नग्नावस्थेतील मिरवणूक अशा असह्य घटनांमुळे आपणास पश्चात्ताप झाला ?

अण्णासाहेब, आपल्या मृत्यूमुळे आपल्या कुटुंबियांवर न सहन होणारा असा हा घाला पडला. पण त्याहीपेक्षा महाराष्ट्रातील साऱ्या हरिजन कुटुंबियांवर न सहन होणारा हा मोठा आघात आहे !

नाना तऱ्हेच्या स्मृती पुढे येतात. आपण वाड्याला असताना किती चर्चा केल्या ! किती मौलिक गोष्टी तुम्ही सांगितल्याने शेवटी आपणास मी म्हणालो, " अण्णा-साहेब, आता आपली भेट केव्हा ?" आपण म्हणालात, " ह्याच महिन्यात पुढच्या वर्षी वारी करीन. "

' वारी ' शब्दाने मनात वादळ उठते. वारकरी देवाच्या भेटीची तिथी चुकविणार नाही. तसेंच अण्णाही अस्पृश्यता-निवारण्यासाठी करावयाच्या प्रयत्नांची वारी कधी चुकविणार नाहीत. काय ते विचार! किती श्रमशक्ती! गांधी जन्मशताब्दी वर्षात ' दलित सेवक 'मध्ये अस्पृश्यता–निवारणावर जळजळीत प्रकाश टाकणारे लेख आता कोण लिहील ?

अण्णासाहेब, तुम्ही का रुसलात ? आम्हास स्वप्नातसुद्धा न पटणारी घटना घडली. अण्णासाहेब, तुमच्या तत्त्वनिष्ठ व सतत चंदनाप्रमाणे मानवतावादी ध्येयासाठी झिजणाऱ्या आत्म्यास माझे कोटी कोटी प्रणाम !!

## आमचे स्फूर्तिस्थान

**श्री. तात्या नवले**, अक्कलकोट

अण्णा आमचे स्फूर्तिस्थान होते. वाट चुकत असेल तेथे त्यांचे ते मातृहृदय वाटेला लावण्यास तळमळून उठायचे ! त्यांच्या संगतीत आम्ही ' हे भगवान ! ' असा उच्चार सहज केला तरी, अण्णा म्हणायचे, ' हा मी उभा आहे, काय हवं आहे सांगा.' मग आम्ही ओशाळत असू. पुढे ते म्हणत, ' स्वस्थ बसून देवाला हाक मारली तर, तो कधीही येणार नाही. '

' हाथोंसे करो काम और मुखसे कहो राम ' या अण्णांच्या उद्गारांची आठवण होऊन आम्ही नेहमी हाती टकळी नाहीतर चरखा-पेळू घेऊन बसायचे ! अस्पृश्यतेवर दलित सेवकमधून त्यांनी केलेले हल्ले कोण विसरेल ? त्यांची धारदार लेखणी व ती ओजपूर्ण भाषा हरपली.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
२८०२१ वि-क्र.
दा. क्र. २२५५३
ग्रंथ शाखा (स्थळ प्रत)

# अण्णांच्या सहचार्या–माझ्या गुरुवर्या

## पी. यु. पवार

दोंडाइचे, ३१–७–७७

भारताच्या पवित्र भूमीवर अजूनही सीता-सावित्रीचे आदर्श जगणाऱ्या महिला दिसतात, सेवा, त्याग, प्रेम, सहानुभूती, समाधान व औदार्य या गुणांनी त्या मंडित आहेत. सुदैवाने आपल्या समाजात बहुसंख्येने त्या आहेत असे स्वामी विवेकानंदांनी म्हटले आहे. मलाही एका सीतेचे दर्शन घडले. एका सेवाव्रतीचे ऋणनिर्देश करावे व सामाजिक कर्तव्य पार पाडावे अशी इच्छा.

तेरा वर्षांच्या जिजीने गृहस्थाश्रमात प्रवेश केला व मंदाकिनीचे रूप धारण करून आदर्श पत्नी, माता, शिक्षिका म्हणून ख्याती मिळविली. काकी आईच्या आग्रहाखातर ब्रह्मचर्याचा त्याग करून लग्न करणाऱ्या दृढनिश्चयी, संयमी देशभक्त त्यांचा जीवनसाथी झाला. माहेरचा सनातनी कर्मठपणा टाकून गांधीवादी घराण्यात त्या एकरूप झाल्या.

"अबला जीवन हाय तुम्हारी यही कहानी, आँचलमें दूध आँखोंमें पानी" म्हणणाऱ्या मैथिलीशरण गुप्तजींना जणू त्यांचे जीवन आव्हान ठरले असते; अशा खडतर प्रसंगांतून त्या गेल्या असल्या तरी भोवतालच्या संबंधितांबद्दल–विद्यार्थ्यांबद्दल त्यांच्या मनात एक करुणा सतत वास्तव्य करीत असे.

स्व. अण्णांच्या प्रत्येक कार्याचा प्रारंभ घरापासून दिसतो. ते नेहमी म्हणत 'Charity begins at home.' त्यांच्या तत्त्वाप्रमाणे 'आधी केले मग सांगितले' ह्या न्यायाने कुटुंबावर संस्कार केले, मग समाजात. स्त्री शिक्षणाचे ते समर्थक म्हणून ६ वी पास पत्नीस कमलाबाई गर्ल्स हायस्कूल, धुळे येथे दाखल केले. त्यानंतर महिलाश्रम हिंगणे येथे पाठवून मॅट्रिक ट्रेन्ड केले. अण्णा म्हणत, "पत्नीला स्वावलंबी केले म्हणजे आपण निश्चित मनाने देशसेवेला मोकळे." पत्नीने साथ दिली. हिंदी शाळेत नोकरी स्वीकारली. अण्णा महाराष्ट्र राष्ट्र भाषा सभा, पुणेचे पश्चिम खानदेशचे अध्यक्ष–मग सहचारिणी राष्ट्र भाषा क्षेत्रात मागे कशा राहतील ? त्यांनी कोविद, पंडित, पारंगत (आग्रा) ह्या परीक्षा उत्तीर्ण केल्या. पुढे स्वो. वि. संस्थेत नोकरी स्वीकारली. आर. डी. एम् पी. हायस्कूलमध्ये असताना बी. ए., बी. एड्., एम्. ए. झाल्या व ख्यातनाम अध्यापिका म्हणून अध्यापन केले. उच्च शिक्षणानंतरही ज्ञानाची प्रौढी त्यांनी मिरविली नाही. "साधी राहाणी व उच्च विचारसरणी" ह्या पद्धतीने जीवन व्यतीत करीत आहेत.

अण्णांनी खादीचा स्वीकार केला होता. बाईंनीही खादी स्वीकारली. सौभाग्य हाच त्यांचा एक अलंकार होता. माहेरचे मिळालेले सोने अण्णांनी स्वदेशी उद्योग–खडू तयार करणे, गोळ्या करणे, इ० साठी भांडवल म्हणून खर्च केले. पतिइच्छेसाठी त्यांनी काऽकू

केले नाही. अण्णा हरिजन भक्त, बाईंनीही कधी कोणाला जात विचारली नाही. हरिजनांना स्वयंपाकघरात वावरू देणारी दोंडाइच्यातील पहिली ब्राह्मण महिला असेल असे मला वाटते. सर्व मुले आपलीच ह्या भावनेने त्या वावरल्या. सुखदुःखाच्या वेळी रात्रीबेरात्री मुलांजवळ आल्या. मायेच्या ममतेने मुलांना गोंजारले. हितगोष्टी केल्या. बोर्डिंगच्या मुलांना मातृत्वाची उणीव भासू दिली नाही. गरीब मुलांना काम देऊन पैसे दिले. सत्याग्रह्यांचे ते कुटुंब! काम देऊन पैसे द्यावे. स्वावलंबनाचा बाणा रुजवावा हा हेतू.

अण्णा सत्याग्रही. सत्याग्रही कौटुंबिक माया तोडतो. त्याप्रमाणे अण्णांचे सेवेसाठी सतत भ्रमण चालू असे. जेल, सत्याग्रह, हरिजनसेवा, दारूबंदी, साक्षरता प्रसार इ० निमित्ताने ते बाहेर राहावयाचे म्हणून बाईंचे जीवन वैवाहिक ब्रह्मचर्याने भरलेले होते. अल्पवयातच प्रौढत्व धारण केले होते. संसाराचा भार शिरावर होता. अण्णांना कौटुंबिक कार्यातून मोकळे ठेवण्याचे कार्य बाईंनी केले. म्हणूनच अण्णा निश्चित देशकार्य करीत राहिले. अण्णांबरोबर त्यांनी कधी स्वतःला मिरविले नाही. सभा-संमेलनाला गेल्या नाहीत. प्रत्येकाचा कार्यप्रवाह वाहत राहिला. कोणी कोणाच्या कार्यात लुडबूड केली नाही.

अण्णांची इच्छा होती—मुलाला डॉक्टर बनवीन. पण अण्णा सत्याग्रही. गांधीजींच्या मते सत्य व संपत्ती यांचा बेबनाव असतो. तात्पर्य, अण्णा सधन नव्हते. पण कर्तृत्ववान मुलाने पारितोषिकांतून ४२०० रुपये मिळविले व आई-वडिलांनी २००० रुपये खर्च केला. मुलगाही अण्णांसारखा मितव्ययी. त्याचा जमाखर्च अण्णा विद्यार्थ्यांपुढे ठेवीत.त्याला पुढीलप्रमाणे ४½ वर्षांत खर्च आला. हिशेब एवढ्याचकरिता की, मध्यम परिस्थितीतील मुलाला वैद्यकीय महागडे शिक्षण घेता येईल.

| | फी रुपये | बुक रुपये | अन्न रुपये | इतर रुपये | एकूण रुपये |
|---|---|---|---|---|---|
| I | ९१२ | १५० | ५२८ | ३५० | १९४० |
| II | ८३० | १७० | ७०६ | ७०७ | २४१३ |
| III | ८४५ | १०० | ५७५ | ३२० | १८४० |
| एकूण | २५८७ | ४२० | १८०९ | १३७७ | ६१९३ |

मुलगा एम्. एस. झाला अण्णांचे स्वप्न साकार झाले. स्वप्न साकारण्यात अण्णांबरोबर आईचे स्थानही मोठे होते.

३ ऑक्टोबर १९६८ चा दिवस. अण्णांचे कार्य संपले होते. त्यांची प्राणज्योत विझली. बाईंना पाठविलेल्या शोकसंदेशात गंगूताई वैद्य यांनी म्हटले, " मंदाकिनीचा प्रवाह जनतारूपी सागर पुत्रांच्या सेवेकरिता वळविणारा भगीरथ गेला. रुग्ण महाराष्ट्रातील दरिद्री नारायणाच्या सेवेसाठी आदर्श स्त्री-पुरुष रोग चिकित्सक धन्वंतरी देणारा आदर्श पिता गेला. महात्म्यांच्या पावलावर पाऊल ठेवून शांतिसंग्रामात उडी घेणारा सत्याग्रही वीर गेला. स्वाभिमानाचा आणि स्वोद्धाराचा मार्ग विद्यार्थ्यांना दाखविणारा आदर्श गुरू गेला. हरिजन कार्याला आजन्म वाहून घेणारा त्यागी हरिजन गेला. रवी-ज्योत्स्नेचे

ज्ञानकिरण त्या पक्षाला अडवू शकले नाहीत. मंदाकिनीचा भाग्यप्रवाह त्याला रोखू शकला नाही. एवढ्या मोठ्या बलशाली देहातून तो कर्तव्यकर्माच्या आनंदाचीच भरारी घेत उडून गेला. निरागस बालिकेच्या रूपात त्यांनी परमेश्वरी शक्तीचे शेवटचे दर्शन घेतले. ते धन्य होत. मोठ्या देहातला त्यांचा आत्मा महान होता. ”

अण्णा अनंतात विलीन झाले. ते अमर झाले. कर्मपूजक भारतभूमी त्यांना विसरणार नाही. त्यांच्या जीवनाच्या यशस्वितेत ज्यांनी साहाय्य केले त्यांचे ऋणनिर्देश करणे एवढेच माझे कर्तव्य मी समजतो.

## तेथे कर माझे जुळती

**लतिका वसंत मोहनी**, नाशिक

अण्णांचा मृत्यू म्हणजे माझ्या आत्याच्या भावनाप्रधान मनास न पेलवणारा असा वज्राघात आहे. कार्यानिमित्त अण्णांचे सतत भ्रमण, आत्याचे व रवींद्राचे शिक्षण यांमुळे आतापर्यंत या पति-पत्नी-पुत्राचे जीवनप्रवाह वेगवेगळे होते. आता कोठे त्यांचा संगम होत होता. तोच हा आघात.

कोणी अडचणीत असो, संकटात असो, अण्णा त्यांच्या पाठीशी राहात; आधार देत. स्वतःचे काम स्वतः करायचे, प्रत्येक काम आलेच पाहिजे, कोणत्याही कामाची लाज धरावयाची नाही. स्वावलंबी जीवन जगले पाहिजे. ही त्यांची शिकवण म्हणजे समाधानी जीवनाची यशस्वी गुरुकिल्लीच होय. खरोखर अकल्पित घडलेल्या घटनेने मनःस्थिती असह्य झाल्याने जास्त लिहवत नाही. त्यांच्या जीवनावर लेखन करावयाचे ठरले तर एक ग्रंथच होईल. अशा अण्णांच्या मूर्तीपुढे माझे कर जुळतात.

त्यांनी दिलेल्या शिकवणीची शिदोरी आम्हास नक्कीच आयुष्यभर पुरेल.

## असे होते आमचे अण्णा

**सौ. वैजयंती बा. दशपुत्रे**, पुणे

३ ऑक्टोबर, रात्री १०॥ वाजता फोनची घंटा वाजली व ती. स्व. अण्णा गेल्याची दुःखद बातमी कळली. रात्रभर अण्णांच्या आठवणींनी मन उद्विग्न होत होते.

ते संपूर्ण प्रयत्नवादी होते. इंद्रियांवर त्यांचा ताबा होता. त्यांची झोप हुकमी होती. ते म्हणत, ‘ देव दगडाच्या मूर्तीत नाही, चराचरात भरलेला आहे. हा लहान, तो मोठा असा भेदभाव न करता सर्वांवर सारखं प्रेम करून, निःस्वार्थीपणे सेवा केली म्हणजे तुम्ही परमेश्वराचे लाडके व्हाल.’ त्यांना जातिभेद आवडत नव्हता. ते म्हणत,

'जातिभेद मानवनिर्मित आहेत.' एखादा ब्राह्मण नीच कर्म करीत असला तर, ते त्यास ब्राह्मण म्हणत नसत; याउलट एखादा हरिजन चांगले कृत्य करू लागला तर ते त्यास ब्राह्मण समजत.

कै. अण्णा हे माझे मेहुणे, माझ्या थोरल्या बहिणीचे यजमान. त्यांचे लग्न झाले तेव्हा मी सहा वर्षांची असेन. माझ्या बहिणीला आम्ही भावंडे जिजी म्हणतो. जिजी मला आईपेक्षाही प्रिय. अण्णा एकदा जिजीस घ्यावयास आले तेव्हा मी त्यांच्याशी न बोलता मागीलदारी रडत बसले. तेव्हा जिजीने मला त्यांच्याजवळ नेले, "तुम्ही मला नेणार म्हणून वैजूला राग आला आहे." "त्यात काय रडायचे ? तिला जेव्हा तुझी खूप आठवण येईल, तेव्हा तू तिला येऊन भेटत जा." अण्णा म्हणाले. त्यांनी दिलेला शब्द शेवटपर्यंत पाळला. वर्षातून दोनदा तरी ते आमच्या भेटी घडवीत.

पुढे मी मोठी झाल्यावर अण्णांच्या घरी सुट्टीत जाऊ लागले. त्यांच्याविषयी असलेला माझ्या मनातील राग पळाला होता. एखादी गोष्ट येत नाही, किंवा जमत नाही, असे मी म्हटले की, त्यांना राग यायचा. 'येत का नाही ? करून बघ. केल्याने होत आहे रे, आधी केलेच पाहिजे. एकदा चुकशील, दोनदा चुकशील, चुकत चुकत ती गोष्ट तू आत्मसात करशील. मला येत नाही असे म्हणत राहिलीस तर ती गोष्ट तुला जन्मात येणार नाही.' असे म्हणून मला न येणारी ती गोष्ट ते माझ्याकडून करवून घेत व माझ्यात आत्मविश्वास निर्माण करीत, त्यामुळे मी त्यांच्याकडून अनेक गोष्टी शिकले.

मी लहानपणी खूप भित्री होते. एका सुट्टीत मी दोंडाइच्यास गेले. तेथे नदीचे पाणी भरावे लागे. एका रात्री माझ्या हातून तांब्या माठात पडला व माठ फुटला, त्यामुळे घरात पाणी पिण्यास राहिले नाही. त्या वेळी दोंडाइच्यात वीज नव्हती. सगळीकडे अंधार पसरलेला. अण्णा म्हणाले, "वैजूच्या हातून माठ फुटला, तिने कळशीभर पाणी नदीवर जाऊन आणावे. आम्ही कोणी जाणार नाही व मी कोणासही जाऊ देणार नाही." त्या वेळेला मी १३ वर्षांची असेन. आसपासच्या महिलांच्या तोंडून, 'नदीत आसरा असतात, अवेळी जाणाऱ्या बाईला त्या लागतात व बाईचा नाश होतो.' असे ऐकलेले असल्यामुळे मी रडू लागले.

अण्णांनी व्याख्यान द्यावयास सुरवात केली. 'आम्ही हालअपेष्टा सहन करून स्वराज्य मिळवून आणू. त्याचे रक्षण ह्या भित्र्या मुली कसे करणार ? म्हणे अंधाराची भीती वाटते. वेळ पडली तर अंधारात जंगलात जाऊन शत्रूला तोंड द्यावे लागेल. ते काही नाही तिनेच आज नदीवरून पाणी आणले पाहिजे.' त्यांचे व्याख्यान संपेपर्यंत रात्रीचे अकरा वाजले. शेवटी छाती धडधड करीत असताना राम राम म्हणत मी नदीवर गेले व कसेतरी एकदाचे एक कळशीभर पाणी आणले. पण माझा भित्रेपणा बराच कमी झाला व भूत-पिशाच्च-आसरा या गोष्टी भ्रामक आहेत हे अण्णांचे म्हणणे पटले.

ते जिजीला म्हणत, 'तुझे तुकाराममहाराजांच्या जिजाऊसारखे संसारात लक्ष. तू संसार कर व मी तुकाराममहाराजांसारखा तुझ्यासमोरून निघून जाईन !' आणि त्यांच्या

म्हणण्याप्रमाणे झाले. मुलगा, सून, नात, पत्नी यांच्याशी बोलत असताना एक्स-रे मशीनच्या दुरुस्तीकरिता मुलाला पत्राचा आशय ' फॉल्ट इन् दी मशीन ', सांगत असताच त्यांचे शारीरिक मशीन बिघडले व ते त्यांच्यातून निघून गेले ! !

अण्णांचा एकुलता एक मुलगा रवींद्र मोठा गुणवान, बुद्धिमान त्याचप्रमाणे कर्तृत्ववान आहे. तो एक कुशल, प्रयत्नवादी व यशस्वी सर्जन आहे. त्यांचप्रमाणे त्यांची सूनही डॉक्टर आहे. यमाला ह्या सर्व गोष्टीची जाणीव असावी. यमाला वाटले असेल की त्यांच्या मुलाला थोडा जरी अवधी दिला तरी आपल्याला रिकाम्या हाताने परत फिरावे लागेल ! आणि म्हणूनच मांजराच्या पावलाने येऊन मोरपिसाच्या हाताने त्याने अण्णांचे चैतन्य हरण केले. अण्णांना कसलाच त्रास झाला नाही. काळाच्या बाबतही अण्णा अजातशत्रू राहिले.

' दिव्यत्वाची जेथे प्रचीती,<br>
तेथे कर माझे जुळती. '

असे थोर मनाचे अण्णा आमचे स्फूर्ति-स्थान होते. त्यांची मूर्ती दिसत नाही पण अनेक स्मृती मात्र तेवत आहेत.

## असे होते अण्णाभावोजी

**यशोदाबाई ज. टोणगावकर,** डोंबिवली

माझे लग्न झाले तेव्हा आमचे बिऱ्हाड धुळ्यासच होते. नोकरीच्या निमित्ताने मुंबईस जावे लागले. सुरवातीला पाच-सात वर्षे मला मुंबईचे हवामान मानवेना. दरवर्षी आजार. दोन-चार महिने अंथरुणावर काढावे लागत, परंतु पत्र पाठवताच पैशासह अण्णाभावोजी हजर. भाऊ, पैशाची काळजी करू नको. अगोदर वहिनींना बरे कर. एकदा पोटाच्या विकाराने आजारी होऊन दोंडाइचे येथे मी गेले असता वैद्यांनी नुसते ताकावर दोन महिने राहायचा सल्ला दिला. नुसते ताकावर कसे राहवणार ? लगेच माझ्याबरोबर दोन महिने ताकावर राहण्याची त्यांनी स्वतः तयारी केली व माझी समजूत घातली. तो त्यांचा निश्चय आजही मला गहिवरून टाकतो.

देवावर त्यांचा विश्वास नव्हता. ते म्हणत, मानवाची पूजा करा, ताबडतोब मुक्ती मिळेल. परंतु इतके असून आईची इच्छा पूर्ण करण्याकरिता त्यांनी आईला काशीयात्रा घडविली. रस्त्यात जवळचे सगळे पैसे चोरीस गेले तरी न डगमगता, न रागावता तीर्थयात्रा पूर्ण केली.

श्राद्धपक्षावर त्यांचा भरवसा नव्हता. ते म्हणत माणूस जिवंत असेपर्यंत त्याचा आत्मा संतुष्ट ठेवा; यथायोग्य सत्कार करा. ह्यांना ते म्हणत, भाऊ तू राम आहेस, कोणतीही आज्ञा कर, हा मारुती तुझ्यापुढे हात जोडून उभा आहे. त्यांना स्वतःची मुलगी नव्हती परंतु सगळ्या पुतण्यांना, त्यांच्या मित्रांच्या मुलींना ते स्वतःच्या मुलीप्रमाणेच मानत.

आम्ही चेंबूरला असताना ते प्रवासातून येताना दिसले, मी लगेच माझ्या मुलाला ( सुरेशला ) काकांचा प्रवासी फोटो काढण्यास लावले. आज तो पाहिला की असे वाटते अजून ते प्रवासातच आहेत.

दसऱ्याच्या दिवशी ते आमच्याकडे होते; आम्हा सर्वांना त्यांनी दिपवाळींसाठी बोलाविले होते. दोनच दिवसांनी निधनाची वार्ता आलेली तार वेड्यासारखी अनेक वेळा वाचत होते व डोळे पुसत होते.

## प्रेमळ अण्णासाहेब

### सौ. इंदिरा अनंत ठोमरे

माझे आतेबंधू हरिभाऊ उपासनी यांच्याबरोबर अण्णासाहेब शिंदखेडे येथे आमच्याकडे येत. त्या वेळी माझे वडील शिंदखेडे येथे लोकल बोर्डात सब्-ओव्हरसीअर म्हणून नोकरीस होते. अण्णा स्वो. वि. संस्थेकरिता मदत गोळा करण्यास येत. माझे वडील त्यांना खूप मदत मिळवून देत. अण्णा माझ्या वडिलांना हरिभाऊंप्रमाणे मामाच म्हणत. दोन दिवस ते आमच्याकडे असत. पण त्यांच्या दिनचर्येत तेव्हापासून मी केव्हाही पाहिले तरी खंड पडलेला आढळला नाही.

पुढे योगायोगाने माझा विवाह त्यांचे स्नेही अनंतराव यांच्याशी झाला. सन १९४५ पासून आम्ही दोंडाइच्यास आलो. सन १९४८ ला आम्ही स्वो. वि. संस्थेच्या आवारात अण्णांच्या शेजारीच घर बांधून घेतले. जागा नाल्याकाठी उंचसखल. इतर समाजाची समोरच्या काठावर स्मशानभूमी. प्रेत पुरताना आम्हाला ओस्र्यावरून दिसे. मी अत्यंत भित्री. मला काही दिसते असे वाटले तर अण्णा मला व रमाबाईंना तेथे घेऊन जात. हळूहळू भीती कमी झाली.

एकदा स्मशानभूमीत रात्री मोठा जाळ दिसला. अण्णांनी मुलांना व आम्हाला बोलाविले. ‘ हा स्मशानभूमीतील आग्यावेताळ. प्रेत पुरल्यावर काही दिवसांनी हाडातून फॉस्फरस मोकळा होतो. तो वायू असल्यामुळे जेथून वाट मिळेल तेथून बाहेर पडतो. ऑक्सिजनशी संयोग झाल्यावर तो पेट घेतो. ’ अण्णांनी शास्त्रशुद्ध माहिती आम्हाला दिली व आग्यावेताळाची कल्पना दूर केली.

अण्णा जेथे जात तेथे नंदनवन तयार करीत. रोज सकाळी उठून कुदळ-फावडे घेऊन उंचवटे खोदून खळगीत माती टाकीत. काही दिवसांतच आमचे अंगण प्रशस्त व सपाट झाले. आवारात फार मोठे नाग पाच-सहा फूट लांब निघत. अण्णांना आम्ही त्या वेळी बोलावीत असू. अण्णांशिवाय कोणी मारण्यास धजत नसे. हळूहळू नागांची संख्या कमी झाली.

अण्णांनी आम्हाला अडी-अडचणीच्या वेळी सांभाळून घेतले. माझे पती बी. ए.करिता दोन वर्षे अमळनेरला गेले, त्या वेळी मी दोन मुले घेऊन दोंडाइच्यास राहिले. अण्णांचा फार मोठा आधार मला होता.

अण्णांचा स्वभाव खूपच प्रेमळ होता. त्यांना सर्वच घरच्यासारखे वाटत. त्यांनी जातिभेद पाळला नाही. बँडमास्तर कांबळे हे हरिजन होते, पण आमच्या दोन्ही घरांत घरच्यासारखे वागत. अण्णांनी दोंडाइच्याचे मुरलीधर मंदिर हरिजनांकरिता सत्याग्रह करून खुले केले. त्यामुळे सवर्णांचा फार मोठा रोष ओढवून घेतला. हळूहळू विरोध नाहीसा झाला.

## आदर्श स्नेही

### अनंत शंकर ठोमरे

माझ्या आयुष्यातील सुमारे ४५ वर्षांचा प्रदीर्घ काळ अण्णासाहेब यांच्या निकट सहवासातच गेला. त्यामुळे आम्हा उभयतांच्या कुटुंबांतील परिचयही खूपच जिव्हाळ्याचा होता किंबहुना टोणगावकर व ठोमरे ही दोन्ही कुटुंबे आप्तस्वकीयांपैकीच मानली जाऊ लागली.

१९२३ साली मी धुळे येथील स्वोद्धारक विद्यार्थी गृहात इंग्रजी शिक्षणासाठी दाखल झालो. त्या वेळी सुमारे २५ विद्यार्थी तेथे होते. मी ११ वर्षांचा असेन. प्रकृतीने अशक्त, प्रथमच घर सोडलेला, पण माझ्यापेक्षा दोन-तीन वर्षे वयाने मोठे असलेल्या अण्णासाहेब, नवलभाऊ, काशीनाथ पाठक यांनी मला धाकट्या भावाप्रमाणे वागविले. अण्णांचा माझ्यावर विशेष लोभ; त्यामुळे याच वेळी माझे वडील बंधूही संस्थेत असतानासुद्धा माझा ओढा अण्णासाहेबांकडेच अधिक होता.

एकदा एका सुट्टीत मी, अण्णासाहेब व नवलभाऊ जळगाव जिल्ह्यातील पद्मालय पाहण्यासाठी धुळ्याहून पायीच निघालो. रात्र झाली, अंधार पडला. मी अगदी थकून गेलो. जवळपास मुक्काम करण्यासाठी गावही दिसेना. नवल पाटील गाव येईपर्यंत थांबावयास तयार नव्हते. पण अण्णासाहेबांनी माझ्यासाठी सडकेच्या बाजूलाच मुक्काम करावयास भाग पाडले.

' चला येथेच आपला पडाव टाकू या. भटक्या जमातीतील लोक नाही का कुठंही पडाव टाकत! सैनिकांनाही जिथं मिळेल तिथं विश्रांती घ्यावी लागते.' अण्णा म्हणाले.

१९३० साली मॅट्रिकच्या परीक्षेच्या वेळी मी आजारातून नुकताच बरा झालो होतो. परीक्षेला जावे कसे या विवंचनेत मी होतो. कारण परीक्षा केंद्र पुणे हेच होते. अण्णासाहेबांनी मला सांभाळून पुण्यास नेले व परीक्षा आटोपल्यावर परत धुळ्यास पोहोचविले. तदनंतरच ते स्वातंत्र्य चळवळीत सामील झाले.

सेवाभाव, जातिनिरपेक्षता व देशसेवा इत्यादींचे धडे अण्णासाहेबांकडून मला मिळाले. इंदूर येथे कॉलेज शिक्षण चालू असतानाच मी हरिजनांसाठी रात्रीची शाळा चालविली व हरिजनांसमवेत कॉलेजात सहभोजन घडवून आणले ते अण्णासाहेबांच्या प्रेरणेनेच.

माझा स्वभाव हळवा. कोठल्याही अडचणीची मला खूपच काळजी वाटे. अशा वेळी अण्णासाहेब म्हणत, 'मी पर्वतासारखा भाऊ पाठीशी असताना तुला काळजी कशाला?' पण पर्वतासारखे अण्णासाहेब निघून गेले व मी मात्र काळजी करायला शिल्लक राहिलो.

एकदा आम्ही दोघे फिरावयास गेलो असता गावात खूप आरडाओरडा ऐकू आला. आम्ही बघितले तर एका साधूस लोक खूप पिटत होते. का तर म्हणे मुले पळविणारांपैकी तो एक आहे. अण्णासाहेबांचे मन कळवळले. स्वतःच्या प्राणाची पर्वा न करता लोकांचे घाव स्वतःवर सोशीत आम्ही त्या साधूस पोलीस चौकीपर्यंत सुखरूप पोहोचविले.

मी एकटा असतो तर भानगडीतच पडलो नसतो. पण अण्णासाहेबांचा दुसऱ्यांवरचा अन्याय दूर करण्याचा स्थायीभाव होता. अशा कामी श्री. नानाजी तुकाराम शिंपी यांची त्यांना पूर्ण साथ असे. पण त्यांच्या स्वतःवर अन्याय झाला तर मात्र ते प्रतिकार न करता शांतपणे सोसत. ते म्हणत, 'परमेश्वराघरी न्याय मिळेल. तेथे देर असेल पण अंधेर खास नाही.' त्यांच्या या स्वभावाचा लाभ गावातील तथाकथित पुढाऱ्यांनी घेतला. पण आज अण्णासाहेब यांचेच बोल खरे झाले व त्यांच्या आत्म्याला खचित न्याय मिळालेला आहे.

## मेरा वतन भलाई

### श्री. मोहनीराज देशमुख, पुणे

माझे परमस्नेही कै. श्री. अण्णासाहेब टोणगावकर यांच्या मृत्यूला ३ ऑक्टोबर १९७८ ला दहा वर्षे होतील. या जगात माणसाला जे आयुष्य लाभलेले असते त्यात

अज्ञानपणाचा व निष्क्रियतेचा काळ सोडला तर जाणिवेचे असे आयुष्य फारच थोडे शिल्लक राहते. म्हणून माणसाने आयुष्यात सन्मित्र जोडावे व चांगल्या गुणांचा स्वीकार करून अशा मित्रांशी मैत्री वाढवावी.

## सर्वांत मोठी देणगी

जगात मित्रत्वाची देणगी ही फार अनमोल आहे. शुद्ध निःस्वार्थ प्रेमामुळे मनुष्य-जीवनात जितका आनंद लाभतो तितका आनंद हजारो रुपये मिळाले तरी लाभत नाही. असा आनंद ज्यांच्या सहवासात लाभला त्या माझ्या परमस्नेही श्री. रं. रा. टोणगावकर ऊर्फ अण्णासाहेब टोणगावकर यांच्या सहवासातल्या अविस्मरणीय आणि सुखद आठवणी आठवल्या की मनाला आगळेपणाचे दिव्य दर्शन घडते.

स्वातंत्र्यपूर्व काळातले महात्मा गांधींच्या प्रेरणेने जे अहिंसक युद्ध भारतात लढले गेले त्या लढ्यात स्वयंसेवक म्हणून स्वयंस्फूर्तीने, ध्येयवादाने, निष्ठेने उडी घेऊन जीवन समर्पित करण्याचे ठरवून भाग घेतलेले असे आम्ही दोघे कार्यकर्ते, योगायोगाने एकत्र आलो.

मी नगर जिल्ह्यातला, तर अण्णासाहेब टोणगावकर धुळे जिल्ह्यातले, स्वोद्धारक विद्यार्थी गृहातले आदर्श, स्वावलंबी, ध्येयवादाने झपाटलेले असे कर्मयोगी कार्यकर्ते.

## प्रथम परिचय

माझे सत्याग्रही कार्यकर्ते मित्र श्री. हरिभाऊ उपासनी यांनी धुळे येथील स्वोद्धारक विद्यार्थी गृहात सन १९३५ ला माझा अण्णासाहेबांशी परिचय करून दिला. पण तो मामुली होता.

सन १९३७ ला मी शहादे येथे वास्तव्याला असताना अण्णासाहेबांशी कॉंग्रेसच्या कार्यानिमित्त हा परिचय दृढ होत गेला. १९४०-४१ साली धुळे जिल्हा कॉंग्रेस कमिटीचे जिल्हा सेक्रेटरी म्हणून त्यांच्याबरोबर काम करण्याची संधी मिळाली. सन १९४१ ला महात्मा गांधींच्या आदेशानुसार मी वैयक्तिक सत्याग्रहात भाग घेतला, त्या वेळी मला १२ महिन्यांची सक्त मजुरीची शिक्षा झाली. त्या वेळी धुळे येथील सेंट्रल जेलमध्ये परमपूज्य साने गुरुजी, श्री. मधू लिमये, क्रांतिवीर उत्तमराव पाटील यांचा सहवास मला मिळाला.

"छोडो भारत, चले जाव, करेंगे या मरेंगे" या अभूतपूर्व लढ्याचे ८ व ९ ऑगस्ट या दोन दिनी आंदोलनाचे दिव्यदर्शन आम्ही दोघांनी घेतले. ९ ऑगस्ट १९४२ ला पहाटे ४ वाजल्यापासून आम्ही दोघेजण झेंडावंदनाकरिता म्हणून गवालिया टॅंकवर गेलो. पोलिसांचा अश्रुधूर, लाठीमार, छडीमार याला आम्ही तोंड देत गर्दी-बरोबर जात असता अण्णासाहेबांचे मुंबईचे एक मित्र श्री. राजाध्यक्ष यांनी त्यांचा हात पकडून ओढून घरात नेले म्हणून पुढचा अनर्थ टळला. आम्ही घरात शिरत असतानाच

पोलिसांच्या बेसुमार गोळीबाराला सुरवात झाली. तेथून दुपारी निरनिराळ्या मार्गाने आम्ही धुळ्यास परतलो, परंतु मला अटक होऊन माझी रवानगी नाशिक सेंट्रल जेलमध्ये झाली. अण्णासाहेब मात्र भूमिगत झाले. श्री. बाळूभाई मेहेता व कै. श्री. नानासाहेब ठकार यांच्या नेतृत्वाखाली श्री. विष्णुभाऊ पाटील व अण्णासाहेब टोणगावकर यांनी धुळे जिल्ह्यात आंदोलन चालू ठेवण्याचे फार मोठे कार्य केले. पुढे ते सहा महिने शिंदखेडे व धुळे येथे लॉकअपमध्ये होते.

१९४७ ला भारत संपूर्ण स्वतंत्र झाला. थोडीशी उसंत मिळाली. पुढे महाराष्ट्र हरिजन सेवक संघाच्या कार्याची, प्रांतिकचे एक प्रमुख अधिकारी म्हणून फार मोठी जबाबदारी, परमपूज्य कै. अप्पासाहेब उपाध्ये यांच्याबरोबर त्यांनी अंगावर घेतली. व ही जबाबदारी अत्यंत दक्षतेने प्रभावीपणे मृत्यूच्या क्षणापर्यंत उत्कृष्टरीत्या पार पाडली.

महाराष्ट्र हरिजन सेवक संघाच्या कार्याचा अलौकिक लौकिक वाढवून जी मान-मान्यता मिळाली त्याचे सर्व श्रेय श्री. अण्णासाहेब टोणगावकर यांनाच आहे. हे प्रांजळपणे या ठिकाणी स्पष्ट केले पाहिजे. १९५६ सालापासून मी महाराष्ट्र हरिजन सेवक संघाचा जिल्हाप्रचारक म्हणून काम पाहू लागलो. अप्पासाहेब उपाध्ये, श्री. अण्णासाहेब टोणगावकर यांच्या सहवासात पुढे माझे जे संबंध येत गेले ते आमच्या परस्परात अतिशय जिव्हाळ्याच्या स्वरूपात आत्मीयतेने वाढत गेले.

सन १९५८ मध्ये म. ह. सेवक संघाचे मान्यवर सेक्रेटरी व प्रभावी कार्यकर्ते म्हणून आम्ही म्हणजे, श्री. बाविस्कर, श्रीमती जानकीबाई आपटे व मी यांनी श्री. अण्णासाहेब टोणगावकर यांना विनंती केली की, हरिजन नवाहानिमित्त २४ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर या १० दिवसांत नगर तालुक्यात नेप्ती, खातगाव, टाकळी जामगाव, पारनेर, हंगे, सुपे, कामरगाव, चास, नगर अशा १० गावांतून ७ कार्य-कर्त्यांच्या पदयात्रेचे नेतृत्व श्री. टोणगावकर यांनी स्वीकारावे. त्याप्रमाणे श्री. अण्णा-साहेबांच्या कुशल योजकतेने हा विधायक कार्यक्रम अतिशय यशस्वीपणे पार पडला. महाराष्ट्रात या पदयात्रेचे कौतुक करण्यात आले.

नगर जिल्ह्यात प्रचारात, प्रवासात प्राणावरचे भयंकर संकट– आम्ही दोघे श्रीरामपूर तालुक्यात हरिगाव विभागात म. ह. से. संघाचे वार्षिक सभासद बनविण्या-करिता सायकलवरून प्रचारार्थ निघालो असता अपेक्षेपेक्षा जास्त वर्गणी मिळाली. श्री. शारंगधर पवार यांच्याकडे जेवण घेऊन आम्ही ट्रॉलीलाइनवरून जात असताना अण्णासाहेब पुढे व मी ५०–६० फूट मागे असे चाललो होतो. इतक्यात साखरेच्या पोत्यांनी भरलेली अशी एक ट्रक बाजूने भरधाव वेगाने निघून गेली. ‘म्हातारा मेला, म्हातारा मेला’ अशा परिसरातील लोकांच्या आरोळ्या निनादल्या. मी तर ते दृश्य पाहून मागचे मागेच कोसळलो. कसेबसे स्वतःला लोकांच्या साहाय्याने सांभाळून अण्णासाहेबांचे कोणते दृश्य नजरेस पडते म्हणून पुढे गेलो तर ते कमालीच्या शांततेने हातांत सायकल घेऊन हसत उभे होते. तेथे १५–२० मंडळी जमली, म्हणू लागली,

'एका केसाचाही फरक पडला असता तर श्री. अण्णासाहेब ट्रकखाली चिरडले गेले असते.' लोक अण्णासाहेबांकडे कौतुकाने पाहात होते. त्यांनी चौकशी केली आणि त्याच ठिकाणी आणखी दोघा लोकांनी आम्हाला वार्षिक वर्गणी दिली. ती तारीख होती ११ मार्च.

'मी असा अपघाती मरणार नाही, त्यातून माझा उद्या वाढदिवस आहे.' अण्णासाहेब शांत चित्ताने उत्तरले. माझा थरकाप थांबत नव्हता त्यामुळे त्यांच्या धीरोदात्त स्वभावाचे मला विशेष वाटले. कोठल्याही संकटात ते डगमगत नसत. त्यांना मरणाची भीती तर मुळीच वाटत नव्हती.

आम्ही सायंकाळी श्रीरामपूरला काँग्रेसचे प्रमुख पुढारी व माजी आमदार कै. रामभाऊ गिरमे यांच्या घरी गेलो. श्री. अण्णासाहेब व श्री. गिरमे मित्र होते. त्यांनी दोघांनी एकाच वेळी कारावास भोगला होता. मी त्यांना अण्णासाहेबांच्या जिवावर बेतलेल्या भयंकर प्रसंगाची हकीकत सांगितली. श्री. रामभाऊंनी अण्णासाहेबांचा १२ मार्चचा वाढदिवस–समारंभ, मित्राच्या पुनर्जन्मामुळे विशेषत्वाने साजरा केला.

"अनंत हस्ते कमलावराने देता, किती घेशील दो कराने, अशी माझी अवस्था झाली आहे" अण्णासाहेब गदगदून म्हणाले.

औरंगाबादला मराठी पत्रकार परिषद होती. म. ह. सेवक संघाचे प्रमुख पाक्षिक पत्राचे 'दलित सेवका'चे सर्व प्रसिद्धी कार्य श्री. अण्णासाहेब करीत असत. ही परिषद संपवून श्री. अण्णासाहेब नगरला माझ्याकडे आले. रात्री मुक्कामाला असताना त्यांचा पुत्र रवी याच्या लग्नाबद्दल आम्ही बोलत होतो. ते ज्या ज्या वेळी चिरंजीव रवीबद्दल बोलत, त्या त्या वेळी रवीच्या बुद्धिमत्तेबद्दल, लहानपणापासून अभ्यासू असण्याबद्दल, सतत येणाऱ्या पहिल्या नंबरबद्दल, साधी राहाणी व उच्च विचारसरणीबद्दल बोलत असताना त्यांच्या भावना उचंबळून येत असत. कधी कधी मला असे वाटत असे की पुत्रप्रेमामुळे आपल्या मुलाची अतिशयोक्तिपूर्ण स्तुती ते करीत आहेत. पण जेव्हा प्रत्यक्षात या निर्व्यसनी, निगर्वी व अतिशय सालस, साध्या राहाणीच्या त्यांच्या या चिरंजीवाला पाहिले तेव्हा माझा भ्रमनिरास झाला.

'रवीने सगळीच पारितोषिकं पटकावली आहेत. शस्त्रास्त्रनिपुण अर्जुनासारखा तो आता शस्त्रक्रियेत सव्यसाची झाला आहे. अर्जुनाच्या तोंडी जशी अहिंसेची भाषा शोभून दिसते, तसे त्याच्या तोंडी ग्रामीण भागातील हॉस्पिटलची भाषा शोभून दिसेल. नाहीतर अनेकांना वाटलं असतं की शहरातून प्रॅक्टिस चालणार नाही म्हणून हा पलायनवाद आहे. ग्रामीण भागाकडे वळणाऱ्या डॉ. मुलीशीच त्याचा विवाह होणं आवश्यक आहे. कारण सर्जरीला मदतीची आवश्यकता आहे. आम्ही हुंडा पद्धतीच्या अगदी विरुद्ध आहोत.' अण्णासाहेब म्हणाले.

तेव्हा अण्णासाहेबांच्या चिरंजीवाला योग्य अशी वधू शोधण्याचे काम सुरू झाले. अण्णांच्या कुटुंबाची आंतरजातीय विवाहाला मान्यता होती म्हणून काही मित्रांनी तसेही

प्रयत्न केले. मी मात्र विवाहाचा योग जुळविणारा ठरलो. श्री. गोविंदराव रानडे व सौ. शकुंतलाबाई रानडे यांची कन्या आशा हीही एम्. बी., बी. एस्. होती. महाराष्ट्र हरिजन सेवक संघाचे अध्यक्ष कै. अप्पासाहेब यांच्या नात्यातील होती. दोन्ही कुटुंबांचा संयोग हा एक सुयोग होईल असे सर्वांना वाटले; व हा विवाह साधेपणाने सुसंपन्न झाला.

आठवणी अनेक आहेत—परंतु ' मेरा वतन भलाई ' असेच ज्याचे ध्येय होते अशा माझ्या परमप्रिय मित्राच्या स्मृतीला हे एक पुष्प.

**मौ. गु. पठाण**
उप डाकपाल निवास, दोंडाइचा
दि. ५ ऑक्टोबर १९६८

बंधुतुल्य डॉ. रवींद्र टोणगावकर आणि आदरणीय ती. आईसाहेब—

यांना आदाब...आज पहाटेस साडेचारच्या सुमारास मला पडलेल्या स्वप्नात कै. श्री. अण्णासाहेब आणि मी एका हायस्कूलच्या वर्गावरून जात असता एका विद्यार्थ्याने त्यांना विचारले की, ' अण्णासाहेब, आज आपले भाषण होणार होते, मग आपण आम्हास असे एकाएकी का सोडून गेलात ? ' अण्णासाहेब तावडतोब उत्तरले, " हे बघ, माझा मुलगा कर्तृत्ववान निघाला आहे. त्याशिवाय मी जीवनातील सर्व मूल्ये त्यास समजावून सांगितली असून तो त्यानुसार वागत आहे आणि म्हणूनच मी जाण्यात घाई केली असे मला मुळीच वाटत नाही. "

यानंतर लगेच माझी झोपमोड झाली. हे सगळे सांगावयास स्वतः येणार होतो, परंतु माझे हृदय अतिशय संवेदनशील असल्यामुळे कदाचित ते जमले नसते म्हणूनच ह्या पत्राचा आधार घेत आहे.

कै. अण्णांचा चेहरा अगदी प्रसन्न असून तेजस्वी दिसत होता. पोशाख नेहमीचा होता. ते निःसंशय पुण्यवान खरे; त्याशिवाय एका फुलपाखराने फुलातून रस काढून घ्यावा इतक्या सहजतेने मृत्यू—यातना न भोगता—यावा, आत्मा अंतराळात विलीन व्हावा हे शक्य नाही. मी आपल्या नात्या–गोत्याचा, जात-पातीचा नसतानाही ते सर्व-प्रथम माझ्या स्वप्नात आल्यामुळे मी आपणास भाग्यवान समजतो.

अण्णांच्या आकस्मिक चिर प्रयाणाने आपली अपरिमित हानी झाली असून कृपा-छत्र नाहीसे झालेले आज जरी डोळ्यांना दिसत असले तरी त्यांचा **अमर आत्मा** आमच्यात सदैव राहील व त्यांच्याच कृपाप्रसादाने व आशीर्वादाने आपला जीवनपथ अधिकाधिक उज्ज्वल बनून उत्तरोत्तर आपली प्रगती होईल, असा मला दृढ विश्वास आहे.

आपणांवर आकस्मिकरीत्या कोसळलेल्या पर्वतप्राय दुःखात आम्ही सर्व सहभागी आहोत. दयाघन प्रभू आपणास आघात सहन करण्याची शक्ती व धैर्य देवो.

सर्व शक्तिमान ईश्वर मृतात्म्यास शांती देवो.

— आमीन —

# मी पाहिलेले अण्णा

श्रीमती लीलाबाई साळुंखे, दोंडाइचे

सन १९४५ ला आमच्या गुरुवर्या कै. गंगूताई वैद्य यांनी अण्णांचे गीत आमच्या कडून लेझीमवर बसविले. तालासुरात, ठेक्यात म्हटल्यामुळे ३२ वर्षानंतरही त्यातील काही ओळी आजही ओठावर येतातच.

**वीरा स्मरू, एकी करू, नीज भू मातेला।**
**गाऊ चला, सेवू चला, सोडुनी स्वार्थाला ऽऽऽ।**
**जन्मभूमि ही। कर्मभूमि ही। मायभूमि ही।**
**श्री शिवबाजी, तानाजीच्या स्मराच कार्याला ॥गाऊ॥**

अण्णांनी स्वार्थ सोडला, संसाराचा मोह सोडला आणि आपल्या काव्यातही भारतमातेच्या सेवेकरिता तळमळीने दुसऱ्यांनाही स्वार्थ सोडण्यास सांगितला. भूतकाळातील वीरश्रीचे स्मरण ठेवण्यास सांगितले.

अण्णा खरोखर आमचे नेता होते. माझ्या मते समाजाला जो चालना देतो तो नेता; भूतकाळाचे स्मरण ठेवून वर्तमान काळात देदीप्यमान कर्तृत्व करून त्यातून भविष्यकाळाचा इतिहास अमर बनवितो तो नेता; समाजाचे ऋण फेडतो तो नेता, दलितांचा, दीन-दुबळ्यांचा उद्धार करण्याचा प्रयत्न करतो तो नेता; स्वतः मेणबत्तीप्रमाणे सतत जळत राहून दुसऱ्याला प्रकाश देतो तो नेता; सन्मार्ग दाखवितो तो नेता.

आमच्या अण्णांनी वर दर्शविलेले नेतेपण केले. ते क्रियाशील बनले, पण शीलभ्रष्ट बनले नाहीत. नेता म्हणून कृतीला आघाडीला राहिले, कृती करून मान उंचावली, शान वाढविली, प्रतिष्ठा वाढविली पण प्रतिष्ठितपणाचा आव आणला नाही. समाजाला, दीन-दुबळ्यांना हात दिला पण हात मारला नाही, त्यांना हात दाखविला नाही. काळाचे आव्हान स्वीकारीत गेले पण काळाला शरण गेले नाहीत.

हरिजन सेवक संघाच्या कामाच्या निमित्ताने अण्णा नेहमीच घराबाहेर राहात. घरी आले तरी कार्याचा बोझा बरोबरच. शिस्त ही अखंडच, मग घरातल्या वातावरणातही ते कधीच विसरत नसत. नेहमी फिरस्ती असूनही घरी आल्यावर कधी थकलेले, आळसावलेले, कंटाळलेले वा उदास भासले नाहीत. नेहमी प्रसन्न, नेहमी हसतमुख, नेहमी येणाऱ्यांचे 'सुहास्य-स्वागतम्'. कोणाशी चर्चा चाले, कोणाला सल्ला दिला जाई पण वेळ न दवडता तोंडातल्या गप्पांबरोबर हातांतला चरखा नेहमी गतिमान राही. अण्णांना संसार शिरावर आहे याची जाणीवही आईंनी त्यांना कधी भासू दिली नाही. काळजी होती ती दीन-दुबळ्यांची, दलितांची, रंजल्या-गांजलेल्यांची, हरिजनांची, आम जनतेची. ह्या जनसागरात, ह्या लोकप्रवाहात ते स्वतःला झोकून देत. संसाररूपी

सागरात, मंदाकिनीच्या प्रवाहात, रविराजाच्या उदयात हा हिमालय निश्चल असे, निर्धास्त असे. वंशवेलीवर आशालताने लावलेली फळे ह्या तपस्वीने ओंजळीत घेतली नाहीत. पूजा बांधली ती राष्ट्रसेवेची, पूजा केली ती भारतमातेची, पुजारी झाले ते दलितांचे, धूप-दीप ओवाळले ते त्यांच्या गुणदर्शनांचे.

दीन-दलितांची काळजी वाहणाऱ्या अण्णांची काळजी गोपालकृष्णाला, कारण त्यांच्या पहिल्या निवासस्थानी तो सतत त्यांच्या पाठीशी उभा होता. स्वोद्धारक विद्यार्थी गृहाच्या पाठीशी गोपालकृष्णांचे भव्य मंदिर उभारण्यात हाच हेतू मला दिसतो. संसार-रथातही आईनी दोन्ही चाके आपल्या काबूत ठेवून निश्चितपणे रथ हाकला. त्याच रथात अण्णांनी साक्षात लक्ष्मीनारायणचा जोडा आणून बसविला. तोही बापसे बेटा सवाई. समाजसेवेची बाळघुटी ज्या आईवडिलांनी त्यास दिली ते बाळसे धरणारच. आशादेवीनेही प्रसन्नवदने, वरदहस्ते रविराजाच्या साथीने अश्वाचा लगाम आपल्या हाती घेतला तो दया, दातृत्व ह्या गुणांचा मुकुटमणी परिधान करूनच. अण्णांनी संसारात लक्ष घातले नाही; परंतु लाखो संसार सुखी व्हावेत म्हणून भ्रमण करीत राहिले. म्हणूनच की काय लक्ष संसारातील सुख-समृद्धी अण्णांच्या सुशील, वत्सल, कुटुंबात पाहावयास मिळतात. यामुळे अण्णांच्या आत्म्याला अधिकच चिर-शांती लाभेल. त्यांना शतशः प्रणाम!

## ममतेचे सागर

**सौ. शकुंतला जायभावे** नाशिक,

'अण्णा गेले' हे मला खरंच खरे वाटत नाही. अण्णा म्हणजे ममतेचे सागर. त्यांनी प्रतिवर्षी न चुकता माझ्याकडे यावे म्हणून मी 'दलित-सेवक'ची वार्षिक वर्गणीदार बनले. अण्णांच्या सहवासात तो वेळ कसा चटकन निघून जाई. आल्या आल्या माझी व माझ्या संसाराची चौकशी, बोलण्याच्या ओघात गावाकडील सर्व हकीकत सांगत. ओघातच एखादे तत्त्व सांगून जात, त्यांच्या सहवासात आलेल्या त्या क्षणाने मी मोहरून जाई व संसाराच्या पुढील वाटचालीला चालू लागे. आज तो आनंद हिरावला गेला आहे.

## स्वोद्धारक विद्यार्थी गृहाविषयी तळमळ

डॉ. **द. अ. फुलंब्रीकर**, सारंगखेडा, ता. शहादा

ती. कै. अण्णांचा व माझा परिचय धुळे येथे असताना झाला. त्या वेळेस मी त्यांना नेहमी हाफ् पँट, शर्ट, टोपी या खादीच्या स्वच्छ कपड्यांमध्येच पाहात असे.

त्याबाबत मी त्यांना विचारले असता ते म्हणाले, "मी स्वोद्धारक विद्यार्थी गृहात काम करतो. त्या विद्यार्थ्यांपुढे योग्य आदर्श असावा असे मला वाटते. कारण मी त्यांना नेहमी साधी राहाणी असावी असे सांगतो. आणि एवढ्या कपड्यांमध्ये गरज भागत असताना जास्त खर्च कशासाठी करायचा?"

दुसरी आठवण म्हणजे विद्यार्थी गृहासाठी धान्यरूपाने मदत गोळा करण्यासाठी ते स्वतः नेहमी फिरत असत. त्या वेळी सारंगखेडा येथे येण्यासाठी पूल नव्हता. नावेने तापी नदी पार करून यावे लागत असे. लोक गेल्याबरोबर लगेच धान्य किंवा पैसे देत नसत. त्यांच्या सवडीनुसार परत बोलावीत असत. पण न कंटाळता अण्णा परत येत असत. सारंगखेडा ते दोंडाइचे ९–१० मैलांचे अंतर, ते पायीच येत. ज्या उमेदीने ते लोकांनी दिलेले पोतेभर धान्य घेत, त्याच कृतज्ञतेने ते ओंजळभर धान्यही स्वीकारीत असत. जमा केलेले धान्य ते माझ्याकडे ठेवीत असत. नंतर नावेला गर्दी वगैरे नसेल, तेव्हा मी ते दोंडाइचा येथे त्यांच्याकडे पाठवीत असे.

## निरपेक्ष देशभक्त

### श्री. गोविंदराव रानडे

[ घोडनदीहून दि. २।१२।६८ ला पाठविलेल्या पत्रातून. ]

माननीय अण्णा गेले हे खरे वाटत नाही. त्यांची सतत हसरी मूर्ती नेहमी डोळ्यांपुढे येते. ह्या वयातही त्यांचा उत्साह तरुणांना लाजविणारा. सगळी कामं स्वतः करावयाची हौस. देशाकरिता सारं जीवन त्यांनी वाहिलं. अपेक्षा कसली केली नाही. आज एकेक काँग्रेस पुढाऱ्यांचे वर्तन पाहिलं, आणि अण्णांच्या पवित्र जीवनाकडे दृष्टिक्षेप टाकला की वाटतं संधी मिळती तर, आणि वृत्तीत स्वार्थीपणा असता तर, अण्णा आज स्वतःच्या कर्तृत्वाने फार उच्च स्थानी ( समाजाच्या दृष्टीने ) जाऊन पोहोचले असते. पण स्व. अण्णांचा तो पिंड नव्हताच. प्रसिद्धीकरिता त्यांनी कधी सेवा केली नाही. जे मनापासून वाटलं, त्यासाठी आपलं देहपुष्प वाहिलं. फार त्यागी आणि पवित्र जीवन. अशी माणसं आज फार विरळ होत चालली आहेत आणि म्हणूनच आपलं सारं जीवन स्वार्थासाठी– मानासाठी– प्रसिद्धीसाठी धडपड व पैसा, ह्यांनी बरबटलेलं दिसतंय आणि ही घाण आणखी पसरत चालली आहे.

अत्यंत प्रभावी आत्मबल स्व. अण्णांनी संपादन केले होते. त्यांच्या श्रद्धा अचल होत्या. आत्मविश्वास दांडगा होता—आणि फार मोठे संघटना कौशल्य—आणि कर्तृत्वशक्ती त्यांच्या जवळ होती. मॅट्रिकची परीक्षा जवळ आली असता त्या परीक्षेला न जाता चळवळीत त्यांनी भाग घेतला. शिक्षण नसतानाही फार मानाचे स्थान धुळे जिल्ह्यातील

जनतेच्या मनात त्यांनी स्वतःसाठी, स्वतःच्या कार्याने निर्माण केले. असं फार वाटतं की, अण्णा आणखी काही वर्षे जगावयास हवे होते. पण असं का घडलं—व कस घडलं—ह्याची उत्तरे आपणाला का देता येत आहेत ? चि. रवींद्राचे अण्णांच्या शोकसभेच्या वेळी धुळ्याला उच्चारलेले वाक्य आठवले, " अण्णा सारं मजजवळ देऊन गेले आहेत. मी त्यांचाच मुलगा. अण्णांच्याबद्दलच्या साऱ्या अपेक्षा मी पूर्ण करीन. "

माझी खात्री आहे, जो सेवेचा व्यवसाय आपण दोघांनी [ डॉ. रवींद्र व डॉ. सौ. आशा ] पत्करला आहे ते अण्णांचेच कार्य आहे. त्यात तुम्ही दोघे १०१ टक्के यशस्वी व्हाल.

## महिला–मुक्तीचे–समर्थक

**मं. रं. टोणगावकर**, दोंडाइचा

अण्णांच्या जीवनात त्यांची अर्धांगी म्हणून माझा प्रवेश झाला तो सन १९३५ च्या जूनला. माझ्या व त्यांच्या वयात बरेच अंतर. मी १३ वर्षे पूर्ण झालेली तर ते २६ पूर्ण. म्हणजे १३ वर्षांचे अंतर आम्हा दोघांत. पण ते फारसे इतरांना जाणवणार नाही, अशी माझीही प्रकृती धष्टपुष्ट. अण्णा म्हणजे व्यायामाने कसदार, पिळदार, बलशाली शरीरसंपदा प्राप्त असलेला, ऐन तारुण्याने रसरसलेला तरुण व मी तर शारदा ॲक्टप्रमाणेही वयात न आलेली बाला. विवाह झाला तो एका विचारी तरुणाशी. विवाहोत्तर धिसाडघाई त्यांना आवडली नाही. विवाहात ' शुभमंगल सावधान ' म्हटल्याने ते रामदासांसारखे विरक्त झाले नाहीत, तरीपण वैषयिक आसक्तीने त्यांना कधी ग्रासले नाही. मी वयात येईपर्यंत खडतर तपश्चर्या, महान संयम, पत्नी सभोवती वावरते आहे, तिला आपल्या मताप्रमाणे घडविण्याची घोर धडपड चालू आहे; कमळाप्रमाणे त्यापासून अलिप्त राहून हे विचारपूर्वक ब्रह्मचर्य मी १६ व्या वर्षात पदार्पण करीपर्यंत—

**" सर्वभूते जिथे जागी, ज्ञानी योग्यास रात्र ती ।**
**सर्वभूतांस जी रात्र, जागतो संयमी तिथे । " गीताई**

" ही संयमाची पराकाष्ठाच आम्हा हिंदवासियांची संस्कृती जोपासना करणारी आहे. आम्ही नराचा नारायण बनविला तो याच मौलिक विचारांच्या पायांवर. ध्येयवादी तरुणांनी याचा विचार केला पाहिजे. " सबंध जीवनभर संयम, मलाही संयमी बनविण्याचा प्रयत्न. " संयम सुटला की अधःपतनाला प्रारंभ झालाच म्हणून समजा. " गीतेचे नुसते वाचन वा मनन न करता आचरण करणाऱ्या अण्णांचे मत होते.

यावरून मला रवींद्राच्या बोलण्याची आठवण होते. तो पुण्यास एम्. बी., बी. एस्.

उत्तीर्ण झाला व मी नागपूरला एम्. ए. करीत होते, तेथे भेटावयास आला. माझे वास्तव्य त्या वेळी माझ्या आत्या पू. कमलाताई होस्पेट यांच्या मातृसेवा संघात होते.

"काय रवी, कसलं वाचन चाललं आहे? परीक्षा संपली ना आता?"

"लोकमान्यांचं गीतारहस्य वाचतो आहे." रवीचं उत्तर.

"या वयात गीतेवरच्या भाष्याचं वाचन? कमाल आहे बुवा!"

"म्हणूनच लोकमान्यांनी प्रारंभीच म्हटलं आहे की, 'गीतारहस्य वृद्धांकरिता नसून तरुणांकरिता आहे.' वृद्धपणी वाचून त्यातील बहुमोल विचारांना आपण मुकलो म्हणून फक्त हळहळायला होईल; आता तरुणपणी वाचलं व अल्पसं अंगीकारलं तरी गीतारहस्याचं भाग्य उदयाला येईल."

हा संवाद माझ्या एका नातेवाईकात व मुलात झाला. कदाचित अण्णांचा संयम त्याच्यात उतरू पाहत असेल.

अण्णा विशालत्वाचे भोक्ते होते; संकुचितपणा त्यांच्या पाचवीलाही पूजलेला नव्हता. त्यामुळे 'हे विश्वचि माझे घर' ही विचारसरणी. ते भोगी होते तसेच त्यागीही होते. स्वराज्याचे महान भोक्ते, त्याचा उपभोग घ्यायचा म्हणजे महान त्यागही आलाच. अण्णा घरी असत तोपर्यंतच घर व कुटुंबीय यांची आठवण. हे साधारणतः महिन्यातून जास्तीत जास्त आठ-दहा दिवस. बाकी बाहेरच. बाहेर गेल्यावर आपल्याला घर आहे याचा संपूर्ण विसरच पडे, इतके बाहेरच्या कार्यात समरस होऊन जात. परंतु या घराची संपूर्ण जबाबदारी ते टाळू शकत नव्हते; कारण दासबोधाचे मनन केलेले त्यामुळे 'आधी प्रपंच करावा नेटका' हा मानस. त्यामुळे मला स्वावलंबी बनविण्याची प्रबळ इच्छा. त्यांच्या या मानसगंगोत्रीत माझ्या शिक्षणाचा उगम आहे. पुरुष ज्ञानाकरिता व चरितार्थाकरिता शिक्षण घेतो, परंतु स्त्रियांना तो त्यापासून वंचित ठेवतो. वास्तविक—

'जिच्या हाती पाळण्याची दोरी, ती राष्ट्राते उद्धारी' या न्यायाने स्त्री सुशिक्षित तशीच सुसंस्कृत हवी हे त्यांचे आवडते मत– अण्णा म्हणत, "मला उघड्या डोळ्यांनी संसार करावयाचा आहे,– शिक्षणाच्या अभावी माझ्या परमप्रिय मातेला पोटाची खळगी भरण्याकरिता दुसऱ्याचा स्वयंपाक करावा लागला व खरकटी उपसावी लागली. ती पाळी दुसरीवर येता कामा नये."

"अहो अण्णा, विमाकंपनी आहेच की आपल्या मदतीला."

"विमा हा आयुष्याची हमी घेऊ शकत नाही. ज्ञानाचाच विमा उतरवू द्या. त्याची ना चोरी, ना खर्ची– शिवाय आजची राष्ट्राची गरज ज्ञानवंत स्त्रियांची आहे. आम्ही स्त्रियांना जोपर्यंत पारतंत्र्यात टेवू तोपर्यंत देश स्वतंत्र होत नाही. 'ज्ञानी स्त्रीविना स्वातंत्र्य हाती येईना.' 'लग्न' शब्दाचा खरा अर्थ मी जाणला आहे. पत्नीची उन्नती झालीच पाहिजे."

स्वत्यागा अन् एकरूप तुम्ही व्हा—हा अर्थ लग्नी वसे
त्यागाची नित स्वार्थी द्या मुरड ती—हा मार्ग सौख्या असे

प्रेम, त्याग, रसिकता वरात जैं—तैं सौख्य हे नांदते
प्रेमे प्रेम मिळे न प्रेम मृगया, देताच ते लाभते

दोघांनी सहकार्य नित्य करुनी हे शिल्प साधायचे
दोघांची तडजोड वृत्ति असता लाभेल जे पाहिजे.

अण्णांच्या स्व-रचित शुभ-विवाह मंगलाष्टकातील हे विचार. तेव्हा कुटुंबाचे 'शिल्प' साधण्यासाठी माझ्याकरिता अण्णांनी ज्ञानाची कवाडे सताड उघडली. विवाहाच्या वेळी मी व्हर्नाक्युलर फायनलच्या वर्गात होते. ते वर्ष माहेरीच चाळीसगावला पूर्ण केले. तदनंतर मी सासरी धुळ्यास पुढील शिक्षण घेऊ लागले. त्या वेळी हायस्कूलमधील पहिली, दुसरी, तिसरी अशा तिन्ही इयत्ता एकत्रित करण्याची सोय होती. अण्णा स्वतः 'कमलाबाई गर्ल्स हायस्कूल' मध्ये माझे नाव नोंदविण्यास आले. त्या वेळी हायस्कूल-मधील ४०० विद्यार्थिनींत मी व आमच्या जोशी सरांची पत्नी, अशा दोघीच विवाहित होतो. त्यातही सौ. जोशींनी मध्येच शाळा सोडली. अण्णांनी मला शाळेच्या मुख्या-ध्यापिका श्रीमती शारदाबाई साळ्वे यांच्या हाती सोपविले होते. एका स्वातंत्र्य सैनिकाची पत्नी म्हणून त्या माझ्यावर खूप प्रेम करीत. परंतु इंग्रजी ५ वीच्या वार्षिक परीक्षेच्या वेळीच मी गर्भवती झाले व सहावीत जाण्याचे मी नाकारले. मी शिक्षण चालू ठेवावे म्हणून अण्णांनी मला खूप आग्रह केला पण मी ऐकले नाही.

धुळ्यास असताना माझ्या खूप मैत्रिणी होत्या. त्यात शालिनी, मालिनी, भामिनी, कुमुदिनी नावाच्या होत्या. त्यांना माझे नाव 'रमा' जुने वाटत होते. हे मी अण्णांना सांगितले. ते विनोदाने म्हणाले, 'चल तू मंदाकिनी.' व पुढे माझे नाव कागदोपत्री तेच झाले.

शाळा सुटली, पण अण्णा असे ऐकणारे नव्हते. त्यांनी थोरांची व अनेक स्वातंत्र्य-वीरांची चरित्रे वाचण्यास आणून दिली.

"कृष्ण सांगत असलेल्या माहितीला सुभद्रेच्या गर्भातून अभिमन्यूने हुंकार दिला ही आमची संस्कृती आहे. गर्भावर सुसंस्कार झालेच पाहिजेत." अण्णा म्हणाले.

दि. १७ नोव्हेंबर १९३९ ला मला पुत्र झाला. अण्णांनी आनंदोत्सव साजरा केला. पुढे १९४२ चे क्रांतिपर्व सुरू होण्याच्या अगोदरचा जो काळ होता त्यात अण्णांनी मला हिंदी शिकविले व १९४४ ला मला हिंगण्यास शिकण्यास पाठविले. मी मॅट्रिक, सेकंड-इयर ट्रेंड व हिंदी कोविद या परीक्षा उत्तीर्ण होऊन स्वो. वि. गृह दोंडाइचे येथे विद्या-मंदिरात नोकरीस लागले.

माझ्या शिक्षणासाठी अण्णांनी खूप त्रास सोसला. घरकामातही त्यांना खूप मदत करावी लागे. मी पदवीधर व्हावे ही त्यांची फार इच्छा. त्यांच्याच प्रेरणेने मी हिंदी पंडित व हिंदी पारंगत ( आग्रा ) झाले. मराठीची साहित्य विशारद झाले. पण पदवीधर झाल्याविना त्यांना चैन पडेना. शेवटी एस्. एन्. डी. टी. युनिव्हर्सिटीची बी. ए., बी. एड. पदवी मी मिळविली. माझा व स्वो. वि. संस्था चालकांचा काही प्रश्नांवर खटका उडाला व मी रजा घेतली. या वेळीं माझी मानसिक स्थिती बिघडलेली होती, म्हणून अण्णा मला नागपूरला घेऊन गेले व एम्. ए. करिता त्यांनी प्रवेश मिळवून दिला. प्रा. कोलते, प्रा. अ. ना. देशपांडे, प्रा. वाबगावकर, प्रा. शं. दा. पेंडसे यांच्याकडे ते मला घेऊन गेले व त्यांचा परिचय करवून देऊन मला मदत करण्याबद्दल त्यांना विनंती केली. एकदा 'नरेंद्रांचे रुक्मिणीस्वयंवर' मला मिळत नव्हते तर अण्णांनी, नांदेड ( मराठवाडा ) च्या लायब्ररीतून आठ दिवसांकरिता मिळविले व ते त्वरित परत पाठविण्याची व्यवस्था केली.

पदव्या माझ्या नावापुढे लागत पण आनंदाने अण्णांची छाती फुगत असे. आपल्या पत्नीपुढे ज्ञानाचे आणखी कोणते दालन उघडता येईल याचाच विचार ते करीत असत. त्याकरिता घरात बरोबरीने कामात मदत करीत.

'अहो लोक हसतात व नावे ठेवतात.' असे मी म्हटले तर म्हणत, 'लोक घोड्यावरही बसू देत नाही व पायीही चालू देत नाहीत. काही दिवसांनी माझाच आदर्श ते गिरवतील बघ!' झालेही तसेच. अनेकांनी अण्णांपासून ही प्रेरणा घेतली.

## पाकशास्त्रातील माझे गुरू

माझ्या विवाहाच्या वेळीं माझ्या आजीने मी 'गृहकृत्यात दक्ष आहे' असे प्रमाणपत्र दिले होते. पण मला मात्र माहेरी कधी स्वयंपाकाची वेळच आली नव्हती; कारण दुपारचा सोवळ्यातला स्वयंपाक आजी करी तर रात्री आई करी. माझ्या आजीने पाहताना नातेवाईकांनी भरलेले घर पाहून दिले होते. सासू, आईच्याच वयाची नणंद, दोन मोठ्या जावा यांच्यामुळे मला स्वयंपाकाची वेळ येणारच नाही असा तिचा कयास असेल. परंतु तिच्या दुर्दैवाने नातीवर दुर्धर प्रसंग ओढवला व 'गृहकृत्य–दक्षतेचे हसे झाले.'

विवाहानंतर आलेल्या पहिल्याच दिवाळींत शाळेला सुट्टी असल्यामुळे मला सासरी यावे लागले. दोन्ही वडील जावा दिवाळीसाठी माहेरी गेल्या. सासूबाईंच्या डोळ्यातील मोतीबिंदूचे ऑपरेशन करण्याकरिता त्या वन्संसह चाळिसगाव येथे माझ्या माहेरी गेल्या. स्त्रियांपैकी घरात आता मी एकटीच स्त्री आणि ती म्हणजे वयाची १४ वर्षे पूर्ण न झालेली. हे चौघे भाऊ, माझा एक पुतण्या, एक लहान पुतणी व एक भाची म्हणजे आम्ही लहान–मोठी एकूण आठ माणसे. फक्त भांडी घासावयास बाई. तशात माझ्या एका जावेने माहेरी जाण्याच्या आनंदात बिन-निवडलेले, खडवणाचेच गहू दळावयास दिलेले.

माझ्या पाककलेतील तो पहिलाच दिवस. कचकच कणकेच्या अर्धकच्च्या पोळ्या, आळूची भाजी म्हणजे नुसतीच पाने उकडून त्याला फोडणी दिलेली. अण्णांसह चौघे बंधू त्या वेळी मिलमध्ये काम करीत असत. दुपारी १२ चा भोंगा झाला. सर्व घरी आले व पानावर बसले, आणि माझे वडील दीर एकदम गरम झाले.

'स्वयंपाक आहे की चेष्टा आहे ? काय खाणार ?'

थोडा थोडा वरणभात खाऊन सर्वजण उठले; मला मेल्याहून मेल्यासारखे झाले. पण मी त्या वेळी कोणाशीच बोलत नव्हते.

अण्णांनी ओळखले की मला स्वयंपाकातील प्राथमिक ज्ञानसुद्धा नाही. ते त्या वेळी धुळे मिलमध्ये डाइंग खात्यात काम करीत असत. काम लवकर आटोपून ते सर्वांच्या थोडे आगोदर घरी येत, व मला पाकशास्त्राचे धडे देत. त्या वेळी माझे तोंड सदैव चुलीकडे असे. अण्णा स्वयंपाकघराच्या उंबरठ्यावर उभे राहूनच धडे देत. कधी त्रागा नाही, कधी उणा शब्द नाही. एवढेच काय पण त्यांनी धान्य कसे पाखडावे व कसे घोळावे हेही शिकविले.

अण्णांच्या वडील भगिनीची व त्यांची भाकरी करण्याची पैज लागली होती की, मोठ्यात मोठी भाकरी करून संपूर्ण पोपडा म्हणजेच पापुद्रा कोण आणतो. वन्स हरल्या, कारण मोठ्या ताटाएवढ्या संपूर्ण तव्यावर बारीक भाकरी टाकून तिचे दोन्ही समान पापुद्रे अण्णांच्याच भाकरीला आले. भाकरी जाड झाली की ते म्हणत, 'भाकरा केला आहे का ?'

सासूबाईंना दिसत नव्हते तेव्हा त्यांचा सोवळ्याचा स्वयंपाक अण्णा मधल्या जेवणाच्या विश्रांतीच्या वेळी करीत असत. त्यांच्या हातच्या रुचकर भोजनाची सर्वच प्रशंसा करीत.

अशा रीतीने अण्णांनी माझे शालेय शिक्षणच केले नाही, तर सर्वार्थाने मला शिक्षित केले. दोन्ही कुटुंबांत सर्व तऱ्हेची नातेवाईक मंडळी असताही अण्णांना मला स्वयंपाक शिकवावा लागावा हेही एक विधिलिखितच.

## देवादिक आणि धर्मकुलाचार

श्राद्धादी कर्मकांडाचा अण्णांना अत्यंत तिटकारा होता. श्राद्ध करून आपल्या पितरांना पाणी पाजणे त्यांना मान्य नव्हते. ते म्हणत, जिवंतपणी जे काय सुख तुमच्या वाड-वडिलांना द्यावयाचे ते द्या. त्यांच्या सुखासमाधानाच्या मरणाने तुम्हाला जो आशीर्वाद मिळेल तोच खरा. त्यामुळे माझ्या सासूबाईंच्या श्राद्धदिनी ते हिंगणे महिलाश्रम किंवा अनाथालय यांना शक्य तेवढे पैसे पाठवीत. शैक्षणिक संस्थांना मदत करण्याचा त्यांचा हेतू फार उदात्त होता. त्यांच्या आईला शिक्षणाच्या अभावी स्वयंपाकाचेच काम करावे

लागले, त्यामुळे ते म्हणत या शैक्षणिक संस्था म्हणजे अनेक कुटुंबांचे आधार होत. पवित्र संस्कारकेंद्रे होत.

जरी कर्मकांडावर त्यांचा विश्वास नव्हता तरी आपल्या मातेच्या सुखात ते आपला आनंद शोधीत असत. सासूबाईंच्या हिंदू मनाला काशीविश्वेश्वराची व हरिद्वाराची यात्रा घडली तर कृतकृत्य वाटणार होते. म्हणून सन १९५० ला आम्ही यात्रेला निघालो. तेव्हा ते मला म्हणाले की, ‘ चला, यात्रेतून काकींची देवस्थळं पाहणं होतील व तुझी ऐतिहासिक तशीच कलात्मक स्थळं पाहून होतील. ’ कारण माझे शिकविण्याचे मुख्य विषय भाषा व इतिहास होते.

अण्णा मंदिरात जाऊन कधीही मूर्तीपुढे हात जोडीत नसत. मंदिरांबद्दल त्यांच्या मनात एक घृणास्पद भावना निर्माण झाली होती. ज्या मंदिरांतून अखिल मानवजातीला प्रवेश नव्हता, मज्जाव होता, ज्यांत स्पृश्यास्पृश्य भेदभाव होता, जेथे अधिकाधिक अनाचार होता, त्या मानवनिर्मित मंदिरांतील मूर्ती देवत्व पावलेल्याच नाहीत असे त्यांचे म्हणणे. ते त्यांच्या एका अभंगात याचे जिवंत वर्णन करतात—

**“ शोधा शोधा सारे जण — कोठे लपला नारायण**
**पोटासाठी हरींचे गुण — गाती येथे भक्तगण**
**देव यांचा झाले धन — येथे कैचा नारायण ॥ १ ॥**
**गुड्या पताका तोरण — बांधी भुलवाया जन**
**पुजाऱ्याचे बकध्यान — येथे कैचा नारायण ॥ २ ॥ ”**

सासूबाईंच्या हातून काशीला गोदान केले त्या वेळी अण्णा म्हणाले, “ आमची सर्व धार्मिक स्थळं अशा रीतीनं दांभिकतेनं व अनाचारानं बरबटलेली आहेत. अंधश्रद्धाळूंच्या पैशावर हात मारून पंडे लाल झाले आहेत. हीच गाय जर एखाद्या गरजूला मिळाली असती तर त्याच्या मुलांबाळांनी दुग्धप्राशनाचा जो एक ढेकर दिला असता तोच तुम्हाला जन्ममरणाच्या फेऱ्यातून मुक्त करू शकला असता. जनतेत जनार्दनाला पाहावयाला आम्ही कधी शिकणार ? ”

मी त्यांना म्हटले, ‘ तुम्हाला जर या गोष्टी पसंत नाहीत तर तुम्ही या गोष्टी का करता ? ’ त्यावर ते म्हणाले, “ ‘ न मातुः परमदैवतम् ’ जिने उभी हयात कष्टात काढली; तिला तिच्या इच्छेप्रमाणे सुख देण्याचा हा प्रयत्न आहे, दुसरे काही नाही– तुला मात्र सांगण्यामागे माझा हेतू हा आहे की निदान तू तरी या स्तोमाच्या पाठीमागे लागू नये. ” त्यांच्या त्या बोलण्याचा माझ्या मनावर एवढा परिणाम झाला की, अण्णांच्या वर्षश्राद्धदिनी आम्ही त्यांच्या सर्व जातींतील मित्रांसमवेत भोजन केले. राहते छोटेसे घरकुल स्वोद्धारक विद्यार्थी संस्थेला दिले. हिंगणे महिलाश्रम, धुळे येथील हरिजन सेवक संघाचे कन्या छात्रालय व नागपूरचे पू. कमलाताई होस्पेट यांचे वृद्धाश्रम या संस्थांस अल्पशी आर्थिक मदत पाठविली. डोळे भरून आले होते, पण मन प्रसन्न होते. अण्णांची

शिकवण थोडीतरी का होईना अंगीकारली होती आजही त्यांच्या स्मृतिदिनी निदान शंभर रुपये तरी अत्यंत गरजवंताकरिता खर्च केले जातात.

आमच्या या यात्रेत गयेचा प्रसंग मोठा गंमतीशीर झाला. आम्हाला जेवढे दान देता येईल तेवढे आम्ही देत गेलो. गयेची कुप्रसिद्धी ऐकून होतो की, तेथे पितरांच्या उद्धारासाठी समाप्तीचे श्राद्ध होते. त्यात शेवटी पंडे फुलांच्या माळेने श्राद्धविधी करणाराचे हात बांधतात व मन मानेल त्याप्रमाणे दक्षिणेची मागणी करतात. येथे अक्षरशः लोक नागवले जातात. कारण अलाहाबाद, काशी व गया या त्रिस्थळी केलेल्या श्राद्धांची येथे समाप्ती असते. पंडे आशीर्वाद देतात ' तेरे पितर सरग भये ' तेव्हा कोठे आमच्या मृत पूर्वजांना सद्‌गती मिळते. अण्णांचे हात बांधले गेले. ते प्रथम क्रमांकावर होते. नंतर १०–१२ लोकांचे ओळीने हात बांधले गेले. आम्हाला शक्य होती तेवढी दक्षिणा दिलेली होती. पण अधिक हवी म्हणून पंडे हात सोडीनात. तेव्हा अण्णा जरा आवाज चढवून म्हणाले, ' हाथ छोडनेके है कि नहीं ? मेरे पितर तो कबके सरगही भये हैं, तुम्हारी इतनी ताकत नहीं कि उनको नरकमें उतरावोगे ' वातावरण गरम झाले होते. पहिलेच बोहणीचे गिऱ्हाइक खमंग भेटले होते– फार तंग वातावरण केले तर बाकीची गिऱ्हाइके जातील; असे वाटून पंड्यांनी तारस्वरात पण घाईघाईने त्यांच्या मस्तकावर तांदूळ टाकले व एकदाचे ' तेरे पितर सरग भये ' म्हणून शिक्कामोर्तब केले. आम्हाला खूप हसू येत होते. प्रसंगातील गांभीर्य नष्ट झाले होते. माणसं नास्तिक का बनतात ? याचा प्रत्यवाय मला आला होता.

हरिद्वारचे वातावरण मात्र मनाला खूप शांती देणारे ठरले. हिमालयाने वेष्टित स्फटिकासारख्या शुभ्र धवल गंगेच्या दर्शनाने, मन प्रसन्न झाले. अण्णा मनसोक्त डुंबले.

पुढे फिरत फिरत आम्ही गोकुळला आलो. वेळ दुपारची २–३ ची असेल. मुख्य मंदिराचा दरवाजा खटखटविला. आमचा वाटाड्या आत गेला. पुजाऱ्यांनी त्याच्याबरोबर निरोप दिला की, देव आता झोपलेले आहेत, त्यामुळे तुम्हाला दर्शन घडणार नाही. वाळयाच्या ताटीचा सुगंध पसरलेला होता. आम्हाला एका ठिकाणी फार वेळ थांबून चालणार नव्हते. सासूबाईंचा चेहरा उतरलेला होता. बरोबरच्या सहा-सात जणींनादेखील दर्शन हवे होतेच. म्हणून मी वाटाड्याला अधिक पैसे कबूल केले, तेव्हा पुजारी दरवाजाशी आले व ते आम्हाला आत बोलाविणार तेवढ्यात एरवी हिमालयासारखी थंड प्रवृत्ती असलेल्या अण्णांचा ज्वालामुखीसारखा स्फोट झाला. ' देवांना झोपविता की घृतकुल्या मधुकुल्या खाऊन भरल्या पोटी वाळयाच्या ताटीत तुम्ही सुखासीन झोप घेता ? कालचक्र थांबणारे नाही, देव जर क्षणमात्र झोपले तरी सृष्टीत उलथापालथ होऊन जाईल. तुमच्या मूर्तीत गोपालकृष्ण भरलेला नाही, आम्ही त्याला गीतेत पाहतो, विश्वात पाहतो. परमात्म्याची सारी लेकरं उन्हातान्हात तडफडत आहेत आणि तुम्ही त्याला वाळयाच्या ताटीत बंदोबस्तात ठेवता. लाच मिळाली की मागल्या दरवाजाने तुम्हाला दर्शन घडविता येते. देवावरील श्रद्धेने, त्याच्याबद्दलच्या ओथंबलेल्या

भावनांनी आलेल्या भाविकांच्या भावना तुम्ही पायदळी तुडविता याचे तुम्हाला काही वाटत नाही ?'

एक तर झोपमोड झालेली व आपल्याच दारात येऊन अशी खरपूस हजेरी घेतलेली कोणाला आवडेल ? पुजाऱ्याचा रागाचा पारा चढला व 'हम शयनकालमें प्रभुको जगा नहीं सकते' असे म्हणत त्याने धाडकन दरवाजा लावला. आम्ही पायरीवरच सुन्न होऊन उभे होतो. अण्णा म्हणाले, 'चला, बरे झाले त्याने दरवाजा बंद केला; नाहीतर एका बंदिस्त गोपालकृष्णाला पाहून, हात जोडून आपण परतीच्या मार्गाला लागलो असतो, आणि खऱ्या कृष्णाला मुकलो असतो. जनता जनार्दनाच्या दर्शनाकरिता कूपमंडुकांनी निर्माण केलेल्या निर्जीव स्थळांना भेट देणेच नको. देव तर भक्तीचा भुकेला असतो ना ? आपण सगळे गोकुळच पायाखाली घालू. कृष्णाचे बालपण उदात्त अशा सृष्टीतच रममाण झाले होते, तो निसर्गच आपण पाहू. कदंबा-कदंबांतून आपल्याला कृष्णरूप दिसेल. यमुनेतून आपल्याला कृष्णरूप दिसेल.' आम्ही मुख्य देवालयातील देव न पाहताच परतलो.

देवांच्या बाबतीत अण्णा आम्हाला नेहमी सांगत की, परमोच्च गुणांनी युक्त असे जनतामान्य थोर पुरुष म्हणजे देव. शंकराकडे पाहा. एका उत्कृष्ट शेतकऱ्याचे दर्शन तुम्हाला होईल. भारतीय शेतकऱ्याचे वाहन नंदीशिवाय दुसरे कोणते चांगले असणार ? अमाप पीक येण्याकरिता गंगाप्रवाहाची आवश्यकता आहेच. चंद्रामुळेच कित्येक वनस्पती फुलतात. नगरांतून वास केल्यास शेती कशी चांगली होणार, त्याकरिता निर्जन ठिकाणीच वस्ती करावी लागणार. शेतीतील अन्नधान्याची नासाडी करणाऱ्या उंदरांचा नाश करणारा सर्पराज तर त्याच्या गळ्यातील ताईत ठरणारच.

श्रीकृष्ण म्हणजे राजकारण व समाजकारण यांचे उत्कृष्ट धडे समाजाला देणारा पुरुषोत्तम. 'गीता' सांगणारा, कुब्जेसारख्या वक्र स्त्रीलाही सरळ करून सुख देणारा व प्रामुख्याने जरासंधाच्या बंदिवासातील १६,००० पतित समजल्या जाणाऱ्या स्त्रियांचा स्वतःच अंगीकार करवून त्यांना पातिव्रत्याच्या पदास पोहोचविणारा उद्धारक. नाहीतर समाजात ह्या स्त्रियांना पतिता म्हणूनच जगावे लागले असते.

मर्यादा पुरुषोत्तम रामाने तर प्राणिमात्रांचे सर्वच जीवन व्यापले आहे.

## 'वृक्षवल्ली आम्हा सोयरे'

अण्णा मितभाषी होते तसेच मितव्ययीही होते. या काटकसरीत राष्ट्रीय दृष्टीच अधिक होती. आयुष्यात त्यांनी एक तांब्याभरदेखील गरम पाणी घेतले नाही. मुलालाही तीच सवय लावली. पण मी माहेरचे काही संस्कार घेऊन आलेले होते. मला चहा आणि स्नानाकरिता गरम पाणी लागे. स्नानाला गरम पाणी घेणाऱ्यांवर अण्णा फार

गरम होत; कारण आम्ही पाणी गरम करण्याकरिता, म्हणजे अनावश्यकतेकरिता राष्ट्राची जळण शक्ती नष्ट करतो हे त्यांचे मत. त्यातल्या त्यात वृक्ष तोड फारच; म्हणजे आम्ही सृष्टिसंहारक. तेव्हा त्यांच्या मते निदान एक वृक्ष वाढविला तरच आम्हाला गरम पाणी घेण्याचा हक्क. ते वाचाळवीर नव्हते तर कृतिवीर होते. त्यांनी २५–३० वृक्ष तरी वाढविलेच. त्यांची एक घोषणा होती, ' जेथे जाऊ तेथे झाड लावू. ' जेथे जेथे घर केले असेल तेथे जागा असल्यास झाडे लावण्याचा उपक्रम होताच. ते नेहमी म्हणत की, वृक्षारोपण अगदी सोपे आहे; तेच आजकाल होते आहे. पण वृक्षसंवर्धन हवे, तेच सर्वात अधिक कठीण. ' आजा झाड लावील तेव्हा नातू फळ खाईल. ' वृक्षसंवर्धनाला चिकाटी हवी. जन्माला आलेल्या मुलाला वाढविण्यात ज्या खस्ता खाव्या लागतात व जे प्रेम द्यावे लागते तेच प्रेम वृक्ष वाढीकरिता द्यावयास हवे.

खास माझ्याकरिता म्हणून अण्णांनी व चिरंजीवाने स्वोद्धारक विद्यार्थी गृहात वृक्ष लावला तो म्हणजे ' वटराज. ' मला ज्येष्ठी पौर्णिमेला वडावर जाण्यास वेळ मिळत नसे व पूजा तर व्हावयास पाहिजे, म्हणून एक फांदी मी तोडून आणावयाचे काम माझ्या चिरंजीवावर सोपवीत असे. आदल्या दिवशी तोडून आणावयाचे लक्षात येत नसे. एकदा वडावर पूजा सांगणारे ब्राह्मण मुलावर खूप रागावले. त्यांचेही बरोबर होते की ज्या वडाचे माहात्म्य ज्येष्ठी पौर्णिमेला असे त्या दिवशी त्याची तोड करणे म्हणजे पाप-कर्मच. रवींद्र फांदी तर घेऊन आला पण चेहरा उतरलेला. अण्णा म्हणाले, चल तुझी आता नेहमीचीच गैरसोय दूर करतो. पूजा केलेली ती फांदी त्यांनी लावली. १५–२० दिवस आम्ही पाणी घालीत होतो. लोक हसत होते. कारण अशा रीतीने फांदी लागणार नाही असे सर्वांचे मत. ते वृक्षारोपण म्हणजे एक टिंगलीचा विषय झाला. हळूहळू इतरांत मीही सामील झाले व शेवटी मी अण्णांना म्हटले की, आता मात्र मीच ती वाळकी फांदी फेकून देते. अण्णा वारंवार सांगत होते की कोठल्याही फांदीला मूळ फुटून तिच्यात जीवनरस यावयास कालावधी लागतोच. पण मी फांदी फेकण्याकरिता म्हणून फांदीजवळ गेले व फांदी उपटणार तोच अहो आश्चर्यम्! नवजात बालकाच्या अर्धोन्मीलित दृष्टीसारखा कोवळा छोटासा लाललाल अंकुर डोळ्यांतून स्फुलिंग ओकत बाहेर आलेला नजरेस पडला. मला माझ्या कृत्याची लाज वाटली व मी अण्णांना ' अहो तुमच्या मुसळाला अंकुर फुटला ' म्हणून सांगावयास धावले. त्या वेळी माझ्या डोळ्यांसमोर वाल्याच्या पुढे नारदांनी जमिनीत रोवलेल्या काठीला जो बहर आला तोच तरळू लागला.

' अधिक धान्य पिकवा मोहीम ' राष्ट्राची निकडीची हाक. अण्णांचा मूळ पिंड शेतकऱ्याचा पण जवळ शेती नाही. तरीही घराभोवतालच्या परसूत भरपूर भाजीपाला लावला. १८′ × १२′ च्या जागेत उत्कृष्ट प्रतीच्या भाज्यांची पैदास केली. एका वेळी १७–१८ भाज्या असत. त्या वेळी अण्णा स्वो. वि. गृहाचे व्यवस्थापक होते. व्यव-स्थापनापेक्षाही त्यांना या कामी पैसा मिळविण्याकरिता अधिक बाहेरच जावे लागे. पण

जेव्हा जेव्हा ते घरी असत त्या वेळी पहाटे पाचला फिरावयास जात. जाताना हातात घेतलेल्या दोन बादल्या येताना शेगाने गच्च भरलेल्या असत. त्याचे संडासाच्या मागे उत्कृष्ट खत तयार होई. मैलासफाईत ते मधून मधून भाग घेत. त्यांना त्याची घाण वाटत नसे. मैला व शेग यांच्या खताने पीक भरघोस येते. त्यांचा योग्य उपयोग केला तर सिंद्रीच्या खत कारखान्यावर फार पैसा खर्च होणार नाही असे त्यांचे मत होते. पहाटे शेण गोळा करण्यामागे तर ते अत्यंत मौलिक विचार मांडत. "सडकेवर रात्री पडलेले शेण मोटारींच्या आणि गाड्यांच्या चाकांखाली मातीमोलच व्हायचे, तेव्हा ते गोळा करायला पहाटेचाच काळ अधिक चांगला. मंद मंद शीतल हवेत फिरणेही होते व हातून कामही होते." कामात बदल हीच त्यांची विश्रांती.

शाळेतील विद्यार्थ्यांच्या मुताऱ्यांमधून वाया जाणारे मूत्र पाहिले की त्यांना अत्यंत वाईट वाटे. त्यातून उत्कृष्ट हिराखत तयार होईल असे शाळेच्या शेतकी विभागाला त्यांनी सांगितले. पण हे इतरांना फारसे मानवले नाही.

पावसाळ्यात जमिनीवर वाहणी पडून माती वाहून जात आहे तर तिला अडविण्याकरिता भर पावसात भिजत फावड्याने त्यांचे काम चालू असे. कारण आम्हाला सांगत कणाकणाने राष्ट्रीय धनाची नासाडी होते तिची जोपासना झालीच पाहिजे. लगेच 'क्षणशः कणशःचैव' या श्लोकाचे त्यांनी भाषांतर करून आम्हाला ऐकवले.

**"क्षणक्षण कणकण जोडा— विद्याधन ही मिळेल हमखास**
**दवडुन क्षण ना विद्या— कण दवडुन धन मिळेल कवणास."**

उत्कृष्ट भाज्यांची पैदास करताना जशी त्यांची राष्ट्रीय वृत्ती होती, तशीच त्यांची डोळस धार्मिक दृष्टीपण होती. ते म्हणत ही रोजचीच ऋषिपंचमी. ऋषिपंचमीच्या दिवशी धावाधाव करून काही 'हातचं'— बिनबैलाच्या श्रमाचं मिळतं का म्हणून पाहावयाचे व एक दिवस साजरा करून स्वस्थ बसावयाचे हे बरोबर नाही. आज लोकसंख्या वाढीमुळे शहरांतून दाटीदाटीने घरे उभी आहेत पण खरे पाहता घराभोवती परसू पाहिजेच. या परसूतून सुगंध देऊन मन प्रसन्न करणारी फुले, त्याचप्रमाणे आरोग्य देणारा भाजीपाला यांचे उत्पादन घरातील स्त्रिया व मुलांमुलींनी करावयास हवे. ऋषिपत्नी हे काम करीत असत. ते म्हणत 'करूं काम । मुखी राम । दवडूं ना दाम । मिळवूं आत्माराम.' ऋषिपंचमीच्या मागचा उदात्त हेतू स्त्रियांच्या गळी उतरविण्याकरिता त्यामागे जी भीतियुक्त अर्थहीन कहाणी रचली आहे ती बरोबर नाही. कुत्रीचा व बैलाचा जन्म ही कहाणीतील कथा तर त्यांना मुळीच पसंत नव्हती. ते हसून सांगत की मी मुक्त होणार आहे त्यामुळे तू अर्धांगी असल्याने तुझी मुक्ती आपोआपच होईल. म्हणून जन्मोजन्मी तोच पती हवा याकरिता वटसावित्री, ऋषिपंचमी वा मंगळागौरीचे व्रत स्त्रिया करीत बसतात त्याची तुला जरूरी नाही.

ॐ

**एच्. टी. गोराणे**
एच् /२ रेल्वे क्वॉर्टर,
मु. पो. डोंबिवली

सोमवार
१६-१२-६८

प्रिय डॉ. रवींद्रनाथ यांस–

अ. शु. आशीर्वाद वि. वि.–

मी मूळचा दोंडाइचे येथील. आई वारल्याने मला स्वो. वि. गृहात राहावे लागले. त्या वेळी पूज्य अण्णांनी आम्हास जे काही दिले त्याची फेड होणेच शक्य नाही. त्यांनी आम्हास–मानव म्हणून जगण्यास शिकविले, आणि नेमके ह्याच पुण्याईवर आज २५-२६ वर्षे झाली आम्ही वाटचाल करून मानाने–सन्मानाने जगून आहोत व जगू हीच इच्छा.

अलीकडेच भेट झाली. मी आतून ठाण्याचे तिकिट देतो म्हणून सहज म्हटले, पण त्यांना कसे पटणार ? शेवटी मीच स्वतः काम करीत असलेल्या स्टेशनवर क्यूमध्ये–रांगेत– उभा राहून तिकिट घेतल्यावर त्यांना बरे वाटले.

खरे म्हटले तर त्याच दिवशी मी म्हणालो, "अण्णा, आपण खूप थकलात, अंग थरथरतं आहे. मला द्या पिशव्या. आणि जिन्याने नका जाऊ, श्रम होतील. अण्णांनी यावर काय म्हटलं असेल असं वाटतं डॉ. रवी, आपणांला ?"

स्व. अण्णांनी नापसंती दाखवून म्हटले, "अद्याप खूप चालायचे आहे. खूप कष्ट करायला हवेत !" मला हट्ट सोडणे भाग होते. मी स्व. अण्णांना अदृश्य होईपर्यंत त्यांच्या पाठमोऱ्या आकृतीकडे पाहून शतशः प्रणाम केले.

आम्हा पुष्कळांना वडिलांनी जन्म दिला, परंतु वडिलांना जे देता आले नाही ते पूज्य स्व. अण्णांनी आम्हास उदार हस्ते दिले. अशा त्या या युगातील ज्ञानेश्वर माऊलीला आम्हा उभयतांचे लाखो प्रणाम !

प्रभू आपणा उभयतांना 'अण्णांचे कार्य' भरून काढण्यासाठी उदंड आयुष्य देवो.

आपला नम्र
हे. तु. गोराणे

* * *

॥ वंदेमातरम् ॥

**एल्. एम्. देशपांडे**
c/o भारत सरकारची टांकसाळ
फोर्ट मुंबई, १ (B. R.)

दि. ११-१०-६८

प्रिय गुरुबंधू डॉ. टोणगावकर,

स. न. वि. वि.

परवाच्या वर्तमानपत्रात गुरुवर्य ती. अण्णासाहेब यांच्या निधनाची बातमी वाचली व त्या दिवसापासून मन बेचैन झाले. खरोखरीच ती. अण्णांचे निधन झाले असेल का ?

झाले असल्यास ते निधन नव्हेच!! आत्मा जीर्ण वस्त्र टाकून गेला. ती. अण्णा व त्यांचा आत्मा अमर आहे!!!

इ. स. १९३८–३९ ची वर्षे! फक्त दोन वर्षे!! त्या दोन वर्षांच्या स्मृती अजूनही ताज्या आहेत. कारण त्या स्मृती ती. अण्णांच्या सहवासात स्वो. विद्यार्थी गृहात गुरुगृही जसे पूर्वी राहात असतील ना तसेच राहाण्यात गेलेली आहेत.

ती पाहा शेवटची खोली! आमच्या गो. बा. साठे वसतिगृहातील. तेथे ती. अण्णा भिंतीला टेकून ( समोर डेस्क ) बसले आहेत. पांढऱ्या शुभ्र खादीची बंदाची अर्धी चड्डी व सँडो पद्धतीचे खादीचे पांढरे बनियन. बाहेर जाताना उंच खादीची टोपी व खिशाला झाकण असलेला हाफ् शर्ट.

गांधी सप्ताह, हरिजन सप्ताह वा स्वातंत्र्य प्राप्ती सप्ताह असो, ते पाहा ती. अण्णा आम्हा आश्रमातील विद्यार्थ्यांच्या दोन रांगांतून राष्ट्रीय गाणी म्हणत आहेत. भल्या पहाटे उठून दोंडाइचे धुळे रस्त्यावर धावण्याच्या कार्यक्रमानंतर जोर व बैठका. नंतर आम्हा विद्यार्थ्यांच्या अडीअडचणी व अभ्यासाची चौकशी. शिस्त कडक पण अंतःकरण लोण्यासारखे मऊ. त्या वेळी १ ते ३ इयत्ते पावेतोची ती शाळा. परंतु त्या दोन वा तीन वर्षांत वसतिगृहात अगर नुसत्या शिक्षणासाठी शाळेत असणाऱ्या आम्हा विद्यार्थ्यांचे जीवनच शिस्तबद्ध बनविले व राष्ट्रीयतेने भारून टाकले. एकदा एका प्रभात फेरीत ती. अण्णांनी बनविलेल्या छोट्याशा कविता व राष्ट्रगीतांची वही कोणातरी विद्यार्थ्याकडून हरवली. झाले, ती. अण्णांनी सबंध महिनाभर बेचैनीसारखे घालविले. दे. भ. कै. सानेगुरुजींचे ‘ काँग्रेस पत्र ’ खपविण्यासाठी ती. अण्णा खेडोपाडी व खुद्द गावात दिवसभर भटकत. कोडदे, लंघाणे व विखरण येथील यात्रेत ते खेड्यांतील लोकांसमोर साक्षरतेचे वर्ग घेत असत. राष्ट्रभाषा प्रचार समितीचे केंद्र अण्णांच्या प्रेरणेने झाले. वसतिगृहाच्या मदतीसाठी ते पायी किती हिंडले असतील याची गणनाच नाही, त्यासाठी त्यांनी दोन-तीन महिने मेहनत घेऊन ‘ कंसारी विजय ’ नाटक बसविले. मी त्यात पाटलाची भूमिका घेतली होती व आजचे महाराष्ट्र प्रा. काँ. कमिटीचे चिटणीस रा. शिवाजी पाटील यांनी नारदाची भूमिका केली होती.

१९४२ सालात तर ती. अण्णांनी फारच परिश्रम केले. राष्ट्रसेवा, गरिबांची सेवा, साक्षरता प्रसार, एक ना दोन कैक क्षेत्रात कोणताही गाजावाजा अगर स्वतःची जाहिरात न करता आपल्या स्वास्थ्याची पर्वा न करता कणाकणाने झिजले, असे माझे अण्णा गेले, असे मी कसे मानेन ? कदापी नाही. मला तर अण्णांनी दुसरा जन्मच दिला आहे. इ. स. १९३९ मध्ये शिवरात्रीला आम्ही पायी कोडदे, लंघाणे येथील शिवमंदिराच्या यात्रेस गेलो होतो. सर्व विद्यार्थी ती. अण्णांसहित तापीत पोहत होते. मीसुद्धा पोहणे शिकत होतो. तेवढ्यात दत्तू नावाच्या एका सहकाऱ्याने मला शिकविण्याच्या निमित्ताने पाण्यात ओढून नेले. तेथे प्रवाहाला फार जोर असल्याने त्याने माझा हात सोडून दिला. मी तापीच्या प्रवाहात वाहत चाललो. ‘ अण्णा, अण्णा ’ असे मी पाण्यातून डोके वर

काढून ओरडत होतो. एक हाक अण्णांच्या कानी जाताच अण्णा प्रवाहाच्या विरुद्ध बाजूने सपाट्याने पोहत येऊन त्यांनी मला खांद्यावर घेऊन किनाऱ्यावर आणले. उलटे फिरवून मी शुद्धीवर आल्यावर त्यांना हायसे वाटले. तेथील पाटलांकडे रात्रभर मुक्काम करण्याची व्यवस्था करून मगच अण्णा परतले. असे हे थोर अण्णा अमरच आहेत ! या प्रसंगी मी त्यांच्या किती आठवणी सांगू ? आज कोणी कोठे व कोणी कोणत्या पदावर असतील, परंतु गु. ती. अण्णांचा खरा शिष्य त्यांना कधीही विसरणार नाही. अण्णांच्या आत्म्यास सहस्र प्रणाम !

**ता. क.**—ती. गुरुवर्य अण्णांचे छायाचित्र त्यांचे जन्म व निर्वाण दिनासहित पाठवू शकलात तर मी आपला ऋणी राहीन.

## गुरुवर्य अण्णांची शिक्षापद्धती

### सुकलाल जगन्नाथ सोनार

१९३० चा काळ. मी अण्णांचा विद्यार्थी. सोनार गल्लीत त्या वेळी शाळा होती. हीच जुनी राष्ट्रीय शाळा; स्वोद्धारक संस्था चालवीत असे. मुले शाळेत उशिरा येत. पण अण्णा कधी मारीत नसत. हृदय परिवर्तनावर त्यांचा भर असे. तरी चुकणाराला शासन हवेच. म्हणून उशिरा येणाऱ्याला भिंतीकडे तोंड करून तीन तास उभे करीत. जो विषय कच्चा आहे, ते पुस्तक हातात देऊन त्या विषयावरील प्रश्नांची उत्तरे शोधून काढणे ही अण्णांची शिक्षा होती. तीन तासांनंतर किंवा काही वेळेला आधीच ' पुन्हा असे करू नकोस ' असे सांगत. त्यामुळे उशीरा येणाऱ्यांचे व अंगचुकारपणा करणाऱ्यांचे प्रमाण फारच कमी असे.

मोरस साखर [ परदेशातून – मॉरिशसहून येणारी साखर ] खायची नाही, चहा प्यायचा नाही, डोक्यावर केस वाढवायचे नाहीत, खादीचे कपडे घालायचे, खादी टोपी प्रत्येकाने घातलीच पाहिजे असे अण्णांचे त्या वेळेचे संस्कार व अण्णांची अशी शिस्त होती. स्वोद्धारकचा अर्थ ते प्रत्येकाला समजावून सांगत व तसे वागायला लावीत. गरीब विद्यार्थ्यांसाठी ते गावातून पेटी फिरवीत, भाजीपाला, धान्य व इतर मदती गोळा करीत. प्रबोध साप्ताहिक विक्रीचे काम त्यांनी मला दिले होते.

हा बोर्डिंगचा, हा गावातला, हा श्रीमंत, हा गरीब असा भेदभाव त्यांनी केला नाही. सर्वांना ते समान वागवीत. प्रत्येक विद्यार्थी ही राष्ट्राची संपत्ती असे समजून त्याच्याकडे पाहत. मुलांना अभ्यासासाठी रात्री शाळेत बोलावीत व अभ्यास करवून घेत. झोपण्यापूर्वी व उठल्यावर प्रार्थना म्हणत.

त्यांच्या संस्कारांचे महत्त्व त्या वेळी कळले नाही. आज मात्र त्याची जाणीव होते. प्रत्येक गोष्ट अंगवळणी पडेपर्यंत अण्णा करवून घेत. आज त्याची जरूरी भासते.

## अण्णा माझ्या धंद्यातले गुरू

**नरहरी खंडू मिस्त्री,** दोंडाइचे

१९२९ मध्ये दोंडाइचे येथे स्वोद्धारक संस्था सुरू झाली. शाळाही सुरू झाली. आरंभीच्या काळातला मी विद्यार्थी. अण्णा आमचे गुरू होते. अण्णा प्रेमाने शिकवीत, अभ्यास करून घेत. सायंकाळी ते आमच्याबरोबर हुतुतू आदी खेळही खेळत. शिष्यांनी गुरूला हरविले की शिष्य पारंगत झाला असे ते म्हणत. त्या काळी दोन्ही खानदेश मिळून हुतुतूच्या मॅचेस होत. एकदा दोंडाइचे शाळेने भुसावळ येथे झालेल्या मॅचची ढाल जिंकून आणली होती. पुढेही ही परंपरा पुढील विद्यार्थ्यांनी चालविली होती.

अण्णा गांधी–नेहरूंच्या गोष्टी सांगत. 'सत्य अहिंसेने जीवन शुद्ध बनते' अशी त्यांची वागणूक व शिकवण होती. सुतारकामाचे शास्त्रशुद्ध व कलात्मक शिक्षण अण्णांनीच आम्हाला दिले. सुतारकामाचे हिशेबही त्यांनीच शिकविले. वडिलांना अनुभव होता. पण शास्त्रीय व कलात्मक दृष्टी नव्हती, ती अण्णांकडून मी शिकलो आणि या बळावर पुढे मी मोठमोठी कॉन्ट्रॅक्टची कामे अंगावर घेतली व यशस्वीही केली. अण्णांची शिकवण आम्हास जीवनभर उपयोगी पडत आहे.

अण्णांचे प्रत्येक विद्यार्थ्यावर जसे प्रेम असे, तसेच प्रेम कनिष्ठांतला कनिष्ठ कारागीर असला तर त्याच्यावरही असे. माझ्या वडिलांनी तर शालागृह बांधण्यात कमीत कमी पैसे घेऊन मदत केली होती. त्यांचा अण्णांवर फार लोभ. ३ ऑक्टोबर १९६८ ला अण्णा कायमचे गेले. वडिलांना ही गोष्ट कळताच ते अण्णांच्या घरी गेले व ढसढसा रडले—

"अण्णा, तुम्ही आम्हाला टाकून गेलात हे बरोबर नाही. आता आपली भेट केव्हा?" त्यांना शोक आवरेना; आणि आश्चर्य हे की बरोबर आठच दिवसांनी गुरुवारीच माझे वडील खंडू मिस्त्री अण्णांना भेटावयास कायमचे निघून गेले.

## अण्णांचे संस्कार

**सोमजी गरबड पाटील,** फेस

कै. रं. रा. टोणगावकर ऊर्फ अण्णा जिल्हा कॉंग्रेस कमिटीचे अध्यक्ष असताना मौजे फेस या गावी त्यांच्या कार्याचा सत्कार करण्याची संधी आम्हा फेसवासियांना मिळाली.

सन १९४२–४३ ला 'ते आपले घर' या पूजनीय साने गुरुजीलिखित नाटकाच्या प्रयोगाचे उद्‌घाटन अण्णांच्या हस्ते करून रुपये ५०१।– ची थैली त्यांना अर्पण केली. त्यांचे चालते बोलते विधायक कार्य म्हणजे स्वोद्धारक विद्यार्थी गृह, दोंडाइचा. येथे आमचे

फेस-बामखेडे गावचे सुमारे २०० विद्यार्थी अण्णांच्या तालमीत तयार होऊन शिक्षित झालेले आहेत. त्या वेळच्या लागलेल्या सवयी व आचारविचार यांचा आयुष्यात फारच उपयोग झालेला आहे. सर्वच विद्यार्थी चांगल्या हुद्द्यांवर कामे करीत आहेत. दोंडाइचे हायस्कूलमध्ये श्री. रतिलाल गुलाल पाटील हे काही वर्षे शिक्षक म्हणून होते.

## अण्णा आणि शिस्त

### टिला झगडू पटेल, फेस

सन १९४८ ते ५० या कालावधीत स्वोद्धारक विद्यार्थी गृह, दोंडाइचे येथे माध्यमिक शिक्षणासाठी राहिलो. राष्ट्रीय भावनेने इंग्रजी शिक्षण स्पेशल क्लास व ८ वीपर्यंतचे शिक्षण, संलग्न असलेल्या आर. डी. हायस्कूलमध्ये घेतले. त्या वेळची अण्णांची शिस्त, शिवाय भयंकर अन्नटंचाईचा काळ. पुरेसे जेवण मिळत नसे व मिळे तेही निकृष्ट दर्जाचे. कारण संस्थाही राष्ट्रीय भावनेने उभारलेली. गरिबांतल्या गरीब विद्यार्थ्यास शिक्षण घेता यावे म्हणून अल्प मोबदल्यात केलेली सोय.

त्या वेळच्या एका रविवारची गोष्ट. माझ्या खोलीतील विद्यार्थ्यांची शेण गोळा करून खोली सारवण्याची पाळी. कधीही असे काम न केल्यामुळे बाजारात नदीकडे जाऊन शेण आणणे व खोली सारवणे आम्हाला कसेसेच वाटले. शिवाय अपरिपक्व बुद्धी व कोते विचार. सर्वच नवीन विद्यार्थ्यांचा भरणा. सर्वानुमते खोली सारवू नये असे ठरले. 'आपले काम आपणासच करावे लागेल.' अण्णांच्या या हुकुमाची अवहेलना करून साथ न देण्याचा आम्ही निर्णय घेतला.

याचा परिणाम फारच भयंकर व कठोरपणे अण्णांनी आम्हांस भोगावयास लावला. तेही काही कच्च्या गुरूचे चेले नव्हते. त्यांनी दोन्ही वेळ चूल पेटू दिली नाही. सर्वांना उपोषण घडविले. शेवटी आम्हा विद्यार्थ्यांस हार खावी लागली व आमचे काम आम्हास करून घेणे भाग पडले. त्यामुळे जीवनात स्वावलंबनाचे एक वेगळेच वळण मिळावयास अवसर मिळाला. कोणतीही कामे प्रतिष्ठित नाहीत व कोणतीही अप्रतिष्ठित नाहीत, सर्व समान आहेत ही राष्ट्रीय भावना जागृत होऊन त्याची गोड फळे आज चाखावयास मिळत आहेत. दुसऱ्यांना उदाहरण देताना अण्णा व स्वोद्धारक यांचे जिवंत प्रतिबिंब डोळ्यांपुढे उभटते. ही त्यांची देणगी न विसरण्याजोगी आहे.

आम्ही दररोजचे त्यांचे नित्यक्रम पाहात असू. पहाटे ४ ला उठून जोरजोराने घंटा बडवून सर्व विद्यार्थ्यांना जागवून अभ्यासाला बसविणे, बागेस पाणी घालणे, व्यायाम करणे, कपडे धुणे, बाजार करणे इ० सर्व कामे ते स्वतः करीत. आळस हा जीवन नष्ट करणारा फार मोठा शत्रू आहे असे ते म्हणत.

आता सर्व्हिसवर असतानासुद्धा अण्णांची आठवण व शिस्त पदोपदी डोळ्यांपुढे येते व कोणतेही हलक्यातले हलके काम करण्यास लाज, व कमीपणा वाटत नाही.

## अण्णा व स्वावलंबन

### ना. गो. मराठे

स्वोद्धारक विद्यार्थी गृहात मी विद्यार्थी म्हणून होतो. त्या वेळची शिकवण मला आज उपयोगी पडत आहे. वखारीतून लाकडे हमालाकरवी न आणता स्वतःच खांद्यावर आणली पाहिजेत ही शिस्त. ती मला धडगाव भागात शिक्षकाची नोकरी करताना उपयोगी पडली. सामान खांद्यावर वाहून नेण्याची व रोज पळण्याच्या व्यायामाची सवय अण्णांनी मला लावली नसती तर आज पाड्यापाड्यावरून [ पाडा– सातपुडा पर्वतातील उतरणीवरील विखुरलेली आदीवासींची वसतिस्थाने ] स्वतःचे बोचके खांद्यावर घेऊन मी जाऊच शकलो नसतो.

तेव्हा मात्र अण्णांचा आम्हाला खूप राग यायचा. पण आज शहरवासियांची फजिती पाहिली की वाटते स्वावलंबनात खूप अर्थ भरला होता.

## परोपकारी अण्णा

### ओंकार भाऊ भट, कोडदे ( ता. शिंदखेडे )

श्रीमान अण्णासाहेबांना काँग्रेसचे एकनिष्ठ सेवक व हरिजन सेवक संघाचे मंत्री म्हणून अखिल महाराष्ट्र ओळखत होता. माझा अल्पसा का होईना त्यांच्याशी परिचय झाला, त्यातून अण्णासाहेबांच्या स्वभावाची पारख झाली.

त्यांच्याजवळ परोपकार बुद्धी होती· विद्यार्थ्यांच्या मदतीसाठी त्यांचा हात नेहमी पुढे असे. मला आठवते १९६२ मधील एप्रिल महिन्याचा पहिला आठवडा होता. मी माझा वडील मुलगा चि· रवींद्र यास व्ह. फा. परीक्षेकरिता दोंडाइचे येथे घेऊन आलो होतो. त्या वेळीं प्राथमिक शिक्षकांची आर्थिक स्थिती सामान्य होती.

यासाठी स्वोद्धारक विद्यार्थी संस्थेच्या गृहात रवींद्राची जेवण्याची व राहण्याची सोय अल्पखर्चात लागेल त्यासाठी तुम्ही श्री. अण्णासाहेब टोणगावकर यांना भेटा असे माझे श्वशुर श्री. ज. दा. भट A. D. E. I. यांनी मला सुचविले. मी व रवींद्र जेव्हा संस्थेच्या कार्यालयात आलो तेव्हा अण्णासाहेब बाहेर गेले होते, म्हणून आम्ही तेथील व्यवस्थापक श्री. गिरासेसाहेब यांना भेटलो व आमची अडचण सांगितली.

" होस्टेलमध्ये आतापावेतो अपेक्षेपेक्षा जास्त विद्यार्थी घेतले गेले आहेत. म्हणून आता तुम्हाला घेता येत नाही. नाइलाज आहे. दोन दिवस अगोदर आला असता तर चांगले झाले असते. " व्यवस्थापकांनी सांगितले.

बेडिंग व पेटी घेऊन संस्थेच्या आवाराबाहेर पडत असतानाच अण्णासाहेबांचे लक्ष आमच्याकडे गेले, व आम्हाला त्यांनी बोलावून घेतले. मी त्यांना सर्व हकीकत सांगितली. इतरांच्या अडीअडचणींना धावून जाण्याच्या त्यांच्या स्वभावामुळे त्यांनी व्यवस्थापकांना बोलाविले.

" ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या अडचणी अगम्य असतात. त्यासाठी काहीही करून त्यांची सोय लावा." असे अण्णासाहेब म्हणाले. व्यवस्थापकांनीही अण्णांचे म्हणणे मान्य केले.

अण्णासाहेबांनी रवींद्राची उत्तम सोय लावली म्हणूनच त्याला पेपर चांगले गेले व तो प्रथम श्रेणीत उत्तीर्ण होऊ शकला. ही आठवण आम्ही विसरूच शकत नाही.

## अण्णा आणि आर. एस्. एस्.

### एस्. व्ही. तेली

अण्णांच्या निधनापूर्वी एक तास अगोदरच मी त्यांच्याकडे गेलो होतो. अण्णा नुकतेच धुळ्याहून गांधी जन्म शताब्दीचा कार्यक्रम आटोपून परतले होते. मी सहज भेटावयास गेलो होतो. आमच्यात नेहमीप्रमाणे काँग्रेस व आर. एस्. एस्.ची चर्चा झाली. अण्णा पक्के काँग्रेसवादी.

शेवटी अण्णा म्हणाले— " तुम्ही अजून काँग्रेस प्रवेश करीत नाही, त्याअर्थी आमच्यातच काही तरी कमतरता असली पाहिजे. माझा विश्वास आहे की तुम्ही आज ना उद्या काँग्रेसमध्ये यालच. "

अण्णा व संघ यात मतभेद जरूर होते. जातीयता त्यांना मान्य नव्हती. पण संघात जे जे चांगले ते घेतले पाहिजे असे ते म्हणत. संघाचा द्वेष त्यांनी कधी केला नाही. व्यक्ती म्हणून संघातील माणसांशी त्यांची जवळीक होती. संघिस्ट शिक्षक त्यांनी स्वोद्धारकमध्ये घेतले होते.

अण्णांच्या उदारतेची छाप त्यामुळे मजवर पडे. जमाखर्च करण्याला त्यांनीच मला शिकविले. याबाबत ते माझे गुरू होते.

# मर्यादा पुरुषोत्तम बहुगुणी अण्णा

ह. रा. उपासनी

" मेल्या-जित्याविषयी शोक ज्ञानवंत न जाणती "

अण्णा ३ ऑक्टोबर १९६८ ला पंचत्वात विलीन झाले. धुळ्यातील अनेक संस्थांशी त्यांचे निकटचे संबंध होते; सर्वांनी एकत्र येऊन धुळे स्वोद्धारक विद्यार्थी गृहाच्या आवारात शोकसभा आयोजित केली. सामान्य स्त्री शोकसागरात बुडाली असती, तोंड बाहेर काढले नसते. पण मंदाकिनी वहिनीही स्थितप्रज्ञ बनल्या होत्या. ज्या जागेवर ३३ वर्षांपूर्वी विवाह लागला होता त्याच जागेवर त्या पूर्वस्मृतीबद्दल गदगद अंतःकरणाने, दाटल्या आवाजाने शोकसभेत बोलत होत्या. मृत्यूविषयी अण्णांनीच त्यांना निर्भय बनविले होते.

अण्णात काय नव्हते ? तो एक संशोधनाचा विषय होईल. इतके अण्णा बहुगुणी होते. अण्णांनी जीवनातल्या प्रत्येक गोष्टीचे नियोजन केले होते, मी त्यासाठी १०० वर्षे जगेन असे ते आत्मविश्वासाने सांगत. मृत्यूचे कोडे मात्र त्यांना उमगले नाही.

अण्णांचा व माझा १९२३ पासूनचा संबंध होता. उभ्या जन्मात त्यांनी भांडणाचे प्रसंग येऊ दिले नाहीत. शेवटपर्यंत प्रेम ठेवले. अण्णांची त्या वेळी नामवंत विद्यार्थ्यांत गणना होती. सर्वश्री सेनापती बापट, साने गुरुजी, अच्युतराव पटवर्धन, रावसाहेब पटवर्धन आदी बरीच मंडळी धुळ्यास येत त्या वेळी त्यांची स्वोद्धारकला भेट असे. त्या वेळी अण्णा स्वोद्धारकची अंतर्व्यवस्था पाहात; त्यामुळे अण्णांचा या सर्वांशी चांगला परिचय झाला व सर्वांची छाप अण्णांवर पडली.

आयुष्यात सर्व गोष्टी त्यांनी वक्तशीर केल्या. उशीर झाल्याने त्यांची गाडी कधी चुकली नाही, उशिरा उठलेले कधी आम्ही पाहिले नाही, कोणी सांगितले नाही. ते एक महान कर्मयोगी होते ! चिकाटी हा एक त्यांचा विशेष गुण होता. स्वोद्धारकचा लागा (मदत) दोंडाइचेकरांनी मतभेद झाल्याने बंद केला होता. तो त्यांनी परत मिळविला. मिठाच्या सत्याग्रहात लाठीमार सुरू होताच सारे पळाले; अण्णा मात्र खंबीर. त्यांनी लाठी हल्ला झेलला. " हाऊ खरा मराठा ! " असे माधवराव कापडणेकर म्हणत. अण्णा खरेखुरे लढवय्या होते. त्यांचा उत्साह कधी मावळला नाही. ते समाजसुधारक होते. अस्पृश्यता त्यांनी पाळली नाही. ते उत्तम कवी, लेखक व वक्ते होते. सात-आठ वेळा तुरुंगवास भोगून त्यांनी राष्ट्रीय वृत्ती दाखवली. अत्यंत प्रतिकूल व गरीब अवस्थेत अण्णांनी संसार केला. काटकसर, कमीत कमी गरजा, स्वावलंबन हा त्यांच्या प्रपंचाचा पाया होता. एकच मुलगा व त्याला डॉक्टर बनवून देशसेवा करावयास लावण्याचे अण्णांचे स्वप्न अण्णाच साकार करू जाणे ! अण्णा मर्यादा पुरुषोत्तम होते. जीवनात प्रत्येक ठिकाणी

त्यांनी मर्यादा घातल्या होत्या व त्या त्यांनी पाळल्या होत्या, त्यांचे आवडते गाणे—
" नियम पाळावे। जरी म्हणशील योगी व्हावे " याप्रमाणेच ते अत्यंत संयमी होते.

**" उद्योगाचे घरी ऋद्धि-सिद्धी पाणी भरी "**

अण्णांच्या जीवनाकडे पाहिल्यावर याचा साक्षात्कार होतो. मृत्यूच्या आदल्या रात्री ते हरिजन सेवा दौरा आटोपून परतले होते. शेवटच्या क्षणापर्यंत देशसेवेचे भाग्य त्यांना लाभले. धन्य ते अण्णा! धन्य त्यांचे जीवन!!

## राष्ट्रसेवक अण्णा

**ज. ना. जोशी,** धुळे

अण्णांचे प्राथमिक शाळेतील गुरुजी भावे हे होते. त्यांच्या प्रेरणेने अण्णांनी विविध उद्योग सुरू केले. त्याचे शिक्षण त्यांनी अनेकांकडून युक्तिप्रयुक्तीने घेतले. श्री. बाळा मिस्त्री यांच्या फर्निचर कारखान्यातही त्यांनी शिक्षण घेतले. कारखाना बंद असताना ते प्रवेश मिळवीत. हत्यारांचा वापर करून स्वतःच शिकत. बाळा मिस्त्रींच्या पुढे हे लक्षात आले होते. पुढे स्वोद्धारकमध्ये औद्योगिक शिक्षण देण्याचा प्रयोग सुरू झाला. अण्णा त्याचे अध्वर्यू होते. खडू, टूथपावडर, पेनबाम, लाकडाच्या विविध वस्तू; अशा अनेक वस्तू मुलांनी बनविल्या. अण्णांनी याचे एक प्रदर्शन धुळ्यात भरवले. खूप कौतुक झाले. हे प्रदर्शन दोंडाइचे येथे भरविण्याचे ठरले; म्हणून या वस्तू गाडीत भरल्या. विश्रांतीसाठी गाडी डांगुरणे येथे थांबली. मी, अण्णा व हरिबापू आदी गाडी-बरोबर होतो. अण्णांना सकाळी न्याहरी लागे. अण्णांनी दशम्या बरोबर घेतल्या होत्या. हे सारे उशाशी घेतले व झोपले. कुत्र्याला वास लागला. कुत्र्याने अण्णांची न्याहरी पळवली. अण्णा सकाळी उठले. प्रातर्विधी, स्नान, व्यायाम आटोपला. न्याहरी पाहू लागले; पत्ता नव्हता, लांब कोठेतरी, कुत्रा न्याहरी घेऊन गेलेला दिसला. अण्णांच्या तोंडून—

**" मधुपोळ हाय गेला। नुसता सुवास उरला "**

ही कविता सहजस्फूर्त बाहेर आली. मी व बापूंनी मात्र अण्णांची नुसती मजा पाहिली.

अण्णा सिनेमाच्या अगदी विरुद्ध! सिनेमा पाह्यचा नाही हा अण्णांचा निर्धार. 'ब्रह्मचारी' खेळ लागला होता. अण्णांना खूप आग्रह केला. अण्णा ऐकेच ना. अण्णांनी सिनेमाला यावे म्हणून मी त्यांच्याविरुद्ध सत्याग्रह पुकारला, शेवटी केवळ एका मित्राच्या आग्रहास्तव अण्णांनी 'ब्रह्मचारी' पाहिला.

अण्णांनी ब्रह्मचारी राहून देशसेवा करावी असे ठरविले होते. पण ब्रह्मचारी पाहिल्यावर अण्णांनी ' संसार करून देशसेवा ' या आमच्या मताला पुष्टी दिली. आणि तेवढ्याचसाठी अण्णांनी सिनेमाला यावे असा खटाटोप होता. आम्ही विजयी झालो, पण अण्णांचा रोष मात्र राहून गेला.

सन १९३२ ला अण्णांना दोन महिन्यांची शिक्षा झाली होती. नंतर रोज हजेरी द्यावी म्हणून सुटका करण्यात आली, परंतु अण्णा भूमिगत झाले, त्यामुळे पुन्हा पकड-वॉरंट निघाले. या वेळीं माझे एक नातेवाईक पोलीस होते, ते वारंवार अण्णांचा पत्ता विचारीत. कारण अण्णांना पकडून देण्यात त्याला बढती मिळणार होती. मी नातेवाईकांचा संबंधच तोडून टाकला.

१९४२ च्या चळवळींत अण्णा पकडले गेले, त्यांच्या वॉरंटमध्ये रंगनाथ ऐवजी रघुनाथ राजाराम टोणगावकर असे नाव चुकीने पडले. अण्णांचा खटला चालविणाऱ्या श्रीमान अ. वि. टिळक या वकिलांनी माझी साक्ष काढली. त्या वेळीं अण्णांचे नाव रघुनाथ नसून रंगनाथ आहे असे नोंदविले. अल्पशी मदत माझ्या मित्राला मौल्यवान ठरली. अण्णांना चुकीच्या वॉरंटमुळे लगेच सुटका मिळाली. जेलपेक्षाही बाहेरच त्यांचे कार्यक्षेत्र त्यांची प्रतीक्षा करीत होते.

## एक सेवाभावी जीवन

### श्री. एस्. बी. राजपूत

सन १९३० ते १९४७ पर्यंत अण्णा सत्याग्रही होते. सत्याग्रही कौटुंबिक माया तोडतो, निर्धन असतो, पैशांना तुच्छ समजतो; अण्णा सत्याग्रहीच्या भूमिकेत अगदी योग्य होते. अनेक वेळा त्यांना तुरुंगवास घडला, पण खादीधारी अण्णा गांधीवादापासून परावृत्त झाले नाहीत. स्वातंत्र्य लढ्याशिवाय दारूबंदी, साक्षरता प्रसार, हिंदी प्रचार, राष्ट्रीय शिक्षण अशी विधायक कार्ये ते करीत राहिले. महाराष्ट्र त्यांचे कार्यक्षेत्र राहिले. अनेक राष्ट्रीय समस्या सोडविण्यासाठी स्वयंसेवकाची भूमिका त्यांनी केली.

सन १९६४ पर्यंत अण्णा स्वो. वि. संस्थेचे सेक्रेटरी होते. तदनंतर श्री. दादासाहेब राऊळ यांनी माझ्यावर हा बोझा सोपविला. मी असिस्टंट सेक्रेटरी असताना त्यांच्या आदर्श जीवन सान्निध्यात मला राहावयास मिळाले. हे मी माझे भाग्य मानतो.

मुलाला डॉक्टर करीन असे अण्णांचे विचार. मुलगा डॉक्टर झाला. खेड्यात दवाखाना असावा, ग्रामीण रोग्यांची सोय व्हावी म्हणून एम्. एस्. झालेल्या मुलाने दोंडाइचे येथे हॉस्पिटल काढावे, ही त्यांची इच्छा मुलाने पुरी केली. अण्णांच्या कौटुंबिक

सुखाचा प्रारंभ झाला होता. परंतु त्या योगी पुरुषाने सुखाला आकर्षक केंद्र बनविले नाही.

**सुखदु:खे समे कृत्वा लाभा लाभौ जया जयौ**
**ततो युद्धाय युज्यस्व नैवं पापमवाप्स्यसि ।**

ह्या न्यायाने सुखातही कष्टमय सेवाभावाचा त्यांनी त्याग केला नाही. ऑक्टोबर १९६८ पर्यंत, अर्थात शेवटच्या क्षणापर्यंत ते देशसेवा करीत राहिले.

थोर मनाचे महामानव, त्यागी हरिजन, अनंतात विलीन झाले. खूप खूप चालणारे अण्णा विसावले. गावाचे सर्व व्यवहार थंडावले. महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यांतून सच्चा सेवकांचा ओघ दोंडाइचेकडे सुरू झाला. रामधूनच्या नादात तिरंगी झेंड्याच्या आवरणाखाली अण्णा चिरनिद्रित होते. अण्णा अमर झाले. त्यांनी केलेले कार्य हीच त्यांची बोलकी स्मारके आहेत. ही स्मारके नवागतांना पथदर्शन करतील.

## एक मूर्तिकार

### नथू दौलत पाटील

अण्णा माझे गुरू. त्यांच्या सान्निध्यात कितीतरी मौलिक विचारांची ओळख होत असे. अण्णांची आईही अतिशय सोज्वळ प्रकृतीची बाई होती. कोणालाही मदत करण्यास त्या सदैव तत्पर असत. अण्णांना त्यांच्या आईने घडविले. त्यांच्यावर आईचे संस्कार अधिक होते. तरीपण असे म्हटले तर अतिशयोक्ती होणार नाही, की अण्णा ही स्वतःच अशी एक व्यक्ती होती की मूलतःच चारित्र्याने पवित्र, निष्पाप, परहितात स्वहित पाहणारी, निर्व्याज देशप्रेमाने झंझावाती बनलेली, मातृभक्तीने ओथंबलेली.

अण्णांच्या सान्निध्यात कितीतरी तरुण देशप्रेमाने झपाटले होते. मी तर अण्णांना त्या वेळच्या तरुणांवर संस्कार करणारे मूर्तिकार समजतो. पण अनादी काळापासून लोक मूर्तीलाच भजत असतात. समाज, कुटुंब यांची पर्वा न करता अविरत श्रम करणाऱ्या वेड्या मूर्तिकाराला लोक विसरतात, व त्याने तयार केलेल्या मूर्तीवरच पुष्पहारांचा वर्षाव करून आपली टाळी ब्रह्मानंदी लावतात. अण्णांच्या बाबत अगदी तसेच झाले आहे. अण्णांचे चरित्र कधीच लिहिले जावयास हवे होते.

आजही अण्णा नसले तरी त्यांच्या नैतिकतेचे वजन माझ्यावर आहे. अण्णांना चपला काढून हातात नेण्याची वेळ आली व मी जर जवळ असलो तर अण्णांना आवडले नाही तरी चटकन त्यांच्या चपला उचलत असे. त्यांच्या चपला हातांत घेण्यात मला

कधीच कमीपणा वाटला नाही. माझ्या आयुष्यात कितीही मोठा अधिकारी मला भेटला तरी मी त्यांच्या चपलांना कधी हात लावला नाही. ती मला मानहानी वाटली असती.

अण्णा अमळनेरला आले की मला भेटल्याशिवाय कधीही गेले नाहीत. ते आमच्याशी वडील बंधूच्या नात्याने वागत. मनात जर आले की आपल्याला अण्णांची भेट आवश्यक आहे, तर काय आश्चर्य–ते हजर होत असत. माझा विवाह अण्णांच्या व वहिनींच्या सल्ल्यानेच जुळून आला, नाहीतर कोठे तांदळी व कोठे चोपडे. अण्णांचे उदाहरण डोळ्यांपुढे ठेवून त्यांच्याच आग्रहावरून पत्नीला शिकविले व तिच्या साहाय्याने संसाररथचक्र चालविला. म्हणूनच माझा मुलगा एम्. एस्सी., पीएच्. डी. झाला व त्याला त्याची पत्नीही त्याच योग्यतेची एम्. एस्सी., पीएच्. डी. मिळाली.

माझ्या पत्नीत व माझ्यात जर बेबनाव झाला तर ती मला तिच्या जिजींचा ( मंदाकिनीबाई ) व अण्णांचा धाक दाखवीत असे, कारण तिला याची पूर्ण कल्पना होती मी यांचा शब्द कधीही अमान्य करीत नसे. अशा अण्णांना मी ते गेले असे समजतच नाही. आजही ' अण्णा असते तर त्यांना असे आवडले नसते ' असे मी मनाशी म्हणतो.

## पितृतुल्य अण्णा

### डॉ. सौ. आशा र. टोणगावकर

आपल्या आयुष्याचा जोडीदार कसा मिळेल ? कसा वागेल ? सासरची माणसे कशी असतील ? असे निरनिराळे विचार मला सतावू लागले होते. कारण माझी एम्. बी., बी. एस्.ची परीक्षा संपली होती व इन्टर्नशिप् चालू होती. आता विवाह करण्यास हरकत नाही असे आई-वडिलांचे विचार चालू झाले होते.

एकदा बापू ( माझे वडील ) रस्त्याने जात असताना श्री. मोहनीराज देशमुख भेटले व म्हणाले, ' काय गोविंदराव, आशासाठी चांगले स्थळ सुचवू का ? मुलगा एम्. एस्. आहे. प्रत्येक वर्षी पहिला आलेला आहे. घरची मंडळी चांगली आहेत. हुंडा घेणार नाहीत. मुलाच्या वडिलांनी आशाला पाहिले आहे. त्यांना ती पसंत आहे. परवा माझ्याबरोबर हरिजन सेवक संघाची वर्गणी गोळा करण्यासाठी जे अण्णासाहेब टोण-गावकर आले होते ना त्यांचा मुलगा. ' वगैरे गोष्टी झाल्या. बापू घरी आले अन् त्यांनी मला व सौ. आईस ही हकीकत सांगितली. मला खरेच आश्चर्य वाटले; चार दिवसां-पूर्वीचा प्रसंग आठवला.

सकाळी सात-सव्वासात वाजताची वेळ, मी स्वयंपाकघराच्या दाराशी आरामात दात घासत बसले होते. तेवढ्यात मोहनीराज देशमुखांची, ' आहेत का गोविंदराव

घरात ' म्हणून मोठ्याने हाक ऐकू आली. सौ. आई शाळेत गेली होती. बापूंना दम्याचा त्रास रात्री खूप झाला होता. नुकतीच झोप लागली होती. बापूंना उठवू नका, म्हणून मी श्री. मोहनीराजांना म्हणणार होते, तेवढ्यात त्यांच्याबरोबर आलेल्या गृहस्थाकडे माझे लक्ष गेले. ते प्रथमच आमच्याकडे आलेले होते. खादीचे शुभ्र कपडे, डोक्यावर पांढरी गांधी टोपी व काखेत खादीचीच एक शबनम पिशवी घेतलेले गौरवर्णी गृहस्थ. त्यांच्याकडे पाहिल्यावर लगेच आदर निर्माण होईल, अशी मध्यम उंचीची सुदृढ मूर्ती. माझ्या मनातील विचार लगेच बदलले. मी चटकन उठून पिंपाजवळ तोंड धुतले, व त्यांना आत बसावयास सांगितले. ते गृहस्थ म्हणजेच अण्णा. चहा घेत नसल्यामुळे त्यांना दोघांना दूध दिले व नंतर थोड्या वेळाने यावयास सांगितले. झोपेतून उठल्यामुळे माझा तर अवतार कसा असेल तो विचार न केलेलाच बरा! अशा अवस्थेत त्यांनी मला प्रथम पाहिले व पसंत केले. नंतर सर्वजण त्यांना गंमत म्हणून म्हणत, " अण्णा, डोळ्यांनी फारसे दिसत नसल्यामुळेच तुम्ही अशी काळी व चष्मा असलेली मुलगी पसंत केली- काय सुंदर दिसले कोण जाणे तिच्यात. " पण अण्णांनी मात्र मला माझ्या सर्व गुणदोषांसकट पसंत केले होते; अन् माझ्या नशिबानेच मला चांगले प्रेमळ सासर मिळाले.

लग्न ठरल्यानंतर साड्या खरेदी करण्यासाठी व इतर नातेवाइकांना आपली स्नुषा दाखविण्यासाठी अण्णा स्वतः मला मुंबईला घेऊन गेले होते. तेथील लोकांना रवीची पत्नी म्हणजे मी, फारशी पटली नसावी; पण अण्णा मात्र म्हणायचे, " मला पाहिजे तशी सून मी मिळविली आहे. " त्यांच्या चेहऱ्यावरील तो शांतपणा—करारीपणा कधीच ढळला नाही. मी चष्मा न लावताच सगळीकडे यावे अशी माझ्या चुलत सासूबाईंची इच्छा होती. त्यांना चष्मा लावलेला पसंत नव्हता, परंतु मी तर चष्म्यावाचून कोठे जाऊच शकत नव्हते. शेवटी मी अण्णांनाच विचारले, ' मी चष्मा लावू का ? " अन् त्यांनी लगेच सांगितले, " अग लाव की, नजर कमी झालेल्यांचा तो अवयवच आहे अन् रवी नाही का लावत ? तुझ्यावरच का बंधन ? " सगळी मंडळी अपरिचित असताना अण्णांचे ते बोल फारच बरे वाटले. मात्र मला शालू पसंतच पडत नव्हता. अनेक दुकाने पालथी घातल्यावर एका शेवटच्या दुकानात आम्हा सर्वांनाच एक शालू पसंत पडला. आम्ही सर्वच वैतागलो होतो, पण अण्णा मात्र शांत होते. इतका सोशिकपणा आमच्या कोणाजवळच नव्हता.

लग्न झाल्यानंतर ह्या शांत सुस्वभावाचा अनुभव मला क्षणोक्षणी आला. वटपौर्णिमेची गोष्ट, मी प्रथमच नगरहून दोंडाइच्यास सासरी दोन दिवसांकरिता जात होते. माझी सर्व पातळे व गळ्यातील तन्मणी ज्या सूटकेसमध्ये होता, ती सूटकेस श्रीरामपूरला रेल्वेतून चोरीला गेली. मध्यरात्र होती. मी तेथेच गाडीतून उतरून रेल्वे-पोलिसांकडे त्याची नोंद केली. पोलिसांना बरोबर घेऊन माझ्या काकांकडे गेले. नंतर वटपौर्णिमेला एकटीच रडत रडत दुपारी दोन अडीचच्या सुमारास दोंडाइच्यास पोहोचले. सर्वच वाट पाहून कंटाळले होते व मी येत नाही असा त्यांचा समज झाला होता. अण्णा आंब्याचा रस

काढीत बसले होते; शेजारीच दादामामा (माझे मामेसासरे) बसले होते. आई स्वयंपाक करीत होत्या. घरात मी रिकामीच भीत भीत शिरले. सर्वजण काय म्हणतील? कोणत्या प्रसंगाला आपल्याला तोंड द्यावे लागणार? हे विचार गर्दी करीत होते. रवीने विचारलेच, 'सामान कुठे आहे?' अन् मग मला आणखीनच रडावयास यायला लागले. शेवटी मी हिंमत करून सगळे सांगितले. अन् अण्णा अगदी हसत हसत म्हणाले, 'चला! बरे झाले! एक दिवस तरी तू एका साडीनिशी राहणार! किती तरी स्त्रियांना अब्रुरक्षणापुरतेच वस्त्र मिळते. ज्याचे असेल तो घेऊन गेला.' रवीनेही त्यांच्या म्हणण्यातच होला हो मिळविला. म्हणाला, 'तुला नवीन नवीन पातळांची फार हौस ना; म्हणून न नेसताच खूप साठविल्यास त्या साड्या साऱ्या गेल्या.' अण्णा तेवढ्यात हसत म्हणाले, 'जा पटकन् अंघोळ कर व रवीने लावलेल्या वडाची पूजा कर, म्हणजे मग सगळ्यांनाच आंब्याचा रस खाता येईल. आम्हाला केव्हाची भूक लागली आहे.' अन् मग माझ्याही रडव्या गंभीर चेहेऱ्यावर किंचित हासू आले अन् खूप बरे वाटले. दुर्वचन, उपरोध, हेटाळणी कोणाच्याच तोंडी नव्हती. नंतर पाच-सहा दिवसांनी सूटकेस परत मिळाली. त्यातील काहीच गेले नव्हते. मी आल्या प्रसंगाला धैर्याने तोंड दिले होते. अण्णांनी माझे कौतुकच केले.

अण्णांचे आपल्या मनावर जसे नियंत्रण होते तशीच त्यांची इच्छाशक्तीही प्रभावी होती. एखादी गोष्ट करावयाची त्यांनी ठरविली, किंवा त्यांच्या मनाने तसे घेतले की मग कोणी त्यांना बदलवू शकत नव्हते. सुरवातीच्या काळात क्ष–किरण यंत्र पैशाच्या अभावी आम्हाला घेता येत नव्हते, व एक्स–रे मशीन घेतल्याशिवाय सर्जरीचे काम निश्चित करता येत नव्हते, म्हणून अण्णांचे आम्हाला एकच आग्रहाचे सांगणे की कोठूनही कर्ज काढा. तुमचे कर्ज मशीनच फेडील. कारण त्याच्यामुळे तुमचे निदान अचूक ठरेल व रोग्याला तुमच्या उपचाराचा योग्य फायदा होईल.

सन १९६८ च्या वर्षप्रतिपदेला आमच्या हॉस्पिटलचा एक वर्षीय वर्धापनदिन होता. अण्णा त्या वेळी घरीच होते. त्यांचे म्हणणे की, या मुहूर्तावर मशीनची पूजा झालीच पाहिजे. सीमेन कंपनीत कर्मचाऱ्यांचा संप होता, त्यामुळे मशीन लवकर मिळाले नाही. वर्षप्रतिपदेला दुपारी आम्ही घरी जेवण्याकरिता गेलो; मशीनचा पत्ताच नव्हता, त्यामुळे आम्ही सगळेच म्हणालो, 'अण्णा, तुमचे शब्द खोटे ठरताहेत', पण तेवढ्यात आमच्या येथे काम करणारे रामभाऊ सांगावयास आले की, 'ट्रकमधून मोठी खोकी आली आहेत, ट्रकवाला पैसे मागतो आहे.'

'करा मुहूर्तावर पूजा' अण्णा संतोषाने म्हणाले.

आमचे पहिले अपत्य म्हणजे राजश्री. तिच्या जन्माच्या वेळी अण्णा फिरस्तीवर होते. लगेच दोन दिवसांनी ते घरी आले. त्या वेळी त्यांना डोळ्यांनी फारच कमी दिसत होते. मला आठवतं, माझा दाराशीच पलंग होता. अण्णा त्यावर बसले, मांडीवर राजनला घेतले व त्यांचे वाचण्याचे भिंग डोळ्यांजवळ धरून त्या आमच्या छोट्याशा

चिमुरडीला कौतुकाने पाहू लागले. तिचा काळा रंग त्यांच्या डोळ्यांना खुपत नव्हता; तर तिचे टपोरे डोळे व तरतरीत नाक ह्याचेच कौतुक करणे चालले होते. कोणीतरी म्हणाले, ' अण्णा मुलगीच झाली आहे, बरं का! ' अण्णा त्यावर उत्तरले, ' हा भेद आहेच का? ह्या भेदाच्या विरुद्धसुद्धा आघाडीच उघडायला हवी. ' त्यानंतर जेव्हा ते घरी येत त्या वेळी अगदी रंगून तिच्याशी गप्पा मारत, जणू काही त्या एक-दीड महिन्याच्या राजनला सारे समजतेच आहे. राजनचा जन्म १० मार्च १९६८ चा, म्हणजे उन्हाळ्यातील. खानदेशमधील कडक उन्हाळ्यामुळे ती रात्री जागायची, त्यामुळे माझी झोप अपुरी व्हायची. मी पहाटे ६ च्या सुमारास अण्णांच्या स्वाधीन तिला करायची. त्या थंड वेळी अण्णा तिला बाबागाडीत झोपवून फिरवीत असायचे. मला उठवतदेखील नसत; दुधाची बाटली भरून तिला पाजायचे; मला कोणी उठवू लागले तर त्याला विरोध करीत. असे कौतुक फक्त मलाच मिळाले.

पण हे सुख आम्हाला फार दिवस लाभले नाही. शेवटी शेवटी ते फारच थकल्यासारखे वाटायचे. आपल्या दुखणाऱ्या पायांची त्यांनी कधी तक्रार केली नाही. स्वतःच स्वतःचे पाय दाबत अन् चोळीत असत. गांधी जन्मशताब्दीचे वर्ष पार पडल्याशिवाय मी घरी बसणार नाही, निवृत्त होणार नाही असे ते नेहमी म्हणत. वंशपरंपरागत मधुमेह त्यांना होताच. मोतीबिंदूचे ऑपरेशन होऊनही डोळ्यांनी फारसे दिसत नव्हतेच. तरी मुंबईचा प्रवास चालू असे. शहरातून अंदाजाने सायकल चालवीत. मला नेहमी तेच आश्चर्य वाटे अन् अपघाताची भीतीही वाटे. पण भीती हा शब्दच त्यांच्या कोशात नव्हता; जवळ होता फक्त करारीपणा, आशावाद, निःस्पृहीपणा, दुर्दम्य इच्छाशक्ती, मानवी मूल्यांबद्दल अचल निष्ठा व कमालीचा शांतपणा. त्यांच्या स्वभावातील शांतपणामुळे व चिकाटीमुळे लोक त्यांना मानीत असत व आजही मानतात; हे आमच्याकडे येणाऱ्या अनेक लोकांच्या तोंडून समजते.

## स्वातंत्र्यवीर

**य. के. दशपुत्रे**, सेवानिवृत्त शिक्षक, नंदुरबार, जि. धुळे

( १ ) सन १९३२–३३ सालातील गोष्ट. मी धुळे येथील स्वोद्धारक विद्यार्थी गृहात होतो. कै. अण्णासाहेब तर त्या संस्थेतील आरंभीचे विद्यार्थी. त्यांना आट्यापाट्या हा खेळ मनापासून आवडे. आम्ही रोज सायंकाळी आट्यापाट्या खेळत असू. खेळाचे गट दोन. एका गटाचे गट प्रमुख श्री. नवलभाऊ व दुसऱ्या गटाचे प्रमुख श्री. अण्णा. मी नेहमी श्री. अण्णांच्या गटाकडून खेळत असे. आट्यापाट्या खेळातील कोंडी फोडणे

म्हणजे अत्यंत कठीण. परंतु श्री. अण्णांना ही कोंडी फोडणे म्हणजे हातचा मळ वाटत असे. सूरपाटी धरणाऱ्याला मोठ्या शिताफीने हुलकावणी देऊन ते कोंडी फोडत असत. तसेच पार्टीच्या कडेच्या बाजूने पाटी ओलांडणे अत्यंत कठीण. ही पाटी आमच्याबरोबरचे मित्र श्री. नारायण विष्णू भावे जे हल्ली पुण्यात नामांकित डॉक्टर आहेत ते सहज लीलेने ओलांडीत. मला मात्र हे काही जमत नसे. पण श्री. अण्णांनी हे मला शिकविले. पाटी ओलांडताना पाय कसा उचलावयाचा, पाटी धरणाऱ्यास कशी हुलकावणी द्यावयाची हे सर्व त्यांनी मला बरोबर घेऊन शिकविले. आठ-दहा दिवसांत या खेळण्यात मी तरबेज झालो. मला आट्यापाट्या खेळण्याची गोडी जर कोणी लावली असेल तर ती कै. अण्णांनीच. त्या खेळांच्या व्यायामामुळेच मी आज वयाच्या ६७ व्या वर्षीही दिवसातील १०–११ तास बौद्धिक काम करीत असतो. याचे सर्व श्रेय कै. अण्णांनाच आहे.

(२) कै. अण्णांना पोहण्याचा अत्यंत नाद होता. नकाण्याच्या तलावात हातात भाकरी घेऊन ती खात खात ते दोन-दोन, तीन-तीन तास पोहत असत.

मला पोहता येत नसे. पाणी पाहिले की मला भीती वाटायची. एकदा आम्ही काही मुले कै. अण्णांना बरोबर घेऊन वाडीभोकरच्या विहिरीवर पोहावयास गेलो. मला पोहता येत नाही हे त्यांना माहीत होते. सगळ्यांनी विहिरीत भराभर उड्या मारल्या. मी मात्र विहिरीच्या काठावर बसून त्यांची गम्मत पाहात बसलो. मागून हळूच अण्णा आले व त्यांनी मला अलगद विहिरीत ढकलून दिले. झालं मी पाण्यात गटंगळ्या खाऊ लागलो. एक-दोन गटंगळ्या खाल्ल्या असतील इतक्यात अण्णांनी वरून खाली उडी मारली व मला धरले. मी तर घाबरूनच गेलो होतो. ते मला म्हणाले, " अरे, यशवंता, पाण्यात बुडाल्याशिवाय तू पोहण्यात यशस्वी होणार नाहीस. " असे म्हणून माझा हात धरून दोराच्या साह्याने मला त्यांनी पोहणे शिकविले. मी जरी पट्टीतला पोहणारा नसलो तरी पाण्यात पडलो तर बुडून मरणार नाही. माझ्यापुरता तरी पोहून पाण्यातून बाहेर निघेन. अण्णांनी जर मला पोहणे शिकविले नसते तर मी पोहणे या व्यायामापासून अतिशय दूर राहिलो असतो. हे सर्व कै. अण्णांमुळेच घडून आले.

१९३० साल. हे साल म्हणजे भारताच्या स्वातंत्र्य संग्रामातील अतिशय क्रांतिकारक साल होय. कायदेभंगाच्या चळवळीने उग्र स्वरूप धारण केलेले होते. या आमच्या संस्थेतील दोन स्वातंत्र्यवीर म्हणजे एक नवलभाऊ व दुसरे कै. अण्णा या दोघांनी संस्थेचा राजीनामा देऊन या लढ्यात भाग घेतला. मिठाचा कायदेभंग झाल्यावर जंगलचा सत्याग्रह सुरू झाला. संस्थेचे दोन म्होरके संस्थेतून निघून गेल्यावर आम्ही बाकीची मुले स्वस्थ कशी बसणार ?

मी त्या वेळी संस्थेच्या बँड पथकात होतो. आम्ही बँडची जवळजवळ वीस मुले होतो. आम्ही मुलांनी आमच्या संस्थेचे आजन्म सेवक परमपूज्य कै. नानासाहेब देशपांडे

यांच्याकडे संस्थेचा राजीनामा पाठविला. आम्हाला गायडन्स करणारे म्हणजे आमचे म्होरके कै. अण्णासाहेबच.

ते आमच्या अगोदर संस्थेतून बाहेर पडले. साक्री तालुक्यातील दिवाळ्या मावळ्या डोंगरावर जंगलचा सत्याग्रह ठरला होता. तो सत्याग्रह दिघाव्याचे श्री. आत्माराम बाबा कुलकर्णी वकील यांच्या हस्ते होणार होता.

आम्ही सर्व मुले बँडचा ताफा घेऊन त्या डोंगराकडे जाण्यास निघालो. कै. अण्णांनी आम्हाला आगाऊ सर्व सूचना देऊन ठेवल्या होत्या. पोलीस तुम्हाला हटकतील. वेळ पडली तर तुमच्या बँड वाजविण्याच्या वस्तू हिसकावून घेतील. उलटसुलट प्रश्न विचारतील. त्यांना उत्तरे कशी द्यावयाची याची तालीम त्यांनी अगोदर आमच्याकडून करवून घेतली व आम्हाला निडर बनविले.

झाले आम्ही त्या डोंगरावर चढलो. कै. अण्णा तर आमच्या पुढे. पोलिसांनी आम्हाला हटकले. आम्ही त्यांच्या प्रश्नाला योग्य ती प्रतिउत्तरे दिली. बँडच्या त्या मंजुळ आवाजात श्रीकृष्णाष्टमीच्या दिवशी जंगल सत्याग्रह झाला. ' जंगल का कायदा तोड दिया ' ही रणगर्जना आम्ही सर्वांनी केली. आमच्या मागे हजारो भारतीयांनी वरील गर्जना केली. डी. एस्. पी. ने आम्हा बँडच्या मुलांना सोडून दिले. आम्ही बँड वाजवत वाजवत साक्रीला श्री. गोपाळ गुलाबराव भोसले यांच्या घरी आलो. आमच्या अगोदर अण्णासाहेब तेथे हजर. मुलं थकून येतील, म्हणून त्यांनी आमच्याकरिता तेथे पिठलं-भाकरीचे जेवण तयार करून ठेवले होते. आम्हालाही सडकून भूक लागली होती. आम्ही पिठलं-भाकरीवर यथेच्छ ताव मारला. दुसरे दिवशी आम्ही धुळ्यास परत आलो. या सर्व गोष्टी ह्या निधड्या छातीच्या, निर्भयवृत्तीच्या खंद्या स्वातंत्र्यवीरामुळेच (कै. अण्णासाहेबांमुळेच) घडून आल्या. असे होते आमचे कै. अण्णासाहेब. त्यांना माझे शतशः प्रणाम.

## पू. अण्णासाहेबांच्या सान्निध्यातील एक तप

**दत्तात्रय भीमराव घुले**, स्वातंत्र्य सैनिक व हरिजन सेवक, धुळे.

अण्णासाहेब हे एक आदर्श व्यक्तिमत्त्व. त्यांना पाहिल्यावर समाधान व आदर वाटावयाचा त्यांचा पेहराव एखाद्या मंत्र्यासारखा असायचा. ते एक हाडाचे व खंदे स्वातंत्र्य सैनिक होते. ते स्वतःला राष्ट्राचे सैनिक समजून अहर्निश राष्ट्रसेवा व समाज सेवा करीत असत.

ते स्वतः स्व-उद्धारक होते. त्यांचे शिक्षणही स्वोद्धारक विद्यार्थी गृहातच झाले आणि आपल्या जीवनाचा महत्त्वाचा वेळ त्याच संस्थेच्या विद्यार्थ्यांच्या सेवेत अर्पण करून राष्ट्राचे खरे आधारस्तंभ त्यांनी निर्माण केले.

हरिजन सेवक संघात १९५४ साली त्यांचे सेक्रेटरी म्हणून पदार्पण झाले. स्व. पू. काकासाहेब बरवे यांच्यानंतर दलित सेवकांतील अग्रलेख लिहिण्याचे काम थंडावले

होते. ते त्यांनी आपल्या खंबीर व प्रखर लेखणीने लिहून ती उणीव पूर्ण केली व वाचकांची वाचण्याची गोडी सतत वाढत गेली.

हरिजन सेवक संघाची ग्रँट ६–६ महिन्यांनी मिळत असे. त्यामुळे प्रचारकांना दरमहा मानधन मिळत नसे. म्हणून अण्णासाहेब जिल्ह्या-जिल्ह्यांत फिरून महिन्याकाठी ८०० ते ९०० रु. पर्यंत वर्गण्या मिळवत असत. त्यामुळे कमी पगाराच्या व अडचणीत असलेल्यांचे पगार वेळेवर मिळून त्यांची गरज भागविण्याचे पुण्याचे कार्य करीत असत.

आपल्या सामानासाठी प्रवासात हमाल करणे त्यांना आवडत नसे म्हणून ते स्वतःचे सामान स्वतःच वाहून नेत असत. म्हणून त्यांनी त्यासाठी दोन बगलेच्या खाकी पिशव्या शिवून घेतल्या होत्या. ते स्वतः स्वावलंबी होते. स्वतः सूत कातून स्वतःचे कपडे विणून तेच वापरीत असत. म्हणून ते खादीचे कपडे फार जपून व काटकसरीने वापरीत असत. ते स्वतः धुळ्याच्या स्वोद्धारक विद्यार्थी गृहाच्या एका लहान खोलीत राहात असत. स्वतः हाताने स्वयंपाक करून खात असत. सकाळी नास्त्याला खजूर, केळी, दूध, पेरू व टोमॅटो खात असत. त्यांचा आहार सात्त्विक असे. हॉटेलातील पदार्थ चुकूनही खात नसत.

**पू. अण्णा स्वतः डॉक्टर :** अण्णांना मधुमेहाचा विकार होता. त्याचा त्यांनी सतत प्रतिकार केला. स्वतःची लघवी स्वतः तपाशीत असत व इंजेक्शनही स्वतःच करून घेत असत.

**एक सच्चा कर्मयोगी :** योगी पुरुषाप्रमाणे निद्रा फार कमी. ते सतत झोपेतही जागृत असत. पहाटे ४ ला उठत व सर्व प्रातर्विधी आटोपून थंड पाण्याने अंघोळ करीत व कपडे वगैरे धुऊन प्रार्थना करीत व प्राणायामही करीत. त्यानंतर सूत कताई व मग नास्ता. सकाळी ८ वाजता ह. से. च्या ऑफिसात जाऊन सर्व काम पाहात असत. कचेरीतील कर्मचाऱ्यांशी फारच सौजन्याने वागत. त्यांना आपल्या मंत्रिपदाचा व विद्वत्तेचा गर्व नसे. अगदी खेळीमेळीने वागत व नेहमी आनंदी असत. त्यांना आपल्या परिवाराची काळजी वाटत नसे. सर्व मन हरिजन सेवेच्या कार्यात रममाण झालेले असे.

अण्णांच्या खोलीत ते स्वयंपाक करताना मी जाऊन बसत असे. त्यांना भाजी करण्यास वेळ लागू नये म्हणून त्यांना आवडणारी पालकाची किंवा मेथीची पालेभाजी आणून मी देत असे. त्यामुळे त्यांना फार बरे वाटत असे व ते माझ्या पत्नीच्या स्वयंपाकाची प्रशंसा करीत असत.

**हरिजन सेवेचा मिळालेला प्रसाद :** ठाणे जिल्ह्यातील भिवंडी तालुक्यात एका खेडेगावात हरिजनांना सामुदायिक विहिरीचे पाणी मिळत नव्हते, म्हणून स्वतः व त्या भागातील प्रचारक श्री. उल्हास भोईर हे दोघे गेले व पाणी भरण्यास पुढाकार घेतला. त्यामुळे गावातील सवर्ण लोक भडकले व त्यांनी दोघांनाही खूप मारले. अण्णांचे डोके फुटले व ५–६ टाके पडले. ते त्यातून आठ दिवसांनी बरे झाले. त्यांच्या जीवनातील

अनेक आठवणी आहेत. परंतु त्या सर्व जागेअभावी देता येत नाहीत. त्यांच्या पुण्यस्मृतीस माझे शतशः प्रणाम.

## माझे ज्येष्ठ सहकारी

**श्री. ल. व. कुलकर्णी**, सासवड, निवृत्त मंत्री, म. ह. से. संघ.

महाराष्ट्र हरिजन सेवक संघात माझी नेमणूक झाल्याचे पत्र आल्याबरोबर अध्यक्षांनी मुख्य कचेरी धुळे, येथे लगेच पाचारण केले. अध्यक्ष अप्पासाहेबांनी अण्णासाहेबांचा समक्ष परिचय करून दिला आणि कचेरीच्या कामाची माहिती करवून घेण्यास सांगितले. आम्ही एकाच वर्षात ह. से. संघात काम करू लागलो. अण्णा संपूर्ण राष्ट्रीय बाण्याचे व अस्पृश्यता निवारणाचे कट्टे पुरस्कर्ते असल्यामुळे आम्ही अंतःकरणाने खूपच जवळ आलो.

स्वोद्धारक विद्यार्थी गृहात अण्णा राहावयास असत. आम्ही रोज पहाटे फिरावयास दोन मैल जात असू. या वेळेत आम्ही परस्परांना देशहित साधताना वा समाजहित साधताना आलेल्या अनुभवाच्या गोष्टी सांगत असू. अण्णांचे अनुभव ऐकून त्यांच्या निष्ठेबद्दल माझा आदरभाव शतगुणित होत असे.

पहाटेस खोली सफाई, अंघोळ, कपडे धुणे आटोपल्यावर, त्यांनीच तयार केलेला अल्पोपाहार माझेसह झाल्यावर कचेरी कामास सुरवात होत असे. या वेळी कचेरीतील कारकून बजरंगे व कामळे आलेल्या पत्रव्यवहाराची माहिती देऊन प्रचारकांच्या गरजा व अडचणी सांगत. अध्यक्ष अप्पासाहेबांशी त्यावर विचारविनिमय करून आम्ही प्रचाराच्या दौऱ्यावर निघत असू.

अण्णांच्या बरोबर प्रवासात खांद्यावर दोन सैनिकी पिशव्या असत. त्यांत आवश्यक ते कपडे मुख्यतः चरखा ( पेटीचा ) व पेळू असत. अण्णा पूर्ण वस्त्र स्वावलंबी होते. प्रवासात ते बरोबर असताना हरिजन सेवक संघासाठी वर्गणी व देणगी मिळविणे, ' दलित सेवक ' पाक्षिकाचे ग्राहक वाढविणे व अस्पृश्यता निवारण कार्यासाठी प्रचारकांच्या विभागात फिरून त्यांना आर्थिक मदत देणे, त्यांच्या कार्यातील अडचणी दूर करणे ही कामे चालत.

अण्णांबरोबर प्रवास करताना पैशाची सर्वतोपरी जबाबदारी त्यांच्याकडे असल्यामुळे मी निर्धास्त असे. प्रवासात झालेल्या खर्चाची बिनचूक चिठ्ठी मला देऊन अण्णा मोकळे होत असत. मी पावत्या फाडून सर्व पैसे अण्णांकडे देत असे. शेवटी पावत्या व रोख पैसे यांचा मेळ घालून अण्णा चोख हिशेब ठेवीत असत.

महाराष्ट्रातच काय पण भारतभर कारणपरत्वे अण्णांबरोबर मी प्रवास केला. अण्णांकडून व्यवस्थित पैशाची जपणूक होत असल्यामुळे चोरांना कधीही त्यांचा खिसा कापता आला नाही व त्यांना लुबाडताही आले नाही. समाजाचे आपण विश्वस्त आहोत अशी त्यांची भावना होती. त्यामुळे मिळालेल्या पैशाचा योग्य विनिमय व त्याची काटेकोर जपणूक याचा अनुभव मला प्रवासात मिळे. त्यांचा अनुभवी सत्संग माझ्या फार उपयोगी पडला. उलटपक्षी मला एकट्याला अनेक वेळा प्रवास करावा लागला, अध्यक्षांबरोबरही फिरावे लागले; त्या त्या वेळी अण्णांशिवाय केलेल्या या प्रवासात अनेक वेळा खिसे कापले गेले; सामानदेखील गहाळ झाले. इतकेच नव्हे तर पावती पुस्तकांचा हिशेब, प्रचारकांना दिल्या जाणाऱ्या रकमा, कचेरीकडून अवेळी येणारी ग्रॅन्ट यांच्या एकंदर हिशेबाच्या घोटाळ्यामुळे मला द्रव्यहानी व अपकीर्तीही सहन करणे भाग पडले. माझी ही अगतिक परिस्थिती पाहून अण्णांनी खास लक्ष घालून सर्व हिशेब पाहून कचेरीकडे झालेल्या चुकांची मांडणी केली होती. पुण्याला आल्यावर त्यांनी खास वेळ काढून कचेरीकडून झालेल्या उणिवाही निदर्शनास आणवल्या. पण अण्णा स्वर्गस्थ झाले व पुढीलांनी सर्व सत्ता हाती एकवटल्यावर 'कोऱ्या पाटीवर' सर्व काम चालू केले. जुने हिशेबी कागदपत्र, पावती पुस्तके नष्ट केली गेली. अण्णांच्या पश्चात हरिजन सेवक संघाची वाताहतच झाली असे म्हणणे अतिशयोक्तीचे होणार नाही. अण्णा ही हरिजन सेवक संघात त्यांच्या शेवटच्या क्षणापर्यंत ध्येयासाठी झगडत राहणारी थोर व्यक्ती होती.

त्यांचा सहवास मला संस्थेच्या निमित्ताने लाभल्यामुळे 'पुष्पसंगे मातीस वास लागे' असे माझे दिवस गेले व जात आहेत. अखेर 'तारूनि अनेक पतितां आपणही स्वयेचि भव तरला' ही समर्थांची उक्ती अण्णांच्या बाबतीत सार्थ ठरली. अण्णा स्वतः कवी व लेखक होते. 'दलित सेवक'मधील त्यांचे लिखाण हे हरिजन सेवक संघाच्या ध्येयधोरणास प्रभावीपणे चालना देणारे असून वास्तवतेलाही चांगला साज चढविणारे होते.

## प्रभावी प्रचारक

प्रचार कार्यात असताना अनेक ध्येयवादी नेत्यांकडून अण्णांवर स्तुति-सुमनांचा वर्षाव होत असे, इतकेच नव्हे तर पंढरीच्या पांडुरंगाचे दर्शन घेण्यापेक्षा हे दर्शन अधिक समाधान देणारे वाटते असे अण्णांच्या संबंधी भाव प्रकट केलेले मी स्वतः पाहिलेले, ऐकलेले आहेत. त्याचबरोबर कामात असताना कट्टर जातीयवाद्यांनी व स्पृश्यांनी मारझोड करून अण्णांना भयंकर जखमी करून सोडलेले आहे व अशा स्थितीतही संपूर्ण विरोधात अण्णा मेरुप्रमाणे निश्चल राहून कार्यभाग पुरा केल्याशिवाय राहिले नाहीत. उत्कृष्ट प्रचाराचा आदर्श असाच असावा लागतो.

## कर्तबगार नेतृत्व

अखिल भारतीय हरिजन सेवक संघाचे दिल्लीचे थोर थोर सभासद व भारतीय नेते महाराष्ट्रात पाहणी करावयास येत असत. त्या वेळी आमचे अण्णा कार्यक्रमाची संपूर्ण आखणी करून व कार्यक्रम ठरवून तत्परतेने अशा सर्व लोकांचे दौरे समाधानकारक रीतीने पार पाडीत असत. दौऱ्यात अण्णा हे त्यांच्यात बिलकुल कोठेही कमी पडत नसत. नियमित कताई व स्वावलंबन हे अशा प्रसंगी नेत्यांचाही कौतुकाचा विषय होत असे. इतकेच नव्हे तर प्रो. मलकानी, वियोगी हरी, कमिशनर एल्. एम्. श्रीकांत इत्यादी अनेक थोर नेते आपापले चरखे काढून कताई चालू असताना अस्पृश्यता-निवारण कार्यासंबंधी अर्थपूर्ण चर्चा करीत असत. अण्णांचाही चरखा सतत गतिमान असे.

## स्वजनांसंबंधी विशेष आस्था व प्रेम

साधी राहाणी व उच्च विचारसरणी याबाबत अण्णा हे आदर्श पुरुष होते. कुलदीपक डॉ. रवी पुण्यास मेडिकल कॉलेजमध्ये शिकत असताना अण्णांच्यामुळे मलाच काय पण अनेकांना सुलभपणे व शक्य त्या सर्व सवलती मिळून प्रकृति-स्वास्थ्याचा लाभ झाला. अण्णा शक्यतो आजारी पडत नसत पण चप्पल पायाला चावल्याने व मधुमेह असल्याने पायाचे दुखणे विकोपाला गेल्यावर धुळ्याला खाजगी दवाखान्यात राहून उपचार घ्यावे लागले या आजारात सौ. मंदाकिनी वहिनींनी अण्णांची सेवा अखंडपणे करून पतिनिष्ठेचा आदर्श व कर्तव्यकर्माची जाणीव उत्कृष्टपणे दाखवून दिली. मी या प्रसंगी अण्णांच्या बरोबर अनेक वेळा बोलत असता घरगुती गोष्टींबद्दल पुष्कळच ऊहापोह मनमोकळेपणे होत असे.

## अलौकिक बंधुभाव

सासवड येथे महाराष्ट्र हरिजन सेवक संघाचे शिबिर भरले होते. सुमारे शंभर मंडळी शिबिराला उपस्थित होती व कामाचा सर्व दृष्टींनी व्याप फार मोठा होता. अडचणींचे डोंगर पार करून अण्णांनी मोठ्या कौशल्याने शिबिर यशस्वीपणे पार पाडले आणि याच प्रसंगात शेवटच्या दिवशी माझ्या मातोश्रींचे निधन झाले. या वेळी सर्व शिबिरार्थी मोठ्या प्रेमाने व आपुलकीने माझ्या कालवश मातेला श्रद्धांजली वाहण्यासाठी आले होते. या प्रसंगी अण्णांनी त्यांच्या मातेची स्मृतिकथा सांगून अगदी धाकट्या भावाप्रमाणे माझ्या जवळ राहून मातृशवाला सुताचा हार घालून त्यांनी वंदन केले, दहनविधी होऊन घरी परत आल्यावरही ते बराच वेळ मातृसान्निध्यातील माया-ममतेच्या गोष्टी सांगून माझे सांत्वन करीत राहिले. अण्णांची साथ मला अखेरपर्यंत लाभली.

एखाद्या महात्म्याला दुर्लभ असा मृत्युलाभ त्यांना झाला. त्यांच्या उर्वरित आशा-आकांक्षा यशस्वी कुलदीपक डॉ. रवी व त्याच्या मातोश्री मंदाकिनी वहिनी समर्थपणे पूर्ण करण्याचे कार्य करीत आहेतच.

## अण्णा– कार्यकर्त्यांचा दिलासा

**श्रीमती मनोरमा इनामदार**, प्रचारिका, म. ह. से. संघ, धुळे.

महाराष्ट्र हरिजन सेवक संघामार्फत प्रतिवर्षी २४ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर अशी पदयात्रा शहादे तालुक्यात घेतली जाई. अण्णा आमच्याबरोबर असत. प्रत्येक कार्यकर्त्याला उत्तेजन देऊन त्याला कार्यप्रवृत्त करण्याचे कसब अण्णांच्या अंगी होते.

मला ते म्हणत, " इनामदारबाई, तुम्ही अस्पृश्यतेबद्दल काही न बोलता कीर्तन करूनच सामाजिक समतेचे महत्त्व पटवून देण्याचे काम करा. तुमचा आवाज चांगला आहे व गाण्या-गोष्टीतून लोकांना जितके लवकर पटते, तितके व्याख्यानातून नाही. "

माझ्या अंगच्या गुणांना अण्णांकडून असा प्रतिसाद मिळाल्यामुळे कामाचा आनंद मिळत होता. या दृष्टीने एक प्रसंग फार बोलका आहे. जळगाव जिल्ह्याच्या समाज कल्याण अधिकाऱ्यांविरुद्ध मी एक अर्ज हरिजन सेवक संघाकडे केला, कारण जळगावला जे हरिजन मुलांचे बोर्डिंग चालत होते, त्यातील मुलांच्या खाण्यापिण्याच्या दृष्टीने गंभीर तक्रारी माझ्याकडे आल्या होत्या. समाज कल्याण अधिकाऱ्यांनी चिडून, ' इनामदारबाई स्वतःला कोण समजतात ? ' असा प्रश्न विचारला असता, अण्णांनी उत्तर दिले होते की, त्या सरकारी अधिकृत जागेवर नाहीत त्या सेवक आहेत. पण जनताजनार्दनाच्या हृदयाचे त्या आशास्थान आहेत. त्यांची किंमत फार मोठी आहे. असे स्पष्टवक्ते पदाधिकारी आमच्यातून गेले. ही कार्याची पोकळी कधीच भरून येणार नाही. अण्णांच्या आठवणीने डोळे पाणावतात. त्यांच्या जीवनात आमच्यासारख्या कार्यकर्त्यांना दिलासा होता.

## कट्टर गांधीवादी

**न. उ. सोंदाणकर**, स्वातंत्र्य सैनिक व प्रचारक, म. ह. से. संघ, धुळे

अण्णासाहेब हे कट्टर गांधीवादी होते. नेहमी खादीचे कपडे वापरीत. १९३२ ते १९४८ सालापर्यंत ते जिल्हा पश्चिम खानदेश काँग्रेस कमिटीत कधी चिटणीस तर कधी अध्यक्ष होते. मिठाच्या सत्याग्रहात त्यांना अटक झाली होती. सन १९३२ मध्ये धुळे जेलमध्ये मी त्यांचेसह होतो. खानदेशी लोकांच्या खाण्यात रोज कांदा असतो. कांदा व मीठ मिळविण्याकरिता आम्ही जेलमध्ये अन्नसत्याग्रह करून या गोष्टी मिळविल्या.

काँग्रेस कमिटीमध्ये बाळूभाई मेहता व अण्णा यांच्यात काही कार्यक्रमांबाबत एकमत होत नसे. अण्णा विनोदाने बाळूभाईंना म्हणायचे, ' तुम्ही संन्याशी आहात, तुम्हाला समाजकारण कळायचे नाही, त्याकरिता विचार करणारा गृहस्थाश्रमीच पाहिजे. '

अण्णा स्वतः कविता व पोवाडे करीत व प्रभातफेरीत म्हणत. त्यांच्या प्रभातफेरीत मी सहभागी होत असे. एक वेळ दोंडाइचा येथे धुळे जिल्हा काँग्रेस कमिटीची मीटिंग झाली. त्या मीटिंगमध्ये जिल्हाध्यक्षाची निवड होणार होती. अण्णासाहेबांनी कॅनव्हासिंग केले नव्हते तरी चार उमेदवारांना पराभूत करून ते निवडून आले. त्या वेळी भव्य मिरवणूक निघाली होती. अण्णांना मिरवणूक काढणे पसंत नव्हते; पण त्यांचा नाइलाज झाला.

अण्णा पट्टीचे पोहणारे होते. शिबिरानिमित्ताने आम्ही एकत्र जमत असू व विहिरीवर पोहण्यास जात असू. अण्णांना फ्लोटिंग म्हणजे हातपाय न हलवता उताणे स्थिर, असे तरंगणे येत असे.

हरिजन सेवक संघाच्या कामाच्या बाबतीत व त्याकरिता वर्गणी जमविण्याचा त्यांचा हातखंडा होता. कार्यकर्त्यांना त्या वर्गणीतूनच परस्पर मानधन देऊन टाकीत असत. आम्ही धुळे जिल्ह्यात फिरत असताना मला हे दिसून आले की खेड्याखेड्यां-मधून त्यांचा शिष्यगण पसरलेला आहे. त्यांच्या त्या ओळखीचा उपयोग आम्हाला फार होत असे. वर्गणी तर मिळेच, पण आमची व्यवस्थाही छान ठेवली जाई.

ते काटकसरी, निर्व्यसनी, निःस्पृह वृत्तीचे व स्वावलंबी असे गांधीवादी होते.

## श्रद्धांजली अंक

**दलित सेवक**
१ नोव्हेंबर १९६८

### ध्येयवाद...एकनिष्ठा ..सेवाभाव...नियमितपणा

महाराष्ट्र हरिजन सेवक संघाचे माजी अध्यक्ष कै. वि. नी. उपाध्ये यांना आलेली व तदनंतर अण्णांच्या चिरंजीवाला आलेली सांत्वनपर पत्रे.

**(१) श्री· काका कारखानीस**, विजापूर

महाराष्ट्रातील हरिजन कार्यात मोठी आपत्ती निर्माण झाली. आपल्या शारीरिक व्यंगात ( दृष्टिदोषात ) अधिकच भर पडली. कोणत्याही कार्याकडे– विशेषतः हरिजन कार्यात तर निष्ठावान माणसांची वाण दिसून येते. बाह्यात्रडंबर, ढोंग, अप्रामाणिकपणा, इ. वाढत आहे. देशाचे भवितव्य कळत नाही. मन गांगरून जाते. आपण स्वतःला आवरा आणि त्यांच्या कुटुंबियांना व संघाला सांभाळा.

**(२) श्री. बाळूभाई मेहता**, पवनार—

कै. काकासाहेब बर्वे ह्याच्या निधनानंतर श्री. अण्णासाहेब ह्यांनी ' महाराष्ट्र हरिजन सेवक संघा 'च्या चिटणीसपदाची जबाबदारी स्वीकारली तेव्हापासून त्यांनी संघाची अविरत आणि एकनिष्ठपणे सेवा बजावली आहे. संघाचे ते आधारस्तंभ आणि आपला तर उजवा हात होते. त्यांच्या मृत्यूने संघाची अपरिमित हानी झाली आहे. ह्या सेवेमुळे त्यांच्या आत्म्यास शांती मिळेल.

**(३) श्री. जीवनलालभाई**, दिल्ली—

स्व. श्री. टोणगावकर महाराष्ट्र हरिजन सेवक संघ के आधारस्तंभ थे और उनके होते हुए श्री. उपाध्येजी को काफी निश्चितता रहती थी। केंद्रिय हरिजन सेवक संघ को इनके देहावसनसे बहुत भारी क्षती हुई है।

**(४) श्री. आचार्य भिसे**, बोर्डी—

अप्पासाहेबांना दुःखित मनाने नमस्कार. मित्र श्री. टोणगावकर यांच्या निधनाची बातमी वाचून मला अत्यंत दुःख झाले. थोडया दिवसांपूर्वी ते इकडे आले होते. सर्वांना भेटले आणि तेव्हा प्रकृती कशी छान होती. त्यांच्या निधनाने तुम्हाला अवर्णनीय दुःख झाले असणारच. त्यांच्या निधनाने आमच्यातला एक ध्येयनिष्ठ, कर्तव्यदक्ष, कर्तबगार कार्यकर्ता नाहीसा झाला आहे.

**(५) श्री. रा. स. काजरोळकर**, मुंबई—

अनपेक्षितपणे त्यांना आलेला मृत्यू हा एक प्रकारे त्यांनी अंगीकारलेल्या हरिजनांच्या उद्धार कार्यावरील आघात होय. त्यांचे उज्ज्वल कार्य हरिजन व इतर मागास समाज केव्हाही विसरणार नाही. अस्पृश्यतानिवारण योजनेवरील त्यांचे कार्य उल्लेखनीय असून वेळोवेळी हे कार्य करीत असताना, सरकारला त्यांनी आलेल्या अडचणींचे निवेदन केल्यामुळे ही योजना यशस्वी होण्यास बरीच मदत झाली.

**(६) श्री. ग. रा. गायकवाड**, कोल्हापूर—

कै. काकासाहेबांच्या नंतर ' दलित सेवक 'मध्ये हरिजनांच्या प्रश्नाबद्दल आत्मीयतेने व अभ्यासू दृष्टिकोणातून लिहिणारा मोकळ्या अंतःकरणाचा कार्यकर्ता गेला. त्यांची दृष्टी चौफेर होती. कार्यकर्त्यांना तर ते निश्चित मार्गदर्शन करीत. त्यांच्या भेटीने काम करणाऱ्यांना उत्साह वाटे. काय करायला पाहिजे ह्याबद्दल त्यांची मते स्पष्ट होती व ती कार्यकर्त्यांना ते पटवून देत आणि समजून सांगत.

**(७) श्री. शामराव पाटील**, बोर्डी —

महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कार्यकारिणीचे ते सभासद असताना त्यांचा व माझा स्नेहसंबंध जमला तो अखेरपर्यंत. काँग्रेस संघटनेत त्यांनी केलेली कामगिरी अमोल आहे. महाराष्ट्र हरिजन सेवक संघाच्या चिटणीसपदाची जबाबदारी स्वीकारून त्यांनी जे कार्य केले ते अत्यंत गौरवास्पद आहे. संघाची कामगिरी त्यांनी आपल्या शिरावर घेताच हरिजन सेवा व अस्पृश्यता निवारण कार्याला फार जोराने चालना मिळाली. हरिजनांवरील अन्याय, जुलूमजबरदस्ती व दुःखे यांना वाचा फोडण्याचे काम त्यांनी निर्भयपणे करून समाज व शासन ह्यांना सतत जागविण्याचा प्रयत्न केला.

त्यांच्या मृत्यूमुळे महाराष्ट्रातील गांधी विचाराचे, एक सर्वोदयवादी, हरिजनांचे सच्चे मित्र व सार्वजनिक जीवनातील प्रेमळ व नम्र, स्वार्थत्यागी व निष्ठावंत असे थोर समाजसेवक नाहीसे झाले.

**(८) प्रा. ठाकुरदास बंग**, वर्धा—

ते एक तळमळीचे निष्ठावान, हरिजन सेवेच्या कार्यातील कार्यकर्ते होते.

**(९) श्री. कृष्णदासभाई शाह**, मुंबई—

महाराष्ट्रातील हरिजनांचे अनन्य सेवक हरपले. मूक सेवेचा त्यांचा आदर्श होता. गांधीजींच्या विधायक कार्याची दृष्टी घेतलेले एक-एक कार्यकर्ते जात चालले आहेत. नवीन मंडळींत अण्णासाहेबांचा हा हुरूप पसरो.

**(१०) श्री. उल्हास भोईर**, भिवंडी—

त्यांच्यासारखा सेवक आपल्या संघास लाभला व त्यामुळेच मीसुद्धा अस्पृश्यता निवारण कार्यात खेडोपाडी मरेपर्यंत यातना सहन करू शकलो हे माझे भाग्य.

**(११) आशाताई वाघमारे**, औरंगाबाद—

कै. वाघमारे ह्यांच्या मृत्यूस दोन महिने झाले नाहीत. एकेक निष्ठावंत चालले. अण्णांसारखा सतत सेवारत व हरिजनांचा कळकळीचा निष्ठावान कार्यकर्ता दुर्मिळ. आपली तर हातातील काठीच हरपली. अप्पासाहेब, मला असह्य दुःख झाले. आपण शांती ठेवा.

**(१२) हिरालाल कल्याणी**, जळगाव—

आपल्या संघाचा अत्यंत तळमळीचा, दलितांची उत्तम प्रकारे व अभ्यासपूर्ण बाजू मांडणारा मनमिळाऊ स्वभावाचा पुरुष आपल्यातून कायमचा गेला. अण्णासाहेबांची कीर्ती अमर आहे.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. 20628 वि-मं
22543

(१३) **श्री. पां. ध. जाधव,** भिवंडी—

ज्याच्या अस्पृश्यता निवारण्याच्या कार्यास तोड नाही, असा हरिजनांचा सच्चा मित्र गेला.

(१४) **श्री. सदानंद कदम,** ठाणे—

त्यांनी शेवटपर्यंत हरिजन सेवेत वाहून घेऊन म. गांधींचे शिष्यत्व सिद्ध केले.

(१५) **श्री. के. गो. लिमये,** पाली—

त्यांच्यासारख्या ध्येयनिष्ठ आणि त्यागी व्यक्ती आता दुर्मिळ होऊ लागल्या आहेत. गाजावाजा न करता मनोभावे काम करीत राहणे हाच त्यांचा धर्म होता. दलितांची सेवा हाच धर्म समजून त्यांनी आयुष्य वेचले. कमी बोलणे, भरपूर काम करणे व त्या कामात सेवावृत्ती असणे हे त्यांचे स्वभाववैशिष्ट्य होते.

(१६) **श्री. यदुनाथ थत्ते,** तथा ' साधना ' परिवार, पुणे—

दलितांच्या कणवेने अण्णासाहेबांनी दीर्घकाळ कार्य केले. त्यासाठी जे शौर्य, निर्धार आणि त्याग त्यांनी दाखविला त्याला तोड नाही. दारिद्र्याचा वसा त्यांनी त्यासाठी घेतला होता.

(१७) **श्री. शिरूभाऊ लिमये,** ' सुधारक '–पुणे—

आजच्या भ्रष्ट होत चाललेल्या परिस्थितीत त्यांच्यासारख्या स्वच्छ चारित्र्याच्या व ध्येयवादी कार्यकर्त्यांची फार जरूरी आहे.

(१८) **श्री. दत्तात्रय वीडकर,** टिळकवाडी, नाशिक—

त्यांची आठवण सतत राहील. त्यांना वीराचे मरण आले. आपले काम करीत असताना ज्यांना मृत्यू आला ते वीरच. त्यांच्या निधनामुळे आम्ही आमच्या एका सुहृदास मुकलो.

(१९) **डॉ. शांतिलाल शहा,** निजामपूर—

मला स्वतःला अण्णासाहेब निजामपूरला येत तेव्हा खूप मार्गदर्शन करीत. त्यांच्या व पू. बाळूभाई व पू. कांतिलालभाई यांच्या मार्गदर्शनाने मी आजपर्यंत येथे कार्य करीत आलो आहे. माझेही उत्तम मार्गदर्शक नाहीसे झाले. पू. अण्णांचे जिल्हा काँग्रेस कमेटीतील नेतृत्व तसेच हरिजन सेवक संघाचे कार्य व स्वोद्धारक विद्यार्थी गृहातील कार्य हे त्यांचे जिवंत स्मारक होय.

**(२०) स्व. ह. वि. पाटसकर,** पुणे—

आपले वडील एक निष्ठावंत कार्यकर्ते होते.

**(२१) प्रा. वा. मो चौवळ,** तलरेजा कॉलेज, उल्हासनगर—

आपले वडील हरिजन सेवक संघाचे प्राण होते. माझा प्रत्यक्ष संबंध असल्यामुळे मला स्वतःचे वडील गेल्यासारखे वाटले.

**(२२) श्री. स. आ. बर्वे,** वकील, शिरपूर—

आम्ही एकेकाळचे सहप्रवासी. आता दिवसेंदिवस अशी ध्येयवादी माणसे कमी कमी होत चालली व नवीन कार्यकर्ते अशा सेवाभावी व ध्येयवादी वृत्तीचे दिसतच नाहीत, हे पाहून मन बेचैन होते. आपण स्वतः उत्तम डॉक्टर असून आपल्या पित्याला औषधाचा डोस पाजण्यास ईश्वराने वाव दिला नाही. आपल्या पित्याची इच्छा मला जो डोस अगर इंजेक्शन देशील तोच खर्च आपले गरीब बांधवांकरिता मी राखून ठेवीत आहे अशीच असावी.

**(२३) श्री. रा. ग. सोनार,** नंदुरबार—

कै. श्री. अण्णांची मजला नेहमी आठवण येत राहील. कारण त्यांचे व माझे संबंध ते जिल्हा अध्यक्ष असताना ४६–४७–४८ सालापासून अगदी जवळचे व प्रेमाचे होते. पूज्य बाळासाहेब खेर, मुंबई राज्याचे मुख्य मंत्री असताना काही सार्वजनिक कामात पू. अण्णांनी मला बरीच मदत केली होती. ती मी विसरणार नाही.

**(२४) श्री. मा. मु. उपासनी,** कलेक्टर कार्यालय, धुळे—

माझे शैक्षणिक पालक कायमचे सोडून गेले याबद्दल मनावर विश्वास बसेना. मला शिक्षणाचा हायस्कूलपर्यंत लाभ ती. स्व. अण्णांच्या कृपेमुळे मिळाला. दोंडाइचे स्वो. वि. संस्थेत ती. अण्णांनी आम्हास शिस्त आणि नम्रता शिकविली. १९४२ मध्ये राष्ट्र-भक्तीची शिकवण त्यांच्याच प्रेरणेने मिळाली.

**(२५) प्रा. गो. हु. महाजन,** तळोदा—

थोर समाजसेवक व आदर्श शिक्षक म्हणून अण्णासाहेबांचे जीवन व कार्य आमच्यासारख्यांना सदैव प्रेरणा देत राहील.

**(२६) श्री. भीमसिंग कंजर,** दोंडाइचे—

आम्हांला माणुसकी शिकविणारा देवमाणूस गेला.

**(२७) श्री. नानाजी तुकाराम शिंपी**, धुळे—

१९३० सालापासून निकटचा संबंध. आपले सर्वांचे मार्गदर्शक, पददलितांची बाजू घेणारे, मदोन्मत्तांचा व खुशालचेंडूंचा नक्षा उतरविणारे, श्रमाची महती ओळखणारे, शेतकरी, कामकरी, पददलित, गोरगरिबांसाठी अहोरात्र झटणारे, मानव्याचा खरा धर्म ओळखणारे; अण्णांच्या शब्दांत तेज, वाणीत ओज, दृष्टीत तेजस्विता होती. राष्ट्रासाठीच आम्ही रात्रंदिवस विचारविनिमय करीत बसत होतो.

बिनचूक आचरण. चूक म्हणजे मरणच समजत. मनुष्याचा जीवनसमय अमूल्य आहे असे मानून प्रत्येक मिनिट सेवेसाठी लावीत.

**(२८) श्री. प्र. मा साळवेकर**, मुंबई—

सचिवालयात पुष्कळ वर्षे काम करूनही मी फक्त दोन-तीन मंत्र्यांच्या पी. ए. शी मैत्री जोडू शकलो. याउलट अण्णासाहेब मंत्रिमंडळात नेहमी वावरत असत. मंत्रीही त्यांना मान देत असत. यावरून त्यांच्या कार्याची महती कळते.

**(२९) श्री. दामोदर दशरथ पगार**, इंजिनिअर, मुंबई—

मी १९२० ते १९२२ सालच्या दरम्यान स्वो. वि. गृहात असताना ते सहृदय, प्रेमळ, मनमिळाऊ व अत्यंत प्रामाणिक असे माझे निकटवर्ती स्नेही होते. मुंबईस येत तेव्हा भेटत. एक-एक आठवणींनी अंतःकरण भरून येते.

**(३०) श्री. शाहीर मुंगा पाटील**, कोल्हापूर—

मागास वर्गाचे अमोल कार्य केलेला धागा तुटला, पण त्यांनी तंतू तयार केले आहेत.

**(३१) कै. शं. रा. जोशी**, माजी मुख्याध्यापक, लो. टिळक विद्यालय, नंदुरबार—

गेल्या बुधवारी गांधीजयंतीनिमित्त शाळेने श्रीमती मंदाकिनीताईंना आमंत्रित केले होते. त्या आल्या त्या वेळीं आमची बोलणी झाली. आणि दुसऱ्याच दिवशी ही घटना घडली. दैवाचा दुर्विलास ह्यापरता कोणता ?... ते तपस्व्याचे जीवन जगले. त्यांनी ब्राह्मण्य खऱ्या अर्थाने टिकविले. खरोखर तेच हरिजन झाले !

**(३२) श्री. स. त्र्यं. टोणगावकर**, चाळीसगाव--

बालपणापासून त्यांचे कष्टाचेच आयुष्य. आपल्या घराण्यात हे प्रसिद्धिपराङ्मुख, कर्मवीर, तत्त्वनिष्ठ; म्हणून त्यांच्या कीर्तीला व कर्तृत्वाला एक प्रकारचा उजाळा होता.

# ३ : अण्णांचे वैचारिक लेख

## समाजसत्तावाद व तो यशस्वी केव्हा होईल ?

प्रबोध
दि. २४-५-३६

### कामगार-मजूर-पुढाऱ्यांनो खेड्यात चला

हजारो मजुरांनी मर मर मरायचे, शरीराचे पाणी करून रात्रंदिन हाल भोगायचे. थंडी, वारा, ऊन यांची क्षिती न बाळगता कष्ट करायचे आणि शेवटी अर्धपोटीच राहावयाचे. मात्र त्यांच्या जिवावर एका भांडवलवाल्याने खुशाल ऐषआराम भोगायचे, मोटारी उडवायच्या आणि घृतकल्या मधुकल्या खाऊन ढेकर द्यायचे. हजारो शिपायांनी—वीरांनी रणक्षेत्रावर जावयाचे, शत्रूच्या समोर छातीची ढाल करायची, आत्मदान द्यावयाचे, जिवाची तमा न धरता यशाकरिता प्रयत्न करायचा व शेवटी यश मिळवूनही पोटाला कसेबसे मिळाले तर भाग्यच समजायचे. पण एखाद्या राज्यकर्त्याने मात्र यांच्या जिवावर सर्व वैभव उपभोगायचे. भांडवलवाल्या एका जिवाच्या सुखासाठी हजारोंनी कष्ट भोगायचे. काय म्हणून ? तोही मनुष्य व मजूरही मनुष्यच. तेव्हा हा भेद का म्हणून ?

ही विषमता देवाघरची नाही. मानवानेच, स्वार्थसाधू भांडवलवाल्यांनी निर्माण केली आहे. अमानुषपणे ते खालच्या वर्गास नागवीत असता हजारोंनी हा छळ सहन करणे म्हणजे त्यांच्या दुर्बलतेचे मूर्तिमंत दृश्य आहे. तेव्हा भांडवलशाही, साम्राज्यशाही नष्ट झाली पाहिजे म्हणून बोल्शेव्हिझम, सोशॅलिझम आणि कम्युनिझम यांचा प्रचार सुरू आहे. या सर्वांच्या बुडाशी अखिल मानवजात सुखी कशी होईल हे एकच ध्येय आहे.

मानवानेच ही कृत्रिम विषमता निर्माण केली. भांडवलवाले व जेते राज्यकर्ते खालच्या जनतेत अन्नवस्त्र व राहण्याची, निवाऱ्याची जागा जी त्यांना जीवन जगविण्यास पाहिजे इतकीदेखील मिळू देत नाहीत व त्या अभावी त्यांचे जीवित मातीमोल करून धुळीस मिळवितात. वस्तुतः भांडवलवाले व राज्यकर्ते यांना जसे हवा, पाणी व अन्न शरीररक्षणार्थ लागते तसेच त्यांनाही लागते. तेव्हा यांच्या व त्यांच्या जीवनात वस्तुतः काही फरक नसताना यांनी साऱ्या गोष्टी यांना पुरून, उरून, फाजील नाश पावतील इतक्या वापराव्या व खालच्या लोकांना उपासमार पडून त्यांची वाण भासावी व त्यांनी हालहाल होऊन मृत्यूच्या गाठी घ्याव्यात ही विषमता आज असह्य झाली आहे.

गरिबांना दोन सांज पुरेल इतके अन्न नाही. स्वच्छ पाण्याच्या सोयी नाहीत, अंगभर वस्त्र नाही आणि निवाऱ्याच्या जागेविषयी तर बोलावयासच नको. पुरेशी विश्रांतीसुद्धा त्यास मिळत नाही. निसर्गाने दिलेल्या या गोष्टींचा तरी त्याला भरपूर त्याच्या जीवनास लागेल इतका पुरवठा मिळालाच पाहिजे. तो त्यांचा हक्क आहे याकरिताच सारे ' झम ' आज थैमान घालीत आहेत.

बोल्शेव्हिझम, कम्युनिझम अथवा सोशॅलिझम सारी मानवजात तेवढी समान असे सांगतात. तरी त्याचा अर्थ सर्वांनी एकच काम केले पाहिजे असा नव्हे. सर्वांना समान हक्क मिळावेत असे वाटत असेल तर सर्वांच्या बुद्धीचा विकास एकाच कक्षेत आला पाहिजे. याचा अर्थ असा की ज्याची बुद्धी ज्या विषयात चालेल त्या विषयाची त्याने प्रगती करावी. मात्र प्रत्येक धंद्यास प्रतिष्ठा आहे हे लक्षात ठेवावे. समाज धारणेकरिता जी नानाविध कामे किंवा उद्योग करावयास हवेत ते सर्वांनी मिळून केले तरच समाजाची धारणा होईल हे ठरलेलेच आहे. परंतु या कामाचा मोबदला मात्र सर्वांना सारखा मिळेल. सर्वांच्या जीवनास सारखी किंमत दिली जाईल. बुद्धी व श्रम यांना सारखाच मोबदला मिळेल अशी व्यवस्था श्रमजीवीने करून घेतली पाहिजे. ज्ञानाची त्याची परिसीमा वाढली म्हणजे एवढे खास समजेल की याचेजवळ ( बुद्धिवाद्याजवळ ) डोके असले तरी हातपाय नाहीत. तो लुळापांगळा श्रीमंत आहे. त्याचे इच्छित कार्य घडावयास आपल्यावाचून त्याचे निश्चित अडेल तेव्हा आपण मागू ते त्याने आपणांस दिले पाहिजे. असे झाले म्हणजे बुद्धीची व श्रमाची सारखी किंमत होईल. म्हणजे एखादा अशक्त, दुबळा पण बुद्धिमान, सशक्त अडाण्यावर हुकमत चालवू शकणार नाही.

सांपत्तिक विषमता नाहीशी कशी होईल हे पुढील उदाहरणावरून सहज समजेल. समजा, एक शिक्षक आहे तो दरमहा १५० रुपये मिळवितो. म्हणजे रोजचे पाच रुपये त्याचे उत्पन्न आहे. त्याला जीवनास आवश्यक असे धान्य खरीदायचे असेल तर शेतकऱ्यानेही आपणास रोजी पाच रुपये पडतील इतकी त्या धान्याची किंमत आकारल्यास त्याला ती देणे भाग पडेल व समाजात प्रत्येक उत्पादित वस्तूबद्दल असे झाले म्हणजे आर्थिक विषमता दूर होईल. पण त्यासाठी ज्ञानाची भरपूर वाढ अखिल मानवजातीत झाली पाहिजे.

निसर्गनियमाविरुद्ध अमानुषतेचे प्रकार नाहीसे व्हावेत एवढाच साऱ्या समाजसत्तावाद्यांचा हेतू आहे व तो अखिल मानवजातीत ज्ञानाचा प्रसार भरपूर केला तरच सिद्धीस जाईल तेव्हा आजच्या कम्युनिस्ट, सोशलिस्ट लोकांनी ज्ञानाचीच उपासना व प्रचार केला पाहिजे. नुसते शहरातील व्यासपीठावर ओरडून भागावयाचे नाही, कारण रक्ताची एकदा चव लागलेले हे भांडवलवाले वाघ आपली शिकार त्यांना शिकवून त्यांच्या कानीकपाळी ओरडून स्वतः होऊन सोडून देतील ही आशा करणेच व्यर्थ आहे. तर ज्यांना त्यांचे भक्ष्य म्हणून बळी पडावे लागते अशा अज्ञानी श्रमजीवी लोकांत जाऊन त्यांना याचा प्रतिकार कसा करता येईल याचे शिक्षण दिले पाहिजे तरच या गोष्टी शक्य

होतील. त्यांच्यात गेल्याशिवाय, मिसळल्याशिवाय त्यांचे दुखते कोठे हे समजणार नाही व योग्य इलाज करता येणार नाही. तेव्हा समाजसुधारकांनो, समाज सत्तावाद्यांनो, शेतकरी व कामगार मजूर पुढाऱ्यांनो, आपले उद्दिष्ट साधावयास खेड्यात चला.

## कौन्सिल निवडणुकीत जिल्हा काँग्रेसची जबाबदारी

प्रबोध

दि. १२-७-३६

निवडणुकीत जात, धर्म व संपत्ती यांच्या विचारांपेक्षा व्यक्तीच्या आचारविचार व योग्यतेकडे लक्ष देणेच अत्यंत जरूरीचे आहे. आम्हास कळालेल्या माहितीप्रमाणे जिल्हा काँग्रेस कमेटीकडे कौन्सिल सभासद होऊ इच्छिणाऱ्या काही जणांचे अर्जही आले आहेत व त्यांचे ' आम्हास निवडून द्या ' या स्वरूपाचे प्रयत्नही सुरू होऊन त्यांची धामधूम सुरू झालेली आहे. अशा वेळेस राष्ट्रसभेच्या जिल्हाधिकाऱ्यांनी मूग गिळून स्वस्थ न बसता आपले प्रतिनिधी कोण आहेत याचा निर्णय जितक्या लवकर देता येईल तितक्या लवकर देण्याची शक्यतो व्यवस्था केली पाहिजे व काँग्रेसने आपल्या उमेदवाराकरिता कोणत्या अटी त्यास लावल्या आहेत हे जाहीर करून त्या अटींप्रमाणे येणारा उमेदवार आहे की नाही हे जनतेस परीक्षून पाहता आले पाहिजे. या बाबतीत जर गुपचुपीचे व्यवहार चालू राहिले तर जनतेची दिशाभूल होण्याचा संभव बराच आहे. अशी सूचना मुद्दाम करावयाचे कारण असे की कौन्सिल निवडणुकीबाबत काही उमेदवारांनी आपली प्रतिज्ञापत्रे भरून व काँग्रेसने कुणाला उभे करावे याबद्दल त्यांची एक सभा झाली, तरी तिचा जिल्ह्यातील काही जबाबदार व प्रमुख कार्यकर्त्यांना व जिल्हा काँग्रेस मंडळाच्या सभासदांना ठावठिकाणाही नव्हता. यामुळे जिल्ह्यातील कार्यकर्त्यांची मने दुखवतात. याकडे राष्ट्रसभेच्या अधिकाऱ्यांनी अवश्य लक्ष पुरवावयास हवे.

त्याचप्रमाणे काँग्रेसने काँग्रेसच्या प्रतिज्ञापत्रावर सह्या करणाऱ्या या उमेदवारास त्यांनी आजपर्यंतच्या आपल्या गतायुष्याचे चित्र रेखाटण्यास सांगून ती चित्रे जनतेस एखाद्या स्थानिक वर्तमानपत्रद्वारा सादर केली पाहिजेत. म्हणजे कोणता प्रतिनिधी आपणाकरिता योग्य आहे हे जनतेला ठरविता येईल. नुसत्या व्यक्तीच्या शाब्दिक वचनावर विसंबून राहून व तात्पुरत्या फुटलेल्या पान्ह्याला भुलून राष्ट्रसभेने त्यांना आपले प्रतिनिधी निवडता कामा नये, याकरिता सर्व तालुक्यातून लोकमत अजमाविले पाहिजे म्हणजे जनतेला कोणता प्रतिनिधी हवा याचा राष्ट्रसभेच्या कार्यकर्त्यांना नक्की कयास लागेल. या सर्व गोष्टी करण्याचे कारण या ठिकाणी व्यक्तीच्या मोठेपणाचा प्रश्न नसून एका जबाबदार संस्थेच्या यशापयशाचा प्रश्न आहे. जर राष्ट्रसभेने भलतेच प्रतिनिधी

उभे केले तर लोकांचा पाठिंबा तिला मिळणे अशक्य होऊन जिल्ह्यात सर्व कार्याचा विचका होण्याचा संभव आहे व या सर्वांची जबाबदारी जिल्ह्याच्या राष्ट्रसभापतीवर आहे. त्यांनी योग्य त्या माणसांची निवड करून त्यांचीच नावे पार्लमेंटरी बोर्डाकडे रवाना केली पाहिजेत. पार्लमेंटरी बोर्डही जिल्हा सभेने पाठविलेल्या नावांचाच विचार करील हे सांगणे नकोच. तेव्हा जिल्हा कॉंग्रेस कमेटीच्या अध्यक्षास माझी अशी आग्रहाची विनंती आहे की, त्यांनी आतापर्यंत आलेल्या उमेदवारांची यादी व त्यांचे आजपर्यंतचे कार्य व कॉंग्रेसचे प्रतिज्ञापत्र यांचा जनतेकरिता जाहीर खुलासा करावा व जिल्ह्यात ठिकठिकाणी जाऊन लोकमत पाहावे.

संपत्तीच्या जोरावर कोणी निवडून येईल अशी भीती राष्ट्रसभेने बाळगून कॉंग्रेसच्या तत्त्वांना पदतली तुडविणाऱ्या व कामापुरता राम करणाऱ्या प्रतिनिधींची निवड करण्यात राष्ट्रसभेचे हसे होईल. जनता आता संपत्तीला जुमानीत नाही हे गेल्या दिल्ली असेंब्लीच्या निवडणुकीने तिने दाखविले आहे. नाहीतर श्री. वालचंदशेठजींना निवडून येता आले असते. तरी याचा जिल्हा कॉंग्रेस विचार करील व खरे लोकप्रतिनिधीच निवडून येतील याविषयी योग्य ती खबरदारी घेईल.

## लेखांक २ रा

आज राष्ट्रात जे जे अनेक पक्ष आहेत त्या त्या पक्षाचा उमेदवार आपल्या ध्येयाने प्रेरित होऊन कौन्सिल निवडणुकीस उभा राहील. तो आपल्या ध्येयाने जखडला गेल्याने जरी कॉंग्रेसचा उमेदवार निश्चित निवडून येईल असे असले तरी तो आपल्या ध्येयास सोडणार नाही. यामुळे त्यांच्यात व कॉंग्रेसच्या उमेदवारांत काही झाले तरी स्पर्धा चालू राहील. पण या व्यतिरिक्त ज्यांना कोणत्याही विशिष्ट पक्षाचा व जनतेचा पाठिंबा नाही; पण आजपर्यंतच्या कॉंग्रेसच्या असहकारित्वाच्या निवडणुकीत निवडून येऊन, पुन्हा पुन्हा निवडून येण्यास चटावलेल्या व प्रतिनिधिपणा म्हणजे आपली जहागिरीच समजणाऱ्या, काही पगडी फिरवू उमेदवारांना मात्र कॉंग्रेसशी स्पर्धा करावयाची आपणांस शक्यता नाही असे दिसल्याने व कोणतेही विशिष्ट ध्येय डोळ्यांसमोर नसल्याने जो कोणी निवडून देईल त्याच्या पक्षास मान तुकविणे एवढेच त्यांना माहीत आहे. असेच काही उमेदवार कॉंग्रेसला चिकटू पाहात आहेत.

जिल्हा राष्ट्रसभापतींनी आमच्या मागील लेखाच्या विनंतीस मान न देता आपल्या प्रतिनिधींची नावे जनतेस सादर केली नाहीत. तरी म्हातारीने कोंबडा झाकून ठेवला म्हणून सूर्य जसा उगवायचा राहात नाही तद्वत या उतावळ्या प्रतिनिधी होऊ इच्छिणाऱ्या उमेदवारांच्या चळवळीने त्याचा जनतेस सुगावा लागतोच. हे लिहावयाचे कारण असे की आज ज्या उमेदवारांनी कॉंग्रेसच्या प्रतिज्ञापत्रावर सह्या केल्या आहेत, त्यामध्ये वर सांगितल्याप्रमाणे निवडणुकीस चटावलेले व जात्याभिमानाने प्रेरित झालेले असे काही लक्ष्मीपुत्र आहेत व काही खरोखरच जनसेवा व्रतधारी असून त्यांनी आज-

पर्यंतचे आपले आयुष्य व मन काँग्रेसकरिताच खर्ची घातले आहे. पण ज्या वेळी कोणास प्रतिनिधी म्हणून उभे करावयाचे अशाबाबत मागे एक सभा झाल्याचा उल्लेख वर केला, त्याच सभेत या लक्ष्मीपुत्रांनी व जात्याभिमानी आणि ध्येयशून्य प्रतिनिधी होऊ इच्छिणारांनी जर आम्हास काँग्रेस उभे करणार नाही तर आम्ही स्वतंत्र उभे राहू व काँग्रेसला आमच्या पैशावर व जातीच्या पाठबळावर कसून विरोध करू अशी धमकी दिल्याने काँग्रेसच्या जबाबदार अधिकाऱ्यांना काँग्रेसच्या यशासाठी काय करावे ही विवंचना उत्पन्न झाली व म्हणूनच आजपर्यंतचे आपले डळमळीतपणाचे धोरण आपल्या पश्चिम खानदेशात दिसून येते. इतर जिल्ह्यांच्या उमेदवारांची नावे जाहीर होऊन ते या कार्यास लागले देखील. याच वर्षी अखिल भारतीय राष्ट्रसभेचे अधिवेशनही खानदेशमध्येच असल्याने पुढे याबाबत प्रयत्न करावयास आपणास वेळ सापडणार नाही.

तेव्हा राष्ट्रसभेने यांच्या धमकीस न भिता खरोखरीच ध्येयनिष्ठ व कार्यक्षम असेच आपले प्रतिनिधी उभे केले पाहिजेत. आज राष्ट्रात धनाला व जातीला मान नाही. राष्ट्र फक्त काँग्रेस या नावालाच ओळखते, हे मागील दिल्ली असेंब्लीच्या निवडणुकीत राष्ट्राने सिद्ध केले आहे. उलट राष्ट्रसभेच्या प्रतिज्ञापत्रावर सह्या करणाऱ्या ह्या उमेदवारांनी आपण स्वतंत्र उभे राहू असे म्हटल्याबरोबर त्यांनी ज्या पत्रकावर सह्या केल्या त्याच पत्रकास हरताळही फासला व आपले पगडी फिरवू धोरण सिद्ध केले. ज्यांना आपल्या सहीची-देखील दिक्कत वाटत नाही, ते जनतेस दिलेल्या आश्वासनास कितपत पाळतील? हे उघडच आहे व याचा अनुभव आपल्या जिल्ह्यास गेल्या कौन्सिल निवडणुकीपासून आहेच.

समजा निर्धन पण ध्येयवादी व कार्यक्षम असे उमेदवार उभे करून ते अपयशी झाले तर लोकांचा राष्ट्रसभेला पाठिंबा आहे की नाही हे तरी सिद्ध होईल. तरी जिल्हा राष्ट्रसभापतींनी आपल्या अशाच उमेदवारांची शिफारस करावी की ते काही झाले तरी लोकमतास चिकटून राहतील व असेच उमेदवार आज निवडून येतील. काँग्रेसने भलत्याच उमेदवारांना पाठिंबा देऊन जनतेच्या विश्वासाचा फायदा घेऊ नये. यामुळे जनतेला काँग्रेसबद्दल वाटणारी सहानुभूती कमी कमी होत राहील व इतर पक्षांचे मात्र फावेल. तरी आपल्या उमेदवारांची नावे प्रसिद्ध करून त्यांचे चरित्रही राष्ट्रसभा जनतेस सादर करील अशी पुन्हा विनंती करतो.

## लेखांक ३ रा

**(१) इलेक्शनने काँग्रेस प्रेमाचा पान्हा फोडला :** काँग्रेसने कौन्सिल प्रवेशाचा ठराव केला; तो वाचून मी त्याबाबत विरोधी असल्यामुळे मला फार वाईट वाटले. परंतु आज मला त्याबाबत आनंद होत आहे. कारण आता पक्षप्रवेशाची झुंबड उडलेली पाहावयास मिळत आहे. जे लोक काँग्रेसच्या कोणत्याही कार्यक्रमात कधी भाग घेत नव्हते, एवढेच काय पण गेल्या स्वातंत्र्ययुद्धात स्वयंसेवकाला आपल्या मोटारीजवळ

उभा राहू देणेसुद्धा जे पाप समजत होते; इतकेच नव्हे तर ज्यांच्या अंगावर संपूर्ण खादी कधीही चमकली नाही, त्यांच्यातील काहींनी नाममात्र खादी परिधान करून स्वतःला काँग्रेसनिष्ठ म्हणवून निरनिराळ्या लोकल संस्थांत शिरून जिल्ह्यात पक्ष उत्पन्न करून ठेवले, असे लोक आज काँग्रेसकरिता काय वाटेल ते करण्यास तयार झाले आहेत. ही त्यांची तयारी निवडणुकीपुरती न ठरो म्हणजे झाले.

**(२) मूळ स्वभाव जाईना** : काँग्रेसने आपली उमेदवारी मंजूर करावी म्हणून एकीकडे हे लोक स्वतःला काँग्रेसचे म्हणवून घेत आहेत तर दुसरीकडे निवडणुकीत काँग्रेसच्या धोरणाला धाब्यावर बसवून व्यक्तिशः व जातिनिष्ठतेच्या तत्त्वावर प्रयत्न करीत आहेत. ही यांची वागणूक पाहून मला तर हसूच येते. तूप खाऊन लागलीच रूप येत नाही व मूळ स्वभाव जात नाही म्हणतात हेच खरे.

**(३) जिल्ह्यातील वातावरण** : लोकल संस्थेत काम करणाऱ्या इसमाचा मूळ स्वभाव जाणार नाही व काँग्रेसमध्ये सुद्धा त्याच्यामुळे पक्ष माजतील हे जाणूनच की काय बहुसंख्याक सामान्य जनतेचे मत लोकल संस्थेत काम करणाऱ्यांना मुळीच उभे करू नये असे आहे. ही गोष्ट काँग्रेसच्या जबाबदार प्रचारकांच्याही वेळोवेळी लक्षात आली असेल. त्यांनी कोणत्या उमेदवाराला लोकमत अनुकूल आहे ते स्पष्ट कळवावे नाहीतर हा आत्मघात आहे असे मी समजेन.

**(४) मळमळीत सौभाग्यापेक्षा धगधगीत वैधव्य बरे** : वरील प्रकारची उमेदवारांची वागणूक असताना इतकेच नव्हे तर काही उमेदवार आम्हाला काँग्रेसने उभे केले नाही तर आम्ही स्वतंत्र उभे राहू असे काँग्रेस ऑफिसमध्ये स्पष्ट म्हणत असताना त्यांचे अर्ज काँग्रेस फाडून का टाकीत नाही? हे मळमळीत सौभाग्य काँग्रेस का पत्करते? का काँग्रेसला पडण्याची भीती वाटते? अशा तऱ्हेने निवडणुकीत यश येण्यापेक्षा अपयश आलेले मी पत्करीन. ह्या मळमळीत सौभाग्यापेक्षा धगधगीत वैधव्यच मला जास्त पसंत आहे :—

**उत्कट भव्य तेची घ्यावे। मळमळीत अवघेची टाकावे।**
**निःस्पृहपणे विचारवंत व्हावे। भूमंडळी॥**

अशी काँग्रेसची स्थिती असावयास पाहिजे. काँग्रेसमध्ये वशिलेबाजी व दलाली यांना बिलकूल स्थान मिळू नये. वर वर्णित उमेदवार पार्लमेंटरी बोर्डाचे एक सभासद श्री. जेधे यांचा वशिला लावू पहात आहेत, कारण ते दिल्ली असेंब्लीच्या निवडणुकीच्या वेळी व्यक्तिशः श्री. जेधे यांच्याकरिता फिरले होते. वास्तविक पाहता श्री. गाडगीळ व श्री. जेधे यांच्याकरिता व्यक्तिशः प्रयत्न करणे किंवा श्री. पाटणकर व श्री. वालचंदशेट यांच्याकरिता प्रयत्न करणे सारखेच. काँग्रेसनिष्ठ मनुष्य व्यक्तीकडे न पाहता काँग्रेसलाच मत द्या म्हणून प्रयत्न करील.

## पगारी काम करणे म्हणजे व्यक्तित्व विकणे की काय ?

ऑगस्ट १९३६

ता. १६–८–१९३६ च्या धुळे येथील प्रबोध पत्राच्या अग्रलेखात (डि. काँ. कमिटीची सभा पार्लमेंटरी बोर्ड नेमिले ) श्री. मदाने व विष्णू सिताराम पाटील या पार्लमेंटरी बोर्डावर निवडून आलेल्या सभासदांवर जी टीका व विवरण केले आहे, त्यावरून प्रबोधसारख्या जबाबदार व खानदेशच्या मुखपत्र म्हणविणाऱ्या वर्तमानपत्राद्वारा देखील जनतेची कशी दिशाभूल केली जाते इकडे जनतेने लक्ष देणे आवश्यक आहे.

प्रबोध-पत्र म्हणते, " श्री. मदाने व विष्णु सिताराम ह्यांची कीव येते. हे उभयता काँग्रेसचे पगारी प्रचारक आहेत. त्यांनी डि. काँग्रेस कमिटीचे उपाध्यक्ष श्री. टिळक व दुसरे अधिकारी श्री. शाळिग्रामशेट वगैरे ह्यांपैकी जास्त लायक कोण हे ठरवावयाचे म्हणजे नोकराने धन्याच्या श्रेष्ठतेची तुलना करून लायकी-नालायकीचा दाखला देण्यासारखे आहे. " श्री. मदाने व पाटील हे उभयता काँग्रेसचे एकनिष्ठ सेवक असतील पण तेवढ्याने त्यांना एवढा मोठा अधिकार घेण्याची पात्रता येते असे मात्र नाही. कोणत्याही संस्थेला एकनिष्ठ सेवकांची गरज असते पण अशा सैनिकांकडे त्यांचा दर्जा सोडून पाहण्याची प्रवृत्ती झाली की अनर्थ ओढवतात. " इत्यादी.

प्रबोधच्या मजकुरात प्रबोधने उपदेशाचा आव आणला आहे. पण आपलाच उपदेश आपल्या मजकुराने कसा फोल ठरत आहे याकडे मात्र त्याची दृष्टी वळली नाही असे आपणांस दिसून येईल. प्रबोधने जो येथे मालक व नोकर हा संबंध श्री. टिळक, श्री. शाळिग्रामशेट व श्री. मदाने, श्री. विष्णू पाटील यांत दाखविला आहे तोच चूक आहे. श्री. मदाने अथवा श्री. विष्णू पाटील हे कुणाही व्यक्तीचे नोकर नाहीत तर ते एका जबाबदार संस्थेचे नोकर आहेत. वरील व्यक्ती म्हणजे काँग्रेस नव्हे. व्यक्ती सतत बदलणाऱ्या असतात. श्री. मदाने वा श्री. पाटील हे नोकर म्हणजे ह्या व्यक्तींच्या मताचा प्रसार करणारे नव्हेत तर काँग्रेसच्या ध्येयाचा प्रसार करणारे आहेत. उद्या जर ह्या व्यक्ती काँग्रेसच्या ध्येयाविरुद्ध एखादी गोष्ट त्यांना सांगू पाहतील तर ते यांच्या आज्ञा धाब्यावर बसवून काँग्रेसचे ध्येय जगाला सांगतील. कारण ते काँग्रेसचे एकनिष्ठ सेवक आहेत असे प्रबोधकारच कबूल करतात. तेव्हा ते यांचे नोकर नसल्याने मालकांच्या उचनीचपणाची तुलना करण्याचे कामच त्यांना उरत नाही. ज्याप्रमाणे श्री. टिळक वगैरे काँग्रेसचे सभासद आहेत त्याचप्रमाणे तेही आहेत. तेव्हा सभासदांना असलेले निवडणुकीचे सर्व अधिकार त्यांना पोहोचणे क्रमप्राप्तच आहेत.

श्री. टिळक वगैरे जे कोणी काँग्रेसचे अधिकारी मंडळ असेल ते सभासदांनीच निवडून दिलेले असतात. त्यांना निवडून देणाऱ्यांतच त्यांचीही गणना होते. म्हणजे सभासदांचे अधिकारी हे मालक नसून प्रतिनिधी आहेत. याच प्रतिनिधींतूनही एखाद-दुसरे विशेष कार्य करण्याकरिता लायक कोण हे ठरविणे जसे सभासदांचे काम असते

तसेच ते यांचेही आहेच. हे जर नोकर असते तर त्यांची जिल्हा कॉंग्रेस कमिटीत निवड का झाली असती ? इतर वेळेस ते कॉंग्रेसचे नोकर असतील म्हणून काय त्यांनी आपल्या मताचा त्या योगे विक्रय केला ? जर नोकरांना मतदानाचा अधिकारच पोहोचला नसता तर प्रबोधचे हे विधान सत्य ठरले असते, व ज्या अर्थी त्यांना मतदानाचा अधिकार पोहोचतो, त्या अर्थी श्रेष्ठतेची तुलना करण्याचा अधिकारही त्यांस पोहोचतो.

जे सर्वस्वी लोकनियुक्त आहेत व ज्यांना अधिकारी मंडळाच्या बैठकीतही बहुमत मिळविता येते, त्यांची कीव करण्याचे प्रबोधकारांना कारणच नाही. उलट आपल्या या सैनिकांच्या यशाबद्दल सर्वांनी त्यांचे अभिनंदन करावयास हवे. म्हणजेच बहुजन समाजास हे कळून येईल की लायक माणसाला कॉंग्रेसमध्ये काम करावयास स्थान आहे, वाव आहे. येथे एखादा श्रीमंत लक्ष्मीवान असो, अथवा पोटाकरिता नोकरी करणारा सामान्य मजूर असो, गरीब-श्रीमंतीचा प्रश्नच येथे नाही. येथे लायकीला त्यागाची, कामाची किंमत आहे.

श्री. मदाने व श्री. विष्णू पाटील हे जरी कॉंग्रेसचे नोकर असले तरी ते गुलाम नाहीत. निःस्वार्थी सेवकांनी आपल्या आवश्यक अशा चरितार्थाकरिता वेतन घेणे हा काही गुन्हा नव्हे.

## धर्मग्रंथ म्हणजे कायदा

सन १९५५

[ अस्पृश्यता समूळ नाहीशी करण्यास हृदयपरिवर्तन हाच एक मार्ग ]

या लेखातील काही भाग.

समाजाचे कल्याण करणारा- समाजाला धारण करणारा- तो धर्म. ही धर्माची सुटसुटित व्याख्या- कालमानाप्रमाणे त्यात बदल करावा लागला म्हणूनच नाना वेद- श्रुती-स्मृती-शास्त्रे-पुराणे-इतिहास निर्माण झाले. नाहीतर जगाला जसा एकच सूर्य आहे, एकच चंद्र आहे तसा एकच धर्मग्रंथ राहिला असता. पण ज्याअर्थी ते अनेक आहेत त्याअर्थी कालमानाप्रमाणे ते लिहिले गेले आहेत हे उघडे सत्य आहे व या ग्रंथांनाच धर्मग्रंथ-म्हणजेच कायदे हे नाव मिळाले. कायदे अनंत केले तरी त्या कायद्यांचा व्यवहारात कितपत उपयोग झाला याच्यावर त्यांचे श्रेष्ठत्व अवलंबून राहिले. जोपर्यंत समाजाच्या अंतःकरणाचा त्याने ठाव घेतला नाही, समाजाच्या हृदयात त्यामुळे पालट झाला नाही तोपर्यंत त्या कायद्याचा काही उपयोग होऊ शकत नाही. म्हणूनच ज्या वेळी हे धर्मग्रंथ स्वतः आचरून त्या श्रेष्ठींनी लिहिले- जगाला सांगितले त्या त्या

वेळी शास्त्रात रूढिर्बलीयसी या एकाच न्यायाने या श्रेष्ठांचा छळ झाला. पण हा सारा छळ साहूनही, मी सांगतो हाच धर्म आहे, हेच सत्य आहे, हीच ईश्वरपूजा आहे, यातच समाजाचे कल्याण आहे असेच त्यांनी मरणापर्यंत सांगत राहून जनमनावर आपल्या तत्वांची– शिकवणुकीची छाप पाडली. त्यांची अंतःकरणे जिंकली, त्यांचा हृदयपालट केला तेव्हाच ते श्रेष्ठ ठरले व त्यांनी लिहिलेला कायदा हा धर्मग्रंथ बनला.

## अहिंसामय सामाजिक क्रांती हाच धार्मिक मार्ग

समाजातील उच्चनीचता-भेदाभेद-आर्थिक, धार्मिक, सामाजिक विषमता नाहीशी करण्यासाठी हाच मार्ग आजवर जगातल्या कुठल्याही धर्मसंस्थापकांनी किंवा प्रचारकांनी सर्वश्रेष्ठ मार्ग आहे असे सांगितले याचे गमक तरी काय ? धर्मात जी वसुधैव कुटुंबकम्ची कल्पना– हे परमोच्च ध्येय गाठण्याची दृष्टी आहे ते द्वेषाने, हिंसेने, परस्परांचे खून पाडून कसे साध्य होईल ? तेव्हा जरी कायदा केला तरी कायद्याने आपणा परस्परातील प्रेमभाव वाढविण्याची– जरी तो कायदा करताना इच्छा किंवा ध्येय असले तरी, ज्यांना त्यापासून दंड-शिक्षा होईल, त्यांच्या ठिकाणी द्वेषच वाढीस लागण्याचा अधिक संभव आहे; व ज्याअर्थी कायदा माहीत असूनही तो ती गोष्ट धार्मिक आहे या समजुतीने व पापाच्या भयाने, करावयास सिद्ध होतो त्याअर्थी त्याच्या मनास त्याच्या बुद्धीप्रमाणे तो प्रांजल राहण्याचा प्रयत्न करतो हे निश्चित समजणे भागच आहे. जोपर्यंत त्याला तो पाळत आहे हा अधर्म आहे हे पटवून देता येणे शक्य होणार नाही तोपर्यंत हा संघर्ष राहीलच व त्यामुळे द्वेषही राहणारच, म्हणून अहिंसक मार्गाने मने जिंकणे हाच एकमात्र पर्याय हे भेदाभेद नष्ट करण्यासाठी आचरणे भाग आहे.

भारतीय घटनेने व कायद्याने अस्पृश्यता आज उरलेली नाही पण प्रत्यक्षात काय ? समाज सेवकांचे अविरत प्रयत्न, साधुसंत, ऋषिमुनी, धार्मिक ग्रंथ, वेद यांचे पाठबळ व सरकारी सत्ता ही पाठीशी असतानासुद्धा अस्पृश्यता आहे त्या स्वरूपातच आज कायम आहे. कायद्याने दिलेले हक्क हरिजनांना उपभोगता येत नाहीत.

एखादी सार्वजनिक विहीर किंवा सार्वजनिक मंदिर, हॉटेल, केशकर्तनालय खुले करण्यासाठी केवढे दीर्घ प्रयत्न आज करावे लागतात याचा अनुभव घेतला किंवा त्याचे मोजमाप केले म्हणजे या गतीने अस्पृश्यता कधी नष्ट होईल व ' सर्वे अत्रः सुखिनः सन्तु ' चे रम्य स्वप्न आम्ही कधी वास्तव्यात पाहू ? याचा विचार उत्पन्न होतो.

## अंधळी न्यायदेवता

भारतीय घटनेने राव वा रंक या दोघांच्या मताची किंमत एक ठरविली. पुस्तकात राजाचे राज्य गेले, प्रजेचे राज्य आले. पण कायद्याने सामाजिक क्रांती होत नाही. शहरांतून, खेड्यांतून आजही एखादाच श्रीमंत दिसतो व हजारो दुःखित-पीडित दिसतात. श्रीमंतांच्या आश्रयाने आपण जगत आहोत ही खुळी कल्पना आजही अज्ञानाने

दुःखितांच्या मनात ठाण मांडून बसली आहे व मोठयांशी कशाला वैर करा? ही भीतियुक्त भावना त्यांच्यात दिसून येते. कायदा जरी त्यांच्या बाजूने आहे तरी आपले हक्क बजावून घेण्यास त्यांची तयारी नाही, कारण न्यायदेवता अंधळी आहे. जनतेच्या डोळ्यांनी तिला पाहणे भाग आहे. साक्षी-पुराव्यावर न्यायाचा निकाल लागतो व साक्षीदार वैयक्तिक स्वार्थासाठी धनिकांचे दबलेले असतात किंवा स्वतःच्या असमर्थतेने लाचार-दुबळे बनून त्यांची जीभ सत्य सांगू शकत नाही. यामुळे कायदे पुस्तकात राहतात व राव रंकावर अधिकार गाजवतात, म्हणजेच कायद्याने त्यांना दिलेले अधिकार, सुख-सोयी यांचे अपहरण करतात. आजतर केवळ साक्षीपुरावे देणारे त्यांना दबलेले आहेत असे नाही तर ज्यांच्या हाती कायद्याने जनतेला पाठबळ देण्याची सत्ता आहे ते सत्ताधारी-अधिकारीही स्वार्थांध होऊन धनिकांचे गुलाम बनलेले दिसतात व कायद्याची भंबेरी उडलेली आपण सर्वत्र पाहतो.

### जमाना बदलला

लोकराज्य आले, कायदा झाला तरी भेद नाहीसे झाले नाहीत, असे जरी असले तरी आज ना उद्या ही परिस्थिती बदलेल असा विश्वास आज वाटत आहे, कारण जमाना बदलला आहे. रामराज्य जाऊन प्रजाराज्य सुरू झाल्यामुळे प्रजेला आपल्या हक्कांची जाणीव होऊ लागली आहे. पण हक्क घेताना सुद्धा ज्याच्याजवळून ते घ्यावयाचे आहेत त्याची हिंसा करणे किंवा ज्या वागणुकीने आपणास त्याची घृणा वाटत होती तीच वागणूक आपण आचरणे अधर्म होईल. याऐवजी सामुदायिकपणे सगळ्यांच्या कल्याणात त्याचे कल्याण आहे, पाण्याचा एकाकी थेंब त्वरित सुकून जातो तसा या प्रजाराज्यात प्रजेला विरोध करून, तिच्या मनात द्वेषाचा भडका होईल असे वागण्याने त्याचा सर्वनाश होईल, हे तत्त्व त्याने जाणले पाहिजे. मानवाला मानवाने मानवाप्रमाणे वागविले पाहिजे, आपल्याला हजारोत सामावून घेतले पाहिजे, हाच आजचा कल्याणकारी मार्ग आहे.

## दारूबंदी

### दारूबंदीचे धोरण शिथिल करणे महाराष्ट्राच्या परंपरेस शोभणारे नाही

[ दलित सेवक १५ सप्टें. १९६७ ]

नुकतेच महाराष्ट्र सरकारचे मुख्य मंत्री श्री. वसंतराव नाईक यांनी त्यांना काँग्रेसच्या कार्यकारिणीने दारूबंदीचे धोरण शिथिल करण्यास परवानगी दिली आहे, असे घोषित केले व त्या घोषणेनुसार महाराष्ट्र सरकारची पावले लवकरच उचलली जातील असेही त्यांनी जाहीर केले.

अनेक वर्षांच्या तपश्चर्येने व अनेकांच्या त्यागाने आणि बलिदानाने दारूबंदीचे धोरण भारतातील काही प्रांतांमध्ये अमलात आले. स्व. म. गांधींनी यासाठी अविरत प्रयत्न केले व दारूबंदी व्हावी म्हणून पिकेटिंगची मोहीम या देशात झाली. महिलांनी यासाठी अपार कष्ट केले व आपल्या संसाराची आपल्या डोळ्यांदेखत होणारी राखरांगोळी थांबावी म्हणून या चळवळीत भाग घेतला. कोणत्याही देशात जेथे मद्यपान निषेध नाही तेथेदेखील मद्यपान शिष्टसंमत नाही व दारू पिणे चांगले असे आजवर कोणीही म्हटल्याचा पुरावा इतिहासात नाही.

ज्या राष्ट्रात दारूचे व्यसन वाढावे म्हणून सरकार प्रयत्न करील त्या देशाचे स्वातंत्र्य हे स्वातंत्र्य नव्हे असे महात्माजींनी वारंवार सांगितले. दारूपासून सरकारने कोणत्याही परिस्थितीत कर मिळवून देशाचा विकास साधावा हे तर अत्यंत लाजिरवाणे आहे. गोरगरीब, अज्ञान पीडितांच्या हजारोंचे संसार एकीकडे उद्ध्वस्त करावयाचे व दुसरीकडे त्यांचा विकास साधण्याच्या गप्पा मारावयाच्या या परस्पर विरोधी गोष्टी कधीही साधणार नाहीत. असे स्वातंत्र्यपूर्वकाळातच काय पण आज देखील कोणा सुज्ञास वाटेल असे वाटत नाही. म्हणूनच भारताच्या घटनेत मार्गदर्शक अशी जी तत्त्वे नमूद केली आहेत त्यांत दारूबंदीबाबत आदेश दिलेले आहेत. घटनेचे हे आदेश महाराष्ट्र सरकार आज बाजूला ठेवून पाहात आहे.

महाराष्ट्र सरकार हे सर्व देशात पुरोगामी सरकार म्हणून प्रसिद्ध आहे. देशात सर्वप्रथम स्वातंत्र्यप्राप्तीनंतर दारूबंदी महाराष्ट्र सरकारने अमलात आणली हे विसरता येणार नाही. महाराष्ट्र सरकारने हे धोरण यशस्वी होण्यासाठी जे प्रयत्न करावयास हवे होते, ते करू शकले नाही. लोकांमध्ये या विचाराचा प्रादुर्भाव होण्यासाठी ते जनतेचे व सामाजिक कार्यकर्त्यांचे साहाय्य मिळवू शकले नाही याचा हा स्पष्ट पुरावा आहे. यासाठी महाराष्ट्र सरकार व सामाजिक कार्यकर्ते यांनी परस्परांच्या सहकार्याने जिद्दीस पेटून दारू-बंदी यशस्वी करण्याचा प्रयत्न केला पाहिजे. ते न करता दारूबंदी धोरण फसले म्हणून शरणागती पत्करून जर दारूबंदी धोरण शिथिल करण्याचा सरकार प्रयत्न करील, तर महाराष्ट्राचेच नव्हे तर अखिल मानव जातीचे त्यात कायमचे अकल्याण ठरेल असा धोक्याचा इशारा या निमित्ताने सरकारला द्यावासा वाटतो.

ज्या कारणासाठी सरकार हे पाऊल उचलावयाचे म्हणते ती कारणे तर अगदीच तुटपुंजी व विचारवंतांच्या बुद्धीस न पटणारी आहेत. दारूबंदीच्या धोरणाचा विचार करण्यासाठी नेमलेल्या टेकचंद समितीच्या शिफारसी दारूबंदी सर्व देशभर करण्यात यावी अशा स्पष्ट आहेत, परंतु काही लोकांना असे वाटते की, सध्या सर्वत्र दारूबंदीमुळे हातभट्ट्या सुरू झालेल्या आहेत व दारूचे व्यसन वाढलेले आहे. पूर्वी इंग्रजांच्या राज्यात सर्वत्र दारूची दुकाने राजरोस चालत होती तरी हातभट्ट्या होत्याच. तसेच आज मध्य प्रदेशात व केरळमध्ये दारूबंदी सैल करण्यात आलेली आहे पण तेथील सरकारच्या अहवालावरून त्यांना सरकारी महसूल दारूबंदीपासून मिळत नाही व

हातभट्ट्याही कमी झालेल्या नाहीत असे दिसून येते. महाराष्ट्रातही तेच व्हावयाचे आहे. सरकारला दारूबंदीपासून अपेक्षित महसूल तर मिळायचा नाहीच पण हातभट्ट्यांचे प्रमाणही कमी होणार नाही. यासाठी दारूबंदीचे धोरण सैल करणे हा मार्ग नसून त्यासाठी समाजात जागृती निर्माण करून दारूच्या विरुद्ध लोकमत तयार करणे व दारूबंदी यशस्वी करणे हाच मार्ग आहे.

दारूचे गुन्हे वाढत आहेत व देशात यासाठी कायद्याने लोकांना दारू दिली जावी व या प्रवृत्तीस आळा घालावा हा मुद्दा तर अगदीच नादानपणाचा आहे. परवाच एका थोर न्यायाधीशांच्या अध्यक्षतेखाली मुंबईत भरलेल्या दारूबंदी परिषदेत या न्यायाधीशांनी गेल्या पाच वर्षांचे सरकारी आकडे देऊन असे दाखविले की या पाच वर्षांत दारूबंदीचे गुन्हे दरवर्षी कमी झाल्याचे दिसते. उलट चोरीचे व स्मगलिंगचे गुन्हे मात्र दरवर्षी वाढत आहेत. मानव जातीच्या सामूहिक जीवनास सुरवात झाल्यापासून तो आजच्या इंडियन पीनल कोडपर्यंत चोरी करणे वाईट व समाजघातक आहे असे म्हटले आहे. त्यासाठी शिक्षा होतात तरी गुन्ह्यांचे प्रमाण वाढत आहे म्हणून का चोरी करण्याची मुभा सरकार देणार आहे ? असा रोखठोक जबाब या न्यायाधीशांनी सरकारला विचारला आहे. गुन्हे करण्याची प्रवृत्ती दिवसेंदिवस समाजात वाढत आहे, कायदा धाब्यावर बसविला जात आहे, याला कारण आजचे समाजधुरीणच आहेत किंबहुना आजचे कॉंग्रेसचे राज्यकर्तेच आहेत. गुन्ह्यांचे प्रमाण वाढत आहे म्हणून दारूबंदी शिथिल करण्याचा मार्ग अवलंबिणे हे सर्वथैव धोक्याचे आहे.

काही मध्यमवर्गीय आज दारूबंदीच्या धोरणाबाबत सारखा विरोध करीत आहेत. त्यांच्या थोड्या सोयीसाठी जे आज अज्ञानात व गरिबीत आपले संसार करीत आहेत त्यांना दारू मोकळी करून तिला एकप्रकारची सामाजिक प्रतिष्ठा मिळवून देऊन व्यसनात ढकलायचे व त्यांच्या उद्ध्वस्त झालेल्या संसाराच्या चितेवर आपले हरबरे भाजावयाचे अशी ही कुटिल नीती समाजास घातक ठरेल.

कोणीही मातापिता आपल्या हाताने आपल्या मुलाबाळास कधीही दारूचा पेला देणार नाही. तो जरी अत्यंत दारुडा असला, व्यसनाधीन असला तरी ज्या वेळेस तो शुद्धीत असेल त्याची सद्सद्विवेक बुद्धी जागृत असेल, काम करण्यास समर्थ असेल, त्या वेळी तो दारू पिणे वाईटच म्हणेल व आपली वंशवेल त्यापासून करपून जाऊ नये म्हणून तिला तो या व्यसनापासून अलिप्त ठेवील. हा मनुष्यस्वभाव आहे. मग राष्ट्राचे व जनतेचे जे सरकार मायबाप म्हणवून घेते त्याने आपल्या हाताने दारूची दुकाने उघडून ती दारू चांगली आहे असे सांगून जनतेला ती खुली करणे कितपत योग्य ठरेल ?

दारू पिणे हे व्यसन आहे. सरकार ३·५ टक्क्याची दारू खुली करणार असे म्हणते. ३·५ टक्क्यांची नशा येणारच व नशा सारखी वाढीस लागणार. ती किती टक्क्यांची आहे या विचारास काहीच अर्थ राहात नाही. तेव्हा हा मुद्दा तर अगदीच पोरकट आहे.

हरिजन, गिरिजन व मागासवर्गीयांना आज दारूबंदीमुळे जे थोडेसे शिक्षण

मिळत आहे, त्यांच्या घरात जी थोडीशी भांडीकुंडी दिसत आहेत ती दारूबंदीचे धोरण शिथिल झाले तर मुळींच दिसणार नाहीत. या सरकारच्या विचारामुळे हा अज्ञानी समाज आज हवालदिल झाला आहे. जे व्यसनी आहेत ते आज अन्य मार्गांनी पितात. पण उद्या दारू मुक्त झाल्यावर ते सर्रास पिऊ लागतील, तरी त्यांची प्रतिष्ठा वाढेल व त्यांच्या देखादेखी अनेक पिऊ लागतील. तेव्हा सरकारने दारूबंदीवर स्थिर राहिले पाहिजे अशी आमची आग्रहाची विनंती आहे.

## दुष्कर्मासाठीसुद्धा मुहूर्त साधतातच (दलित सेवक १ नोव्हेंबर १९६७)

महात्मा गांधींच्या जन्मदिनी सुमुहूर्त गाठून २ ऑक्टोबरला महाराष्ट्राचे एक एम्. एल्. ए. आपले डेप्युटेशन घेऊन महाराष्ट्राच्या मुख्य मंत्र्याकडे गेले होते. डेप्युटेशन नेण्याचा मुख्य उद्देश होता, "ताडी–माडी खुली केली पाहिजे." भंडारी समाजाला कामधंदा मिळाला पाहिजे व त्यांच्या बायकामुलांची उपासमार थांबली पाहिजे, याबद्दल कुणाचेही दुमत असावयाचे कारण नाही. पण त्यांच्या सौख्यासाठी लक्षावधी अडाणी, अज्ञानात खिचपत पडलेल्या आदिवासी, हरिजन, अशिक्षित बांधवांना ताडी-माडीच्या व्यसनात लोटावयाचे, त्यांच्या तोंडातला घास काढावयाचा, त्यांना उपासमार घडवावयाची, आज त्यांच्या अंगावर दिसणारे अर्धवट वस्त्र नाहीसे करून त्यांना संपूर्ण उघडे बनवावयाचे, थोडे कोठे ते शिक्षण घेऊ लागले आहेत त्यापासून त्यांना वंचित करावयाचे व एकाच्या सुखासाठी शेकडोंचा बळी घ्यावयाचा हा प्रकार कोठवर शहाणपणाचा होईल याचा विचार या एम्. एल्. ए. महाशयांना व त्यांच्या बरोबर गेलेल्या भंडारी कार्यकर्त्यांना कसा शिवला नाही? याचे आश्चर्य वाटल्यावाचून राहात नाही. समाजवादी म्हणून हे एम्. एल्. ए. स्वतःला म्हणवून घेतात. समाजवादी पक्षालाही हे मान्य आहे का? असा प्रश्न मनात येतो. आपल्या क्षुद्र स्वार्थासाठी दुसऱ्यांच्या संसारात विष कालविल्यासारखेच हे आहे.

या मागणीसाठी २ ऑक्टोबरचा मुहूर्तच या एम्. एल्. ए. साहेबांना का युक्त वाटला हे तर एक जबरदस्त कोडे आहे. महात्मा गांधींचा शुभाशीर्वाद, त्यांचे डेप्युटेशन यशस्वी व्हावे म्हणून ते इच्छितात की काय? महात्मा गांधींनी एके ठिकाणी असे म्हटले आहे की, 'वेश्या व्यवसाय एक वेळ चालेल पण दारू पिणे किंवा त्यासाठी दारू मोकळी ठेवणे हे त्यापेक्षाही वाईट आहे.' त्यांनी असेही म्हटले की, 'जर मला कोणी एक घंट्याकरिता भारतीय राज्याचे सर्वाधिकार दिले तर मी या घंट्यात सर्वप्रथम भारतात सर्वत्र दारूबंदी अमलात आणीन व मानवी जीवनाचा हा महान शत्रू नाहीसा करीन.' त्याच महान नेत्याच्या पवित्र जन्मदिवशी 'ताडी-माडी खुली' ही मागणी करावयाचे धाडस तरी कसे होते?

दारूबंदी होण्यापूर्वी जेव्हा भारतात दारूची व ताडी-माडीची दुकाने खुली होती त्या वेळची दृश्ये या एम्. एल्. ए. साहेबांनी पाहिलेली नाहीत. अक्षरशः घरादारात

चौदा विश्वे दारिद्र्य, अंगभर वस्त्र नाही, घासभर अन्न नाही, शिक्षणाचा संपूर्ण अभाव. जे काही मोलमजुरी करून मिळे ते परस्पर दारू-ताडी-माडीमध्ये खर्चावयाचे. त्याच्या नशेने धुंद होऊन अक्षरशः गटारीत लोळणारे, सर्वत्र ओकून घाण करणारे व अंगात पशुसम संचार झालेले हे व्यसनी आपल्या बायकांना व मुलांना रात्रंदिन बडवीत असलेले, अशी दृश्ये चोहोबाजूस कोठेही झोपड्यात पाहता आढळत असत. दारूबंदी झाल्यापासून ही दृश्ये सहसा दिसत नाहीत व या गरीब अज्ञ जनतेस आपण मानव आहोत अशी थोडीशी जाणीव होताना दिसत आहे.

भंडारी समाज आज २० वर्षे आपल्या धंद्यावाचून जगला आहे. तो बेकार आहे हा केवळ बोभाटा आहे. कारण त्यांचा धंदा ताडी-माडीला टॅप करणे हा आहे. नीरेच्या उद्योगात आजही १। लक्ष टॅपर्सची आवश्यकता आहे. नीरा ताडगुळाची मागणी असून त्यांना टॅपर्स मिळत नाहीत. तेव्हा ते बेकार आहेत ही ओरड व्यर्थ आहे. आपल्या माड्या उठविण्याकरिता, लाखोंच्या घरांची राखरांगोळी करण्याकरिता जर त्यांना गांधीजींच्या आशीर्वादाची अपेक्षा असेल तर त्यांच्या पदरी शापच पडेल हे त्यांनी निश्चित समजावे.

सरकारने नुकताच दारूबंदी सप्ताह साजरा केला. अर्थात सरकार दारूबंदी यशस्वी करू चाहते हे निश्चितच.

## महाराष्ट्र सरकारच्या दारूबंदी धोरणाबाबत व्यथा व्यक्त करण्यासाठी उपोषण

दलित सेवक, १ ऑक्टोबर १९६७

सरकारने गेल्या वीस वर्षांत दारूबंदीसाठी जी सामान्य जनतेची सहानुभूती मिळवावयास पाहिजे होती ती ते मिळवू शकले नाही. ज्या सार्वजनिक सेवकांची यासाठी त्यागाची तयारी होती त्यांना गुंडांपासून संरक्षण सरकार देऊ शकले नाही व तेही ज्या हिरिरीने दारूबंदीसाठी त्यांनी पिकेटिंग केले त्या हिरिरीने या दारूबंदीच्या यशस्वितेकरिता कार्य करू शकले नाहीत. सर्वांत मोठी व राष्ट्रविघातक गोष्ट म्हणजे ज्याच्या बळावर राष्ट्राच्या संस्कृतीचे व जीवनमूल्यांचे यश अवलंबून आहे ते संरक्षक पोलीस खाते, सरकारने राष्ट्राच्या हितासाठी उचलेले पाऊल यशस्वी व्हावे म्हणून परिणामकारक साहाय्य सरकारला करू शकले नाही. ते कायदा मोडणाऱ्यांच्या पाठीशी स्वतःच्या थोड्या स्वार्थासाठी उभे राहिले आणि हातभट्ट्यांचा व्यवहार बोकाळला. सरकारच्या सर्व राष्ट्रहितासाठी केलेल्या कायद्यांना आज धूळ चारली जात आहे. याचेही कारण तेच आहे. हे सूर्यप्रकाशाइतके सत्य असताना सरकार त्याकडे काणाडोळा करते. पोलीस खात्याची ही अराष्ट्रीय वृत्ती नष्ट करण्याऐवजी आपण हरलो, पोलीस खाते दुरुस्त करता येत नाही, हातभट्ट्या वाढत आहेत या सबबीसाठी दारूबंदीचे धोरण सैल करून दारूच्या हातभट्ट्या थांबतील असे समजणे ही सरकारची आत्मवंचना आहे.

एकीकडे गांधीजन्मशताब्दीच्या अनेकानेक योजना आखणारे हे सरकार गांधीजन्मशताब्दीपूर्वीच गांधीजींच्या अमोल तत्त्वांना काळे फासण्यास सिद्ध व्हावे हा केवढा दैवदुर्विलास! गांधींचे पुतळे उभारून, त्यांच्या जयंत्या साजऱ्या करून, 'महात्मा गांधी की जय' अशा घोषणा देऊन आम्ही गांधींच्या मार्गाने जाऊन त्यांनी रेखाटलेल्या रामराज्याचे चित्र पूर्ण करीत आहोत ही धूळ जनतेच्या डोळ्यांत फेकणाऱ्या सरकारला जनताही ओळखते.

## राष्ट्रीय एकात्मता साधण्यासाठी महान आपत्तीने दिलेल्या संधीचा फायदा घ्या

(दलित सेवक १ एप्रिल १९६८)

११ डिसेंबर १९६७ ची ती भयाण रात्र. भारताच्या बऱ्याच भागाला भूकंपाचा जाणवेल व कायमचा लक्षात राहील असा धक्का देऊन गेली. सगळीकडून मदतीचा ओघ कोयनेच्या परिसराकडे वळला. एक गोष्ट सगळ्यांनाच पटली की, या दैवी आपत्तीने गरीब-श्रीमंतांचा, लहान-मोठेपणाचा, जातीपातीचा, धर्माचा, उच्च-नीचत्वाचा कसलाही भेदभाव न ठेवता सर्वांना सारख्याच मापाने मोजले. ही ब्राह्मण वस्ती आहे वा हरिजन वस्ती आहे, हा मुसलमान आहे वा हिंदू आहे, हा ख्रिश्चन आहे, हा पारशी आहे असा कसलाही विचार ठेवला नाही. तोच विचार मदतीचा ओघ पाठविताना राष्ट्रीय व परराष्ट्रीय बंधूंनीही ठेवला नाही. 'भूकंपग्रस्तांना मदत पाठवा' ही एकच हाक राष्ट्राच्या कानी येत होती.

आता भूकंपग्रस्तांच्या पुनर्वसनासाठी घरे बांधण्याच्या महान कामाची सुरवातही झाली आहे. केवळ एकऱ्या कोयना नगरचा हा प्रश्न नाही तर सातारा, रत्नागिरी व कोल्हापूर जिल्ह्यांमधील असंख्य गावांतील घरांचा फार मोठा व्यापक असा हा प्रश्न आहे. तेव्हा हा प्रश्न सोडविताना अतिविशाल दृष्टीने विचार करण्याची आवश्यकता आहे. जी एकात्मता दैवी आपत्तीने दाखविली त्यापेक्षाही व्यापक राष्ट्रीय एकात्मता या पुनर्वसनात दिसून आली पाहिजे.

भारताच्या जातीयतेचे मूळ खेड्यापाड्यांतून वा शहरांतून असणाऱ्या जातीय वस्त्या वा वाडे यांत रुजलेले आहे. लक्षावधी खेड्यांत वा शहरांतूनही हा ब्राह्मण वाडा, हा महारवाडा, हा चांभारवाडा, ही सुतारगल्ली, ही वाणी गल्ली, हा कुंभारवाडा अशा अनंत जातींच्या नावाने ओळखले जातात. चांगल्या वस्त्या होण्यासारख्या जागा तथाकथित उच्चवर्णीयांनी बळकावल्या आहेत व गलिच्छ, घाणेरड्या, गावच्या टोकाला गावचे सांडपाणी वा उकीरडे असतील अशा जागेतच अद्यापही मागासवर्गीय कारू, नारू, गावकामगार, सफाई करणारे, चर्मोद्योगी, महार, चांभार, मांग आदींच्यासाठी राखून ठेवलेले आजही दिसतात. मेहेतरांच्या घरांबद्दल तर विचारावयासच नको. जेथे

सारा गाव मलविसर्जन करील, साऱ्या गावच्या गटारींचे पाणी एकत्र होऊन मोठा दुर्गंधी नाला झाला असेल, जेथे उकिरडे असतील व आरोग्याचे एकही साधन जेथे नसेल अशा सार्वजनिक संडासांच्या आसऱ्यालाच त्याने राहिले पाहिजे. इतकेच नव्हे तर मैल्याच्या दुर्गंधीतच त्याने आपल्या मुलाबाळांसह जेवण घेतले पाहिजे, अशी सक्ती आजही त्यांच्यावर होत आहे.

स्वराज्य मिळून २१ वर्षांचा काळ लोटला. घटनेने सर्वांना समान हक्क दिले. समान शिक्षण व समान आरोग्याची हमी सर्वांना जाहीर झाली. अस्पृश्यता निवारणाचा कायदा पास झाला, परंतु आजही हरिजनांतील कितीही सुसंस्कृत उच्च पदवीधराला, सरकारी अधिकाऱ्याला वा श्रीमंत व्यापाऱ्याला सवर्ण वस्तीत घर मिळू शकत नाही अशी अनेक उदाहरणे दाखविता येतील. राष्ट्रीय एकात्मतेचा जयघोष चालत असला तरी ' मुखमें राम बगलमें छुरी ' या म्हणीचा प्रत्यय सर्वत्र येतो.

राष्ट्रीय सीमेवरील आघाडी सांभाळणाऱ्या हरिजन जवानांच्या कुटुंबियांना गावच्या विहिरीवर पाणी भरावयास मिळत नाही, असे जेव्हा त्यास समजते तेव्हा त्याच्या मनाची अवस्था काय होत असेल याचा कधी कोणी विचार करतो का ? अपमानाने जीवन जगावयाची पाळी जेव्हा या मागासवर्गीय सुशिक्षित अधिकाऱ्यावर वा तरुणावर येते तेव्हा त्याला होणाऱ्या असह्य वेदनांची कधी चर्चा केली जाते का ? राष्ट्रीय एकात्मता कशी निर्माण व्हावी ?

' खाजगीरीत्या या गोष्टी होतात त्या हळूहळू हृदयपरिवर्तनाने बदलतील, थोडे दमाने घ्या ' असा युक्तिवाद यावर केला जातो. परंतु जोडा घालणारा त्याचे चावण्याचे दुःख समजू शकतो. परदुःख शीतल असते तेव्हा ज्यांना हे अपमानास्पद जिणे जगावे लागते त्यांना ते मिनिटभरही साहणे अशक्य होणे साहजिक आहे. तेव्हा निदान सरकारला जेथे काही सरकारी खर्चाने करावयाचे असेल तेथे तरी सरकार या गोष्टीचा आग्रह धरते आहे, इतकेच नव्हे तर प्रत्यक्ष कृती करून राष्ट्रीय एकात्मतेला जेथे तडा पडत असेल अशा गोष्टी घडू देणार नाही, देत नाही असा प्रत्यय जनतेला मिळाला पाहिजे. तसा प्रत्यय मिळाला तरच कोट्यवधी हरिजन, गिरिजन, मागासवर्गीय जनता राष्ट्रीय एकात्मतेला साथ देईल अन्यथा त्यांच्या ठिकाणी ज्वलंत द्वेषाची भावना निर्माण झाल्याशिवाय राहणार नाही याची सरकारने दखल घ्यावी.

मागे नद्यांच्या महापुराने अनेक गावी पुनर्वसनाचे कार्य केले गेले. अनेक निर्वासितांचे पुनर्वसन झाले. त्या वेळीही ही परिस्थिती सरकारच्या लक्षात आणून देऊनही सरकारने त्या बाबतीत फारसे लक्ष दिलेले नाही असे खेदाने म्हणावे लागते.

विधिमंडळाच्या सदस्यांना आपले मतदार खुश ठेवावे लागतात. त्यांचे सगेसोयरे, आप्तेष्ट, नातेवाईक, जातबांधव, यांच्याकडून त्यांना मते मिळवावयाची असतात. किंबहुना जातीवरच निवडणुकांची तिकिटे अद्यापही पक्षोपपक्षांना वाटावी लागतात. मग विधि-मंडळाचे वा राज्यसभेचे सवर्ण सभासद या गोष्टीसाठी आग्रह कधीच धरणार नाहीत. तेव्हा

बहुमतवाल्या पक्षीय सरकारनेच याकडे कोणाच्याही विरोधास न जुमानता आग्रह धरून पुनर्वसनाच्या वेळी जातीय वाड्यांना-वस्तींना मूठमाती दिली पाहिजे. राष्ट्रीय एकात्मतेच्या दृष्टीने हे त्यांचे परमकर्तव्य आहे. कोयना परिसरात पुनर्वसन करताना राष्ट्राचा कोट्यवधी रुपये खर्च व्हावयाचा आहे. हे रुपये खर्चून जर हजारो वर्षे चालत आलेल्या रूढ्यांप्रमाणे जातीय वाडेच तयार होणार असतील तर आजच्या सरकारला राष्ट्रीय एकात्मतेच्या धोरणाचे केवळ ढोंगच करावयाचे आहे असे म्हणावे लागेल. जर खरोखरीच सरकारला राष्ट्रीय एकात्मता साधावयाची असेल तर हरिजनांना संरक्षणाची हमी देऊन संमिश्र वस्तीत राहावयास ते प्रवृत्त होतील अशी व्यवस्था केली पाहिजे. ग्रामीण जनतेला संमिश्र वस्तीने राहण्याची गरज पटविली पाहिजे, व ते तयार नसतीलच तर ती गोष्ट त्यांच्यावर लादली पाहिजे.

हरिजनांनी यासाठी आपल्या हक्कांचे संरक्षण व्हावे म्हणून खडबडून जागे झाले पाहिजे. गलिच्छ गाव किनाऱ्याच्या जागेत यापुढे आम्ही राहणार नाही असा निश्चय त्यांनी दाखविला पाहिजे.

हरिजन आमदारांनी याची तड लावून घेण्याचा निश्चय केला पाहिजे. अन्यथा त्यांनी स्वजनांचा द्रोह केल्याचे घोर पाप त्यांच्यावर येणार आहे. कारण नियतीने आपत्तीच्या रूपाने का होईना, दिलेल्या संधीचा जर त्यांनी उपयोग करून घेतला नाही तर पुन्हा शेकडो वर्षे या पुनर्वसित घरांत जरी त्यांना राहावयास मिळाले; ते घर जरी इतरांसारखे नीटनेटके बांधलेले असले तरी, गावच्या घाणेरड्या वस्तीत व आरोग्यहीन अशा ठिकाणीच ते असेल व त्या दुर्गंधीतच त्यांच्या भावी पिढ्यांना राहावे लागेल याचा विचार त्यांनी केला पाहिजे. म्हणून विनंती एवढीच की राष्ट्रीय एकात्मतेचा महान विचार रुजविण्याची आलेली ही संधी संमिश्र वसाहती निर्माण करून सगळ्यांनी साधावीच.

## कुटुंब नियोजन

[ धर्म, अर्थ, काम, मोक्ष साधण्याकरिता गृहस्थाश्रमाची नितांत आवश्यकता; पण ते संयमित हवे. गृहस्थाश्रमात कामदेवतेला किती स्थान हवे याचे विवेचन अण्णा करीत, " भाराभार प्रजोत्पादन करणे म्हणजे पुरुषार्थ नव्हे. प्रजोत्पादन हेच कर्तव्यकर्म लोक समजत गेले अन् कोटींची भर लोकसंख्येत पडली. सुप्रजोत्पादन करून, त्याचे चांगले लालनपालन करून त्यास सत्प्रवृत्त गृहस्थ बनविणे हे पित्याचे काम. आज काय अवस्था दिसते ? मुलाबाळांना पुरेसे खायला नाही, कपडे नाही, शिक्षण नाही - नियोजन नको का ? "

अण्णांच्या पत्नीला लहानपणी एका ज्योतिषाने ' तुला सात मुली होतील ' असे भविष्य सांगितले होते. विवाह झाल्यानंतर अण्णांना हे समजले तेव्हा ते खळाळून हसले

व म्हणाले, एकच अपत्य, अन् अण्णांनी लगेच संस्कृत सुभाषिताचे भाषांतर तयार करवून ऐकविले.—

**गुणी एकच मुलगा, अधिक बरा, दुर्गुणी शताहून**
**एकच चंद्र करी तम नाश, न हो लाख तारकांकडून।**

विवाहप्रसंगी अण्णांचे वय गृहस्थाश्रमास परिपूर्ण म्हणजे २५ वर्षे पूर्ण होते, पण पत्नी अल्पवयीन सव्वातेरा वर्षांची. ती सभोवती वावरते आहे, पण अण्णांचा पराकोटीचा संयम; त्या काळात पत्नीला साधा स्पर्शही त्याज्य. गीतेतील असिधाराव्रत अण्णांनी स्वीकारले होते.—

**सर्व भूते जिथे जागी। ज्ञानी योग्यास रात्र ती।**
**सर्व भूतांस जी रात्र। जागतो संयमी तिथे। — गीताई**

अण्णांचा विवाह जून १९३५ ला झाला, परंतु अण्णा खऱ्या अर्थाने गृहस्थाश्रमी १९३८ ला झाले. त्यांना नोव्हेंबर १९३९ ला पुत्ररत्न झाले. धर्मग्रंथातील कामशास्त्र विवेचनाप्रमाणे– अण्णांच्या मते स्त्री रज:स्वला झाल्या दिवसापासून १२ ते १६ दिवस टाळल्यास – कुटुंब नियोजन चांगले होईल. परंतु ज्या वेळी कृत्रिम साधनांचा उपयोग होऊ लागला, तेव्हा ते उखडले. याबद्दल त्यांचे काय मत होते हे त्यांच्या खालील लेखावरून स्पष्ट होते. लेखाचा पूर्वार्ध नष्ट झाला. उत्तरार्धच आहे. ]

मग ब्रह्मचर्य कोठले ? आणि इंद्रियदमन कोठले ? बरे हेही राहू द्या, नका पाळू ते ब्रह्मचर्य व नका करू ते इंद्रियदमन. पण यांचे तरी विषयोपभोगाचे समाधान यापासून त्यांना मिळते काय ? तर मुळीच नाही. हाड चघळणाऱ्या कुत्र्याप्रमाणे यांची स्थिती नव्हे काय ? स्त्रियांना आधुनिक साधनांचा उपयोग करावा लागल्यामुळे पुरुषांचा विषयोपभोग भागविण्याकरिता त्या एक फक्त कृत्रिम साधन बनल्या आहेत. यामुळे त्यांना आपल्या जीवनाकरिता कशी गुलामी स्वीकारावी लागते याचे प्रत्यंतर येते. त्या केवळ यंत्र म्हणून या ठिकाणी वापरण्यात येतात. त्यांना शारीरिक व मानसिक दृष्ट्या त्यापासून काहीही लाभ होणे शक्य नाही. बरे पुरुषांना तरी त्यांचे उद्दिष्ट साधते काय ? वीर्यनाश हा जर मृत्यू तर आमच्या या संततिनियमनवाद्यांची स्थिती काय ? यांचा वीर्यनाशही अव्याहत चालू राहावयाचा. मग यावर लवकर मृत्यूची पाळी आली तर त्याला जबाबदार कोण ?

स्त्रिया या मार्गाचा अवलंब केवळ आर्थिक परावलंबतेमुळे करतात. निसर्ग सोडून एरवी त्या वागावयास कधीही तयार व्हावयाच्या नाहीत. पुरुष आपल्यावरील संततीची जबाबदारी टाळण्याकरिता हा मार्ग स्वीकारतात, पण यामुळे पुरुषवर्गाची विषयवासना मात्र अनिवार होऊन त्यांनी पशूवरही ताण केली. पशू तरी निसर्गनियमनाला धरूनच मैथुन करतील. पण यांच्या मैथुनाला निसर्ग कधीच आड यावयाचा नाही व त्याचे परिणामही

यांना भेडसाविणार नाहीत. तेव्हा पशुवृत्तीच्यावरही ताण करणारा हा मार्ग श्रेयस्कर कोणी म्हणेल का?

Everything that glitters is not gold. जे जे चकाकते ते सोने नसते, या नात्याने आज पाश्चात्त्य राष्ट्रे जरी कळसाला चढलेली दिसत असली तरी त्यांचे प्रत्येक कृत्य अनुकरणीय आहे असे म्हणता यावयाचे नाही. पाश्चात्त्यांची संस्कृती आधि-भौतिक शास्त्रावर रचलेली आहे व आपली आध्यात्मिकतेवर आहे. त्यांचा आदर्श भोग व आपला त्याग असा त्यात फरक आहे. आपणास वाटते त्यांच्या संस्कृतीत सौख्य साठविलेले आहे; ते मात्र आपल्या संस्कृतीला आळवून पाहतात. आज प्रचलित असलेल्या स्त्री-पुरुष संबंधात हिंदी संस्कृतीची लग्नपद्धती सर्वांत श्रेयस्कर आहे. तिच्यामुळे स्वैतरहित साधते, हे सर्व जगाला पटले आहे. अशा स्थितीत विवाह संस्थेचे उच्चाटण ज्या संततिनियमनाने होणार तिचा स्वीकार करून, प्रचार करणे केव्हाही मानव जातीस हितावह होणार नाही. आमच्या लग्नपद्धतीत सुप्रजोत्पादन हा एक प्रमुख हेतू आहे. त्यात स्त्री ही पुरुषाची अर्धांगी समजली जाऊन उभयतांच्या विचाराने सारा संसारगाडा चाललेला असतो. आज आम्ही आमची संस्कृती विसरलो व भलत्याच रूढीला चिकटून बसल्यामुळे आमच्यात दिसून येणारे दोष आमच्यात शिरले व म्हणून आधुनिक संतति-नियमनाकडे वळण्याची आम्हास इच्छा उत्पन्न होते. पूर्वीच्या आपल्या आश्रम धर्माप्रमाणे वागल्यास या गोष्टींची आपणावर पाळी येणार नाही.

मध्यंतरी समाजाची घडी विस्कळीत होऊन त्यात बालविवाहादी अनेक घातक रूढी प्रचारात आल्या. विशीच्या आतच तीन-चार मुलांची आई म्हणून स्त्री मिरवू लागली. अल्पवयात मातृपदाची जबाबदारी आल्याने ती नियोजनास तयार होणे शक्य आहे. तसेच पुरुषवर्गावरही तिशीच्या आतच सर्व संसाराची जबाबदारी पेलवावी लागत असल्यामुळे तो गांगरून जाऊन संततिनियोजनास प्रवृत्त होणे स्वाभाविक आहे. ज्या समाजात प्रौढविवाह होतात त्यातील पुरुषवर्ग बेकारीने गांगरून जाऊन संततिप्रतिबंधास तयार झाले आहेत व स्त्रिया अडचणीने त्यांना संमती देत आहेत. एकूण आज संतति-नियमनाची जरूरी आहे, व त्याचा झपाट्याने प्रचार होत आहे हेही खरे.

आज झाले आहे काय, आमच्या मुलांमुलींस त्यांचा शिक्षणक्रम संपेपर्यंत अथवा ती वयात येऊन संसारास लागेपर्यंत या विषयापासून शक्य तेवढे अलग राखण्यात येते. आमच्या वडीलजनांची शिकवणही त्यांना तशीच मिळते. त्यांना लवकरात लवकर नातू पाहावयास मिळाला म्हणजे बस्. अशा वेळी या विषयाचे सांगोपांग ज्ञान आमच्या मुलांमुलींस दिले गेले पाहिजे. ब्रह्मचर्याची महती पटली तर ती खात्रीने गृहस्थाश्रमात देखील सुप्रजोत्पादनापुरतेच संभोग करतील. तसेच त्यांना निसर्गनियमाने संभोग करण्याचा काल कोणता? त्यायोगे फायदे काय? अतिसंभोगाचे तोटे काय? याचे साग्र ज्ञान देण्यात आले पाहिजे व शारीरिक व मानसिक दृष्ट्या त्यांना हिताहित कसे साधते व

'शतायुर्वैजिवेत्' याप्रमाणे आपले आयुष्य वाढवून कसे घेता येईल याची शक्य तितकी माहिती पुरविण्यात आली पाहिजे.

आज या विषयासंबंधी कोणी त्र काढला तर आमचा समाज त्याला पाजी म्हणतो, पण या गुप्तपणामुळेच भयंकर घातुक परिणाम आज समाजावर झाले आहेत. ज्यांना आपल्या शरीराची यापासून हानी आहे की फायदा आहे या गोष्टीची यत्किंचितही माहिती नाही व जे केवळ आपल्या क्षणैक सुखाकरिता हपापलेले असतात, त्यांनी संसारात पडल्यावर आज ज्या अक्षम्य चुका उदा. अकाली व प्रतिवर्षी स्त्रियांवर मातृपदाची जबाबदारी येणे वगैरे केल्यास त्या माकडाच्या हाती कोलीत अशाच आहेत. तेव्हा आता या विषयाचा आडपडदा सोडून त्यांचा आपल्या संस्कृतीस धरून संततिनियमन कसे शक्य आहे याचा जोराने प्रसार झाला पाहिजे; व जर यापुढे असेच मूग गिळून आमचे ज्ञाते बसतील तर आधुनिक संततिनियमनाचे आगमन होऊन पशुवृत्ती बोकाळेल.

आज बहुजन समाज दोन्ही दृष्टींनी आधुनिक व प्राचीन संततिनियमनाच्या बाबतीत अज्ञात आहे व पाश्चात्त्य संततिनियमनाचा प्रसार व्हावयास सुरवात झाली आहे. त्याच वेळेला जर आपण आपल्या संस्कृतीची छाप बहुजन समाजावर पाडली तरच तरणोपाय आहे नाहीतर नाश स्पष्टच दिसत आहे. तेव्हा उत्तिष्ठत जाग्रत !

## खत देणारे निर्भंगी, निर्गंधी संडास बनवा आणि भंग्यांना घाणेरड्या कामातून मुक्त करा

१ ऑगस्ट १९६७

### लोकनियुक्तांचे अभिनंदन आणि त्यांच्याकडून अपेक्षा

सन १९६७ ची सुरवात म्हणजे भारताच्या लोकनियुक्तांचा पर्वकाळ. आम्हीही निवडून आलेल्या सर्व बिंदूपासून सिंधुरूप लोकनियुक्त राज्यकर्त्यांचे, भारतभाग्यविधात्यांचे हार्दिक अभिनंदन करीत आहोत. या सर्व लोकनियुक्तांची कारकीर्द यशस्वी व्हावी अशा आमच्या शुभेच्छा या निमित्ताने आम्ही व्यक्त करीत आहोत.

आज जी विकास कार्ये चालली आहेत ती दिल्लीत विचार करून खेड्यांत पोचविली जातात. यामुळे 'आधी कळस व नंतर पाया' अशी अवस्था चालू आहे. ग्रामाकडून दिल्लीकडे या विकास कामाचा ओघ वळला तर आज जी पोकळी या विकास कार्यात दिसून येते व खालच्या थरापासून वरच्या पातळीपर्यंत सरकारी पैशातच विकास कार्ये करून आम्ही आमचा वाटा उचलला आहे असे खोटेच जमाखर्च सर्वत्र दिले जातात, ते थांबले पाहिजेत. तरच भरीव विकास कार्ये होतील याची जाणीव या लोकनियुक्तांस झाली पाहिजे.

निर्भेगी संडासांच्या मोहिमेकडे आज आम्ही या लोकनियुक्तांचे लक्ष वेधू इच्छितो. सारे राष्ट्र आज अन्नधान्याच्या बिकट परिस्थितीतून जात आहे. अन्नधान्य पिकविण्यासाठी खताचे काही कारखाने किती खत पुरविणार ? पाच-सहा लक्ष खेड्यांच्या या विस्तृत देशात पाच-सहा लक्ष खतांचे कारखाने हवेत. तरच या देशाची खतांची गरज संपूर्णपणे भागविली जाईल.

निर्भेगी संडासांची मोहीम सुरू करून आपल्या देशाचा 'घाणेरडा हिन्दुस्थान' हा दुर्लौकिक लोकनियुक्त घालवू शकतात. आज सर्व दृष्टीने विकास कार्यात पुढारलेला गाव जरी आपण घेतला, ग्रामगौरव करून शिक्कामोर्तब झालेल्या या साक्षर, सुशिक्षित गावाची स्वच्छता एकदा पाहा— समारंभासाठी एखादा मोठा पाहुणा आपण नेतो तर शहराच्या व खेड्याच्या प्रवेश मार्गावर सर्वत्र दुर्गंधी. आया-बहिणींची अब्रू चव्हाट्यावर उभी असलेली. आलेल्या पाहुण्यासही आपले मलमूत्र विसर्जन कोठेतरी उघड्यावरच करणे भाग.

एक निर्भेगी खतोत्पादक संडास निर्माण केल्याबरोबर राष्ट्राची अभिवृद्धी—समृद्धी यांच्यात तर भर पडेलच परंतु अत्यंत गलिच्छ असे मैला डोक्यावर वाहून नेण्याचे जे माणुसकीला लांच्छन आहे ते दूर होईल. लोकनियुक्ताने आपल्या प्रतिष्ठेचा उपयोग करून श्रमदानाने स्थानिक प्रश्नात लक्ष घालून शाळेजवळ व ग्रामपंचायतींजवळ असे नमुन्याचे निर्भेगी, निर्गंधी संडास बांधावेत म्हणजे त्याचा प्रचार द्रुतगतीने होईल. लोकनियुक्तांकडून आमची हीच अपेक्षा.

## बिहार दुष्काळाने राष्ट्रीय एकात्मतेला दिलेले आवाहन

१ जून १९६७

बिहारमध्ये भीषण अवर्षणामुळे जो दुष्काळ पडला आहे त्यामुळे सुजलाम्, सुफलाम् अशी जमीन नापीक झाली आहे. नोव्हेंबर १९६६ पासून बिहारमध्ये शे. ७५ लोक अक्षरशः अर्धपोटी आहेत. असे असले तरी बिहारच्या राजधानीत मात्र बिहारमधील पाच कोटी लोकांवर काही आपत्ती आलेली आहे ह्याचे थोडेही दर्शन होत नाही. ही आश्चर्याची घटना आहे. तेथील व्यापारी, सरकारी नोकर व इतर जनता ह्यांचे दैनंदिन व्यवहार नेहमीप्रमाणे चालू आहेत. लग्नकार्यातील भोजन समारंभ, सिनेमा थिएटरांतील गर्दी, चैनीच्या गोष्टी, सहली अगदी जशाच्या तशा चालू आहेत !!

शहरांतून अनेक साठेबाजांनी आजही काळ्या बाजारातून पैसा लुटण्याचा प्रयत्न चालविलेला आहे. इतकेच नव्हे तर, मदतकार्य चालू आहे तेथेही लाचलुचपत, वशिलेबाजीचे थैमान चालू असल्याच्या माणुसकीला काळिमा आणणाऱ्या बातम्याही मधून मधून येतात. मन विषण्ण होते—सरकारने तेथे दुष्काळी काम काढले आहे, परंतु

पोटात अन्न नाही म्हणून पुरेसे काम करता येत नाही. १०० घनफुटांचे काम केले म्हणजे सुरवातीस १ रु. ७५ पैसे मजुरी मिळत असे. ती आता वाढवून २ रु. २५ पैसे करण्यात आली आहे. कामाच्या प्रमाणात मजुरी मिळते परंतु पोटात अन्न नाही त्यामुळे अंगात त्राण नाही, म्हणून काम पुरेसे होत नाही अशा दुष्ट चक्रात ते लोक सापडले आहेत.

आधीच भारतातील भाषावार प्रांतरचना, राजकीय पक्षांचे परस्पर विरोध, सत्तेचे विकेंद्रीकरण इत्यादींमुळे भारतीय संघराज्याचे काय होईल अशी भीती विचारवंतांना वाटू लागली आहे. लहान-सहान गोष्टींवरून प्रचंड मोर्चे, जाळपोळ व राष्ट्राची वित्तहानी आणि प्राणहानी होत असल्याच्या बातम्या सारख्या येतच असतात. ह्यामुळे राष्ट्रीय एकात्मतेला तडा जाईल की काय व राष्ट्राची पावले कोणीकडे जात आहेत, ह्याबद्दल सर्व ज्ञानवंत साशंक आहेत.

बिहारमधील भीषण दुष्काळ, कोकणातील वादळग्रस्त परिस्थिती यांसारखे दैवी कोप म्हणजे मानवाच्या मानवतेला व राष्ट्रीय एकात्मतेला दिलेले जबरदस्त आवाहन आहे. म्हणून बिहारच्या मदतीला धावून जाऊन त्यांची दुःखे मानवी प्रयत्नांनी जेवढी कमी करता येतील तेवढी कमी केलीच पाहिजेत. हे इतर प्रांतियांचे सर्वप्रथम आद्य-कर्तव्य आहे.

भारताच्या काना-कोपऱ्यांतून बिहार निधी गोळा होत आहे. विशेषतः गुजराथ, महाराष्ट्र व त्यातही प्रामुख्याने मुंबई येथील लोकांनी सहृदयतेने आपली पावले उचललेली आहेत. इतर प्रांतांतून शेकडो स्वयंसेवक तेथे पाहिजे आहेत. डॉक्टर्स हवे आहेत. शेतकऱ्यांना पाच वर्षे कर माफ केल्याशिवाय ते स्वावलंबी होणार नाहीत. मारवाडी रिलीफ कमिटी, गुजरात रिलीफ कमिटी, मुंबई सर्वोदय मंडळ दुष्काळग्रस्तांना मदत करीत आहेत. तेव्हा सर्व भारतीयांना एकच आवाहन आहे की, अन्न – कपडे – पैसा – स्वयंसेवक अशा रीतीने ज्या स्वरूपात मदत पाठविता येईल ती पाठवावी व आपली राष्ट्रीय एकात्मता सिद्ध करावी. ही विनंती.

## भारतीय संस्कृतीतील लांच्छन

दलित सेवक, मार्च १९६८

आंध्रमधील विधान परिषदेत मुख्य मंत्र्यांनी कोणाच्याही अंगावर शहारे आणणारी घटना निवेदन केली. ते म्हणाले एका हरिजनाने चोरी केली या संशयावरून आंध्रमधील कृष्णा जिल्ह्यातल्या कांचीकचेला या गावच्या काही नागरिकांनी त्या हरिजनाला जिवंत जाळून मारले. अशाच काही घटना नुकत्याच इतर प्रांतांतही घडल्याचे ऐकिवात आहे.

पंजाबमध्ये एका हरिजनाने नुसता मिशांना पीळ दिला तर त्या सबबीवर त्याला जाळून मारण्यात आले. कोकणातही असाच एक प्रकार घडल्याचे आढळून आले आहे. औरंगाबाद जिल्ह्यातील हरिजन स्त्रियांना नग्न करून त्यांची धिंड गावकऱ्यांनी काढली ही हकीकत फारशी जुनी नाही.

ठिकठिकाणी हरिजनांची उभी शेते कापून नेणे, त्यांच्या घरांना व खळ्यांना आगी लावणे इत्यादी प्रकार तर सर्रास चालू असल्याचे आपण नेहमी वाचतो, अनुभवतो. हरिजनांना कामावर न ठेवणे, त्यांच्या भाकरी बंद करणे, त्यांच्यावर बहिष्कार टाकणे, त्यांना चक्कीवर दळून न देणे, दुकानावर माल न मिळू देणे इत्यादी प्रकारांनी त्यांचे जीवन असह्य करून त्यांना गाव सोडावयास भाग पाडणे हे प्रकार ठिकठिकाणी घडतात. या गोष्टी जेथे चालतात त्या ठिकाणी खेड्यापाड्यांतून अद्यापही सार्वजनिक विहिरींवर वा पाणवठ्यावर त्यांना पाणी भरू न देणे, सार्वजनिक केशकर्तनालयात व उपाहारगृहात त्यांना प्रवेश न देणे, ग्रामपंचायतीत निवडून आला तरी त्याला पंचायत सभेच्या वेळी खुर्चीवर बसू न देणे या गोष्टी घडत असल्याचे नवल वाटण्याचे काहीच कारण नाही. 'अस्पृश्यतेचे संपूर्ण उच्चाटन झाल्याशिवाय स्वराज्य पूर्ण होऊ शकणार नाही' या गांधीजींच्या द्रष्टेपणाच्या वचनाची सत्यता आज क्षणोक्षणी प्रत्ययाला येते.

स्वराज्य मिळून २० वर्षे झाली तरी घटनेने दिलेले अधिकार हरिजनांना उपभोगता येत नाहीत. लोकाभिमुख सत्तेचे विकेंद्रीकरण झाल्याचा डांगोरा आम्ही जगभर पिटीत असलो तरी, जिल्हा परिषदेच्या स्थापनेपासून अस्पृश्यतेची पाळेमुळे स्थानिक प्रतिष्ठेच्या दबावामुळे अधिकच खोल झालेली दिसून येत आहेत. खेड्यापाड्यांतून हरिजनांवर होणारे अन्याय हरिजनांना तोंड दाबून बुक्क्याचा मार या नात्याने सहन करावे लागतात. अल्पसंख्य व परावलंबी जीवन असल्यामुळे अन्याय झाला तरी साक्षीपुराव्याच्या अभावी कोर्टात जाता येत नाही आणि कार्यकर्त्यांना तपासणीच्या वेळी "सब ठीक" अशी उत्तरे ऐकावयास मिळतात. भारतीय संस्कृतीचे हे लांच्छन अद्यापही महारोगासारखे भारताला ग्रासून आहे. भारतीय नेत्यांनी राष्ट्रीय एकात्मतेचे कितीही आवाहन केले तरी जेथे एक जात दुसऱ्या जातीच्या लोकांस राजरोसपणे कोणतेही कायदे असले तरी जिवंत जाळावयास धजते, तेथे राष्ट्रीय एकात्मता उत्पन्न होण्याची आशा बाळगणे हे मृगजळाच्या मागे धावण्यासारखे आहे.

या परिस्थितीवर सरकारची पावलेही शांततेचा भंग होऊ नये म्हणून उलटीच पडत असलेली दिसतात. अस्पृश्यता निर्मूलन होत नाही म्हणून गावच्या लोकांना दुखावता येत नाही या सबबीवर व हरिजनांचे पाण्याचे हाल किती दिवस चालू द्यावयाचे या गोंडस नावाखाली सरकारी तिजोरीतील पैशांनी खेडेगावांतील हरिजन वस्तीतून स्वतंत्र विहिरी बांधून दिल्या जात आहेत. तेव्हा या उलट्या गतीने भारतीय संस्कृतीचे हे लांच्छन कमी होण्याऐवजी अधिकच दृढ होत राहील अशी साधारण भीती वाटते.

# मेहतर मुले–मुली सुशिक्षित झाल्या तरच भंगी मुक्ती साधेल

१ मे १९६८

अस्पृश्यता हा हिंदू धर्मावरील एक कलंक आहे, तर जातीयता हा त्याला मिळालेला एक शाप आहे. ' कृण्वंतो विश्वमार्यम् ' किंवा ' वसुधैव कुटुंबकम् ' ह्या घोषणा किंवा उद्दिष्ट साधू इच्छिणाऱ्या किंवा साऱ्या जगाला ' सहनाववतु ' मंत्र सांगून परस्पर सहकार्याची हाक देणाऱ्या किंवा ' सर्वेत्रः सुखिनः सन्तु 'ची प्रार्थना करणाऱ्या हिंदू धर्माला चातुर्वर्ण्याचा महान रोग जडल्यामुळे त्याची छकले छकले उडाली आहेत. ' व्यक्ती तितक्या प्रकृती 'प्रमाणे व्यक्ती तितक्या जाती किंबहुना तितके देव भारतात निर्माण झाले. तेहेतीस कोटी देव आहेत असे जेव्हा म्हटले जाते तेव्हा दर-माणशी स्वतंत्र देव हीच विचारसरणी प्रत्ययास येते. परधर्मसहिष्णुता शिकविणाऱ्या या धर्मात कोणाचीही पूजा केली तरी ' सर्व देव नमस्कारम् केशवं प्रतिगच्छति, ' हा एकात्मतेचा सिद्धान्त जरी शिकविला गेला तरी माझा देव, माझी भक्ती, माझा आचार, माझी प्रार्थना ही इतरांपेक्षा श्रेष्ठ, इतर माझ्यापेक्षा कमी दर्जाचे हा विचार सहजच निर्माण होऊन इतरांना तुच्छ लेखण्यासाठी त्यांची उन्नती न व्हावी म्हणून प्रयत्न केला जातो. पर्यायाने द्वेषही करावा लागतो व त्याचेच विकृत स्वरूप म्हणून जातीयता रूढ झालेली आज दिसते. याचा परिणाम हिंदू धर्माची विशालता व उदात्त तत्त्वज्ञान जरी जगमान्य असले तरी प्रत्यक्ष व्यवहारात मात्र प्रतिक्षणी त्याची द्वैत वादातच शकले उडालेली आहेत.

बुद्धिवाद्यांनी इतरांना धर्माच्या बाबतीत गौण ठरवून व चातुर्वर्ण्य प्रमाण धरून त्यातही शूद्रांना वगळले. इतकेच नाही तर घराघरांतून जन्मदात्या माता-भगिनींना देखील ' न स्त्री स्वातंत्र्यमर्हती 'चा पाठपुरावा करून त्यांनाही वेदाध्ययनापासून वंचित केले. याचा परिणाम हजारो वर्षे रूढीरूपाने जन्मावरून जाती ठरविण्यात आल्याने काही समाज उपेक्षित राखले गेले व त्यांच्यावर ठराविक धंदे लादले गेले. ते इतके की काही समाजांना आपण माणसे आहोत, आपणासही मानवतेचे हक्क आहेत याचा देखील विसर पडल्याचा प्रत्यय आजही येतो.

भारतात निरनिराळ्या राज्यांत गेल्या ४०–४५ वर्षांत साक्षरतेची योजना निर-निराळ्या राज्यांत लागू झालेली आहे. असे असताना आजही कोट्यवधी जनता निरक्षर आहे. जेथे योजना चालू झाली आहे तेथे ही योजना यशस्वी व्हावी म्हणून स्वतंत्र यंत्रणा उभारली गेली. अधिकारी नेमले गेले, गौरव समारंभ झाले, मग ही निरक्षरता राहिली कशी ? या देशाचे आदिवासी–गिरिजन, मागासवर्गीय, हरिजन, भटके, निमभटके किंवा विमोचित यांच्यापर्यंत ही योजना पोहोचावयास वेळ लागेलही परंतु आमचे मेहतर भाई तर खास शहरांत नगरपालिकांच्या गावांतच राहतात. जेथे

शिक्षण सक्तीचे झाले आहे, जो आपल्या मुला-मुलींना शिकविणार नाही त्याकरिता दंड केला जातो तेथेही हा मेहतर समाज आज १०० टक्के निरक्षर राहू शकतो हे उघडे सत्य आहे.

'नही सुप्तस्य सिंहस्य प्रविशन्ति मुखे मृगाः' याप्रमाणे आज सरकारने सर्व दृष्टींनी मेहतर मुला-मुलींच्या शिक्षणासाठी सर्व तऱ्हेच्या तरतुदी करून ठेवल्या आहेत तरी मैला सफाई हाच आपला जन्मसिद्ध हक्क आहे, ही आपली मक्तेदारी शिक्षण देऊन हिरावली जाईल व आपण त्यामुळे बेकार होऊ, आपल्या मुलांना शिक्षण दिले तर ते हा धंदा करणार नाहीत अशा भावुक समजुतीने सर्व सवलती मिळत असताही तो कोरडाच राहिला आहे.

नुकतेच फेब्रुवारीमध्ये दौंड येथे या समाजाच्या व इतर समाजाच्या सुशिक्षित लोकांनी बोलाविलेल्या सम्मेलनात तरुणांनी महाराष्ट्रातील जनतेला, सामाजिक संस्थांना व कार्यकर्त्यांना एक हाक देऊन आवाहन केले आहे की, येत्या वर्षी किमान ५०० तरी मेहतर मुला-मुलींना सरकारी अनुदानावर चाललेल्या मागास छात्रालयांतून प्रवेश मिळवून देण्याची व्यवस्था सर्वांनी मिळून करावी.

या आवाहनास साथ देणे दोन दृष्टींनी आवश्यक आहे. एक तर या झोपलेल्या समाजास याची जाणीव करून द्यावयाची आहे की यापुढे मैला सफाईचे काम संपूर्णपणे नवीन शास्त्रीय दृष्टीनेच केले जाईल. त्यांची मैला सफाईची मक्तेदारी संपुष्टात येईल. त्यांची नवपिढी साक्षर व सुशिक्षित होऊन तिला इतर समाजाप्रमाणे नवीन व्यवसाय स्वीकारावा लागेल. दुसरे असे की, मेहतर समाजाच्या सुशिक्षितपणाने भंगी मुक्ती साधली तर आज जे लांन्छन हिंदू समाजास आहे ते आपोआपच दूर होईल. अन्त्योदयात सर्वोदय आहे; आणि भंगी हा सर्वांत अन्त्य आहे. त्याच्या उदयात सर्वांचा उदय सामावलेला आहे. म्हणजे अस्पृश्यता–जातीयता आदी सारे नाहीसे होतील व समाज एकजिनसी होऊन राष्ट्रीय ऐक्याची स्वप्ने साकार होतील.

## अस्पृश्यता निवारण साधावयाचे असेल तर प्रचारकांचेच साहाय्य अत्यावश्यक

दलित सेवक, १ ऑगस्ट १९६८

४ जुलै १९६८ च्या महाराष्ट्र टाइम्समध्ये 'अस्पृश्यता नष्ट झालेली नाही' या मथळ्याखाली सरकारी अधिकाऱ्याकडून प्रसिद्ध झालेल्या अहवालात पगारी प्रचारकांवर शिंतोडे उडवून 'हा प्रयोग फसला' असे म्हणण्याचे धाडस केले गेले.

पगारी प्रचारकांचा प्रयोग फसला हे जरी मध्यवर्ती सरकारच्या प्रतिनिधीकडून कोणी वदवून घेतले असेल तर या बहुजन समाजाच्या परिषदांतील वा पंचायत समित्यांतील प्रतिनिधींनी हरिजन व सवर्ण यांत सलोखा राखून समता आणण्यासाठी हृदय-

परिवर्तनावर जोर देऊन हे कार्य करताना सुळावरील पोळी खाण्याचे धैर्य या प्रचारकांना करावयाचे असते याची जाणीव राष्ट्रपतींपासून सर्व आमदार, खासदार वा मंत्री यांच्यापर्यंत सर्वांना आहे. असे असताना सरकारी अधिकाऱ्याने प्रचारकांवर शिंतोडे उडविले याचा अर्थ त्याला प्रचाराच्या परिस्थितीची जाणीव नाही असेच म्हणावे लागेल.

देशात नव सामाजिक क्रांती करावयाची असेल तर, त्यासाठी प्रचाराची आत्यंतिक आवश्यकता आहे हे कोणालाही नाकारता येणार नाही. अधिक धान्य निर्मिती, दारूबंदी, ग्रामोद्योग, कुटुंबनियोजन, मलेरिया निर्मूलन, शिक्षण प्रसार इ. समाजविकासाच्या कामासाठी कोट्यवधी रुपयांचा प्रचार-खर्च सरकार करीत आहे. त्यात मध्यवर्ती सरकार व प्रांतिक सरकारे यांचा पैसा खर्ची पडतो. या सर्व प्रचारासाठी जे प्रशिक्षित प्रचारक नेमलेले असतात त्यांना भरपूर मानधन दिले जाते. परंतु अस्पृश्यता निवारण कार्यासाठी अनुदानाच्या आधारे जे प्रचारक नेमले जातात त्यांच्या जीवनविषयक गरजांचे व आजच्या सामाजिक विषमतेच्या काळात यांची चाललेली ससेहोलपट याकडे मध्यवर्ती सरकार वा प्रांतिक सरकारे यांनी जाणूनबुजून जे दुर्लक्ष केले आहे, त्याचा विचार केला तर सरकारला अस्पृश्यता निवारणाचा केवळ देखावा निर्माण करावयाचा आहे असे म्हणावे लागेल. कारण या प्रचारकांना ‘ आई जेवू घालीना व बाप भीक मागू देईना ’ अशा परिस्थितीत आपले कार्य करावयाचे आहे.

गेल्या वीस वर्षांपूर्वी हरिजन सेवक संघासारख्या देशव्यापी संस्थेने १९३२ पासून या कार्यास हात घातला व स्वतंत्रपणे स्वतःच्या बळावर अस्पृश्यता निवारणाची नैतिक जबाबदारी ते पार पाडीत होते. स्वातंत्र्य सैनिकांनी जसे प्राण पणाला लावून सर्वस्वाच्या बलिदानाची तयारी ठेवून कार्य केले त्याच हिरिरीने समाजातील हा अस्पृश्यतेचा कलंक धुऊन काढण्याचे कंकण या स्वयंस्फूर्त संस्थांनी उचलले. स्वराज्य मिळाल्यावर या संस्थांना मदत करणे हे सरकारला आपले कर्तव्य वाटले किंबहुना या सामाजिक कार्यकर्त्यांशिवाय समाजातील हा हजारो वर्षांचा डाग धुऊन काढता येणार नाही, याची खात्री वाटली म्हणून या संस्थांना अनुदान घेण्याची विनंती करण्यात आली. त्या वेळी हा सद्‌हेतू होता. परंतु स्वराज्य प्राप्तीनंतर, सत्ता हाती आल्यानंतर इतर कार्यात जशी परिस्थिती निर्माण झाली, तशीच परिस्थिती जातिवादाचा पुरस्कार करणाऱ्या सरकारकडून याहीबाबत झाली व जातीय बळावर निवडून आलेल्या प्रतिनिधींकडून यापेक्षा अधिक अपेक्षा करणेही चुकीचे ठरेल.

मध्यवर्ती सरकारच्या अधिकाऱ्याने देशात अस्पृश्यता अद्यापही वावरते आहे हे दाखविण्यासाठी जी उदाहरणे घेतली ती जर हे प्रचारक या कामात नसते तर त्याला दाखविता आली नसती. ठिकठिकाणी हरिजनांचा चाललेला छळ व त्यांना भोगावी लागणारी दुःखे याला वाचा या प्रचारकांनीच फोडली आहे. ही वाचा फोडतानादेखील त्यांना आपला जीव धोक्यात घालूनच हे करावे लागले. याची जाणीव या अधिकाऱ्याला दिसत नाही. जर हे प्रचारक नसते तर सरकारदरबारी अस्पृश्यता संपूर्ण नष्ट झाल्याचीही

घटना लिहिली गेली असती. तेव्हा हा प्रयोग फसला आहे असे नसून जर खरोखरी सरकारला अस्पृश्यता निर्मूलन साधावयाचे असेल तर प्रचारकांचीच नितांत आवश्यकता लागेल. पण ते प्रचारक यशस्वी होण्यासाठी प्रचारक योजनेचा साधकबाधक विचार करणे आवश्यक आहे. अन्यथा अस्पृश्यता निवारण हे मुखाने बोलावयाचे व ज्यांना ते नको आहे, त्यांच्या पुन्हा पुन्हा हे फसले आहे या म्हणण्याला बळी पडून अस्पृश्यता निर्मूलन कार्यावर मूले कुठारः याप्रमाणे कुऱ्हाड घालण्याची क्रिया सरकारकडून घडेल अशी स्पष्ट जाणीव आम्ही सरकारला देत आहोत. प्रचारकांचा हा प्रयोग जाणूनबुजून कसा फसेल याची कार्यवाही सरकारकडून वा जिल्हा परिषदा वा पंचायत समित्या यांजकडून सहेतुकपणे कशी झाली याचे विवेचन आम्ही पुढील अंकी करू.

## श्वेतपत्रिकेच्या संदर्भात होणाऱ्या नवीन अभ्यासक्रमात सफाई शिक्षणाचा अंतर्भाव केला जावा

दलित सेवक, १ जुलै १९६८

महाराष्ट्र सरकारने प्रथमच श्वेतपत्रिका काढून एक नवीन पायंडा सुरू केला. याबद्दल महाराष्ट्र सरकारचे व प्रामुख्याने शिक्षण मंत्री नामदार मधुकरराव चौधरी ह्यांचे अभिनंदन आम्ही करीत आहोत.

या श्वेतपत्रिकेने महाराष्ट्राच्या शैक्षणिक क्षेत्रात देशाच्या विकासाच्या दृष्टीने नवी पावले पडत आहेत, याची आशा निर्माण झाली आहे. श्वेतपत्रिकेवर सर्वच विचार-विनिमय करून नागरिकांची व शिक्षण क्षेत्रातील तज्ज्ञांची मतेही घेण्याचा योग्यच कार्यक्रम महाराष्ट्रात सर्वत्र सध्या चालू आहे, हीही आनंदाची गोष्ट आहे.

आजचे शिक्षण कुचकामी व केवळ कारकून बनविणारे आहे. देशाच्या विकास कार्यात आजचे सुशिक्षित फारशी भर घालू शकत नाहीत. स्वातंत्र्यपूर्व काळात केवळ इंग्रजी राजवट चालविण्यासाठी ठराविक चाकोरीचे कारकून निर्माण करणारा तो एक साचा होता याची जाणीव प्रकर्षाने झालेली आहे व या शिक्षणात बदल करून डोक्या-बरोबर हातापायांचा उपयोग करून राष्ट्राच्या आर्थिक उत्पादनात भर पाडून शेती व औद्योगिक क्षेत्रात भारत स्वयंपूर्ण कसा होईल व याचा पाया शैक्षणिक वयातच बाल-बालिकांच्या अंगी रुजला जावा असे शिक्षण देण्याचा विचार सर्वत्र चालू आहे. याच दृष्टीने भारतात सर्वप्रथम ‘ बेसिक ’ शिक्षणाचा प्रयोग केला गेला. उद्योगमूलक शिक्षण व्हावे व त्यातून नव पिढी निर्माण झाली पाहिजे. म्हणजे शिक्षणानंतर नवशिक्षित हे बेकार न बनता आपला उद्योगधंदा करून स्वावलंबी होतील. देशातील बेकारीचा फार

मोठा प्रश्न सुटेल. ग्रामोद्योगांना चालना मिळेल, शेती व्यवसायात सुधारणा होऊन भारताच्या खेड्यापाड्यांतील बहुसंख्य जनता उद्योगात अडकेल, ग्रामस्वराज्याचे सुंदर रामराज्य निर्माण होईल व खेडे हा घटक संपूर्ण स्वावलंबी बनून त्याच्या दैनंदिन जीवनाचा विकास होईल असे एक स्वप्न त्या वेळेस चितारले गेले होते, परंतु कल्पना मांडणारे राष्ट्रीय पुढारी व तिची अमलबजावणी करणारे शिक्षक यांच्यात फार मोठी तफावत पडली. केवळ हुकूम आला म्हणून तो शिक्षणक्रम पार पाडावयाचा हा दृष्टिकोण. यामुळे ‘ बेसिक ’ शिक्षणाचा कार्यक्रम पूर्णपणे फसला. काही दिवस कागदी घोडे नाचले व सर्वत्र फसवणुकीचा उद्योग सुरू झाला.

कोणत्याही राष्ट्राचा विकास व्हावयाचा म्हणजे तो त्या देशातील शिक्षण नागरिकांच्या अंगी किती बाणले आहे यावरूनच ठरविता येईल. शिक्षण नवपिढीच्या रोमरोमात भिनले पाहिजे व त्यांच्या जीवनात क्षणोक्षणी त्यांना त्याचा पुरेपूर उपयोग करता आला पाहिजे, तरच त्याचा सर्वांगीण विकास साधेल. राष्ट्रीय वृत्तीची जोपासना त्यात केली गेली पाहिजे. अन्यथा केवळ कागदी घोडेच पुन्हा पदरी पडतील.

नवीन शिक्षण पत्रिकेत ज्या शिक्षणाची अपेक्षा केली आहे ती पूर्ण करावयासाठी प्रथम शिक्षकांची मने सरकारने वश करावयास पाहिजेत. अन्यथा बेसिक शिक्षणाची जी अवस्था झाली तीच याही शिक्षणाची होईल. म्हणून केवळ शिक्षकांची, रिफ्रेशर कोर्सच्या शिक्षणाची, तांत्रिक व्यवस्था करून भागावयाचे नाही तर त्यांना ते पटले पाहिजे. स्वतःचे कर्तव्य आहे असे वाटले पाहिजे व त्यांनी त्यात स्वतःचे मन, बुद्धी, कष्ट ओतले पाहिजेत, तरच नवविकास साधेल, अन्यथा पुन्हा पूर्वीचाच अनुभव घ्यावा लागेल.

आजच्या शैक्षणिक अभ्यासक्रमात केवळ पुस्तकी शिक्षणावरच भर दिला जातो. शिक्षणक्रम पूर्ण झाल्यानंतर पदवीधर साहेब बनतो व केवळ कागदावरच आकडे मोडतो. त्याचा राष्ट्रीय विकासास काहीच उपयोग होत नाही. तेव्हा त्याला प्रात्यक्षिक अधिक प्रमाणात मिळाले पाहिजे. त्याची व्यवस्था होणे आवश्यक आहे.

एस्. एस्. सी. पर्यंत देखील ६५–७० विषय घेऊन परीक्षेस बसता येते, परंतु ही संख्या तूर्त तरी १०–१५ विषयांबाहेर जाऊ शकत नाही. इतर शिक्षणाची व्यवस्था शाळांमार्फत होऊ शकत नाही. तेव्हा बाकीचे विषय हे अपवादात्मकच परीक्षेस घेतले जातात. तेव्हा त्या विषयांचे महत्त्व अद्याप सरकारला व जनतेला पटलेले नाही असेच म्हटले पाहिजे. मध्यंतरी मल्टिपर्पज शाळांमधून नेहमीच्या ७–८ विषयांखेरीज शेती, कॉमर्स, टेक्निकल इ. विषयांची जोड दिली गेली. पण शेवटी त्याचाही एक साचा बनला, व त्याला पुढे विकास साधता आला नाही. या विषयांत आणखी काही विषयांची भर राष्ट्रीय विकासाच्या व ऐक्याच्या भावनेच्या दृष्टीने घातली पाहिजे, अन्यथा राष्ट्र विकासास त्यामुळे व्यत्यय येईल, इकडे हरिजन सेवक संघाने अनेक वेळा ठराव करून

शासनाचे लक्ष वेधले आहे, परंतु हरिजन सेवक संघाचे ठराव सागर में गागर या न्यायाने कोठल्या कोठे बुडाले हे सांगण्याची जरूरी नाही.

गेल्या फेब्रुवारी महिन्यात दौंड येथे भंगी मुक्ती व जातीय ऐक्य, अस्पृश्यता निवारण यांसाठी हरिजन सेवक संघामार्फत प्रातिनिधिक शिबिर व परिषद घेण्यात आली. त्या वेळी 'सफाई' कामाच्या व अस्पृश्यता निवारणाच्या दृष्टीने भंगी मुक्तीचा उद्देश सफल व्हावा म्हणून सफाई कामाच्या शिक्षणास अभ्यासक्रमात स्थान प्राप्त व्हावे अशा आशयाचा एक ठराव केला व ठरावाच्या प्रती शासनाकडे पाठविल्या गेल्या. नेहमीप्रमाणे त्यावर काय विचार होईल हे सांगता येणे अशक्य आहे. परंतु शिक्षण-विषयक श्वेतपत्रिका प्रसिद्ध झाल्याने या ठरावास उजाळा देता येईल व या सफाई शिक्षणाचा राष्ट्रीय विकासास किती प्रचंड पाठिंबा मिळेल हे सांगण्यासाठीच आजचा विषय आम्ही मांडीत आहोत.

'सफाई' या शब्दाचा सरळ अर्थ सफाई महर्षी श्री. अप्पासाहेब पटवर्धन यांनी केला आहे की, 'सफाई' म्हणजे 'सब चीजोंका फायदेमंद इस्तेमाल'. सर्व वस्तूंचा फायदा मिळविण्याच्या दृष्टीने वापर होणे म्हणजे सफाई करणे, हा साधा सरळ अर्थ आहे. लाखो खेड्यांच्या व कोट्यवधी लोकांच्या या देशात आपल्या शास्त्रीय दृष्टीच्या अनुभवामुळे दर वर्षी कोट्यवधी रुपयांच्या उपयुक्त खतोत्पादक वस्तू आपण वाया घालवून आपले दारिद्र्य, आरोग्य, शक्ती गमवीत आहोत याचा विचार देखील आजच्या सुशिक्षित म्हणविणाऱ्या समाजास शिवत नाही, हे पाहून आमच्या विचारशक्तीची व बुद्धीची कीव करावीशी वाटते. सिंद्रीसारख्या एखाद-दुसऱ्या कारखान्याच्या निर्मितीसाठी अब्जावधी रुपये आम्ही खर्च करतो व राष्ट्राच्या दृष्टीने अगदी तुटपुंज्या अशा खताची निर्मिती साधतो. परंतु प्रत्येक नागरिकाकडून मिळणाऱ्या विनासायास व विनाखर्च मिळणाऱ्या दहा पौंड खताचे लक्षावधी टन खताकडे आमचे लक्ष जात नाही ही केवढी दुर्दैवी घटना आहे. असा विचार आला म्हणजे एका प्रश्नातून असंख्य प्रश्न सुटतील व राष्ट्रीय विकासात अनंत पटीने भर पडून त्याची गती तीव्रतेने वाढेल. महत्त्वाचा अन्नधान्याचा प्रश्न चुटकीसरसा सुटेल. भारताचा 'गंदा–भारत' हा दुर्लौकिक नाहीसा होईल. सर्वत्र आदर्श स्वच्छता आली म्हणजे आमचे आरोग्य सुधारेल, वयोमर्यादा वाढेल, शक्ती कार्यक्षम होईल. परक्यांकडून अन्नधान्याची भीक मागण्याची लाजिरवाणी प्रथा थांबेल, परकीय चलन वाचेल व राष्ट्रीय संपत्तीत भर पडेल. भंगी मुक्ती साधून हिंदूधर्मावरील अमानुषतेचा कलंक दूर होईल. तेव्हा त्या सफाईची कल्पना, शिक्षण व ती अंगी बाणून आपल्या जीवनाचा विकास साधण्यासाठी सफाई शिक्षणाचा अभ्यासक्रमात अंतर्भाव झाला पाहिजे. शिक्षणपत्रिकेच्या संदर्भात जेव्हा नवीन अभ्यासक्रम आखला जावयाचा आहे तेव्हा तो शिक्षणक्रमात बाल मंदिरापासून तो उच्च शिक्षणापर्यंत कसा गोवता येईल याचा सांगोपांग विचार होणे आवश्यक आहे. नवीन अभ्यासक्रम आखताना तो विचार केला पाहिजे, हीच आमची या वेळी विनंती आहे.

# अस्पृश्यता नष्ट झाल्याविना गांधी-जन्मशताब्दी उत्सव निर्जीव ठरेल

दलित सेवक, ता. १ ऑक्टोबर १९६८

१९३२ च्या २४ सप्टेंबरला भारताच्या राष्ट्रपित्याचे प्राण वाचविले तो येरवडा अथवा पुणे करार लिहिला गेला, भारतातील स्पृश्य हिंदूंच्या त्या वेळच्या सर्व पुढाऱ्यांच्या उपस्थितीत व स्व. पंडित मदन मोहन मालवीय यांच्या नेतृत्वाखाली या पुढाऱ्यांनी त्या करारनाम्यावर सह्या केल्या. व 'दहा वर्षांत हिंदू समाजातील अस्पृश्यता घालवू' असे अभिवचन स्व. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना ते अस्पृश्य समाजाचे नेते या नात्याने स्व. महात्मा गांधींच्या साक्षीने दिले. ता. २४ सप्टेंबरला त्या ऐतिहासिक घटनेला ३६ वर्षे किंवा तीन तपे पूर्ण झाली आहेत. या निमित्ताने भारतातील हिंदूंच्या त्या वेळच्या पुढाऱ्यांचे आजचे वारसदार किंवा राजकीय पक्षांचे वारसदार ह्यांनी ही प्रतिज्ञापूर्ती केली की नाही हे आत्मनिरीक्षण करून पाहावयाची सर्वांची जबाबदारी आहे.

२ ऑक्टोबर १९६८ ला आपण १९६७ मध्ये येणाऱ्या गांधी-जन्मशताब्दीपूर्तीच्या समारंभास मोठ्या उत्साहाने सुरवात करून राष्ट्रपित्याच्या नेतृत्वाखाली राष्ट्रीय विकासाच्या पूर्ततेसाठी अनेकविध विधायक कार्याच्या देशव्यापी योजना मध्यवर्ती सरकारच्या केन्द्रीय कार्यालयापासून तो सत्तेचे विकेन्द्रीकरण होऊन सुरू झालेल्या ग्रामस्वराज्य अथवा ग्रामपंचायतीच्या कार्यालयापर्यंत या योजना त्यांच्या कक्षेत बसतील अशा स्वरूपात आखण्यात आलेल्या आहेत.

राष्ट्रपित्याच्या द्रष्टेपणाने व सत्य-अहिंसेच्या निष्ठेने भारताला अभूत असे आसेतू हिमाचल स्वातंत्र्य लाभले; स्वराज्य मिळाले. त्याचे सुराज्य किंवा रामराज्य वा ग्रामराज्यही राष्ट्रपित्याच्या प्रेरणेने सुरू झालेल्या अनेकविध विधायक कार्यांमुळेच होणार आहे. या विधायक कार्याची परिपूर्णता म्हणजेच स्वराज्य. हीच मुळी सरळ सोपी व्याख्या राष्ट्रपित्याने राष्ट्राला शिकविली आहे. तेव्हा त्याच निष्ठेने, आजचे स्वराज्याचे वारसदार भारतीय, या जन्मशताब्दीच्या वर्षी या विधायक कार्यात सर्वस्व तन-मन-धन वेचून कार्य करावयास उद्युक्त झाले आहेत व या सर्व गोष्टी करून राष्ट्रपित्याचे ऋण फेडावयाची इच्छा बाळगीत आहेत यात वावगेही काही नाहीच. ते जर त्यांनी केले नाही तर ते कृतघ्न ठरतील.

स्वराज्याचे सुराज्य करावयाची ही संधी आहे. सर्वांगीण विकासाची यात आखणी आहे अशी प्रामाणिक समजूत आजच्या नेत्यांची आहे, पण—

या विकास कार्यात राष्ट्रपित्याने स्वराज्य ज्याला म्हटले ते स्वराज्य आपण मिळविले आहे का ? याची छाननी करावयास मात्र ते अजिबात विसरलेले दिसतात. किंवा या बाबतीत जाणूनबुजून झोपेचे सोंग त्यांनी घेतलेले आहे असेही म्हणता येईल.

" ज्या राज्यात अस्पृश्यता असेल ते राज्य स्वराज्यच होऊ शकत नाही " असे

राष्ट्रपित्याने क्षणोक्षणी देशाला आवर्जून सांगितले इतकेच नाही तर, "प्रथम अस्पृश्यता नष्ट करा व नंतर स्वराज्य निर्माण करा" असाही त्यांचा आग्रह सतत राहिला. पण देशाची फाळणी मान्य करून, अस्पृश्यतेचा प्रश्न बाजूस सारून आमच्या पुढाऱ्यांनी स्वातंत्र्य घेतले. स्वातंत्र्यात आपण अस्पृश्यता सहज नष्ट करू अशी त्यांची प्रांजल भावनाही असेल कदाचित आणि त्या दृष्टीनेच त्यांनी भारतीय घटनेत अस्पृश्यतेला मूठमाती दिली व जगात अस्पृश्यता निर्मूलनाचा आभास निर्माण केला.

स्वातंत्र्यपूर्व काळात पुणे कराराला १५ वर्षे पूर्ण झाली होती. महात्मा गांधींनी अविरतपणे अस्पृश्यता निवारणासाठी व हरिजन उद्धारासाठी प्रयत्न केले. देशव्यापी दौरा केला. या कार्याची पूर्तता व्हावी म्हणून भीक मागितली. हरिजन सेवक संघाची स्थापना करून हिंदूंचे हृदयपरिवर्तन करण्याचा अटोकाट प्रयत्न केला. स्वतः हरिजनांच्या प्रश्नास मान्यता मिळावी म्हणून व त्यांना सन्मानाने सगळ्यांनी वागवावे म्हणून हरिजन वस्तीस राहण्याचा निश्चय करून सर्व तऱ्हेने अस्पृश्यता नष्ट करून हरिजनांना समान सामाजिक दर्जा प्राप्त होण्यासाठी प्रयत्न केला. पण स्वराज्य मिळाल्यानंतर मुखाने जरी सर्व राजकीय पुढारी अस्पृश्यतेच्या विरुद्ध बोलत असले तरी, आचारात मात्र त्यांचे प्रतिनिधित्व जातीय संघटनांवर आधारित असल्याने स्वजातीयांविरुद्ध जाऊन त्यांना ते दुखवू शकले नाहीत. इतकेच नव्हे तर सत्तेच्या विकेंद्रीकरणाच्या नावावर खेड्यापासून तर शहरापर्यंतचे मतदार संघ जे निर्माण करण्यात आले ते जातीय तत्त्वावरच त्यांना करावे लागले. त्यामुळे अल्पसंख्याकांना कोठल्याही ग्रामपंचायतीत व नगरपालिकेत राखीव जागा, त्याही नाइलाजाने आज ठेवाव्या लागल्या.

छत्तीस वर्षे झाली राष्ट्रपित्याच्या समोर करार लिहिला गेला. आम्ही प्रतिज्ञाबद्ध झालो. आम्हाला स्वराज्य मिळाले. त्यालाही आज २१ वर्षे पूर्ण झाली. परंतु या स्वराज्याचे लोण हरिजनांपर्यंत अद्यापही पोहोचू शकले नाही.

ज्या हरिजनांना, जे या स्वातंत्र्याचे वारसदार आहेत, ज्यांनी या देशाची इतर जाती-जमातींबरोबरच सेवा केली, त्या हरिजनांना आपल्या गावात सार्वजनिक शासनाच्या पैशांनी बांधलेल्या विहिरीतून त्याला तहान लागेल त्या वेळी स्वतःच्या हाताने पाणी खेचून पिता येत नाही. जीवनासाठी लागणारे पाणी तो ओंजळीने पिऊ शकत नाही. दुसऱ्याच्या दयेवर त्याच्या मुलाबाळांना-कुटुंबियांना अवलंबून राहावे लागते. किंबहुना काही प्रसंगी ते तहानेने व्याकुळ होऊन तडफडून मरतानाही त्या हरिजनांना हे स्वराज्य आहे असे तरी का वाटावे ? त्याने या राष्ट्राला हे माझे राष्ट्र आहे असे तरी कसे म्हणावे ? हा सरळ व सोपा प्रश्न आहे.

हरिजनांतील अनेक जमाती पूर्वीपासून लढाऊ जमाती आहेत. स्वातंत्र्य रक्षणाचे काम त्यांनी इतरांच्या खांद्याला खांदे लावून प्राण पणाला लावून आजवर केले आहे. अशा युद्ध आघाडीवर असलेल्या जवानाला जर त्याचे कुटुंबीय आजही पाण्यासाठी त्याच्या गावी भीक मागून तडफडत आहेत असे समजले तर स्वातंत्र्यरक्षणासाठी त्याची

भावना किती निश्चित राहील? याचा विचार स्वराज्याच्या सत्तेच्या विकेंद्रीकरणातून मिळालेल्या अधिकारी व्यक्तींना यत्किंचितही शिवत नाही याची चीड येते.

विकास कार्याची आखणी दिल्लीच्या कचेरीत होवो अथवा पंचायत समितीत होवो, ग्रामपंचायत सभांतून ती पास झाली तरी हे विकास कार्य प्रत्यक्षात ज्यांच्या निढळाच्या घामाने होते ते सामान्यपणे हरिजन-गिरिजनच असतात. प्रत्यक्ष मजुरी, मग ती बांधकामाची असो अथवा कृषीमध्ये असो, कारखान्यात वा रेल्वेत किंवा इतर राष्ट्रीय उद्योगात असो, तेथे जास्तीत जास्त वाटा या हरिजन, गिरिजनांचाच असतो. त्यांनाही स्वतःची जाणीव हळूहळू होतेच आहे. त्यांच्या सहकार्याची राष्ट्राला नितांत आवश्यकता आहे. याची जाणीव त्यांना होऊ लागली आहे. नागा राज्य किंवा डोंगरी राज्य यांची मागणी ही या जाणिवेची नांदीच आहे.

अशा वेळी जर अस्पृश्यता या देशात या ना त्या रूपाने वावरत राहिली तर भावनात्मक राष्ट्रीय ऐक्य हे शब्दांतच राहील व आजतरी ते शब्दांतच आहे, असे स्पष्टपणे म्हणता येईल. आजचे राज्य, लोकांचे राज्य, लोकांसाठी लोकांनी निवडून दिलेल्यांचे राज्य म्हणविले जाते. बहुसंख्याकांचे राज्य ते झाले, असे म्हणता येईल. आजही हरिजन-गिरिजन मागासलेले असल्याने, त्यांना आपल्या हक्कांची पुरेशी जाणीव नसल्याने व आजच्या निवडणुकी द्रव्यबळावर जिंकता येत असल्याने गरीब-दरिद्री जनतेचे प्रतिनिधी आजच्या शासनात जाऊ शकत नाहीत व म्हणूनच आजची अस्पृश्यता कमी होण्याऐवजी वाढतच आहे. जातीयता वाढीस लागलेली आहे. पण हा उषःकालापूर्वीचा काळोख आहे याची जाणीव राज्यकर्त्यांनी वा समाज धुरीण म्हणवून घेणारांनी करून घेतली नाही, तर त्यातून राष्ट्र विघाताची बीजे पेरली जातील हे त्यांनी पक्के समजून घ्यावे.

३६ वर्षांचाच हा प्रश्न आहे असे नाही, त्यामागे ३६०० वर्षांचा इतिहास आहे. महात्मा बुद्धांनी, ऋषिमुनींनी, जैन धर्माच्या प्रवर्तकांनी, वीरशैव लिंगायत पंथाच्या संस्थापकांनी, महानुभाव पंथाने, इतर अनेक समाज सुधारकांनी, भारतीय साधुसंत, कबीर, ज्ञानदेव, एकनाथ, तुकाराम, स्वामी दयानंद सरस्वती, विवेकानंद, महात्मा फुले इ. महान पुरुषांनी याविरुद्ध आजतागायत आंदोलने केली, परंतु रूढीचुस्त हिंदुधर्मीयांनी त्याला दाद दिली नाही. तेव्हा पूज्य राष्ट्रपित्यांनी या चळवळीस हात घालून हा कलंक धुऊन काढण्याचा अविश्रांत प्रयत्न केला. मानवता धर्माचा पाया त्यांनी रचला. धर्म व राजकारण यांचा मिलाफ यातून त्यांनी साधला. अंधश्रद्धा नाहीशी करून बुद्धिप्रामाण्यावर विश्वास ठेवावयाची नवीच शिकवण व तीही अहिंसक मार्गाने व हृदयपरिवर्तनावर, माणुसकीला आव्हान करून त्यांनी हिंदुधर्मीयांना दिली.

भारताला जर विश्वाचे, या सत्य-अहिंसा शास्त्राने शांती साधावयाचे नेतृत्व करावयाचे असेल तर प्रथम आपल्यातील अस्पृश्यतेचा कलंक धुऊन काढला पाहिजे. गांधी जन्मशताब्दी पूर्णपणे यशस्वी व्हावयाची असेल तर ३६ वर्षांची केलेली प्रतिज्ञा या पुण्य काळातच पूर्ण केली पाहिजे. अन्यथा ही शताब्दी प्राणावाचून देह अशी निर्जीव ठरेल.

# ४ : काव्यसंपदा

## कै. अण्णासाहेब टोणगावकरांची काव्यसंपदा

लेखक : **प्रा. पुरुषोत्तम पाटील**, धुळे

कै. अण्णासाहेब टोणगावकरांच्या काव्यसंपदेचा हा परिचय लिहायला घेताना राहून राहून एक विचार मनात सारखा येत आहे. अण्णासाहेब समाजसेवक होते, शिक्षणाच्या क्षेत्रात आदर्शवाद रुजविणारे विद्यार्थीप्रिय शिक्षक होते, वसतिगृह चालविता चालविता बहुमोल संस्कारांनी मुलांच्या भावी जीवनाची घडण घडविणारे व्यवस्थापक-पालक होते. स्वातंत्र्य-संपादनाच्या विविध चळवळींत वेळोवेळी स्वतःला झोकून देणारे त्यागी देशभक्त होते, अन्याय्य रूढी, चालीरीतींविरुद्ध दंड थोपटून उभे राहणारे 'कर्ते सुधारक' होते, 'सर्वोदया'चे निष्ठावंत प्रचारक होते. या माणसाने एवढ्या व्यापातून काव्य लिहिले तरी कधी? बरे हा काव्याचा पसाराही थोडाथोडका नाही. शेकडो पाने भरतील एवढे विपुल काव्य लिहायला त्यांनी सवड काढली तरी कधी? श्रीमती मंदाताई टोणगावकरांनी जेव्हा अण्णासाहेबांच्या कवितांच्या तीन भरगच्च भरलेल्या वह्या माझ्याकडे दिल्या, तेव्हा माझी पहिली प्रतिक्रिया चकित होण्याचीच होती. त्या विषयांची व्याप्ती पाहिल्यानंतर तर या आश्चर्यात अधिकच भर पडली. श्रीमती मंदाताईंशी बोलताना थोडा खुलासा झाला. काव्यलेखन हा अण्णासाहेबांचा स्वतःचा खास छंद होता. कामाचा कितीही व्याप असला तरी थोडी उसंत मिळताच ते आपल्या भावनांना, विचारांना काव्यात वाट करून देत. त्यांनी किती सातत्याने कवितालेखन केले ते कवितांच्या खालील तारखांच्या नोंदींवरूनही कळून येते. कधी कधी तर लागोपाठ दररोज एक-दोन कविता याप्रमाणे दोन-दोन महिने सलग लेखन झालेले आढळते.

### काव्यलेखनापाठीमागची वृत्ती, प्रेरणा

अण्णासाहेबांच्या कविता वाचीत असताना मला पू. साने गुरुजींच्या 'पत्री' या काव्यसंग्रहाची आठवण झाल्याशिवाय राहिली नाही. येथे काव्याची तुलना, मूल्यमापन मला अभिप्रेत नाही. पण वृत्तीचे आणि प्रेरणेचे विलक्षण साम्य जाणवले म्हणून हा उल्लेख. आपल्या काव्याच्या स्वाभाविक आविष्काराबद्दलची साने गुरुजींची भूमिका, विनयाची होती. साहित्याच्या दरबारात उच्च प्रतीचा कलाकवी म्हणून मानमान्यता

मिळावी असा यत्किंचितही विचार त्यांच्या मनाला कधी शिवला नव्हता. देशाच्या, समाजाच्या सेवेचे कार्य करीत असता जे अनुभवले, जे वाटले ते आपल्या साध्या सरळ अनलंकृत शब्दांत मांडावे अशी त्यांची वृत्ती होती. 'दळिता, कांडिता' काही बोल आपोआपच जनाबाईच्या तोंडी येत. सेवेचे, श्रमाचे काम करता करताच गुरुजींनाही काही सांगावेसे वाटे. त्याला त्यांनी काव्यात शब्दबद्ध केले. या वृत्तीला जोड मात्र एका प्रेरणेची मिळाली. ती म्हणजे 'शिकण्या-शिकवण्याची'. जीवनानुभव घेता घेता जे शिकायला मिळाले ते इतरांना कळकळीने सांगावेसे वाटले, शिकवावेसे वाटले, ते सारे त्यांनी काव्यात मांडले. 'समाज-शिक्षक'च्या अशा प्रेरणेत वावगे काही नाही. हीच प्रेरणा कै. अण्णासाहेब टोणगावकरांना मार्गदर्शक ठरली असावी. कारण तिचे पडसाद त्यांच्या काव्यात जागोजाग उमटलेले आढळतात.

## कवीसंबंधी अण्णासाहेबांची कल्पना

'कवी' संबंधीच्या प्रचलित कल्पनांपेक्षा अण्णासाहेबांची कल्पना व्यापक आहे. 'कवी म्हणजे मनाचा मालक' कारण जो मनाला, इंद्रियांना जिंकू शकणार नाही तो या बाहेरच्या सृष्टीलाही नीट जाणू शकणार नाही व खरे काव्य प्रसवू शकणार नाही. त्यासाठी त्यांनी सूरदासाचे उदाहरण दिले आहे.

'फोडोनी जे नेत्र। जाहले आंधळे।
तेव्हा घडे काव्य-। दर्शन त्या ॥'

तुकाराम, वाल्मीकी यांचीही तीच कथा. "तुकारामांनी मनाला, इंद्रियांना पूर्णपणे जिंकले तेव्हा जगाला दिव्य अभंगवाणीचा लाभ घडला. मनोनिग्रहाच्या तपश्चर्येत जेव्हा अंगावर वारूळ चढले तेव्हा पुढे वाल्मीकी कवी झाला." असे ते म्हणतात. "प्रेमळ वृत्तीचा। रंग चढवोनी। कवी सृष्टीकडे। पाहतसे॥" असे सांगताना हे प्रेम 'व्यापक' असावे, त्याला जितेंद्रियत्वाचे अधिष्ठान असावे याची जाणीव करून द्यायला ते विसरत नाहीत. पामर जन विषयसुखात रमतात पण कवी 'आत्मानंदात' डोलतो. "लोकांना आनंद। मिळे भोजनात। कवीला आनंद भोजन हो" असे कवीचे वर्णन त्यांनी केले आहे. कवीच्या अंगी जाज्वल्य अशी सत्यनिष्ठाही हवी. अशी सत्यनिष्ठा असेल तर कवीला लोकहृदय 'जैसेच्या तैसे' दाखविता येईल, एरवी नाही. कवीला आवश्यक असणारे हे गुण आहेत ते आपल्या ठिकाणी यावेत अशी प्रार्थनाही अण्णासाहेबांनी पुढील शब्दांत केली आहे- "रामा रंगा इच्छी। कवी व्हाया नित्य। बाणू दे हे गुण। अंगी त्याच्या". आदर्शाप्रत जाण्याची त्यांची धडपड होती. त्यातील यशापयशाचा हिशेब त्यांनी कधी मांडला नाही. आपणालाही त्या दृष्टीने पाहण्याचे प्रयोजन नाही.

## प्रासंगिक की काळाचे प्रतिबिंब ?

कै. अण्णासाहेबांच्या काव्याचे स्वरूप पाहत असताना त्यातील बऱ्याच कवितांची प्रासंगिकता काहींना जाणवेल. भूदान, स्वदेशी, राष्ट्रीय शिक्षण, दारूबंदी, अस्पृश्यता-निवारण, स्वातंत्र्य-लढा अशा अनेक विषयांना त्यांच्या काव्यात स्थान मिळाले आहे. निरनिराळ्या प्रसंगांच्या निमित्ताने या विषयांवर त्यांचे काव्यलेखन झाले आहे. त्यातील काही विषय आता जुने झाले आहेत. पण म्हणून काही त्यांचे सापेक्ष महत्त्व कमी होत नाही. त्यांच्या या कवितांकडे मी निराळ्या दृष्टिकोणातून पाहतो. कै. अण्णासाहेबांच्या जीवनातील कर्तबगारीचा कालखंड हा त्या काळातील वरील विषयांचा ध्यास घेतलेल्या सामाजिक-राजकीय चळवळींचा कालखंड होता. लहानातला लहान माणूसदेखील त्यातून अलिप्त राहू शकत नव्हता. अण्णासाहेब तर या चळवळींच्या माजधारेत सापडलेले. साहजिकच या विषयांवर त्यांनी पुनःपुन्हा लिहावे यात नवल नाही. त्या काळातील जाणिवांचे, आकांक्षांचे, प्रयत्नांचे यथार्थ प्रतिबिंबच त्यांच्या काव्यात पडलेले आहे असे म्हणणे अधिक उचित होईल.

## पारतंत्र्याच्या वेदना, स्वातंत्र्याचा ध्यास

गुलामगिरीत सर्वांचेच हाल होतात. ‘ अन्न मिळेना खावया पिकवुनीही ’ असा अनुभव येतो. कापसाचे उत्पादन भरपूर झालेले असले तरी अंगावर धडोतीच दिसतात. ब्रिटिशांची चाकरी हाच एक लांच्छनास्पद आधार उरलेला, म्हणून कवी उद्गारतो— ‘ या पारतंत्र्या कसा साहू बोला— जिथे नोकरीविना ना भाकरी ’ दुसऱ्या एका ठिकाणी भारतमातेच्या तोंडी पुढीलप्रमाणे आर्त प्रश्न टाकलेला आहे—

**‘ कवणाचे खाउनि अन्न— शरिराला पोसीत असता ?**
**त्या तुमच्या देहावरती— नाहिच का माझी सत्ता ? ’**

स्वातंत्र्य मिळवावयाचे असले तर प्राणाची बाजी लावावी लागते, सातत्याने अपार खस्ता खाव्या लागतात. ‘ झिजल्याविण स्वराज्य कैचे— स्वातंत्र्य नव्हे की फुकाचे ’ हे तर त्रिकालाबाधित सत्य. स्वातंत्र्य यज्ञाची सांगता होण्यासाठी मातृभूमीच्या सुपुत्रांना स्वतःची आहुती द्यावी लागते. हा आशय सांगणारी ‘ स्वातंत्र्ययज्ञ ’ ही कविता तिच्यातील रूपकामुळे मनोवेधक बनली आहे. या यज्ञातील वेदी आहे सत्य, अहिंसादी शाश्वत तत्त्वांची, इंधन आहे सौख्य-त्यागाचे, हा यज्ञ जीव-ज्योतीने पेटतो, त्यात टाकायच्या समिधा आहेत आत्मस्वकीय प्रेमाच्या, यज्ञाचा अग्नी फुलविण्यासाठी वारा घालावा लागतो मातृभक्तीचा आणि शेवटी मातृभूमीच्या सुपुत्रांच्या आहुतीने ह्या यज्ञाची पूर्णता होते. स्वातंत्र्याचे प्रतीक म्हणजे ‘ तिरंगा ’. त्याचे वर्णन कवी पुढीलप्रमाणे करतो — ‘ अरि-रुधिराचा डाग न ज्याला । सत्य अहिंसा व्रतास त्याला । बलिदाने दे निश्चित शांती’ पण

ज्यांना स्वातंत्र्याकांक्षेचा स्पर्शही होऊ शकत नाही असे काही करंटे असतात. त्यांचा धिक्कार 'देशशत्रू' या शब्दात करावा लागतो. 'स्वातंत्र्याची नाही गोडी। पारतंत्र्यी सदा आवडी। परदेशीची वाली बेडी। तो देशशत्रू॥' स्वातंत्र्यविषयक कवितांत 'स्वातंत्र्ययज्ञ', 'शल्य', 'प्रतिज्ञा', 'पारतंत्र्य', 'वस्तुस्थिति' या कविता उल्लेखनीय आहेत.

## ही भूमी सर्व देवाची

स्वातंत्र्यविषयक कवितांच्या बरोबरीनेच 'भूदान' विषयक कविताही संख्येने भरपूर आहेत. 'भूदाना'चे तत्त्वज्ञान कवीने अतिशय सुबोधपणे मांडले आहे. भूमीच्या मालकीचा प्रश्न देशोदेशी यक्षप्रश्न होऊन राहिलेला आहे. त्याची सोडवणूक साम्यवादी राष्ट्रांत रक्तरंजित क्रांतीने होते. पण भारतात गांधीजी आणि विनोबांनी मानसिक परिवर्तनावर, माणसाच्या न्यायबुद्धीवर भर दिला. "हवा, पाणी ही देणगी ईश्वराची– कृपा भूमि ही मानवाला तयाची" असे असताना काहींनी ती विनासायास बळकावून बसावे आणि बहुसंख्य गरिबांना निराधार करावे याची खंत कवीला वाटते. "पिकाचा धनी राबणाराच होई– कुणा कष्टल्यावाचून अन्न नाही" अशा आदर्शाचे स्वप्न कवी पाहतो. ते प्रत्यक्षात अवतरण्यासाठी कवीचे मन तळमळते आहे. 'उद्या ही जमीन कायद्याने वाटली जाणारच आहे, मग आपण होऊन ती श्रमणाऱ्यांना का देत नाही?' असे भविष्यवाणी असलेले आवाहनही याच भूमिकेतून आले आहे. जे ईश्वरदत्त आहे त्याचा लाभ सर्वांना घेता यावा असे कवीला वाटते. त्यासाठी केलेला युक्तिवादही बघण्यासारखा आहे—

**पाडुनी का तुकडा घेता– त्या आकाशाचा, बोला**
**वायुचे भरुनि का कोठे– ठेवाल तुम्ही हे, बोला**
**ते तेज बंद का करुनि– ठेवाल तिजोरित, बोला**

**सागरा लुटुनी न्याल?**
**किती सरिता त्या अडवाल?**
**हा प्रश्न जेवि फोल**

**ही भूमि तेवि ना तुमची – ही भूमी सर्व देवाची।**

मूठभर लोकांच्या संचयवृत्तीने गरिबांची गरिबी अधिकच वाढते आहे याची खंत आपणाला वाटायला हवी ही जाणीव या कवितांतून प्रकर्षाने व्यक्त झाली आहे. "ऐद्यास ना जगाया– राहील हक्क येथे। गाळील घाम तोची– मिळवील मानपान" हे श्रमप्रतिष्ठेचे गायन त्यांनी अनेक वेळा केलेले आढळते. या सर्व भूदानविषयक कवितांत प्रचाराचा रुक्षपणा, त्यातील भावनिक ओलाव्यामुळे आपोआपच नाहीसे झाल्याचे प्रत्ययाला येते.

## सामाजिक विषमतेबद्दल तीव्र खंत

भूमी, संपत्ती यांच्या विषम वाटपाबद्दल वाटणारा खेद जसा कवीने आपल्या काव्यात व्यक्त केला आहे त्याप्रमाणेच —किंबहुना त्याहीपेक्षा जास्त सामाजिक विषमतेबद्दल, जातिभेदाबद्दलची तीव्र खंत कवीच्या या विषयावरील कवितांतून प्रकट झालेली दिसते. मानव हा येथून तेथून सारखाच असताना हा उच्चवर्णीय, हा अस्पृश्य असे भेद आमच्यापैकी काही स्वार्थी लोकांनी निर्माण केले व अंधळ्या परंपरेने त्यांना दृढता आणली.

> ' पापपुण्य आणि धर्मभावना हळुच घुसवून तयामध्ये
> ग्रंथ निर्मिले, जातिभेदा वर्णियले मग जगामध्ये । '

पौराणिक वाङ्मयाचे निर्माते आणि वरिष्ठवर्णियांचा मतलबीपणा यांच्याबद्दलची कवीची ही धारणा महात्मा ज्योतिबा फुले, लोकहितवादी यांच्या परखड वैचारिक भूमिकेशी एकरूपतेचे नाते सांगणारी आहे. वर्णभेद हे ईश्वरनिर्मित नाहीत, मानवनिर्मित आहेत हे कवीने हडसून खडसून सांगितले आहे. या भेदाचे वर्णन करताना कवीच्या युक्तिवादाला जी उपरोधाची किनार लाभलेली आहे ती पाहण्यासारखी आहे —

> लाल रक्त का ब्राह्मणास ये क्षत्रियास येते हिरवे ?
> वैश्या-शूद्रा निळे-जांभळे प्रकार प्रत्येकास नवे ?
> ब्राह्मण चाले डोक्याने का क्षत्रिय चाले हाताने ?
> वैश्य चालती काय धडाने शूद्र चालती पायाने ?
> ब्राह्मणास ते अन्न खावया क्षत्रिय खाती शस्त्रास्त्रे ?
> वैश्या सोने खाया, शूद्रा गवत, सांगती का शास्त्रे ?

' अग्नी फक्त शूद्रांनाच जाळतो, ब्राह्मणांना नाही — असे थोडेच असते ? ' ' जातिभेद ना मान्य निसर्गा – समान सकलांचे रक्त ' ही वस्तुस्थिती असताना वरच्यांनी खालच्यांना धिक्कारीत राहायचे, दूर लोटीत राहायाचे यासारखा माणुसकीचा अपमान दुसरा कोणता नाही. वास्तविक वर्ण मानायचेच झालेत तर ते कर्मानुसार, जन्मानुसार नव्हे. ' इतिहासामधी किती दाखले, क्षत्रिय ब्राह्मण झालेले – ब्राह्मण असुनी क्षत्रिय बनले. ' तरीही जन्माने लाभलेल्या जातीचाच आमच्यापैकी काहींनी दुराग्रही अभिमान बाळगून शूद्रांना दूर लोटले. परिणाम काय झाला ?

> ' लाखो, कोटी परधर्मांमधि आम्ही ढकलिले आजवरी
> अपमानित ते, सर्व जाहले आज आपुले पहा अरी '

म्हणूनच उच्चवर्णीय हिंदूंना आवाहन करताना कवीने उदाहरण दिले आहे की, अंत्यजाशिवाय संतमालिकाही पूर्ण होऊ शकली नाही. म्हणून संतांना मान द्यायचा

असेल तर अंत्यजांना जवळ केले पाहिजे. 'इथे सर्व राहो सुखी' अशी आमची प्राचीन काळापासूनची उदात्त प्रार्थना असताना अस्पृश्यांना मात्र आम्ही दुःखाच्या खाईत लोटले आहे, वास्तविक जीवनाचे साधे सरळ सूत्र पुढीलप्रमाणे आहे—

'प्रेमाने जगी प्रेम वाढते द्वेष वाढतो द्वेषाने'
नीच मानता दुजास, मानी नीच तुम्हा तो त्वेशाने'

पण आम्ही असे करंटे की, 'आम्ही श्वान–मांजरांना जवळ करतो, दगडधोंड्यांची पूजा करतो' पण मानवांनाच दूर करतो, तुच्छ लेखून त्यांची अवहेलना करतो, हे आपणांलाच अत्यंत लांच्छनास्पद आहे. याही पुढची पायरी म्हणजे आपणाला पटलेला 'बुद्धिधर्म' ज्यांनी कृतीत आचरून हे लांच्छन पुसून टाकण्याचा आयुष्यभर अविरत प्रयत्न केला त्या समाजसुधारकांचीही आम्ही अवहेलना केली, छळ केला, याबद्दलचा उद्वेगही कवीने जळजळीत शब्दांत व्यक्त केलेला आढळतो. 'सामाजिक विषमता' या विषयावरील कवीच्या सर्वच कवितांत त्याच्या आंतरिक तडफडीचे, तळमळीचे हृदयस्पर्शी पडसाद उमटलेले दिसून येतात.

## प्रेमाची देवाणघेवाण

जगातील हिंसा, दुष्टाचार, कलह यांवरील एकमेव उपाय म्हणजे निर्मळ, सात्त्विक असे प्रेम. या प्रेमभावनेच्या गौरवाला एक खास संधी मिळते ती संक्रांतीला– तिळगूळ देण्याच्या निमित्ताने. कै. अण्णासाहेब टोणगावकरांना हा उपक्रम त्यासाठीच फार महत्त्वाचा वाटत असावा. हे त्यांनी या विषयावर लिहिलेल्या अनेक कवितांतून दिसून येते. 'संक्रांतीची किती सुखद ही पर्वणी आपणांला– प्रेमाची निर्झरणी जणू लाभली या दिनाला' असे ते एका ठिकाणी म्हणतात. खानदेशचे जुन्या पिढीतील थोर देशभक्त माननीय नवलभाऊ ( नवल आनंदा पाटील ) अण्णांचे निकटचे स्नेही. त्यांना तिळगूळ पाठविताना ते म्हणतात—

'स्वार्थत्यागे अविरतपणे पाळुनी ज्या व्रताला
स्वातंत्र्याचा ध्वज मिरवुनी भारती धन्य झाला
आयू सारी जनपदहिता वेचिली सेव्यभावे
तोची द्यावा तिळगुळ मला वीर हो प्रेमभावे'

याच कवितेत 'मांगल्याची मम निशिदिनी वाढवो प्रेमवेली' 'प्राणीमात्रावरि विमल हे प्रेम माझे वसावे' अशी कवीने परमेश्वराजवळ प्रार्थनाही केली आहे. दुसऱ्या एका कवितेत 'त्यागाचा परम पवित्र गूळ घेऊन, त्याच्यात सत्य तीळ कुटून विश्वाला हा मधुरतर ऐक्यरूप मेवा द्यावा' अशी मनीषा प्रकट झालेली आहे. अहिंसेची हिंसेवर,

प्रेमाची द्वेषावर मात होईल तरच खरे संक्रमण घडेल असे कवीला वाटते. या भावनेनेच कवी म्हणतो– ' सत्प्रेम-ऐक्यी जदा विश्व नांदेल— संक्रांत ही सार्थ होईल रे '

कै. अण्णासाहेबांना लहान मुलांचे भारी प्रेम. त्यांच्यासंबंधीच्या वात्सल्याने त्यांचे अंतःकरण ओथंबलेले असे. लहान मुलांचे वागणे, बोलणे– सारे काही किती निरागस, निष्पाप असते. म्हणूनच वर्डस्वर्थलाही म्हणावेसे वाटले– ' Heaven lies about as in our infancy. ' कै. अण्णासाहेबांनाही तसेच वाटत असावे असे त्यांच्या वात्सल्य-भावनेचा आविष्कार असलेल्या कवितांवरून दिसते. दुष्ट जगाची खाष्ट नजर आपल्या बाळाला लागू नये म्हणून त्याला तीट लावणारी त्यांच्या कवितेतील आई म्हणते–

**' हे सुंदर छकुल्या मनमोहक तू किती**
**या छटा गुलाबी तुझिया गाली किती**
**तव हास्याची मधुर बहु ही रीती '**

दुसऱ्या एका कवितेतही सान बालकाचे असेच मनोहारी वर्णन कवीने केले आहे.

**नित्य हासरे, वदन गोजिरे**
**पाहताचि दुःख कुठे पळुन जाई रे**

अशा वेळी मुलासवे मूल व्हावे असे कोणाला वाटणार नाही ? ' बोल बोबडे– देति मज धडे– बोबडाचि मीही वदे– केवि हे घडे ! ' असा स्वाभाविक चमत्कार घडावा यात काही नवल नाही. लहान मुलाचा ' पापा ' घेताना, संसारतापाने त्रस्त झालेल्या मातेचा सारा श्रमपरिहार होतो, तिला स्वर्गसुखाचा प्रत्यय येतो.

**सुख वसतसे स्वर्गीचे या जगात कुठे बरे ?**
**विरति अवघी दुःखे जेथे कुठे असले झरे ?**
**सहज शमवी साऱ्या तापा असे बळ कोणते ?**
**तरि मधुरसा पापा घ्यावा, मिळेल अवघे तिथे !**

वात्सल्य-प्रेमाच्या अशा मोजक्याच कविता कै. अण्णासाहेबांनी लिहिल्या असल्या तरी त्यातील भावमाधुर्यामुळे त्या रसिकांच्या दीर्घकाळ स्मरणात राहतील.

## परिणत अवस्थेतील काव्य : अभंगरचना

अण्णासाहेबांचा पिंड एकीकडे समाजसुधारकाचा, देशभक्ताचा होता, पण दुसरीकडे अंतर्मुख तत्त्वचिंतकाचाही होता. विशेषतः आपल्या उत्तर आयुष्यात या सततच्या चिंतनाचा आविष्कार त्यांनी सोप्या, सहज भाषेतील अभंगांतून केला. तुकाराममहाराजांनी उत्कर्षाला नेलेले हे छंद-माध्यम त्यांना सुकर वाटते. सन १९५२–'५३

च्या काळात व तदनंतरही जवळजवळ हे अभंगलेखन चाले. अभंग-चरणातील अंतर्गत यमक रचनेचे बंधनही त्यांनी बाजूला सारले, पण या अभंगांतील उत्स्फूर्त आशय मनाला जाऊन भिडणारा आहे.

## रामा–रंगाची ही जोडी माय–तान्हा

संख्येने जवळजवळ अर्धसहस्र असलेले हे अभंग अण्णासाहेबांनी आपले आवडते दैवत प्रभू रामचंद्राला उद्देशून लिहिले आहेत. प्रत्येक अभंगाच्या शेवटी भक्त ‘ रंगा ’चा–रंगनाथाचा विनीत भाव अत्यंत मधुरपणे व्यक्त झालेला आढळतो. त्यांच्या रामाच्या या आळवणीत उत्कटता आहे. ‘ रोमरोमी माझ्या संचरलासी तू रामा ’ या अनुभवाप्रत तेही आले असावेत. ‘ रामा तू धरिले, मजला पोटाशी, माया तुझी लाभली रे ’ यासारख्या ओळी वाचताना माय–लेकरूचे सर्व परिचित रूपक भावनांची नवी आवर्तने घेऊन आल्याचे जागवते. या उत्कट समीपतेचे रूपांतर पुढे तादात्म्याच्या जाणिवेत न झाले तरच नवल !

**रामाहून रंगा । नाही हा निराळा ।**
**उमजला रूप । तुझेच हे ॥**

पण या तादात्म्यानुभवाची वाट तशी सोपी नव्हती. मुख्य अडसर होता पढिक पांडित्याच्या दबदब्याचा. पण भक्तिमार्गावरील या पथिकाला लवकरच कळून चुकले की श्रेयप्राप्तीचे शहाणपण काही पोथ्या-पुस्तकांतून मिळू शकत नाही. पुस्तकी पांडित्याचा अतिरेक म्हणजे रुग्णालयच. किती मिस्किलपणे कवी लिहून जातो—

**औषध बाटल्या । जेथे जास्त तेथे ।**
**आजारी आहे हे । निश्चितचि ॥**
**तैसे जेथे पोथ्या । सापडती फार ।**
**तेथे शहाणपण । नाही समजा ॥**

दुसऱ्याही अभंगात कवी म्हणतो—‘ पुस्तकात नाही – अर्थ तो कधीही ’; ‘ रामा रंगा इच्छी । ज्ञान या सृष्टीचे । पोथीचा कंटाळा । असे त्याला ॥ ’ भोवतालची चैतन्यमय ईश्वरीय सृष्टी दृष्टिआड करून रुक्ष पांडित्याने काही परमेश्वरसाधना होऊ शकत नाही हे अण्णासाहेबांनाही जाणवले. म्हणून त्यांनी कास धरली ती भोवतालच्या निसर्गाची—सूर्यकिरणांचे वैभव मुक्तपणाने उधळीत असलेल्या आकाशाची, रिमझिम रिमझिम बरसणाऱ्या धारांची, सज्जनाच्या विशाल अंतःकरणाप्रमाणे हेलावणाऱ्या सागरलहरींची. अशा निसर्गसौंदर्याची ज्याला चव नाही, तिकडे जो पाठ फिरवून जपतपच करीत बसतो तो अभागी. म्हणूनच अण्णासाहेबांनी दुसऱ्या एका अभंगात म्हटले आहे—‘ रुसेल तो राही । भिकारी करंटा. ’ ज्याला निसर्गातील चैतन्य–स्पंदन जाणवते त्यालाच परमेश्वर स्वरूपातील चैतन्याचा साक्षात्कार होतो.

## पाहू दे गुणांचीच बाजू

वरीलप्रमाणे साक्षात्कार झालेल्याची जगाकडे पाहण्याची दृष्टीच बदलून जाते. दिसते ते सारे चांगले. 'दुर्योधना'लाही 'सुयोधन' म्हणून संबोधण्याइतके मन मोठे होते. आणि प्रत्यक्षात जगात काही अनिष्टाचे अस्तित्व असले तरी त्याची पर्वा नसते--

नाही मज भीती। वाईटाची शमा।
जोवरी चांगले। दिसे मज ॥

असे चांगले पाहता यावे यासाठी स्वतः चांगले व्हावे लागते, सुजन व्हावे लागते. अण्णासाहेब टोणगावकर असे अतिसुजन देवमाणूस होते. त्यांचे सर्व आयुष्य म्हणजे एक सेवा-यज्ञच होता. लोकसेवेचे हे कार्य आमरण करीत असताना मनात उठलेले नाना विचारतरंग, भावनातरंग त्यांनी काव्यात शब्दबद्ध केले. त्या काव्यसंपदेचा हा अल्पसा परिचय.

# चार शब्द

### मंगेश पाडगावकर

कै. अण्णासाहेब टोणगावकरांच्या कविता मी वाचल्या. व्यक्ती म्हणून मला त्यांची मुळीच माहिती नव्हती. परंतु या कविता वाचीत असताना समाजसेवेची उत्कट तळमळ बाळगणारा, प्रतिष्ठेचा कसलाही हपापा न बाळगता जीवनात श्रेष्ठ मानलेल्या मूल्यांची उपासना करणारा एक सच्चा माणूस मला सतत भेटत राहिला. आपल्या मनातला ध्यास मला सांगत राहिला.

या कवितांतून मला जाणवलेला हा माणूस कसा असेल याचे चित्र मी माझ्या कल्पनेने रंगवू लागलो. या कविता लिहिणाऱ्या माणसात एक विलक्षण सरलता, प्रेमळपणा असावा असे मला तीव्रतेने जाणवले. ध्येयाच्या मागे त्याग करीत धाव घेणारी, विश्रांतीसाठी न थांबणारी, मागे वळून न पाहणारी माणसे मला आदरणीय वाटतात. परंतु पुष्कळ वेळा या त्यागाच्या ताणामुळे त्यांच्यातली सहजता न कळत मुरगळली जाते आणि त्यांच्या व्यक्तित्वाला खरखरीतपणा येतो; परंतु कै. टोणगावकरगुरुजी यांच्या व्यक्तिमत्त्वात असा खरखरीतपणा असेल असे या कविता वाचीत असताना क्षणभरही वाटले नाही. आनंदाने गाणे गुणगुणावे त्याप्रमाणे त्यांनी आपली समाजसेवेची कामे केली असावी. आणि यामुळेच, हाती घेतलेल्या कार्यांची इतकी गर्दी असतानाही ते वह्या भरभरून कविता लिहू शकले. या कविता म्हणजे कै. टोणगावकरगुरुजींनी स्वतःच्या मनाशी केलेला जणू संवाद आहे. कै. टोणगावकरगुरुजींनी हाती घेतलेली कामे त्यांच्या

कवितालेखनात अंतराय न बनता त्यांच्या काव्यलेखनाला प्रेरणा देत राहिली. आपल्या अंतःकरणातील मानवप्रेमाचा आविष्कार त्यांनी आपल्या काव्यातून केला.

कवीच्या हृदयात व्यापक प्रेम हवे अशी टोणगावकरगुरुजींची धारणा होती. अशा व्यापक प्रेमामुळे ' दगडात पाही ईश्वरदर्शन ' असे भावसामर्थ्य कवीला प्राप्त होते असे ते मानीत. ते या जीवनदृष्टीचे वर्णन करताना म्हणतात :

**प्रेमळवृत्तीचा रंग चढवोनी**
**कवी सृष्टीकडे पाहतसे**
**नाचे तेव्हा त्याचे सृष्टीदर्शनाने**
**हृदय प्रेमाने ओथंबुनी**

कवितेच्या निर्मितीत टोणगावकरगुरुजी जो आनंद अनुभवतात तो आनंद लौकिक वासनापूर्तीचा नाही. या आनंदाला अलौकिकाचा स्पर्श आहे याची त्यांना सखोल जाणीव आहे :

**पामर जग हे विषयसुखात**
**रमे, कवी डोले आत्मानंदी**
**लोकांना आनंद मिळे भोजनात**
**कवीला आनंद भोजन हो.**

अशा अलौकिक आनंदाचा स्पर्श कवीने अनुभवला असला तरी हस्तिदंती मनोरा बांधून त्यात स्वप्नधुंद होऊन राहण्याची त्याची प्रवृत्ती नाही. तो आपल्या भोवतीच्या जगाकडे सहानुभूतीने भरलेल्या उघड्या डोळ्यांनी पाहतो. कै. टोणगावकर यांची ' शल्य ' ही कविता या दृष्टीने पाहण्यासारखी आहे. ही कविता कै. टोणगावकरांनी लिहिली तेव्हा देश पारतंत्र्यात होता. आपण पारतंत्र्यात आहोत ही गोष्ट कविहृदयाला शल्याप्रमाणे बोचत राहाते. ज्या मातृभूमीने शिवाजी, तानाजी, बाजी या पराक्रमी सुपुत्रांना जन्म दिला तिच्याच पोटी आपणही जन्मलो. परंतु आपण अजून पारतंत्र्य झुगारून स्वतंत्र होऊ शकलो नाही.

**स्वातंत्र्यकार्यी दिले प्राण ज्यांनी**
**तयांच्या कुळी जन्म माझा असे**
**दास्यत्व येई परी आज माते**
**मना शल्य हे नित्य बोचीतसे.**

पारतंत्र्याप्रमाणेच समाजातील गरिबी पाहूनही टोणगावकरगुरुजींचे मन अस्वस्थ होते. टोणगावकरगुरुजींचे खादीविषयीचे प्रेम हे करुणेतून निर्माण झाले आहे. खादी

ही त्यांच्या बाबतीत राजकीय गरज अथवा टूम नाही. 'खादीची पवित्रता' या कवितेत त्यांची ही डोळस करुणा व्यक्त झाली आहे. गरिबांचे शोषण दूर करण्यासाठी त्यांना खादी हवी आहे.

**श्रीमंत जे स्वतःला म्हणवून घेति आज**
**गरिबांस ते लुटूनी करिती अमूप पाप**
**खादीविना जगाचे टळणार नाहि पाप**

महात्मा गांधींच्या जीवनकार्यातून टोणगावकरगुरुजींनी केवळ कवितेचीच नव्हे तर आपल्या संपूर्ण जीवनाची स्फूर्ती घेतली आहे. महात्मा गांधींचे जीवन हा या युगातला एक श्रेष्ठ चमत्कार होता. गांधीजींचे राजकारण हे श्रेष्ठ जीवन-मूल्यांच्या आविष्कारासाठी होते. गांधीजींचे जीवन म्हणजे करुणेचा अभूतपूर्व आविष्कार.

**दरिद्री जनांची अहर्नीश सेवा**
**करी, घेइना जो क्षणाचा विसावा**

हा गांधीजींचा जीवनविशेष तर टोणगावकरगुरुजींना अगदी भारूनच टाकतो. ईश्वराची प्रार्थना करतानाही टोणगावकरगुरुजींना प्रथम आठवण होते गांधीजींना दीर्घायुष्य मागण्याची.

**दीर्घायू गांधीजींते लाभो सदा ईश्वरा**
**कंठमणी भारतभूचा गरिबजनां प्यारा**
**सत्यअहिंसेचा तारा शांतिचा निवारा।**

महात्मा गांधींविषयीचे प्रेम त्यांच्या मनात कसे ओतप्रोत भरून राहिले होते ते या ओळी वाचताना आपल्या ध्यानात येते. त्यांची सुखाची कल्पनाही गांधीजींच्या जीवन-दृष्टीनेच प्रभावित झाली आहे.

**जया वाटते नित्य सौख्यी बसावे**
**तये सौख्यशोधास त्या थांबवावे**
**करोनी सुसेवा अती नम्रभावे**
**अहर्नीश त्या दिव्य त्यागा वरावे**

राष्ट्रभक्तीच्या, समाजसेवेच्या या ध्यासामुळे या प्रवृत्तींशी संबंधित असलेल्या चळवळी कै. टोणगावकरगुरुजी यांच्या कवितेचा विषय होतात. यामुळे प्रासंगिकतेची चौकट अटळपणे त्यांच्या कवितेभोवती पडते. कै. टोणगावकरगुरुजींनी कविता हा कलाप्रकार म्हणून जोपासण्याचा प्रयत्न केलेला नाही. मनातले विचार, भावना पद्यबद्ध करण्यात एक प्रकारचा आत्माविष्कार त्यांनी साधला आहे. हा आत्माविष्कार कलात्मक पातळीवर

पोचतोच असे नाही. परंतु या दृष्टीने त्यांनी विचार केलेला नाही हा त्यांच्या विशिष्ट प्रकृतीचाच एक भाग आहे. त्यामुळे कै. टोणगावकरगुरुजी यांच्या बऱ्याचशा कविता प्रासंगिक पद्यरचना या सदरात मोडतात. अशा या रचनेतून एका विशिष्ट कालखंडाचे दर्शन आपल्याला होते. या कालखंडाचा एका सच्चरित्र मनावर झालेला परिणाम आपल्याला दिसतो. सामाजिक-राजकीय जीवनाविषयीच्या आपल्या माहितीत त्यामुळे थोडी भरही पडते.

कै. टोणगावकरगुरुजींनी आवडीने केलेले हे लेखन आता लोकांच्या पुढे येत आहे ही चांगली गोष्ट आहे. त्यांनी समाजाची मनोभावे सेवा केली. समाजमंगलाचा सतत ध्यास आपल्या अंतःकरणात बाळगला. या कविता प्रसिद्ध करून एका अर्थाने आपण काही अंशी एका निर्मळ समाजसेवकाचे ऋण फेडीत आहोत. या कविता-प्रकाशनाच्या संदर्भात हाच अर्थ मोलाचा आहे.

मुंबई
२१-९-७७

✤ ✤ ✤

## गांधीजी ( श्लोक )

धुळे जेल १९३२

अहो भारताते मिळाया अझादी । बहू दिव्य शोधियले शस्त्र खादी
स्वदेशीय नाट्या बहिष्कार नांदी । जये गायिली तेच आहेत गांधी
अहिंसा जयाची असे प्राण प्यारी । असत्यास ना ठाव ज्याचे शरीरी
तसा हिंदू मुस्लीम द्वैतास सांधी । असा जो कुणी तेच आहेत गांधी
दरिद्री जनाची अहर्नीश सेवा । करी घेइना जो क्षणाचा विसावा
तयासाठि जो भव्य मंदीर बांधी । स्वदेशी रूपे तेच आहेत गांधी
जये आफ्रिकेमाजी हिंदी जनाते । दिले हक्क, केले यशस्वी तयाते
बहिष्कार ही कौन्सिला दिव्य कांडी । कुणी लाविली तेच आहेत गांधी
स्वयंसेवका घेउनी फक्त ऐंशी । निघे मीठ सत्याग्रहा जावयासी
कराया स्वये कायदे-भंग दांडी । जये गाठिली तेच आहेत गांधी
प्रतिष्ठेविना ना जगी एक धंदा । न श्रेष्ठत्व जाती गुणालाच वंदा
समाजातली जावया जाति धुंदी । स्वये भंगिही जाहले तेच गांधी
उपासा करी दिन जो एकवीस । कराया खुली मंदिरे अंत्यजास
कुठेही न अस्पृश्यता वेद ग्रंथी । असा रोकडा बोध देतात गांधी
असे हिंदभू प्राण खेडयामधी त्या । म्हणोनी झटे उन्नती तत् कराया
कराया जयाची अहो दारूबंदी । जये दाविला मार्ग त्या नाम गांधी

## प्रभू-दर्शन

प्रभूजी मम आले आले – दर्शन झाले झाले
दीन जनाच्या रूपाने अजि – प्रभूजी मम नटले
दीन उद्धारक दीन बनोनी – दीनकाजी रमले
पीतांबर नच कटी नेसले – खादी ल्यालेले
चक्र गदा नच दिसती हाती – नांगर धरलेले
सुवासिक नच उटणी अंगी – मातीने न्हाले

कस्तुरीचा नच टिळा भाली – अजि घामाने भिजले
किरीट कुंडले विसरूनी सारे – दीनरूप बनले
डोईवरचा मुकुट जाउनी – मुंडासे आले
सुशोभित अजी मंदिर त्यजुनी – झोपडीत रमले
हीनदीन मुले जमवुनी – ज्ञान देत बसले
घाण जगाची दूर कराया – झाडू धरलेले
विलास नाही प्रभूला रुचला – मजुरीला आले
जनसेवारत हीन दीन जे – तत् सेवक बनले
हिंद देवीचे दु:ख पाहुनी – रूप असे धरले
हिंद देवीच्या करुण हाकेने – धावुनी प्रभू आले

## प्रतिज्ञा

देश स्वातंत्र्यास्तव तोडिन सारा स्वकीय संबंध
इतुकेच काय परि मी देईन प्राणही तुटावया बंध
दिधले शिवरायांनी ।किंवा तानाजी बाजि वीरांनी
तैसा स्वातंत्र्याते मिळविन मम प्राण मोल देवोनी
देशाचे लग्न अधी तानाजी लावी मागुती पुत्र
सुखोपभोगांचे तरी देशासाठी करीन मी सत्र
पावन खिंडीमाजी बाजी हो राजी देउनी प्राण
देशास्तव तैसा मी तनमनधनही करीन कुर्बान
नसता शीर मुरारी गाजवी शौर्यही स्वतंत्रतेसाठी
हटणार नाही लवही केले जरि घावहि मारुनी लाठी
हिरकणी भगिनीते दे खंडोजी पुत्रबळि ही हाताने
तैसा स्वातंत्र्यास्तव देईन स्वकिया निरोप प्रेमाने
ज्यास्तव प्रताप राणा आनंदे राहिला वनी रानी
त्यासाठी मी जन्मही वेचिन अजि बंदिवासी हासोनी
संताजी नेताजी करिती शत्रूस थक्क शौर्याने
सत्याग्रह युद्धी या थक्क करीन मीहि शांतीने

स्वातंत्र्याचा झेंडा राघोबा रोवी जाउनी अटकी
रक्षाया झेंड्याते जाईन अजी मी तसा अहो अटकी
विश्वासे पानपती देउनी प्राणही धडा दिला अम्हा
गिरवीन त्याच धडयाते सत्याग्रही येऊनी अजी कामा
दत्ताजी काय वदला 'लढेन पुनरपि जगेन जरि यात'
कैदी जरी मी झालो – परि सुटताची दिसेन युद्धात
देशास्तव झाशीची राणी लढली असून ती अबला
पौरुष जन्मा येवूनी स्वस्थ रहाणे रुचेल केवि मला
जन्मसिद्ध हक्काते मिळवाया सोशिले बहु कष्ट
त्या टिळकांच्या मार्गे जाऊन जगता करीन मी स्पष्ट
असता अलोट लक्ष्मी भोगीती ना मोतीलालजी शिक्षा
सत्याग्रहेच मिळवीन त्याची नको मला भिक्षा

## स्वातंत्र्य यज्ञ

स्वातंत्र्य-यज्ञ इच्छा, बंधूंनो हिंद जननिते झाली
तत् सिद्धता कराया, जबाबदारी तुम्हावरी आली
सामग्रीची यादी दाखवितो वाचुनी अहो ऐका
ठरवा नीट मनाशी जबाब द्याया अधीर होऊ नका
शाश्वत, सत्य, अहिंसा, तत्त्वांची लागते तया वेदी
दुसरे न टिके काही दगड विटांसी क्षणात हा भेदी
इंधन या यज्ञाचे सौख्याचा त्याग हेच हो फक्त
उपयोगि न हो तेही जरि अंतरी मान कीर्ति आसक्त
जीव ज्योतीने हा पेटतसे, एथ अग्नि कुचकामी
द्वेषाने हिंसेने विटाळली ज्योत ही नये कामी
आ तस्वकीय प्रेमाच्या येथे लागती अहो समिधा
अग्नी न प्रदीप्त हो परि मोहे जरी भक्तिभाव राही द्विधा
जननीमय प्रेमाचा, घालावा लागतो सदा वारा
अथवा जाई विझोनी त्या राखाया उपाय ना दुसरा

तनमन-धनाहुतीने पुत्रांच्या यज्ञ होई हा शांत
अथवा व्यर्थचि सारे, तत् समयी जरी कराल आकांत
पुरवाल जननि इच्छा, यज्ञी सर्वस्व देउनी बोला
किंवा जगावयाते गुलामि जीवन पसंत तुम्हांला
क्षणिक सुखे जरि भुलला आहे मृत्यु अखेर ठरलेला
यज्ञ मरण ने स्वर्गा मग जाता का उगाच नरकाला
बलाबलाते अपुल्या पाहुनि यज्ञार्थ काय पुरवाल ?
सांगा कृष्णानंदा दूर करा मातृभूमिचे हाल

## शल्य

दोंडाइचा १९३५

राजा शिवाजीस तानाजि बाजीस देवोनिया जन्म हो धन्य जी
पोटी तिच्या जन्मलो का कुलांगार दास्यत्व जो हे जगी ना त्यजी
स्वातंत्र्य कार्यी दिले प्राण ज्यांनी तयांच्या कुली जन्म माझा असे
दास्यत्व येई परी आज माते मना शल्य हे नित्य बोचीतसे
स्वातंत्र्य भक्तीस त्यांच्या नसे तोड, सांगे इतिहास साऱ्या जगा
देवी भवानी तसा तोरणाही पुरावा तयाचा असे दांडगा
पूजा न देवीस, तो तोरणा ओस, या बीज जे दास्य जाळी मना
तोडावया पाश मन्मायभूमीस, मीची असे आज आधारना
ना आठवे तोड साऱ्या जगी जीस या हिंदभूमीत ऐसी दया
धान्या धनालाही नाही उणे काहि लौकिक हा आजि गेला लया
सोन्या हिऱ्यानेही संपन्न जी भूमि दे साक्ष याची ही कोहिनूर
कंगाल ती होई या पारतंत्र्येच पाहोनी हे दृश्य फाटे ऊर
व्यापार धंदा करोनी जयाचे भरे पोट ऐसा जिथे उद्यम
नाही परी देश साऱ्या दुनियेत बेकार आजि तयाच्या सम
उत्कृष्ट ती शेती, व्यापार सामान्य, आहे जगी नीच ती नोकरी
या पारतंत्र्या कसा साहु बोला, जिथे नोकरीविना ना भाकरी

स्वातंत्र्य हे ध्येय गाठावया सर्व आयुष्य ज्यांनी असे वेचिले
या हिंद भूमीस पावित्र्य याया रणामाजि ते रक्तही सांडिले
या पारतंत्र्यी इतिहास ना नाम दे बंडखोरा विना त्यास ते
रात्रंदिनी ते करी मानभंगा मनाला न होई आता सह्य ते

## वस्तुस्थिति

१९३०

### [ पिता – पुत्र संवाद ]

चला तरुण बंधूंनो, जननी पांग फेडावया
निघा सकल पाश हे, त्वरित दूर फेकूनिया
तसे गुरफटू नका मुळिही प्रेम संसारिया
पडे श्रवणी हाक जै, तरुण सिद्ध हो जावया
निघे जनक–सम्मति मिळविण्या जदा वीर तो
करोनि नमना तया, कथित जाहला बेत जो
वदे वरदहस्त द्या, विजय प्राप्त व्हाया रणी
तदा वदत तत्पिता, ‘ शिकविले तुला हे कुणी ? ’

पिता— “ तोफा आणि मशिनगन्सही तिथे त्या बंदुका संगिनी
ज्यांचे पाशी शिपाई लष्कर असे त्याशी लढावे कुणी
रेल्वे पोस्ट तशी विमान स्टिमरादीकानिशी सज्जही
सत्तेशी असल्या लढून मरणे वेड्या विचारा त्यजी. ”

पुत्र— “ ताता सत्य जरी तुम्ही कथितसा जे सत्य पायावरी
चाले युद्ध, तसेच जोर अवघा ज्याचा अहिंसेवरी
त्यांचा सैन्य अफाट बंदुकी तशा तोफा नसू द्या तरी
झाला आजवरी पराजय कधी ? सांगा तुम्ही हे परी
संख्येने बहु सैन्य कौरव दली, का पांडवांचा जय ?
फौजा मोगलही अफाट असता, का मावळ्यांचा जय ?

जेथे न्याय नितीस काट बसला, धर्मास जे लंघिती
त्यांचा काळ भरोनि नाश ठरला, हे दाखले दाविती "

पिता—"झाले सत्य युगात शक्य म्हणुनी होईल का या युगी
पौराणिक कथा कितीक असल्या गोष्टी रूपे राहती
तत्त्वांना व्यवहारि स्थान नच या देती कधी शाहणे
संसारास्तव तत्त्व मानिती ते संसार त्या कारणे
जयाचे हाती ससा तयास जग हे संबोधिते पारधी
चालेना जगती शहाणपण बा सत्तेपुढे त्या कधी
ऐसा न्याय जगात रूढ असता का दु:ख स्वीकारिशी
कैसा प्राणि जगेल प्राशुन विषा आहे कृती ही तशी
जो श्रीमंत धनाढ्य त्यास असले साजे सदा कार्य हे
स्वार्थत्यागी व देशभक्त पदवी त्यांना जगी लाभते
पोटाला न मिळे जयास पुरते त्या वावगे होइ ते
स्वार्थी हा ठरतो, न मान हि तया, पोटार्थि हे नाम घे
श्रीमंता न कुणी कधी छळतसे ना कष्ट कारागृही
कीर्ती वाढुन मानपान मिळती ए. बी. तया क्लासही
लाठ्यांचा परि मार माथि गरिबा ते कष्ट ही साधणे
होता की नव्हता, कुणास न कळे, हो व्यर्थ त्यांचे जिणे
साधे स्वार्थ परार्थही सहजचि त्यांचा परी आपणा
काही ना घडता फुका पदरि ये निंदा तसा टोमणा
त्याहूनी बरवा असे कितितरी संसार रे आपणा
साधूनी हित तो परार्थही घडे हा फायदा हो दुणा
विद्या प्राप्त करी न घालवि वया सोडून दे नाद हा
संपादी पदव्या भराभर तुला आहे बरा योग हा
सौख्याची धर नोकरी, मिळवुनी पैका करी चैन रे
डोहाळे परि जे तुला अठवले सर्वस्वी ते घात रे "

पुत्र— "बाबा हे वदता तुम्हीच अथवा कोणी दुजा हे वदे
ज्यांनी आजवरी मला शिकविले त्यांचेच का बोल हे
स्वार्थत्यागिय देशभक्त शिवबा तानाजिच्या ज्या कथा

ताता मत्हृदयी स्वये पटविल्या त्या झूट का सर्वथा
सालोसाल करूनी उत्सव जदा त्यांच्या यशा गाइले
संपादा असलेच गुण म्हणुनी आम्हास आदेशिले
आला काळ प्रभुकृपे करुनि तो तेव्हा असा बोधका
जे श्रेयस्कर होय तेच शिकवा पेचात घालू नका "

## खादी घ्या

१९३१

ही खादी बंधुनो घ्या घ्या–निज देहा अजि सजवाया

जी लाखो जीवा जगवी
गरिबास अन्नही पुरवी
बेकारी जगी या तुरवी
निज देश बंधु जगवाया– ही खादी बंधुनो घ्या घ्या

चरबीचे नेसुनी वस्त्र
वाचिता हिंदुनो शास्त्र
राहते केवि पावित्र्य
निज आर्यधर्म रक्षाया– ही खादी बंधुनो घ्या घ्या

वाचवी स्वताचा पैसा
थांबवी हिंदभू ऱ्हासा
परदास्या लावी फासा
निज स्वार्थ तरी साधाया– ही खादी बंधुनो घ्या घ्या

पिंजारी कोष्टी वा कुणबी
ते महार साळी धोबी

त्या अनाथ अबला जगवी
निज दान धर्म साधाया– ही खादी बंधुनो घ्या घ्या

## स्वावलंबन

प्रबोध, १९३४

घ्या स्वावलंबनाचे – व्रत आज या घडीला
स्वोद्धार जे करोनी – आणी स्वतंत्रतेला

स्वातंत्र्य आपणाते – कैसे मिळेल बोला
वस्तू विदेशी साऱ्या – आणूनिया घराला

दुसऱ्यावरी विसंबे – तत् कार्यनाश झाला
जो कष्टतो स्वये तो – ठरतो जगी भला या

मेल्याविना स्वताला – का स्वर्गलाभ होई ?
कष्टाविना जगी या – फळलाभ ना कुणाही

समजोनि तत्त्व जो जो – जगी स्वावलंबी होई
धनधान्य मान्यतेची – ना वाण त्या कधीही

लंघावया स्वपाश – घ्या घ्या स्वदेशी माला
बल स्वावलंबनाचे – दिसता पळेल घाला

न स्वावलंबनाची – लागेल गोडी ज्याला
माला न घालि देवी – स्वातंत्र्यलक्ष्मी त्याला

सिद्धी मिळोनी कार्यी – पुरवी मनोरथाला
करणे परंतु आधी – सांगीतल्या व्रताला

## लाच ( दिंडी )

नोकरीचा जन्मला जधी पेशा । लाचरूपी त्या असे हस्तरेषा
जया लाभे नोकरी अहो मोठी । आढळे हे चिन्ह त्या ललाटी

पगाराने अल्प या कसे भागे । तरी पिडिला हो अहो लाचरोगे
पगाराची ना करी कुणी पर्वा । खाद ज्यादा आवडे आज सर्वा

बड्या साहेबापासुनी शिपाई । कुणी आढळेना जो न लाच घेई
श्रेष्ठ म्हणती हक्कची लाच घेणे । तोच कित्ता गिरविला खालच्याने

न्याय नुरला, सत्य ते पार गेले । अहिंसेचे तत्त्वची बुडाले
नाश झाला नीतिचा धर्म लोपे । करी सारे हे लाच स्वप्रतापे

जिने नसता अपराध दिले फासी । घालवाया जी गुन्हा युक्ति खासी
गरिबाते फुका कैद देती । लाच घडविते सर्व ही अनीती

## गरिबी

गरीबा कोणती दुःखे – हरीबा काय हे ठावे

जन्मता तान्हुल्या बाळे – प्रवासी म्हणुनी हिंडावे
निवाऱ्या पर्णकुटी रात्री – मिळे तरी भाग्य समजावे

अंगडी पदर आईचा – पाळणा पाठिची झोळी
चौघडी जीर्ण त्या गादी । भूवरी बाळ निजवावे

काथ्या आणि मेथ्या दे – जननी त्या रोग हटविण्या
तीच त्या नर्स वा डॉक्टर– ईश्वरा आयु मागावे

## जन्टलमन व्याख्या

### ( फटका )

व्याख्या आजच्या जन्टलमनची कान देऊन परिसावी
'ट' हे अक्षर बहु अवडीचे 'ट' ची महती किती गावी ?

हॅट डोकीला शॉर्ट कोट तो, पायी बूटही नित्य हवा
परिट घडीचा शर्ट नेटका, टाय बांधण्या रोज नवा

पँट नेसण्या रिस्टवॉचही मनगट यांचे शोभविते
स्टॉकिंगा मी विसरलोच हो, वर्णन त्याविना अपूर्ण ते

विंटरमध्ये स्वेटर किंवा डबल ब्रेस्टचा तो कोट
हॉट सीझनी मँचेस्टरची, मलमल बदलाया सूट

साइट यांची शॉर्ट म्हणूनी, स्पेक्ट्स वॉन्ट या फार असे
पोशाखामधी अपटुडेट हो, साहेबाची मूर्ति दिसे

बटन होलचे आंबट शोकी फौंटन दिसते पॉकेटी
चिरुट अथवा सिगारेट हे विडी ऐवजी वापरती

मिशास देती पूर्ण चाट वा फ्रेंच कटावर बहु प्रीती
कटिंग करूनि केस राखिती चाट शेंडीला ते देती

क्रिकेट माजी बॅट मॅट वा नेट स्टम्प्स् आणि टेन्ट
शब्द बोलती डिफिट आउट वा व्हिकेट किंवा वेलकॉट

रेस्ट घेऊनि फिस्ट झोडती सोडा वॉटर लिमलेट
वटवट करिती ट युक्त सारी करताना हे चिटचॅट

तैसी टेनीस फुटबॉलची मधुनि घेती हे टेस्ट
रस्टिक नॉटी ब्रूट स्टुपिडही शिवीगाळिची घ्या लिस्ट

रंगामधला रंग आवडे आज तयांना चॉकलेट
कुणाही थोडा उशीर होत जो म्हणती काहो तुम्ही लेट ?

मोटारीमधी फ्रंट सीट या तिकीट गाडीचे फर्स्ट क्लास
रेस्टॉरंटी टी घेती हे स्टेशनवरती हमखास

हॉटेलाचे भक्त घेती हे टी विस्कूट आणि अमलेट
घरीही लागे डबल रोट तो स्टो किटलीचा या सेट

आवडतो या फार बटाटा तेवी टमाटा ते बटॅर
ट ने सारे युक्त म्हणूनी महती गाती तत् फार

अरिष्ट वाटे मिस्टरना या वेट शिरावर घेताना
पोझिशनला दृष्ट लागते इष्ट देवता ती यांना

कवि नावही हे ट युक्त म्हणुनी-जंटलमन पदवी त्या लाभे
ट चा टक हो तुम्हीही घ्यावा-उने सारे जगी लाभे

## धर्म व अस्पृश्यता संवाद

धुळे मिल १९३६

या प्रदीर्घ कवितेतील काही भाग

(फटका)

पिता — धर्मभ्रष्टा अरे कारट्या - महार मांगा शिवतोसी
जनामनाची लज्जा नुरली - बट्टा आणिला रे मजसी

पुत्र — धर्मभ्रष्ट मी नसे, तात - तुम्ही शिवता केवी यवनासी
गोभक्षक तो देवभक्त हा - ह्या शिवता का मी दोषी ?

पिता — शास्त्री पंडित स्मृतीकार ह्या - मूर्ख ठरविसी का शंखा
वेदग्रंथा शास्त्र पुराणा - पायी तुडवुन तू मूर्खा
वाडवडील तव पूर्वज गाढव - धर्म पाळिला ज्यांनी हा
तूच शहाणा जन्मा आला - अक्कल जगता शिकवाया

पुत्र — रूढीस देता मान तात तुम्ही - शास्त्र ठेवुनि बाजूला
धर्म धर्म परि वृथाच वदता - केवी ऐका त्या लीला
ब्राह्मण म्हणवुनी घेती जे जे - सेवा करिती परक्यांची
पोटा आपुल्या चिमटा बसता - पर्वा नुरते शास्त्रांची
क्षत्रिय वैश्या कुणाही नुरली - दिक्कत चातुर्वर्ण्याची
सेवा करणे परक्यांची का - आज्ञा यांना धर्माची ?
धर्मरूपी हा पोशाखांचा - बुरखा सकला उरलेला
आत्मपरीक्षण केल्यावाचुन - नावे ठेविती इतरांना
शाश्वत तत्त्वे सत्य अहिंसा - अमुच्या धर्मी सांगाया
कुचंबणेने अंत्यज मरती - स्पृश्य हृदीं नच तरिही दया
साधू संता पूज्य मानिता - एकनाथ गुण मुखी गाता
त्यांची कृति मी आचरित अजी - मूर्ख, शंख मज का म्हणता ?
स्वतःच बनला महार ताता - दामाजीस्तव जगजेठी
अंत्यज असता त्याते भजुनी - पुण्य जोडिता का गाठी ?

पिता — देवा अंत्यज म्हणसी कारट्या - हाड तुझ्या नच जिभलीला
वटवट कर ही बंद पोरट्या - नास्तिक पुरता तू बनला

पुत्र — नास्तिक मी की आपण बाबा - शांतपणे हे ठरवा
भक्तिभाव मत् श्रद्धा शिकवी - बुद्धिधर्म हा मजसि नवा
तुम्ही मानता ईश्वर बाबा - श्रद्धा त्यावर जर तुमची
वर्णन त्याचे जरा स्मरा तरि - फिटेल भ्रांती कायमची
जगात नाही अणुरेणूही - जिथे न ईश्वर भरलेला
त्रैलोक्यी तो भरूनी उरला - तत्त्व मान्य हे तुम्हाला
विश्वंभर तो कुठे राहतो - विश्वामाजी उत्तर ये
जनी जनार्दन राहे दुसरे – उत्तर प्रश्ना या ना ये !
आहे जे या पिंडी भरले – भरलेले ते ब्रह्मांडी
अहो दाखवा शास्त्री पंडित – मतास या जो जगी खंडी
परमात्म्याचे स्वरूपची या – आत्म्यामाजी राहतसे
समान सारे आत्मे शिकविती – धर्मग्रंथी मतभेद नसे
अपुल्या आत्म्यासमान पाही – आत्मा इतरांचा नित जो

धर्मबीज हे शास्त्रे वदती – तोची पंडित जगी ठरतो
मायबाप जरि एकच ईश्वर – निर्माता ही विश्वाचा
बंधु आपण सारे नाही – असा दुराग्रह का तुमचा ?
धर्म मूळ जरि दयेत राही – क्षमा शांतिमधे देव वसे
दीन जनाची सेवा जेथे – ईश्वर तैं नित राहतसे
परोपकारा पुण्य नाम दे – पाप असे ही परपीडा
परमधर्म ही श्रेष्ठ अहिंसा – धर्म देई हा खरा धडा
बुद्धिमान जो ऋषीमुनींनी – संत महात्मे आचरिला
खरा धर्म तो पाळिन मी नित – रूढि-धर्म ना पटे मला
समजुनी जे जे इथे वर्तले – भाग्य तयांचे ये भाली
उरलेले जे सर्व करंटे – अधोगती तत् नित झाली
सांगा ताता एक स्पृश्य अन् – दुजा कसा मग अस्पृश्य ?
परमेशाचे रूप जरी जग – पटेल का हो हे दृश्य
अंश ईश्वरी सारे आत्मे – समान ईश्वर जरि सारे
एक ईश्वर अपमान दुजाचा – करील केवी इथे बरे
वैष्णव जे जे म्हणवुनी घेती – विष्णुमय हो जग त्यांचे
म्हणता मानव अस्पृश्या जरि – विष्णुरूप ते कसे नसे

पिता— ईश्वर निर्मित एक स्पृश्य हो – दुजा जन्मतो अस्पृश्य
भेदभाव हे जन्मताच रे – रोज पाहतो ना दृश्य ?

पुत्र— ईश्वर निर्मित नाही ताता – मानव निर्मित हा भेद
शास्त्र पुराणे सांगतात हे – तसेच आपुले ते वेद
मानव तिथुनी एकच बाबा – जन्मता न त्या ये खूण
मातृविहीन घ्या बालक नव – नि सांगा जाती तत् कोण ?
आंबा, बाभुळ, लिंब, फणस वा – पिंपळ, वड हे वृक्ष जरी
बीजे निराळी पर्ण निराळी – जात निराळी पहा तरी
श्वान, बैल वा रेडा, बकरी – वाघ, सिंह वा घ्या हत्ती
पशू जरी म्हणतात तयांना – जात निराळी अहो किती
पोपट, कोकिळ, चिमणी, कावळा, मोर, कबुतरे, चंडोला
पक्षी नावे संबोधा परी – जात एक का तुम्ही बोला ?

ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, शूद्र वा पोट जाती ध्या हज्जार
शिंग कुणा का चार पाय वा शेपुट द्यावा आधार
लाल रक्त का ब्राह्मणास ये – क्षत्रियास येते हिरवे
वैश्या-शूद्रा निळे-जांभळे – प्रकार प्रत्येकास नवे
ब्राह्मण चाले डोक्याने का – क्षत्रिय चाले हाताने ?
वैश्य चालती काय धडाने – शूद्र चालती पायाने ?
ब्राह्मणास ते अन्न खात्रया – क्षत्रिय खाती शस्त्रास्त्रे
वैश्या सोने खाया शूद्रा – गवत सांगती का शास्त्रे ?
ईशा ठायी भेदभाव ना – क्षणोक्षणी ये अनुभवा
अन्नपाणी दे हवा उष्णता – घेता जीवा जन्म नवा
मातीतून ये मातित जाई – शरीर जाती कुणी असे
जन्मापाठी मरण लागले – उच्च नीच नच भेद दिसे
जाळी न अग्नी ब्राह्मणास का – जाळित शूद्रासी फक्त
जातिभेद ना मान्य निसर्गा – समान सकलांचे रक्त
ईश्वर निर्मित नसे भेद हा – स्वार्थी मानव निर्मित हो
पटवु शकेना बुद्धीस कोणी – म्हणुनि न कोणी वर्जित हो

पिता— समजे बाळा अधर्मास त्या धर्म समजलो रे आम्ही
नाश आमुचा आमुच्या हाते आम्हीच केला नच कोणी
संत तुकोबा, एकनाथ आणि ज्ञानोबाची ती वाणी
रूढीप्रिय या समाजास ना पटे छळी त्या अवमानी
जिवंतपणी त्या छळुनी गातो मागाऊन तत् गुणगान
मायावी हा धर्म रूढिरूप राक्षस याचे ना भान

पुत्र— शास्त्राहुन त्या रूढिच मोठी – समाज भीतीने ठरते
बुद्धिमान परी ओळखिती ते – भीति तया मनी तत् नुरते
समाजसेवक लोकहितवादी – फुले, आगरकर ते शिंदे
आचरिती त्या बुद्धिधर्म त्या छळणे आमुचे हे धंदे

## अस्पृश्यता कलंक ( श्लोक )

अहो लाभले भारताला स्वराज्य
प्रतिज्ञा करू या करू ते सुराज्य
दिले प्राण जे आठवू ते हुतात्मे
क्रमू मार्ग जो आचरिला महात्मे
युगानुयुगे भारता भाली भाग्य
न लाभे अम्हा लाभले ते सुभाग्य
अम्ही आमुचा लाविती आज झेंडा
तया रक्षु देऊनिही प्राण दंडा
इतिहास दावी अम्हा दास्य का हे
अहो मूळ तत् जातिभेदात आहे
जगा सिंधुरूपे जरी धर्म हिन्दू
दिसे, भाग तत् हे किती जाति-बिंदू
अहो जातीची चार हज्जार संख्या
किती केवि मोजाल तत् भेदसंख्या
पहा जाहली जाति प्रत्येक धर्म
दुजा स्पर्शता मानिते ती अधर्म
तुम्ही मानिता तुच्छ त्या अंत्यजास
तुम्हा तुच्छ लेखी दुजी जात खास
तुम्हा अंत्यजांचा तदा मान लाभे
वृथा क्षुद्र का तो तुम्हा मान शोभे
नसे शास्त्रि या जातिभेदा पुरावा
कुणी वेद ग्रंथात शोधूनि द्यावा
जरी पूजिता हे तुम्ही धर्म ग्रंथ
करा नष्ट जाती क्रमा हा सुपंथ
वसे सर्वभूती जरी ईशमान्य
तरी अंत्यजामाजि ये कोण अन्य
जरी विश्वि विश्वंभरा धर्म दावी
तरी अंत्यजी तो नसे सत्य केवी

जिथे धर्म सांगे चला एक ठायी
        द्वया भोजना ही कुणा ना मनाई
मिळोनी करू वीर्य कर्मास दोघे
        बनू सर्व तेजस्वी हा बोध घे घे
करावा न कोणी कुणाचाहि द्वेष
        खरा धर्म हा राहि का भेद शेष
'इथे सर्व राहो सुखी' प्रार्थना ही
        दुखी अंत्यजा ठेविता का तरी ही
वदा धर्म आज्ञा तरी सर्व खोट्या
        वृथा मारता धर्म नावे हकाट्या
करा प्रार्थना मंत्र शास्त्रे नवीन
        असे मार्ग हा एक तुम्हा न अन्य

## शेतकरी (फटका)

धुळे मिल, १९३६

कांबळ खांदी वहाण पायी डोई मुंडासे
नांगर घे करी वृषभ रज्जु धरी वदा कोण ऐसे ?
थंडी वारा पाऊस पाणी साहुनि दिनराती
धान्ये पिकवुनी जग पोशिंदा वदा कोण जगती ?
दूध तुपाची रेलचेल करी गोरक्षण करूनी
फुले फळे दे तुम्हा आम्हाला कोण असा अवनी ?
निराधार आणि लुळ्या पांगळ्या गरीब दुबळ्यांना
अन्नदान दे कोण उपाशी राहुनिया त्यांना ?
धन ज्या जवळी शीलधर्म आणि शेतीची माती
कोणाची परी दानशूर अशी जगात या ख्याती ?
साधा भोळा दिसे बावळा सुवर्ण मातीचे
निढळाने करी जादुगार जो नाव काय त्याचे ?

कापुस पिकवून वस्त्र न ल्याया ज्याचा हा न्याय
कर्जापायी लुबाडणाऱ्या कोण चारी साय ?
शास्त्री, पंडित, संत, साधु आणि भोंदू बैरागी
कारू, नारू, सारे पोशी कोण असा त्यागी ?
गाड्या, घोडे, वाडे, माड्या, फॅशनचे बंगले
कुणापरी जगी धनिकांनी या सांगा बांधियले ?
खाया अंडी प्याया ब्रँडी फिरण्या मोटारी
अधिकाऱ्यांची कोण चालवी मिजास ही सारी ?
देव, देवता, भूत, पिशाच्चे, डाखिण वा हडळ
कुणा गृही ही जमूनी सारी करिती चळवळ ?
रोग हटाया जादूटोणा गंडा दोरा वा
कोण लावितो कौल देविला लावाया दावा ?
पैसा दवडुन भांडणात तो भाऊबंदकीच्या
शिळ्या भाकरी कोण खाई मग दारी वकिलांच्या ?
पैसा येता हाती उडवी मौज तमाशाची
दारू पिऊनी पैज लावी मग गाडीघोड्यांची
बारा औते बापाची मग जगी उणे काय
व्यसनापायी सर्व बुडवुनी म्हणे कोण हाय ?
मुला-मुलींना शिकवुनी आम्हा काय करायाचे
बोल कुणाचे 'नोकरीवर का पोट भरायाचे ?
सात पिढ्या जरी बसून खातिल तरी न संपेल'
म्हणुनि ठेवतो कोण आपुली अज्ञ वंश-वेल ?
उत्तर कार्यी बारशात आणि लग्नामधि ऐसा
मुलामुलींच्या कोडकौतुकी उधळी कोण पैसा ?
फुका जगाची उठाठेव करी कारभारी बनून
मजुरावारी शेती करिता निर्धन हो कोण ?
व्यापाऱ्यांना धनिकांना जो चरावया रान
शेतीवाडी गहाण ठेवुन करी कोण चैन ?

शंभर घेई लिहूनी दुप्पट व्याजही दे जबर
पोराबाळा बायकोस करि कोण निराधार ?
उत्पादक जो असून वंचित चाखाया स्वाद
विश्व लुटे तरी कोण सोडिना वडिलार्जित रीत ?
बड्या घराचा पोकळ वासा ज्याचा जगतात
कुळाचार करि उरी कुणाच्या रूढिरूपी भूत ?
भारतभूचा प्रियतम बालक धरणीचा दास
तनमनचित्ते जनसेवा रत काय नाव त्यास ?
ऐकून वाचून अजून नाही सुटले का कोडे
शेतकरी तो रंगा नित त्या गाईन पोवाडे

## नका पिऊ बाबा

[ संक्षिप्त ]

[ दारू पिकेटिंगच्या वेळी १९३० ]

नका पिऊ बाबा – बाबा ही दारू – पिऊनि अम्हा नका मारू
नका पिऊ बाबा – बाबा ही भुरळ – भुरळ ती नसे परी गरळ

अम्हा माराया – माराया जाता – परी ते कळत नाही ताता
तिच्या धुंदीत – धुंदीत असताना – विसरता पोरा बाळांना
जाळते पोट – पोटा जाळुनी – अम्हाला पोसी सोसोनी
कष्ट ती माता – माता ही आमुची – गिळूनी दुःखे देहाची
तुम्हा सुखवाया – सुखवाया झटते – परि ते काळीज उफराटे
तुम्हा असे बाबा – बाबा गाठीचा – देऊनि पैका कमरेचा
जगा दाविता – दाविता आपुला – तमाशा जना फुकटचा
लोळिता जेव्हा – जेव्हा गटारीत – अथवा शेण उकिरड्यात
बोलिता शब्द – शब्द बहु घाण – तुम्हाला असले जरि कान
ऐकू येत नाही – नाही शिवत तैसा – तुम्हांला विचार कवडीचा

पोराबाळांचा – बाळांचा न शिवो – शिवो परि – आपुल्या अब्रूचा
एवढे ऐका – दारू पिता बाबा – वाटते सुख भारी तुम्हा
परी ते नाही – नाही सुख तुम्हा – नसे ते – सात्त्विक पूर्वजांना
जयांनी केला – केला देवधर्म – खर्चुनी पैका हे मर्म
ध्या मनी आता – आता आठवुनी – खर्चा पैका सत्कामी
सोडूनी दारू – दारू ही आहे – मूळ अधर्माचे
मारण्या पोराबाळाचे – नका पिऊ बाबा

## भारत भूमि मुझको प्यार

(विसापूर जेल, १९३२)

भारतभूमि मुझको प्यार — मेरे जीवनका आधार
धर्मभूमि यह कर्मभूमि है — रामकृष्णका धाम
संस्कृतीसे है सबसे बढकर — दुनियामें यह पूर्वापार
कृषीकर्मका जीवन यह है — सुवर्णभूमि जिसका नाम
धनधान्य से हरीभरी है — दुनियामें जो अपरंपार
इसके कारण किये समर्पण — अझाद रणमें प्राण
मुझे स्वर्गसे सबक सिखावे — पालन कर तू यह इकरार

## शिक्षण

दोंडाइचे, ११–१–१९५३

'राष्ट्र युवकांना बालकांना काय
द्यावे शिक्षण' ह्या सवालाचे
उत्तर हे आज बनवा तयांना
करारी न नाजूक राहोत ते
इंग्रजीने होते जगाचे या ज्ञान

जगण्याचे न हो परी पहा
जगण्याचे किंवा जगाचे हा आज
उभा प्रश्न आम्हा पुढे असे
जग समजते मुर्देच आम्हांला
निश्चित हे झाले ज्ञान आम्हा
गुलामीचे आधी फेकणे घोंगडे
निष्क्रिय करी जे राष्ट्रा माझ्या
इंग्रजीचा मोह टाळणे हे आधी
कर्तव्ये तेणे मत् होई आज
त्याविण शाळांचे तेज ना प्रकटे
निश्चित विचारा समजावा
इंग्रजी विद्वान किसानांशी माझ्या
बोलूहि शकेना धड येथे
रामा रंगा टाळी मोह इंग्रजीचा
ग्रामोद्धार ध्येय ज्याचे असे

## तिरंगा

दोंडाइचे, २५–३–५४

तिरंगा प्यारा – जगताचा शांती सहारा
अरि रुधिराचा डाग न ज्याला
सत्य अहिंसा व्रतास ल्याला
प्रेम शांतीच्या वर्षवी धारा
तिरंगी प्यारा

लोभी वृत्ती द्वेष वाढवी
माणुसकी हीन जीवन घडवी
त्यागे लोभे प्रेम दाखवी
तिरंगी प्यारा

शस्त्रास्त्रे जरी जगा जिंकिती
अशांति राही जाई न भीति
बलिदाने दे निश्चित शांती
तिरंगी प्यारा
शस्त्रास्त्रांनी रक्त पिपासा
वाढे अनुभव जगात हिंसा
मानवास दे शांति दिलासा
तिरंगी प्यारा
मानवतेला करी आवाहन
द्वेषरहित जो कष्टा साहून
विजयी झाला जिंकून जग मन
तिरंगी प्यारा
आवाहन दे जमीनदारा
भू दे थांबव जगसंहारा
घेई यज्ञी भू संभारा
तिरंगी प्यारा
भूदानाने रक्त क्रांति ती
शमली भारती झाली शांती
जगता दे ही दिव्य प्रचीती
तिरंगी प्यारा

## अभंग

( जग कामगारांचेच– दोंडाइचे १३–९–५३ )

वस्तुतः जग कामगारांचेच
कामगार वाही भार त्याचा
कारखान्यात वा शेतात राबो तो
करी जग कामे तोच सारी
त्यांच्याच कृपे हे चाले सारे जग

ऐसे नित्य जाई मानले ना
अदृश्य ईश्वरा मानतो ना आम्ही !
पृथ्वी भार वाही समजतो
कामगार आम्ही पहातो प्रत्यक्ष
भार तो वाहतो हेही दिसे
कामगारा माजी राही जो ईश्वर
ओळखा तयास म्हणजे झाले
कामगारातील ईश्वर पाहाता
तंटे मिटतील आपोआप
प्रेमभाव साऱ्या विश्वाचा वाढेल
करतील त्यांची सेवा सारे
मजुरांची सेवा करिता करिता
स्वताच मजूर बनतील
श्रमी मार्गाची ही शिकवण रामा
रंगा आचरील ऐसे करी ।

## धन्य धन्य हा हिन्द

धन्य धन्य हा हिन्द हो – धन्य धन्य हा हिन्द
माझा धन्य धन्य हा हिन्द
क्लेशा साहून त्यागाने दे जगास नित्य आनंद जो
बलिदानाने थांबे हिंसा – शिकवी हा वेदान्त – हो
सत्य अहिंसा असंग्रहाच्या – अस्तेयाचा छन्द हो
शस्त्रास्त्रावरी मात करी यत् पटवी हा सिद्धांत हो
स्वराज्य मिळविती जगात पहिला – घडविती हा दृष्टांत हो
साम्यवाद दे समाजवाद ही – रक्त क्रांती करी शांत – हो
वर्गविहीन तो शोषणरहितहि – नाही कुणा मग भ्रांत हो
युगे युगे ही शांति अहिंसा – संस्कृती देती संत हो
ऋषी महर्षी महंत जेथे – मानव्याचा पंथ हो

# भूमिदान–कूचगीत

रंजाणे, २३-२-५४

भूमिदान भूसमान हा आवाज आजचा
घुमवू या दशदिशात घोष हाच क्रांतीचा
भूमिदान भूसमान घडवू या चहुकडे
शमवू रक्त क्रांतीचे जगातले चला सडे
साम्यवाद दे जगास वर्गकलह भांडणे
द्वेष तो नको अम्हा नको अशांत ते जिणे
मानव मी मानववत् बंधु जो जगातला
भूमिदान यज्ञी हा बोध दिव्य घेतला
प्रेम देऊ, प्रेम घेऊ, फुलवू प्रेमवेलीही
भरवू प्रेमपुष्पांनी प्रेम फळांनी मही
अन्नपाणी सदन हवा औषध मज लागते
गरज तीच सकलांची तत्त्व आज उमजते
शिक्षणसम संधी मिळो गुणविकास व्हावया
मानव जो हक्क त्यास हा मिळो नको दया
ये स्वराज्य हो सुराज्य हीच एक भावना
राखून मत हक्क दिला भारती प्रजाजना
प्रजाराज्यिं भेद करू नष्ट ती विषमता
जातियता वंशभेद गाडु चला करू समता
हिंदभू अम्हास माय लेकुरे तिचे आम्ही
बंधु सकल जीवन सम त्या मिळेल द्या हमी
भूमिदान यज्ञ त्याग प्रेम भ्रातृभावना
निर्मिल करी द्वेष शांति संशय ना हा कुणा
संत विनोबा जगास दान भूमि मागती
समसमान वाटून द्या, द्या जगण्याची शाश्वती
भूमिदान द्या चला करा द्रव्य दानही
दानपत्र घेऊनि करा त्वरे तुम्ही सही

सान, थोर, गरीब, धनिक, स्त्री, पुरुष या चला
देवाची करू जमीन गावची आजला
कसेल तत् जमीन ही श्रमेल तो धनधनी
पिकेल जो श्रमेल जो तया मिळेल ध्या मनी
कुटुंब एक गाव सर्व ग्राम राज्य निर्मु या
एकाचे दु:ख तेच सकलांचे समजु या

## मद्धर्म

सर्वत्र वर्जिल भया श्रम दे शरीरा
भावा न स्पर्शील अशा हृदयात थारा
ते ब्रह्मचर्य व्रत सत्य तशी अहिंसा
अस्तेय शांतिरूप होईल धर्म माझा
न स्वाद काही रसनेस मदीय ठेवी
वृत्तीं स्वदेशव्रत मार्गि सदैव नेई
जो नम्रता शिकवि नित्य असंग्रहाते
मद्धर्म तो सतत पाळिन निश्चयाते
ईर्षा न द्वेष असुया मद मत्सरास
दे क्रोध मोह विषयास न आश्रयास
सेवा परायण करी मनुजा सदैव
निष्काम निर्लभ सदा मम तोच धर्म
ठेवू नकोस कवण्या जगी दास्य पंकी
राहू नको शिकवितो मज पारतंत्र्यी
स्वातंत्र्य भानुरूप जो विलसे जगी या
मद्धर्म दास्य तिमिरा हटवोनी साऱ्या
जो भाव आपपर घालवुनी मदीय
मानी दुजा स्वरुप हे करि तत्त्व ज्ञेय
लाभे स्वतास इतरासहि तेच द्यावे
मद्धर्म हे शिकवि वाग समत्व भावे

उल्हास जो नुपजवी यश लाभ होता
संताप ही नुपजवी मम हानि होता
उद्वेग भाव मम जागृत दुःख होता
होवू न दे सुख त्रिलोभन धर्म भ्राता
दे नाम पुण्य मम धर्म परोपकारा
तो पाप नित्य म्हणतो परपीडनाला
मानी अधर्म मम धर्म जगी असत्य
मद्धर्म हो परमश्रेष्ठ पवित्र सत्य
पुत्रावरी करिसी प्रेम तसेच दासा
दे अन्नदान भुक ज्या मग घेई घासा
सेवा करी पिडित दुःखित प्राणि यांची
भूतावरी नित दया करि सार धर्मी
निर्मील जो हृदयी संस्कृति स्वाभिमान
वाढीस लावि नित प्रेम स्वराष्ट्रमान
जागृत ठेवि नित वाडवडील कीर्ती
आत्मोन्नति शिखर गाठिल धर्म स्फूर्ति
देई विचार सरणी नित जो पवित्र
साधी करील रहणी मम दीन रात्र
सात्त्वीक शुद्ध करि वर्तन सौख्यदायी
सद्धर्म तो मदिय मंगल सर्व ठायी
सत्संग सन्मति सुनीतिहि सद्विचार
हो स्वावलंबन सुमार्ग सुकर्म प्यार
आचार देह मन वाणि करील शुद्ध
मद्धर्म मुक्ति मज देईल शास्त्रशुद्ध
मातेसमान निज समान परस्त्रियांना
दे नारि अब्रुधन रक्षण कार्यि प्राणा
वांछू नको परधना करि कष्ट नित्य
मद्धर्म हेच शिकवि जगण्या अनित्य
मानव्य धर्म मनुजा जगी सर्व श्रेष्ठ
तो राष्ट्रधर्म दुसरा मनुजास इष्ट

हिंदू, इसाई, यहुदी, शिख, मुसलमान
जो धर्म रूढ जगि शेवट त्यास स्थान
मानव्य हा परमधर्म मदीय होवो
मद्धर्म हिंदी जगधर्मी अनित्य राहो
जातीय भेद अवघे नित ते त्यजून
हिंदू म्हणून तदनंतर मी जगेन
अस्पृश्य स्पृश्य नीच उच्च न भेद काही
जातीयतेत मम धर्म कधी न राही
मद्धर्म तो अखिल धर्मी समानतेला
ठेवूनि पाळि परधर्मि सहिष्णुतेला
वेचील मी तनमन धन आयु सारे
आचार शुद्ध नित राखुनि सद्विचारे
हा आत्मसात निजधर्म करीन खास
साफल्य देईलचि या विभु बालकास

## नित्यनवीन

ससून पुणे, २१-१-६५

[ रवींद्रनाथ टागोर यां या गीतांजलीचा भावानुवाद ]

प्रियतमा नवनवी रूपे यावे घेऊन तू सदा ।
प्राणामधी प्रभो माझ्या संचरावेस तू असे ॥
सुवासात ये तू देवा तू ये रंगात ही सख्या ।
रोमांचित स्पर्श तू बनुनी देही ये पुरुषोत्तमा ॥
चित्ती अखंड हर्षाचे अमृत तू बनून ये ।
प्रियतमा मुग्ध नयनी ये जे असती दर्शनोत्सुक ॥
प्रियतमा नवनवी रूपे यावे घेऊनि तू सदा ।
प्राणामधी प्रभो माझ्या संचरावेस तू असे ॥
निर्मला उज्वला येई येई, हो मनोहरा ।
सुंदरा स्निग्धा येई प्रशांता येई तू सख्या ॥
सुखदुःखात ये माझ्या येई कामातही प्रभो ।
नित्य नैमित्तिक जी जी असतील जी मदीय रे ॥
माझ्या सर्व कामांचा ध्येयबिंदू बनून ये ।
घेऊनी नवनवी रूपे यावे प्राणात मत् प्रभो ॥



दा. क्र. 2527 वि. क्र. 22553

REFBK-0022553

## कै. अण्णासाहेब टोणगावकर यांच्या राजकीय, सामाजिक, विधायक कार्याचा थोडक्यात आढावा

(१) १९२९ ते १९३६ दोंडाइचे येथील स्वो. वि. संस्थेचे संस्थापक व शिक्षक.
१९२९ ते १९५४ स्वो. वि. गृहाचे व्यवस्थापक.

(२) १९३० ते १९३२ वैयक्तिक सत्याग्रह. १९४२ च्या लढ्यात भाग.

(३) १९३८ पश्चिम खानदेश जिल्हा काँग्रेस कमिटीचे सेक्रेटरी.

(४) १९३८ ते १९५२ महाराष्ट्र प्रांतिक काँग्रेस कमिटीचे सभासद.

(५) १९३८ ते १९४५ शिंदखेडे तालुका साक्षरता प्रसार शाखेचे संस्थापक व चेअरमन.

(६) १९४१ ते १९४५ महाराष्ट्र विधायक कार्यसमितीचे सभासद.

(७) १९४४ ते १९४९ पश्चिम खानदेश राष्ट्र सेवा दल प्रमुख.

(८) १९४७ महाराष्ट्र राष्ट्रभाषा पश्चिम खानदेश सभेचे अध्यक्ष.

(९) १९४७ ते १९४८ जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष.

(१०) १९४७ ते १९४८ कमांडिंग ऑफिसर, पश्चिम खानदेश जिल्हा दारूबंदी समिती.

(११) १९४८ ते १९४९ संस्थापक व चेअरमन दोंडाइचा गिऱ्हाईक सहकारी संस्था.

(१२) १९४८ ते १९४९ तेलगिरणी कामगार संघाचे संस्थापक व चेअरमन.

(१३) १९४८ ते १९४९ जिल्हा स्कूल बोर्ड सभासद.

(१४) १९४८ ते १९४९ सभासद पश्चिम खानदेश भंगी सेवा समाज.

(१५) १९४८ ते १९५० कंजर विमोचित जातीच्या उन्नतीकरिता प्रयत्न.

(१६) १९४९ ते १९५४ दोंडाइचे शेतकरी लोह सरंजाम सहकारी संघ संस्थापक व चेअरमन.

(१७) १९५३ ते १९५४ शिंदखेडे तालुका सरकारी संस्थांचे लवाद.

(१८) १९५३ ते १९५५ सभासद जिल्हा काँग्रेस निरीक्षण समिती.

(१९) १९५३ दोंडाइचे दुष्काळ निवारक समितीचे प्रथम उपाध्यक्ष नंतर अध्यक्ष.

(२०) १९५४ ते १९६८ महाराष्ट्र प्रांतिक हरिजन सेवक संघाचे चिटणीस.